

जी ए कुलकर्णी यांच्या १० कथांवरील चर्चा- भाग -७

सर्प (सांजशकुन)
सांगाडा (निळासावळा)
साधू (सांजशकुन)
सूड (निळासावळा)
सोडवण (रक्तचंदन)
सोयरे (सांजशकुन)
स्लीला (हिरवेरावे)
स्वप्न (काजळमाया)
हिरवी मखमल गोरा हात(निळासावळा
तक्षक (हिरवेरावे)

जीए कथास्वाद

भाग ७

जीए कथास्वाद ७

जी ए कुलकर्णी यांच्या कथांवरील चर्चांचे संकलन

संकलन व संपादन- सुनीळ सामंत

ई प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

9987737237

या पुस्तकातील सर्व लेखनाचे व चित्रांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे व चित्रकारांकडे आहेत. पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

जी ए कथास्वाद ७

सर्प (सांजशकुन)

सांगाडा (निळासावळा)

साधू (सांजशकुन)

सूड (निळासावळा)

सोडवण (रक्तचंदन)

सोयरे (सांजशकुन)

स्लीला (हिरवेरावे)

स्वप्न (काजळमाया)

हिरवी मखमल गोरा हात (निळासावळा)

तक्षक (हिरवेरावे)

प्रास्ताविक

मराठीतील सर्वोच्च कथालेखकांमध्ये ज्यांचे नांव अग्रक्रमाने घ्यावे अशा श्री जी ए कुलकर्णी यांच्या शताब्दीचे वर्ष २०२२-२०२३. या वर्षाचे सार्थक व्हावे या हेतूने जीएंच्या कथांचे प्रेमी एकत्र येऊन त्यांनी एकावेळी फक्त एक कथा घेऊन त्यावर जमेल तितकी सखोल चर्चा करून, त्या कथेतून काय मिळाले ते सांगण्याचा प्रयत्न केला. जीए यांची कथा लोलकासारखी प्रत्येकाला वेगळा प्रकाश, वेगळा रंग दाखवते. हिऱ्यासारखे जीएंच्या कथेला अनेक पैलू असतात आणि वेगवेगळया वाचकांना त्यातले वेगवेगळे पैलू दिसतात.

चौघांनी आपल्याकडचा एक एक रुपया दिला आणि त्यातून एक एक रुपया घेतला, तर पर्त्येकाकडे एकच रुपया रहातो. पण प्रत्येकाने एक एक विचार दिला तर चौघांकडे चार चार विचार जमा होतात. विचारांच्या या शिस्तबद्ध पण मुक्त देवाणघेवाणी मुळे ही चर्चा अत्यंत आनंदमय झाली. होते आहे. या चर्चेत इतरांनाही आनंद घेता यावा यासाठी हा संकलित पुस्तकप्रपंच.

- संकलक- सुनीळ सामंत (9869674820)

चर्चेतील सहभागी व्यक्ती

आशा भागवत
अतुल ठाकूर
अभयकुमार कुलकर्णी
अलका तडकलकर
अशोक पाटील
उमेश तुपे
कस्तुरी महेश
जयश्री जंगले
माधव पुराणिक
दिलिप बडे
नागेश कुलकर्णी
नितीन वैद्य
निशा क्षिरे
परमजीत सिंग
प्रदिप कुलकर्णी
प्रमोद कुलकर्णी
प्राची बापट
मंजिरी देशमुख
मनमोहन आंबेकर
महेश आफळे
मिलिंद सकपाळ
मिहीर ठकार

यतीन गुळवणी
राजेश उनवणे
राम कुलकर्णी
लक्ष्मीकांत देशपांडे
लखन दगडे
वंदना बोकील
वर्षा हळबे
विलास वाघोलीकर
विशाखा आपटे
विशाखादत्त
विश्वेश्वर नांदेडकर
वैभव कुलकर्णी
शिवाजी कुऱ्हाडे
श्रीकांत देशमुख
संजीव कुलकर्णी
साधना डोंगरे
सुनीळ सामंत
सुमन महामुनी
स्नेहल बोकील
हेमंत खडके
पुरुषोत्तम मोने
मेघा महाजन



जीवन इतके अनंतरुप आहे की अगदी संपूर्णपणे माझ्यासारखेच आयुष्य असलेला माणूस पूर्वी कधी झाला नाही व पुन्हा कधी होणार नाही. त्या दृष्टीने प्रत्येक सामान्य माणूस देखील अद्वितीय असतो. मी गेल्यानंतर एक अव्दितीय भावविश्व पूर्णपणे विरुन जाणार आहे

सर्प ---- कथासंग्रह-सांजशकुन

राजेश उनवणे : सर्प

(कथा लेखक - श्री. जी.ए.कुलकर्णी कथासंग्रह-सांजशकुन)

सांजशकुन संग्रहातील ही सहावी कथा.

कथेतील पात्रे –

१) तो साप

२) तरुण साप (साप समाजाचा भावी नेता)

३) प्रमुख-वृद्ध साप (साप समाजाचा सध्याचा नेता)

४) एक सौन्दर्यवती स्त्री (शारिरीक वासनेचे मूर्तीमंत रूप)

५) विवरातील सापांचा समाज (बिनपापण्यांचे स्थिर डोळे व जिभांची सुते लोंबत असलेला, रखरखीत वाळवंटातील अंधाऱ्या कुंद विवरात, सैलसर वेटोळी टाकून समाधानाने राहणारा सापांचा समाज.-- इति जीए)

कथेची सुरवात “तो साप” च्या विवरातील प्रवेशाने होते. आज तो खूप खुश आहे. त्याने आज जणू “सोनियाचा दिनु” पाहिलेला आहे. त्याचे आयुष्य कृतार्थ झाले आहे. कारण आज जो उत्कट आनंद त्याला झाला आहे, तो आनंद— “पूर्वी कोणास मिळालेला नाही. भविष्यातही कोणास मिळणार नाही.”—असा त्याचा ठामपणे दावा आहे.

त्या आनंदात विवरात प्रवेश करते समयी विवरातील “वृद्ध सापांसमोर नेहमीप्रमाणे आदराने न सरपटता” तो एका धुंदीत वेगाने विवरात प्रवेश करत आहे. त्याची ही कृती विवरातील सर्व सापांनी पाहिली. काहीतरी निराळे, सर्वस्वी जगावेगळेच अद्भुत असे काहीतरी वेगळे घडल्याची सर्वांना जाणीव झाली आहे. सर्वांना काय घडले हे ऐकण्याची उत्सुकता आहे.

पण तरीही कोणीही त्यास किंमत दिलेली नाही. उत्सुकता दाखवली तर जास्तच भाव दिल्यासारखे होईल. (मानवी स्वभाव)

प्रमुख वृद्ध सापाने तर त्याचेकडे बघितले पण नाही. इतर वृद्ध सापानी त्यास बघितले, पण परत सुस्तपणे पडून राहिले. इतर बाकीच्या सापांना उत्सुकता आहेच. पण या सर्वांनीच आपली उत्सुकता ढोंगीपणे झाकून ठेवली आहे.

तो साप आपल्याला कोणीतरी प्रश्न विचारेल म्हणून वाट पहातो. कोणी काहीच त्याला विचारत नाही. एवढी महत्त्वाची घटना त्याला सर्वांना सांगायची आहे, पण इतर सापामध्ये ऐकण्याची उत्सुकता असूनही ते त्यास किमत देत नाहीत. एकही प्रश्न विचारत नाहीत. यामुळे तो हिरमुसला झालेला आहे.

-------- (येथे जीए मानवी समाजाचा दांभिकपणा दाखवतात. हा एक मानवी स्वभाव आहे. दुसऱ्यास जास्त भाव न देण्याचा. दुसऱ्याजवळ काहीतरी विशेष असेल, मग ते विशेष एखादी घटना असेल, वस्तू असेल किंवा इतर काही. त्या विशेषाच इतरांना कुतूहल असते, पण स्वत:हून विचारले तर त्यास फारच हरबऱ्याच्या झाडावर चढवल्यासारखे होईल, तेव्हा स्वत;हून त्याने सांगितले तर बघू, ही मूळ मानवी प्रवृत्ती. ही सगळीकडेच असते. अर्थात समाजात सगळ्यांचीच

तशी वृत्ती नसते. बरेच यास अपवाद असतात. पण कथेमध्ये एकही या अपवादाचे पात्र नाही. साध्यासाध्या कृतीतून मानवी स्वभावाच्या विविध पैलूंचे दर्शन घडवणे हे जीए यांचे एक वैशिष्ट्य त्यांच्या कथेतून नेहमी दिसते. या कथेतही, या छोट्याशा घटनेतून एकंदरीत समस्त मानवी समाजाच्या दांभिकतेवर जीए प्रकाश टाकतात. तेही सापांचे प्रतिक घेऊन.)-------

"तो साप" शेवटी स्वत:च न राहून एक अविस्मरणीय दिवस पाहिल्याचे भाग्य, सौख्य मिळाल्याचे सांगतो. (सौख्य किंवा यश कितीही उच्च दर्जाचे असले, तरी जोपर्यन्त ते इतरांनाही मिळण्याची शक्यता असते तोपर्यंत ते दैदीप्यमान होत नाही.—इति जीए)

ते ऐकून सर्प-समाजात खळबळ होते. त्याने काय पाहिले हे ऐकण्याची उत्सुकता निर्माण होते.

त्यांच्यातील "तरुण साप" डौलाने पुढे येतो. त्याच्या साध्या हालचालीतही त्याच्या सामर्थ्याचा दिमाख, डौल, अहंकार दिसत असतो. सर्प समाजाचा भावी नेता होणारा तो तरुण साप त्यास विचारतो, "भूतकाळात इतरांना न मिळालेले व भविष्यातही कोणास मिळणार नाही असे सुख तुला मिळाले, असे तू म्हणतोस; पण असे भाग्य तुझ्याच वाट्याला यावे, असे काही विशेष मला तरी तुझ्यात दिसत नाही."

सर्प-समाजाने यापूर्वी इतरांना दिपवण्यासाठी अशा वाटेल त्या कहाण्या सांगणाऱ्या सापांची भेट मृत्यूशी कशी घालून दिली होती त्या कृत्यांची तो दोन उदाहरणेही देतो.

त्या कृत्यात "तो साप" ही सामील होता. त्या कृत्यांची आठवण त्यास आहे. तरीही हर्षाने "तो साप" म्हणतो, "माझी कहाणी भाबडी नाही. ती अनुभवलेली कथा आहे. तो आनंद, ते सुख मला मिळालेले आहे. मला तुमच्या या अंधाऱ्या गुहेत, तुमच्याबरोबर रहायची इच्छा कधीच नव्हती. कधीकाळी येथून कायमचे निघून जाण्याची शपथ पूर्वीच घेतली होती."

असे सांगून तो त्याचा अनुभव सांगतो.

अनुभव स्त्रीचा आहे.

स्त्रीचा अनुभव समजताच सर्व साप आपली उत्सुकता उघडपणे दाखवतात.(इति-जीए)

तो अनुभव शय्यागारात दिसलेल्या एका सौन्दर्यवती स्त्रीचा आहे. ती आरशासमोर उभी आहे. तिच्या असीम सौंदर्याने तो आरसा तडकेल की काय अशी भीती तो साप व्यक्त करतोय. ती विवस्त्र होऊन आरशात स्वत:चे सौन्दर्य पहाण्यासाठी ती वळते तेव्हा ती तिचे डोळे क्षणभर पूर्णपणे “तो साप” वर रोखते.

त्याच क्षणी डोळयावर प्रकाशकिरण पडल्याप्रमाणे एक साक्षात्कार “तो साप” याला झाला. तिला त्याने एकच क्षण पहिले.

पण त्या क्षणी त्याने मरण अनुभवले व पुन्हा जन्मलो असे तो सांगतो.

स्त्री-पुरुषांच्या निर्व्याज सुखात निर्माण झालेली शारिरीक वासना, तिचा उगम याबाबत “तो साप” आपल्या सर्प -समाजासमोर विवेचन करतो. तो साक्षात्कार त्यांना सांगतो.

तो म्हणतो----

----- *“निर्मात्याने इतर जनावरे आधी घडवली. माणसापर्यंत येईतो त्या निर्मात्याचे हातचे कसब कमी झाले. ही उणीव भरुन काढण्यासाठी, निर्मात्याने मानवास –-”सृष्टीतील आपण सर्वश्रेष्ठ प्राणी आहोत”-- असा अहंभाव देऊन कशीबशी ती उणीव झाकून टाकली. मानवी देहाला मांस मिळाले त्याचवेळी त्याला वासनेचे बीज मिळाले. त्याचा आनंद त्याला भोगायचा असतो. पण निर्व्याजपणे भोगायची त्याला परकोटीची शरम वाटते. याउलट जनावरात स्वच्छ मोकळेपणा असतो. ते मळकट मनाने खात नाहीत, माणूस मात्र अधाशासारखा खातो. हा ओशाळलेपणाचा, मळकटपणाचा ठिपका माणसाच्या दृष्टीत कायमचा राहून गेला आहे. हे सारे त्या क्षणी मला समजले. जाणवले. त्याचक्षणी ती सौन्दर्यवती*

स्त्रीदेखील,-- हे सारे समजल्याप्रमाणे जणू मी तिला दिसून, माझी लालसा तिने ओळखल्याप्रमाणे -- ती किंचित हसून पडद्याआड निघून गेली.”

यानंतरही सर्प-समाजासमोर “तो साप” त्याचे पुढील अनुभव कथन करतो.

ते वाचून वाचकांना काही गोष्टी स्पष्ट होतात. लक्षात येतात.

“तो साप” यास साक्षात्कार झालेला आहे., तोही एका क्षणात. पण त्या क्षणी त्याने मृत्यु अनुभवला व जणू पुनर्जन्म झाला. दोन्हीतही वेदना असतात. पण त्या क्षणापसून इतर साऱ्या गोष्टी त्यास अर्थहीन व कुरूप वाटू लागल्या. त्या क्षणापासून त्याचे आयुष्यच बदलून गेले. हे जर का घडले नसते तर इतर सापाप्रमाणेच त्याने आपले आयुष्य संपवले असते.

वासनेला जिंकणे, शरीरातील शारिरीक वासनेला मारून टाकणे हे “तो साप” याचे स्वप्न होते. वासनेला जिंकण्याच्या त्याच्या इच्छेला फळ येणे त्याला अशक्य वाटत होते. पण आता त्या इच्छेला दिशा लाभली होती.

त्या सौन्दर्यवतीचे दर्शन, ते दृश्य पुन्हा दिसावे म्हणून शय्यागार असलेल्या प्रासादाभोवती तो प्रदक्षिणा घालत राहतो. अतृप्तपणे.

आणि एक विशेष घटना घडते.

ती सौन्दर्यवती एकेदिवशी, रस्त्यात तिचीच वाट पाहणाऱ्या त्यास पकडते. लाकडी चिमट्याने उचलते. फळांच्या टोपलीत टाकून झाकण लावते. (“त्या क्षणी मला भीती वाटली नाही. वाटली ती एकच भावना – सुटकेची, मुक्ततेची!” –इति “तो साप”)

आणि तो दिव्य क्षण उजाडतो.

ती टोपलीचे झाकण उघडते. (ज्या क्षणी स्वप्न सत्य म्हणून जन्माला येते आणि लालसेचा उगम म्हणजेच तृप्ती ठरते असा दुर्लभ क्षण ! –- इति जीए)

झाकण उघडून त्यास उचलते. धीटपणे. आणि म्हणते, “ये,आता तूच माझा सखा आहेस. एक देदीप्यमान साम्राज्य मावळत असता तूच त्याला आता निरोप दे.”

“तो साप” ज्याने आयुष्यभर वासना जपली आहे, त्या जपलेल्या वासनेने तो तीला दंश करतो. ती मरते. ती आता पूर्णपणे त्याची झाली. अशातऱ्हेने “तो साप” याचे स्वप्न परिपूर्ण होते.

(*“परिपूर्ती नंतर जी श्रांतता येते, सुख पूर्ण झाल्यावर जी आर्द्रता राहते,त्यांच्यामूळे मी इतका संथ झालो. पण हे अंधारे विवर, त्यातील सडलेली हवा आणि त्यातच निर्जीवपणे जगणारे तुम्ही हे पाहिल्यावर माझ्यात सामर्थ्य आले. माझ्या सुखाला तुलना नाही इतके ते परिपूर्ण होतेच; पण तुमच्यासमोर आता त्यावर इर्षेची झळाळी चढली आहे.”* –इति “तो साप)

सर्प-समाजात या अनुभव-कथनाने खळबळ माजते. “तरुण साप” अशी कोणी स्त्री अस्तित्वात नसल्याचे व हे सर्व खोटे असल्याचे ऐलान करतो. इतर सापांनी या भावी नेत्याच्या स्वप्नावर लगेच विश्वास ठेवला आहे. “तो साप” आपल्याला फसवत आहे याचा संताप त्यांना येतो. तेव्हा “प्रमुख वृद्ध साप” प्रथमच कथेत तोंड उघडतो..

तो ही माझ्या दीर्घ आयुष्यात अशी स्त्री कधीच न पाहिल्याचे सांगतो. आणि असे खोटे-नाटे सांगितल्यावर दिल्या जाणाऱ्या प्रायश्चिताची आठवण करून देतो.

हे एकप्रकारे “तो साप” यास मारण्याचे दिलेले अनुमोदनच असते.

भावी नेता होणारा “तरुण साप” वेगाने पुढे येऊन “तो साप” वर हल्ला करतो. सर्प-समाज भावी नेत्याचे अनुकरण करतो. “तो साप” मरतो.

या घटनेनंतर....

“वृद्ध प्रमुख साप” (सध्याचा नेता) “तरुण सापा”ला (भावी नेता) समोरील उंच खडकावर नेतो. आणि त्यास, ती सौन्दर्यवती स्त्री अस्तित्वात असल्याचे सांगतो. “तो साप” सुदैवी असल्याचे सांगून तिला पाहिल्यानंतर “तो साप” सारखीच तप्त तारेसारखी वासना माझ्यात निर्माण झाल्याचे कथन करतो.

माझ शरीर थकले आहे, शरीरातील जोम गेला आहे, पण अजूनही माझी “आसक्ती” राहिली आहे., असे प्रामाणिकपणे कबूल करतो.

वासना जिंकू न शकल्याची त्याची खंतच जणू तो व्यक्त करतो.

त्यावर....

“तरुण साप” (भावी नेता) त्या “प्रमुख वृद्ध साप” (वर्तमान नेता) विचारतो की, “तुम्ही त्याची हत्या करण्याची सूचना का केलीत?”

“प्रमुख वृद्ध साप” म्हणतो, “ *मी काय म्हणतो ते नीट ध्यानात घे. अशी सौन्दर्यवती स्त्री अस्तित्वात आहे, हे मला सगळ्यांसमोर सांगायचे नव्हते. आणि जरी मी सांगितले असते, तरी मी त्याची”* हत्या करण्याचाच सल्ला दिल असता. उद्या *तुला या सापांवर सत्ता गाजवायची आहे. अशी स्वप्ने बाळगणारे साप तुझ्या सत्तेखाली सौम्यपणे राहतील का? सत्ता-संपत्तीच्या जाळ्यात “तो साप” सारखे साप अडकत नाहीत. सत्ता आणि स्वप्ने एकत्र नांदू शकत नाहीत. अशी स्वप्ने पाहणाऱ्यांना न विसरता तू निष्ठुरपणे मारून टाक. ठेचून टाक.*

आणखी एक. तू सत्ताधारी असलास तरी एक व्यक्ती आहेस. जर नसेल तर व्यक्तीच्या जीवनाला अर्थ नसतो. म्हणून तू स्वत:पुरती अशी स्वप्ने जप. स्वप्न जर सहजपूर्ण झाले तर त्यासारखे मलिन, क्षुद्र दुसरे काही या जगात नाही. अशक्य वाटणारे स्वप्न जर तुझ्या आयुष्यात आले, तर त्याचा ताप तुला होईल. त्याची अशक्यता तू स्वीकार. कृतज्ञतेने त्याचे स्वागत कर.

स्वप्नपूर्तीसाठी आपली निवड झाली नाही, असे समजूतदारपणे स्वीकार.”

इतके बोलून “प्रमुख वृद्ध साप” “तरुण सापा”स इतक्या उंचीवरुन तुला काय दिसते आहे?,असे विचारतो.

“माझे घर मला येथून दिसतच नाही. ते इतके खाली दूर राहिले आहे की माझ्या मनाचा थरकाप होतो आहे.” – असे “तरुण साप उत्तर देतो.

“प्रमुख वृद्ध साप” त्यास म्हणतो,

“ घर इतके खाली राहिले असे म्हणण्याऐवजी आपण इतके उंच आलो असेदेखील तुला म्हणता आले असते. एकंदरीत तू झपाटून टाकण्याची आशा असलेली स्वप्ने बाळगल्याचे दिसत नाही. त्याबाबतीत तू सुरक्षित आहेस. त्यामूळे तुला अशा स्वप्नाबाबत इशारा देण्याची गरज नाही. तू आता खाली जा. मी परतणार नाही.”

“तरुण साप”. “का परतणार नाही?” असे विचारतो.

वृद्ध साप म्हणतो,

“वासनेला जिंकण्याचे माझे स्वप्न भंगलेले आहे. आता ते पूर्ण होणे अशक्यच आहे. (थोडक्यात, वासनेची आसक्ती राहिली होती. कथेमध्ये त्याची कबुली वृद्ध सापाने पूर्वीच दिलेली आहे.) सत्ताही आता माझ्याकडून तुझ्याकडे जाणार. आणि मग “सत्ताही नाही आणि स्वप्नही नाही” अशा मला जगून तरी काय उपयोग?..

उरला आहे हा फक्त देह. आसक्ती न सुटलेला.

निव्वळ एक कात. थकली असली तरीसुद्धा स्पर्शाला आसुसलेली एक त्वचा. ती ठेऊन काय करायच आता?”

इतके बोलून वृद्ध सापाने आपले जीर्ण हताश शरीर उंचावरून फेकून दिले.

“उन्हाने धगधगलेल्या खालच्या दगडावर”

-------000------

आदरणीय जीए,

कथा वाचून थक्क व्हायला होते. वासना, आसक्ति स्वप्न आणि सत्ता यांची आपण गुंफलेली सांगड पाहून नतमस्तक होण्याशिवाय हाती काय उरते?

कोठून आणलीत ही प्रतिभा? कसे कमावलेत हे बुद्धीचातुर्य?

सारच अजब, अतर्क्य, अविस्मरणीय...!

आपणास दंडवत, लोटांगण वगैरे वगैरे वगैरे...! 🙏

सुनीळ सामंत: वाह.

राजेशजी कथा सर्वांगांनी दाखवली तुम्ही. त्यातले सर्व पैलू, कथेमागची कथा. सुंदर विवेचन.

या कथेसारखी पण फ़ार नंतरची जीएंची कथा आठवते आहे. समुद्र पाहून आलेल्या तरुणाची. लाल गरुड... नक्की आठवत नाही.

श्रीकांत देशमुख : अतिशय सुंदर विवेचन. या कथेत जि. एं. नी आदिम मानवी लालसा, विषय वासना, सत्तेसाठीचे डावपेच, व मानवी स्वभावाचे वैविध्यपूर्ण कंगोरे सर्पाचे नमुना प्रारुपातुन अशा शब्दात दर्शविले कि वाचक मंत्रमुग्ध झाल्या विना राहत नाही. नुसते आवाक होत राहणेच आपल्या हाताला लागतं.

विलास वाघोलीकर: 💐 💐 💐 💐 💐 💐 💐

प्रतिसाद - व्ही एस वाघोलीकर

💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐

।)सर्प या कथेचे विवेचन मुद्देसूद केले आहे.याबद्दल मी धन्यवाद देतो.

2)साधारणतः जीएंच्या प्रत्येक कथेत अस्तित्वाचा एक पैलू घेवून त्यावर सखोल प्रकाशझोत टाकलेला असतो. उदा ऑर्फियस व काली या कथांमध्ये मृत्यूवर जीएंचे चिंतन आले आहे. रक्तमुखी व अनंत कथांमध्ये माणसाच्या मूलभूत गरजांपासून सुरु करून स्वअर्थ समजून घेण्याच्या गरजेपर्यंतचा प्रवास दिला आहे. याप्रमाणे साधारणपणे प्रत्येक कथेत अस्तित्वाचा एक पैलू उजळलेला आहे.

3)मानवी सामाजीक जीवनातच सत्ता या गुणविशेषाला, किंवा पैलूला महत्वाचे स्थान आहे. समाजात अगदी दोन भाऊ जवळ आले तरी त्यांच्यात फक्त प्रेमाचे, सहकार्याचे संबंध असतात, असे नाही. त्यांच्यामध्ये स्पर्धेचे, सत्तेचे संबंध येतात. कुटुंब, समाज यांमध्ये तर छुप्या किंवा उघड पद्धतीने सत्तेचे संबंध असतात, हे जीएंनी सांगीतले आहे. या दृष्टीने जीएंच्या खालील कथा पाहता येतील -

कळसूत्र, गुलाम, दूत, विदूषक, गोरिला, बळी, रक्तमुखी

तसेच सत्तेचा उपअर्थ सांगणाऱ्याही जीएंच्या अनेक कथा आहेत - स्वामी मध्ये महंताचा मठ, प्रवासी मध्ये अकाल राक्षसाचे नगर, इस्कीलार मध्ये सम्राटाचे आक्रमण व सत्ता, यात्रिक मधील धर्मसत्ता, पातक मध्ये धर्मगुरूची सत्ता, काकणे - शिक्षा मध्ये अन्याय करणाऱ्यांची सत्ता, अनेक संसार कथांमध्ये कुटुंब चालवणाऱ्यांच्या सत्ता दाखवल्या आहेत.

4) प्रस्तुत सर्प कथेमध्ये सत्तेचे, सामर्थ्याचे रूप ठळकपणे दाखवले आहे. सर्प हे सामर्थ्य, चपळपणा (वासना, बरीचसे अमरता) व सत्तेचे प्रतिक आहे. माणसासह बरेचसे प्राणी सर्पाला घाबरतात. तो चपळपणे कोठूनही हल्ला करतो. व तो हल्ला प्राणघातक असतो.

- 5)पंचतंत्राप्रमाणे या सर्प कथेत प्राणी बोलत असले तरी ती पर्यायाने माणसांची कथा आहे. नायक, उपनायक, अनुयायी, बंडखोर नायक ही पात्रे कथेत आहेत.

6)सर्प कथेत स्त्री पुरुष संबंध व वासना यांच्या संदर्भात सत्तेचा अर्थ दाखवला आहे. रक्तमुखी कथेतही हे स्पष्ट केले आहे. जीवन मिळाले की त्याबरोबरच वासना मिळते.त्या वासनेसाठी जग चालते, सत्ता चालते. सूईच्या सूक्ष्मपणे जी ए भावनांचे वर्णन करतात. ते कथेत मूळातून वाचले पाहिजे.

7)सुंदरी क्लिओपात्रासाठी त्या वेळचे राजे व पर्यायाने देशांची सैन्ये लढली. मोठा नाश झाला व शेवटी तिलाही मृत्यू पत्करावा लागला. आत्महत्येच्या पर्यायाचे जीएंनी अनेक ठिकाणी वर्णन केले आहे. येथेही आत्महत्या महत्वाची घटना आहे.

क्लिओपात्राची आत्महत्या, सत्ताधीश सर्पाची आत्महत्या (हिटलरच्या आत्महत्येची आठवण येते) दाखवली आहे. त्याची कारणमिमांसा प्रखरपणे केली आहे. वासना व सत्ता संपल्यावर काय राहते ? राख व आत्महत्या.

8) सत्ता भ्रष्ट करते व सर्वकष सत्ता सर्वकषपणे भ्रष्ट करते. सत्ता मिळाली की सत्ताधीश ती कायम टिकवण्याच्या मागे लागतो. मग तो स्पष्ट विरोधक व सुप्त विरोधकांच्या नाशाच्या मागे लागतो. येथे सुंदरीला पाहीले म्हणून आव्हान देणाऱ्या तरुण सर्पाला सत्ताधीश सर्प नंतर, मारायला सांगतो. व बहुतेक त्याच्या पुत्र सर्पाला गादीवर बसवले जाते. हा सत्ता संघर्ष, अनीमल फार्म कादंबरीप्रमाणे दाखवला आहे. सर्प ही जीएंच्या लक्षणीय कथांपैकी एक कथा वाचलीच पाहिजे.

💐 💐 💐 💐 💐 💐 💐

धन्यवाद. व्ही एस वाघोलीकर

अलका तडकलकर : 5,7 विशेष 🙏

दिलिप बडे: उनवणे सर.सर्प कथेची आपली समिक्षा वाचली.अत्यंत प्रगल्भपणे आपण तिचा पट ऊलघडून दाखवलात.सोन्याची पारख करणारे आपण जवाहिरी आहेत.आपल्या प्रतिभेला सलाम.मी तुम्हाला अशी विनंती करतो की,यथावकाश आपण सर्वच कथांची अशी मांडणी करावी.पुस्तक रूपाने प्रकाशीतही करावी.जी.एं.च्या सर्वच कथांची समिक्षा आपण करू शकाल असा विश्वास वाटतो.

दिलिप बडे: वाघोलीकर,पुराणीक आणि उनवणे सर आपल्या ग्रूपचे दिपस्तंभ आहात

Paramjit Singh: राजेश जी फारच सुंदर विश्लेषण केलेत.फार आनंद झाले आज. 👍

अलका तडकलकर : माझी प्रतिक्रिया

श्रीकांत देशमुख : श्री. वाघोलीकर साहेब धन्यवाद. अस्तित्वाचा एक एक पैलु उलगडुन दाखवणारे विवेचन फारच छान. आपले कथा विश्लेषण नेहमीच "आउट ऑफ बॉक्स" या प्रकारात बसणारे असते.

आपल्या वरील विवेचनातील मुद्दा क्रमांक चार मधील सर्प हे सत्तेचे, सामर्थ्याचे, वासनेचे व बहुतेक अमरत्वाच्या प्रारुपात आपण बघता हया मुद्द्यावरुन मला असे वाटते कि योगीक क्रियेत कुंडलीनी जागृत करण्यास विशेष महत्व आहे. योगा मध्ये अशी धारणा आहे कि सुप्त कुंडली म्हणजे वेटोळे घालुन असलेला सर्प व त्याच्या गुणविशेषाशी साधर्म्य सांगणारा हा गाभा आहे.

जेव्हा एखाद्या व्यक्तीमध्ये कुंडलिनी जागृत होते तेव्हा ती व्यक्ती इतरांपेक्षा जास्त सक्षम होऊन श्रेष्ठतम पदाला पोहचते अशीही धारणा आहे. त्या बळावर ती व्यक्ती सामान्य व्यक्ती पेक्षा शक्ती, ज्ञान ई. बाबत वरच्या दर्जाला (अतीमानवी/सुपर ह्युमन) पोहचते.

सर्प ह्या कथेतुन जि. एं. ना कुंडलिनी जागृती व त्या योगे श्रेष्ठत्वाला पोहचण्याची धडपड असे काही सुचवायचे आहे काय? ह्याबद्दल जाणकार महानुभवांनी कृपया दिशादर्शन करावे ही विनंती.

अलका तडकलकर : नाही

असे नाही.माणसाच्या मनात सेकंदाला जवळपास चाळीस हजार सर्प (विचारांचे) येत असतात.

कुंडलिनी जागृती ही योग्याची उन्नत अवस्था जी सर्वांना हवीशी असते.समाधीतून सत्याचे दर्शन व्हावे हीच परमोच्च सुखाची कल्पना.

अनेक विचार येतात जातात. परंतू असफल होतात व स्मृतीच्या अंधाऱ्या खोलीत वळवलत पडून असतात.

दिलिप बडे: तो साप"(मानव)हा जर लैंगिक ऊत्तेजनेलाच सर्वोच्च आनंद मानत असेल तर.पर्यायाने माणसाच्या जीवनाची (सर्वोच्च आनंदाचीच)जी.एं.नी थट्टा दाखवली आसे वाटते.

यतीन गुळवणी : उनवणे सरांनी सर्प कथा सार्थपणे ऊलगडून सांगीतली आहे. त्यांना मनापासून धन्यवाद. वाघोलीकर सरांनी तर जीएंच्या कथांचा इतका व्यासंग केला आहे की, ते यासाठी डाॅक्टरेट मिळवण्याच्या पात्रतेचे आहेत.

मला सर्प कथेतील मला भावलेले

आणखी एक वैशिष्ट्य आहे. आदम व इव्ह या दोघांच्या संबंधातील तथाकथित दोषी ठरलेल्या सापाबद्दलचे विवेचन!

जीएंनी अत्यंत सफाईदारपणे यावर भाष्य केले आहे. कोणाच्याही भावना दुखावणार नाहीत अशा पध्दतीने एक बिनतोड मुद्दा जीएंनी मांडला आहे.

उनवणे सरांची माफी मागून व त्यांची परवानगी गृहीत धरून दोन मुद्दे सांगतो.

१ सापाला लाकडी चिमट्यात धरून फळाच्या टोपलीत टाकून झाकण लावणारी स्त्री वेगळी आहे. ती सौंदर्यवती राजकन्या नसून राजकन्येची दासी असावी व राजकन्येच्या इच्छेखातर त्या दासीने सापाला पकडून आणले असावे.

मी असे समजलो आहे की, त्या राज्यावर परचक्र येऊ घातले असावे व "एक देदीप्यमान साम्राज्य" मावळू घातले असावे. म्हणून शत्रूच्या हातून विर्टबना टाळण्यासाठी राजकन्या सर्पदंशाने मृत्यू पत्करते.

२ प्रमुख वृद्ध साप अशी सौंदर्यवती स्त्री नाहीच या बरोबर आणखी एक बिनतोड मुद्दा मांडतो. “ कोणती स्त्री सापाला उचलून आपल्या उराला दंश करून घेईल, विषाचा आनंदाने स्वीकार करेल?”

वाहवा जीए! कसं सुचलं हो तुम्हाला असं कथानक?

माझे जीएंना मनापासून वंदन!

परत परत आस्वाद घेऊनही मन अस्वस्थ करणारी मला आवडलेल्या जीएंच्या अनेक कथांपैकी ही सर्प!

उनवणे व वाघोलीकर सरांचे आभार.

जयश्री जंगले : मला असंही वाटतं की यामागे राणी क्लिओपॅट्राचा संदर्भ असावा. तिने असा मृत्यू पत्करला होता.तिच्या दासीकडून फळाची(अंजीर) करंडी मागवली होती. अँटनीच्या (रोमन सेनापती)आक्रमणानंतर सम्राट ज्युलिअस सीझरने (ज्या सीझरला कधीतरी तिने आपल्या सौंदर्याने नमवले आहे) जिंकलेल्या पराभूत म्हणून रोममध्ये पाऊल ठेवण्यापेक्षा ती सर्पदंश पसंत करते. “Give me my robe, put on my crown; I have

Immortal longings in me”

हे तिचे उद्गार प्रसिद्ध आहेत. ती सम्राज्ञीच्या वेषातच मरते. “सत्ता नाही, स्वप्ने नाहीत, तर जगायचं कशासाठी?” या उद्गारांनाही म्हणूनच विशेष अर्थ आहे.

विलास वाघोलीकर: योग्य संदर्भाबद्दल धन्यवाद. एकूण सर्व सर्प कथेबद्दल आपण लिहू शकाल काय ? गुड डे

माधव पुराणिक : कथा सर्प (सांजशकुन ,१९७३, ७ पानी कथा)

विवेचन - माधव पुराणिक (पीएचडी योगशास्त्र)

दिव्य शक्तीच्या दोन रूपांचे आसक्ती (सुंदर स्त्री व सर्प) आणि विरक्ती (अदभुत श्रांतता, आर्द्रता, संथपणा) प्रत्ययकारी वर्णन

१ कथेचे स्वरूप व त्यातील पात्रे

या कथेत सत्ताधारी किंवा राजकीय/ सामाजिक चौकटीत वेगळे शोधणाऱ्या / सापडणाऱ्या व्यक्तींची मानसिक व शेवटी विनाशाची शारीरिक अवस्था वर्णन केली आहे.

कथेतील "तो साप"(जी ए यांच्या इतर कथांतील अलौकिकाचा शोध घेण्यासाठी बाहेर पडलेल्या ,उतारवयातील, सुखदुःखाचा अनुभव घेतला तरी सूक्ष्म अहंकार असणाऱ्या नायकाचा साकेतिक, प्रतीकात्मक अवतार) हा त्याच्या गूढ / तरल /जादूमय अनुभवाचे वर्णन करीत आहे.

त्यावर इतर वृध्द साप (फक्त वय वाढणारी माणसे) , नेता वृद्ध साप (व्यवस्था/ चालू परिस्थिती/व्यक्तीजीवनाला बंदिस्त करणारा माणूस), तरूण भावी नेता साप (आहे तशीच परिस्थिती राहावी म्हणून निवडलेला वारस) आणि इतर साप (नेत्यांचा आदेश पाळणारी सामान्य माणसे) हे सर्व प्रतिक्रिया देतात.

शेवटी नेहमीप्रमाणेच नेता वृध्द साप आशाभंग (स्वप्नभंग) झाल्याने स्वतःचा कडेलोट करून घेतो.

"तो साप" याला चिरडून ठार केले जाते.

सामाजिक चौकट फक्त ती व्यक्तीच्या समृद्ध जगण्याच्या आशेची गळचेपी कशी करते याकरिता वापरली आहे. या चौकटीत व्यक्तीच्या वेगळेपणाची/ अलौकिक अनुभवांची दखल घेतली जात नाही.

२ कथेतील मुख्य संकल्पना

माणसाला जीवनात ४ प्रकारचे अनुभव येतात

१. सांसारिक - शारीरिक स्तरावर इंद्रिय संवेदनशीलता(स्थूल शक्ती) हा अनुभव सर्वांना येतो

२ मानसिक - बुध्दी,मन,प्राण, जीव या स्तरावर -सामाजिक नातेसंबंध - प्रेम, मैत्री, द्वेष राग, इ सर्व भावना

हे अनुभव सर्वांना येतात (सूक्ष्म शक्ती)

३ कलात्मक - कल्पनाशक्ती/ प्रतिभा /सर्व कला (अधिक सूक्ष्म शक्ती) ही कवी, कथाकार, चित्रकार इ फार थोड्या लोकांना हा अनुभव येतो

४ अलौकिक/ कुंडलिनी/ पराकोटीची सूक्ष्म शक्ती

जी एक यांनी या कथेत या शक्तीच्या अनुभवाचे वर्णन केले आहे

असा अनुभव साधना/ उपासना करणाऱ्यांना येतो. तो अत्यंत दुर्मिळ आहे. ते तर्कातीत असतात. पण हा अनुभव ज्यांना येतो तो त्यांच्या जीवनात घडलेल्या/ घडविलेल्या / मिळालेल्या विशेष घटनांवरून किंचित जाणता येते.

भगवद्गीतेत अध्याय १२ यात अशा पुरुषोत्तमांची लक्षणे दिली आहेत.

३ कथेतील दिव्य शक्तीचे वर्णन (जी एं च्या शब्दांत)

१ "पण तेजस्वी डोळे घेऊन तो साप सारे रक्तच वीज झाल्याप्रमाणे इकडे तिकडे दिमाखाने मिरवला. "(तो साप) (ज्ञानेश्वरी ,अध्याय ६, कुंडली शक्तीचे वर्णन)

२ " सौख्य किंवा यश कितीही उच्च दर्जाचे असले तरी जोपर्यंत ते इतरांनाही मिळण्याची शक्यता असते तोपर्यंत ते दैदीप्यमान होत नाही. उलट मला आज जो उत्कट आनंद मिळाला तो पूर्वी कधी इतरांना मिळाला नव्हताच आणि विशेष म्हणजे भविष्यकाळातही तो इतरांना कदापी मिळणार नाही." (तो साप)(हा त्याचा अहंकार. दर्प, गर्व, प्रौढी. दिव्य शक्तीचा पहिला टप्पा - मनोकायिक प्रवेश, सत्ता, ईर्ष्या,इ विकारांचे प्राबल्य)

३ "सामान्य सत्ये लोकांना सांगताना ती त्यांना पटावीत, ती त्यांनी स्वीकारावीत अशी आपली मोठी इच्छा असते पण या क्षणी मात्र मी तसल्या क्षुद्र अपेक्षेपलीकडे गेलो आहे. एखादे भव्य सत्य एकाऐवजी शंभर जणांनी स्वीकारले की जास्त सत्य होते ही कल्पना मला अत्यंत वेडगळपणाची वाटते." (तो साप) (येथे जी ए यांनी जीवनाचा / अस्तित्वावादाचा मूलभूत पेच प्रश्न उपस्थित केला आहे.

एका व्यक्तीचा अदभुत अनुभव दुसऱ्यापर्यंत नपओचवइतआ येणे. साक्षात्कार झाला तरी तो त्या व्यक्तीच्या पुरताच. बाकीच्यांनी आपापल्या मार्गाचा सतत, अविरत, शोध घ्यावा)

४ "शय्येच्या बाजूला एका मोठ्या आरशासमोर स्वतःच्या सुख दर्शनाने स्वतःला विसरून गेलेली एक सौंदर्यवती स्त्री उभी होती." (तो साप) (दिव्य शक्ती फक्त स्वतःचीच जाणीव आहे. शरीराला गूढ स्पर्श करणाऱ्या दिव्य सुंदरतेची)

५ "स्त्रीच्या उल्लेखाने सर्व सापात प्राचीन स्मृतींची ठिणगी नकळत जागी झाली. वृद्ध सापांत देखील हालचाल झाली व त्यातील तीन चार साप अदृश्य धाग्याने ओढल्याप्रमाणे संथपणे पुढे सरकले व इतर सापांच्या मागे थांबले." (प्रत्येक अस्तित्वात असलेली जगण्याची, वंश पुढे नेण्याची, त्याकरिता स्त्री आकर्षणाची शेवटच्या श्वासापर्यंत असलेली शाब्दिक/ मानसिक/ आत्मिक/ श्वासात / नजरेत / स्पर्शात व्यक्त होणारी आदिम इच्छा)

६ "आरसा अतिखोल पाण्याप्रमाणे शांत व आत्मविश्वासी दिसत होता खरा पण या साऱ्या रत्नांचे तेज आणि तिचे असीम सौंदर्य यामुळे तो तडकणार …

संजीव सावरगांवकर: आमचे दुःख: हे सर्व समजते, आकळते पण लेखन प्रक्रिया तेवढी शब्द श्रीमंतीची करता येत नाही. आमचे सुख: कथा कशी समजून घ्यावी, तिचा आस्वाद कसा घ्यावा, तिचे किती आयाम असतात आणि ते तुम्ही चपखल पणे सोप्या शब्दात शब्दांकित करून आम्हाला वाचन समृद्धीकडे नेता. त्याचप्रमाणे आता कथा परत परत वाचा याला उद्युक्त करता याबद्दल आम्ही आपल्या ऋणातून मुक्त होऊ इच्छित नाही. साहित्य वाचनासाठी आणि उत्कृष्ट आस्वादही उपलब्ध करून दिल्याबद्दल शतशः आभारी आहोत. 🙏🏻 🙏🏻 🙏🏻

राजेश उनवणे : वाह सर, अप्रतिम...! 👍 👌

.. “कुंडलिनीचा आकार हा सर्पाप्रमाणे असल्याचे” कोठेतरी वाचल्याचे आठवते..!

तो अनुभव जीए यांनी घेतला होता की नाही याविषयी जीएच सांगू शकले असते...आणि स्वतःच्या कथेविषयी एकही अवाक्षरही न काढणारे जीए याविषयी काही बोलतील ही अपेक्षा ही व्यर्थच आहे म्हणा.....!

श्री. श्रीकांत देशमुख यांनी त्यांच्या अभिप्राय मध्ये जेव्हा कुंडलीनी चा उल्लेख केला तेव्हा मी थक्क झालो...! 🙏

मी सूतोवाच मध्ये बऱ्याच गोष्टी लिहायच्या टाळल्या आहेत, व त्याबाबत ग्रुपने क्षमा करावी.

कारण या कथेसंदर्भात अनेक प्रश्न अजूनही मला पडलेले आहेत.

श्रीकांतजी मूळे या ग्रुप वर खूप रथी-महारथी छुपे रूस्तम आहेत याची जाणीव मात्र झाली..!असो.

कुंडलिनी जागृतिचा माझ्यासारख्या पामराला अनुभव नाही..!पण..

कथेतील मला पडलेले प्रश्न व मान्यवरांचे अभिप्राय याविषयी उद्या सविस्तर लिहिन्याचा विचार आहे...!

सध्यातरी सर्व मान्यवरांचे मनापासून आभार...! 🙏

अलका तडकलकर : कथा अशीच अनेक पदराने उकलत आहे एकदम सगळेच सांगितल्यावर विचार करायला जागा मिळणार नाही. आपण केलेले सुतोवाच चांगले आहे.चर्चा पण सुरू 🙏 आहे.

विश्वेश्वर नांदेडकर : क्लिओपात्रा च्या मृत्यू च धागा घेवून ही कथा लिहिली गेली आहे हे नक्की. पण हे पण तेवढेच खरे की प्रत्येक जण आपापल्या परीने या

कथेचा तर्कसंगत आर्थ लावू शकतो आणि तो नक्कीच दुसऱ्याने लावलेल्या अर्थापेक्षा १८० अंश वेगळा आसू शकतो. आणि हे या कथेचे खरे सामर्थ्य आहे.

वासनेच्या अंगाने, सत्ता संघर्षाच्या अंगाने , आत्महत्येच्या अंगाने , उत्तुंग स्वप्ने पाहणाऱ्या आणि त्या साठी आयुष्य ओवाळून टाकणारा ध्येयाच्या अंगाने आणि इतरही अनेक बाबींना केंद्रात ठेवून या कथेचा मागोवा घेता येतो. मला तरी वासना , अप्रतिम सौंदर्य , साम्राज्याचा अंत व इतरही काही बाबींचा आर्थ लावण्या साठी कथा दोनदा तरी वाचाविच लागणार आहे.

विलास वाघोलीकर: कथेत सर्प प्रतिमा मध्यवर्ती आहे. प्रत्यक्षातला जिवंत सर्प व कथेतील प्रतिमा यांमधील objective correlative (हे वर्णन इलियट व जी एंचे आहे) स्वरूप हा अभ्यासाचा विषय होईल. मला हे सत्तेचे रूप वाटते. याची थोडक्यात कारणे अशी देता येतील -

I)सामर्थ्य, चपळपणा - सर्प अंधारात, सापटीत, खड्डयात राहू शकतो.

2)सामर्थ्य - सर्प विषारी असतो. त्या सामर्थ्याने सर्पाला विशेषतः माणूस, वानर, हरीण इ. घाबरतात. फक्त मांजर, कुत्रा, मुंगुस, मोर, गरुड घाबरत नाहीत.

3)सत्ता - त्या विषारीपणामुळे सर्पामध्ये सत्ता येते. सर्वजण त्याला घाबरून असतात. इजिप्तमध्ये राणीच्या मुकुटात सर्पाची आकृती असे.

4)चपळपणा - सर्प लहान प्राणी असतो. त्यामुळे जेव्हा त्याला हल्ला करायचा असतो किंवा स्वतःचा बचाव करायचा असतो तेव्हा, तो येथून तिकडे जणू वीजेच्या गतीने जावू शकतो.

- 5)अमरत्व गुण - बऱ्याचशा संस्कृतीत सर्पामध्ये अमरत्वाचा गुण समजला जातो. हिंदू संस्कृतीत विष्णु ,शंकर यांच्या जवळ सर्प असतो असे समजले जाते. सर्प कात टाकतो. यामुळेही त्याचे आयुष्य वाढते अशी लोकसमजूत आहे.

6)वासना - अनेक संस्कृतींत सर्प वासनेचे प्रतिक मानला जातो. ख्रिश्चन परंपरेत ॲडम व ईव्ह यांना देवाने फळ खायला मना केली होती. पण सर्पाने त्यांना वासनेचे फळ खायला लावले. हिंदू संस्कृतीत स्त्रीयांनी नाग पंचमीला पूजा करायची असते. तो पुत्र देणारा समजला जातो.

जीएंच्या कथांना अनेक पैलू, अनेक आयाम असतात हे नांदेडकरजींचे निरिक्षण मला पटले. म्हणून हे rejoinder देत आहे. धन्यवाद. विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: सर्प ही कथा उत्कृष्टच आहे. आजवर न समजताही किंवा जेवढी समजली तशीही आवडतच होती. पण आता क्लिओपात्रा ते कुंडलिनी असे दोन टोकाचे संदर्भ लाभल्यावर ही कथा फ़ारच वेगळी, भव्य दिसायला लागली. जीएंच्या कथा समजून घेण्याचा हा अनुभव अद्वितीय आहे.

यतीन गुळवणी : सत्य सांगतो. क्लिओपात्रा, कुंडलिनी हे संदर्भ माहित नसताना सुध्दा ही कथा मला आवडली. वृद्ध पुढारी सापाच्या जागी एखादा राजकीय असामी, गावचा पाटील वा कार्पोरेट कार्यालयातील व्यवस्थापक, एच्आर हेड अशा कोणत्याही व्यक्तीला ही सिच्युएशन लागू होऊ शकते.

जयश्री जंगले : अगदी!

सर्प हा जागतिक वाङ्मयातील एक महत्त्वाचा आदिबंध आहे.

जनमेजयाचे सर्पसत्र आठवले. पण त्याचा काही संबंध नसावा.

विद्याधर पुंडलिकांची “दवणा” आठवली. त्यात सर्प वास्तुपुरूषाचे रूप म्हणून येतो.

राजेश उनवणे : सर्प कथा आणि लेखक जीए

सर्वच मान्यवरांनी सर्प कथेवर फारच माहितीपूर्ण, आशयघन असे विवेचन नोंदवले आहे. त्यांच्या या वेगेवगळया कोनातून कथेकडे बघण्याचा दृष्टिकोण मला कथेविषयी आणखीन भुरळ पाडणारा ठरला आहे. प्रत्येकाचे कथेवरील अभिप्राय या कथेतील आणखी पदर उलगडून दाखवतात, हे नक्की.

सध्या तरी कुंडलिनी, क्लिओपात्रा, इत्यादी विषय बाजूला ठेवून.......,

केवळ आणि केवळ "सर्प कथा व कथालेखक जीए" यांवर लक्ष केंद्रित करून लिहीत आहे.

कथेतील "तो साप" यास झालेला "साक्षात्कार" ही या कथेतील एक महत्त्वाची घटना.

अशा साक्षात्कार झालेल्या त्या सापाची हत्या होणे ही कथेतील दुसरी महत्त्वाची घटना.

ही हत्या का करावी लागली याबाबत वृद्ध सापाने केलेला खुलासा ही तिसरी महत्त्वाची घटना.

या तिन्ही घटनांमध्ये नियतीने तिचे स्वत:चे अस्तित्व दाखवले आहे का?नक्कीच दाखवले आहे. कारण जीए यांच्या बहुतेक कथांमध्ये ती अगदी ठाण मांडून बसलेली असते.

मग, ज्या सापाने, वासनेच्या आसक्तीमधून त्याची काया मुक्त केली त्या "साक्षात्कारी" सापाला, आभाळाएवढी छाया व सागराइतुकी माया जिच्यामध्ये दडलेली आहे अशा नियतीने का वाचवले नाही? उलट त्याची हत्या करण्यास तिने का भाग पडले?

तरुण साप व सर्प-समाजाने त्याची हत्या केली ते "तो साप" विलक्षण काहीतरी पाहिले आहे हे सांगतोय, ते पूर्णपणे खोटे आहे, तो फसवतो आहे अशी समजूत करून घेऊन त्यांनी त्याची हत्या केली. "तो साप" जे सांगत आहे ते पूर्णपणे खोटे

आहे, असे जाहीरपणे सांगून सर्प समाजाला त्याची हत्या करण्याचे अनुमोदन "नेता" या नात्याने "वृद्ध साप" देतो.

पण त्याची हत्या वृद्ध सापाने सत्तेसाठी, ती टिकवण्यासाठी केली आहे. असे साक्षात्कारी साप सत्तेसाठी धोकादायक असतात या विचाराने केली आहे. ओठावर एक, पोटात दुसरेच ही राजकारणी नेत्याची नेहमीच एक भाषा असते.

"तो साप" यास साक्षात्कार झालेला आहे या गोष्टीवर वृद्ध सापाचा पूर्ण विश्वास आहे. तसा प्रयत्न, वासना जिंकण्याच्या वाटेवरचा तो प्रवास, त्याने स्वत:ही केलेला होता. पण शारिरीक सुखाची, त्या वासनेची आसक्ती त्याचे शरीर सोडू शकली नाही, याची प्रामाणिकपणे तो कबुली देतो. त्याच्या मनात "तो साप" याने वासना जिंकली, त्यास साक्षात्कार झाला आहे याबाबत अजिबात असूया नाही. त्याला हे सर्व समजते. ज्ञात आहे. "तो साप" ला झालेला साक्षात्कार त्याला मान्य आहे.

पण शारिरीक वासनेबरोबरच सत्तेची आसक्तीही वृद्ध सापाला आहे. कारण वृद्ध झालो असलो तरी सत्ता ही तरुण सापाकडेच राहणार आहे याबाबत भविष्याची तजवीज करून तो निश्चिंत झालेला आहे.

तरुण सापाच्या सत्तेला भविष्यात अशा साक्षात्कारी सापाचा धोका असू नये म्हणून "वृद्ध साप" त्याची हत्या करण्यास प्रवृत्त झालेला आहे.

मग नियतीने "तरुण साप/सर्प-समाज" आणि "वृद्ध साप" या दोघांच्या माध्यमातून साक्षात्कारी "तो साप" याची हत्या का घडवून आणली?

याचे स्पष्टपणे कारण जीए नियती सारखेच अदृश्य ठेवतात. ते शोधण्याचे काम वाचकावर सोडतात.

ते शोधण्यासाठी वाचकास साक्षात्कारी "तो साप" याचे सुरवातीचे सर्प-समाजासमोर केलेले त्याचे भाषण नीट तपासावे लागते. "हा आनंद, हे सुख यापूर्वी

कोणासही प्राप्त झाले नाही" इथपर्यंत ठीक आहे. पण...... "भविष्यात कोणासही तो प्राप्त होणार नाही" यात एक दर्प आहे. त्याचा अहंकार आहे. ही दर्पोक्ती नियतीला मान्य नाही.

अध्यात्माच्या वाटेवर साक्षात्कार झाला असला तरी अहंकाराचे बीज कधी डोके वर काढेल व त्या साक्षात्कारीचा समूळ नाश कसे करेल हे सांगता येत नाही. इतिहासात, पुराणात रावणापासून अशी अनेक उदाहरणे आहेत.

जीए यांच्या कथेत नियती जशी अदृश्य स्वरूपात असते, तसाच अहंकारही असतो. कधी ते त्यास अदृश्य स्वरूपात ठेवतात तर कधी दृश्य रूपात. जीए या दोघांना चपखलपणे कथेत बसवतात.

जीए एक मायावी लेखक आहेत, असे मला वाटते. (आणि कृष्णाचे एक रूप मायावी आहे.) ते वाचकाची फसवणूक करतात, ते त्यांचे बुद्धीचातुर्य वापरून.

ते वाचकाला कथेतील नाट्य उघडपणे सांगत नाहीत.

कथेतील पात्रांच्या मानसिकते प्रमाणेच, वाचकांची मानसिकता ओळखणारी, लेखक जीए यांची स्वत:ची एक मानसिकता आहे.

त्यामूळे ते वाचकाला कथेच्या मूळ नाट्यापासून, मूळ गाभ्या पासून दूर नेतात. त्यासाठी भाषेचा, उदाहरणांचा अक्षरक्ष: उत्सव साजरा करतात. वाचक कथेतील भाषा, वर्णने, उपमा, उदाहरणे याने प्रभावित होऊन कथेतील पात्राबरोबर चालू लागतो. कथा संपल्यावर तो प्रभावीत होतो. कधीकधी सुन्न होतो.

मग हे असे का याचा शोध घेणेसाठी पुन्हा कथा वाचायला सुरवात करतो. हे असे का? याचे उत्तर कथेत तो पुन्हा शोधू लागतो. प्रत्येक व्यक्तिची विचारसरणी, मानसिकता वेगवेगळी असते. जीए यांना अभिप्रेत असलेला कथेचा गाभा कधी त्यास सापडतो, तर कधी दुसराच अर्थ त्याला गवसतो. तर कधीकधी संपूर्ण कथाच त्याला दुर्बोध वाटू लागते.

यामुळेच जीए यांच्या कथेच्या वाटेस फार कमी वाचक जातात. पण जे जातात ते रसिकतेने यावर विचार करतात. त्याच रसिकतेने इतरांबरोबर चर्चा करतात. दुसऱ्याचे या कथेविषयी काय मत आहे याची मग त्यांना उत्सुकता लागते. आणि अशी व्यक्ति भेटताच कथेचे निरनिराळे अर्थ समजू लागतात. कधी ते पटतात, कधी नाही. पण त्या चर्चेतून दोन वाचकात एक प्रकारचा ऋणानुबंध निर्माण होतो.

जीए यांना रसिक वाचकांची ही मानसिकता नक्कीच ठाऊक होती.

यासाठीच कथांचे किमयगार, प्रतिभावान, आध्यात्मिक, ज्ञानी, योगी असे लेखक जीए आपल्या कथांच्या बद्दल फारशी चर्चा करीत नसावेत.अशा कथा लिहिणे हीच एक साधना असते.

आणि स्वत:च्या साधनेबाबत खरा योगी कधीच बोलत नसतो.

त्याच्या मौनातच त्याच्या साधनेचे फलित स्वरूप दिसून येत असते..

यतीन गुळवणी : उनवणेसरांनी महत्वाच्या घटना मांडून त्यावर उहापोह केला आहे. कार्य, कारण या दृष्टिकोनातून

केवळ घटनाक्रमाचाच विचार करायचा झाल्यास सर्वात जास्त महत्वाची घटना म्हणजे माझ्यामते “त्या सर्पाकडून” “त्या” सौंदर्यवतीने करवून घेतलेला वा घ्यावा लागलेला दंश!

दंश हा केंद्र बिंदू मानल्यास विचारचक्र कसे फिरू शकेल यावर चर्चा व्हावी.

सुनीळ सामंत: या ग्रुपवर मान्यवर एकाच कथेचे वेगवेगळ्या बाजूंनी करत असलेले अवलोकन पाहून अचंबित व्हायला होतेच. पण या कथेचे राजेशजींनी ज्या दोन वेगवेगळ्या दीर्घ आस्वादांत विविध पैलू दाखवले त्याचा मोठा अचंबा वाटला. एका अर्थी त्यांनी सूतोचा केले आणि नंतर विलासजी, माधव सर, विश्वेश्वरजी,

यतीनजी, अलकाजी व इतर सर्वांनी मांडलेल्या विचारांचे एकप्रकारे सुसूत्रीकरण केले.

या सर्वात एक गोष्ट मला अजून उमगलेली नाही वा अर्धवट उमगली ती मी मांडू इच्छितो.

सत्ता म्हणजे काय? जीएं ना सत्ता या शब्दातून एका व्यक्तीचे सिंहासनग्रहण एवढेच अभिप्रेत नसावे. जी व्यक्ती सत्तेच्या रक्षणासाठी सत्याचाही (सत्य बोलणाऱ्या सर्पाचा जीव घेता घेता त्याने जे सांगितले ते खोटे होते असे म्हणणे म्हणजे सत्याचा जीव घेणे) जीव घेते ती दुसऱ्या क्षणाला स्वतःचा जीवही उंच खडकावरून फ़ेकून देते आणि स्वतःला केवळ निर्जीव कात समजते. याचा अर्थ सत्ता म्हणजे उपभोग घेण्याची खुर्ची नसून त्यापुढे बराच मोठा व्यापक अर्थ या कथेत आहे. जीएंच्या मनातला तो अर्थ शोधण्याचा मी प्रयत्न करत आहे. (हा अर्थ विदूषक मधल्या संकुचित अर्थाच्या पलिकडला आहे). या विचारमंथनात आपला सहभाग अपेषित आहे.

सुनीळ सामंत: **सत्ता म्हणजे काय**?

अलका तडकलकर : पहिली घटना....तो साप भाग्यवान आहे म्हणून त्यास भूतो न भविष्यति असे सुख मिळाले

दुसरी घटना...आपण जे स्वप्न पाहिले ते इतरांना फलद्रूप झाले ही असूया/द्वेष म्हणून त्या सापाची हत्या

तिसरी घटना...आपल्या हातून हत्या झाली हे भान आले त्यामुळे एक नैराश्य भावनेने हतबलता आली.

नियतीचे रूप असे बदलणारे

संजीव सावरगांवकर: कथा:सर्प संदर्भ: दंश

दंश हा केंद्रबिंदू मानला तर सर्प ही कथा तीन स्तरांवर, तीन वेगळे वेगळे आयाम व तीन वेगळे काळ असा कथेतील लिखाणाचा विचार करावा लागेल.

एका या छोट्या कथेमध्ये जीए यांनी फार कमी शब्दात हा तीन पेडी गोफ इतका सुंदर लिहिला आहे की साक्षेपी, बहु साहित्यवाचक व आजचा नागरिक याची एक छान सांगड या कथेचे मध्ये घातलेली दिसते.

पहिला पेड आहे क्लिओपात्रा या जगनमान्य कथेचा संदर्भ. ज्यात ती अति मादक, सुंदर, सौंदर्याची खाण असलेली स्त्री , सत्तेवर कायम प्रेम करणारी व तिची अभिलाषा असणारी रमणी, युद्ध प्रवृत्त करणारी व शेवटी युद्धातील हार यामुळे आत्मघात करणारी कृती हे तीचे वैशिष्ट्य. महाराणाची वैषयिक आसक्ती व अंततः तिची सत्तालोभ वृत्ती, विषयवासना पूर्तता न होण्याची शक्यता व त्यातून पकडलेल्या सर्प च्या सर्पदंशाने स्वतःचा आत्मघात करून घेते. त्या क्षणी तो सुद्धा कसा तर स्वतः विवस्त्र अवस्थेत स्वतःच्या जीभेवर सर्पाचा विषयुक्त दंश घेऊन स्वतःचा मृत्यू घडवून आणते. लोकमान्यते प्रमाणाने ती तिची भूमिका आत्महत्या म्हणुन ठरते.

आता याच घटनेची दुसरी बाजू म्हणजे सर्प याचे विश्व. त्याचा स्वतःचा कामातूर क्षण. सर्पाचे विचार हे पुरुष मानवी विचार आहेत व फक्त ते सर्पामुखी बोलावलेले आहेत. सर्वच सर्प बिळात जमिनीखाली राहणाऱ्या विश्वात कूपमंडूक वृत्तीने राहात होते. पण तो सर्प वेगळे जीन्स घेऊन या पृथ्वीतलावर आलाय. त्याला जमिनीवरील जगाची आशा आहे, उत्सुकता आहे, नवे जग पाहण्याची दुर्दम्य इच्छा आहे, आसक्ती आहे.

पहिल्यांदाच जेव्हा तो पृथ्वीवर येतो तेव्हाच त्याच्या जीन्समध्ये आदिमानव एडम व ev यांच्या सफरचंदाच्या चाव्याची आठवण होऊन आपण मानवाच्या जगात विषय वासनेला कसा जन्म दिला पण तो भोग आपण अजूनही का उपभोग शकलो नाही की अनंतकाळापूर्वीची वासना लालसा आहे. आत्ताच्या त्याच्या या जीन्समुळे ती अत्याधिक पणे त्याच्या शरीरात उफाळून येते.ज्यावेळेस तो विवस्त्र

स्त्रीला पाहतो. नंतर इतर सापांना सांगताना सुद्धा त्याचे वेडे स्वप्न, त्याची शपथ, बिळाबाहेरचे आयुष्य पाहण्याची उर्मी हे आढ्यता पूर्वक सांगताना हेही सांगतो की अत्यंत तृप्तीचा क्षण निर्माण करून ही, सदैव अतृप्त राहणारी ताजी राहणारी अत्यंत तृप्तीचा क्षण सुखद अशा उत्कटतेने दाहकता निर्माण करणारी, ही वासना ही पहिल्या सापाने वासना उत्पन्न केली नाही.

(पण ADAM EVE च्या कथेनुसार सर्प ही वासना उत्पत्तीचा माध्यम, कॅटलिस्ट आहे) परंतु कथेमध्ये मात्र वासना बीज सर्पामध्ये स्त्रीदर्शनाच्या माध्यमातूनच निर्माण झाले आहे हे निर्विवाद

घटना आहे.

सर्पाची वासना लालसा व वासनापूर्तीचा तो अमूल्य क्षण जीए यांनी दोन पानात सुंदर पद्धतीने लिहून संयतपणे फुलविला आहे. अगदी आपल्या करताच कशाला, जमिनीखालील इतर सर्प मंडळींचा सुद्धा उत्सुकता वाढवणारा असा लिहिला आहे. मग त्या सर्पाला फळांच्या टोपली मध्ये टाकून महाराणीकडे टोपलीसह तो आणला गेला होता. ती त्याची नियती व इच्छापूर्ती. आणि ज्या क्षणी स्वप्न सत्य म्हणून जन्माला येते आणि लालसेचा उगम म्हणजेच तृप्ती ठरते असा दुर्लभ, दुर्मिळ क्षण त्याच्या वाट्याला आला. आणि त्याने त्या क्षणाचा अखंड उपभोग घेतला. ही झाली सर्पाची विचार व कृतीची दुसरी बाजू म्हणजे दुसरा पेड. दंश हे वासना पूर्तीचे प्रतीक दाखवून अनेक वेळा दंश करून तो ही गलितगात्र झाला की आकंठ वासना उपभोगून शांत झाला की ज्यामुळे त्या स्त्रीचे संपूर्ण शरीर काळे निळे पडले. त्या क्षणी ती महाराणी असण्याचा त्याला माहिती नव्हतं.

हा घेतलेला सर्व उपभोग तो हे सर्व तो गर्वाने कोणीही उपभोग न घेतलेले सुख दर्पोक्तीने सर्व सर्प समाजासमोर सांगतो ते त्या समाजाला अप्राप्य असते. मात्र सत्ता प्राप्त झालेल्या मानवास ते उपलब्ध, अगदी सहज उपलब्ध होऊ शकते. (कोणत्याही देशाचे, कोणत्याही काळातील हा भोग आपण ऐकला आहे, वाचला आहे, राज्ये लयस गेलेली पाहिली आहेत.) अशा त्या पदापर्यंत कोणी पोहोचू नये म्हणून

कार्यकर्ते, स्वतः, इतर चमचे पदाधिकाऱ्यांची पाठराखण करतात. त्यामध्ये त्यांचाच प्रतिनिधी म्हणजे वृद्धसर्प त्याचेही त्याच्यावरती शेवटी वक्तव्य येतेच त्याची परिणीती होते ती अपरिपक्व वक्तव्य करणारा साप समाज झुंडशाही पुढे अनेक सर्प दंशावर मृत्युमुखी पडतो. म्हणजे ज्याने उपभोग घेतला आहे त्याचा मृत्यू उपभोग घेता आला नाही त्यांच्या दंशानेच होतो. म्हणजे हा एक समाज मान्य समाजदंश.

मग म्हातारा वृद्धसर्प तरुण सर्पाला कथा सांगण्याच्या निमित्ताने खडकावर नेतो व त्याचे आपले हेच असेच अनुभव तरुण सापाला सांगतो व सल्ला देतो हे तरुण सर्प उद्या तू प्रमुख होशील तुला त्या सापांवरती सत्ता गाजवायची आहे सत्ता व स्वप्न एकत्र नांदू शकत नाहीत तेव्हा अशा स्वप्नांची बीजे दिसू लागली की ती त्वरित ठेचून काढ.

त्यानंतर तो स्वतःला दगडावरून लोटून देतो. हाही एक वेगळा दंश.

आता तुम्ही हा विचार कुटुंब, सोसायटी, गट, समाज, गाव, शहर, देश यांच्या राजकारणात लावून पहा हे असे दंश रोज कुठे ना कुठे होत असतात. जोपर्यंत ते आपल्या कातडी पर्यंत येत नाही तोपर्यंत ते इतरांचे अनुभव असतात , स्वतःचे नाही. हा एक वेगळा दंश थोडक्यात अशी ही त्रिपडी दंश कथा

संजीव सावरगांवकर.

सुनीळ सामंत: तुमच्या आस्वादलेखनातही जीएंच्याच लेखणीचा भास होतो राव.

संजीव सावरगांवकर: सत्ता, यावर फक्त सर्प कथा विचारात घेता येणार नाही. जी. ए. यांच्या सर्व कथांमधून याबाबत सर्वांगीण वाचन करावे लागेल, त्यानंतर या वर लिहिता येईल. सत्ता या शब्दाला, कृतीला, मालकी ला अनेक पदर येतील. त्याचे संदर्भ प्रत्येक कथेचे मध्ये वेगवेगळे असू शकतील. तो एक मोठा अभ्यासाचा विषय

होऊ शकतो. त्याकरता आपल्याला वेगळे विचार मंथन करावे लागेल. अर्थात हे माझे प्रथम दर्शनी मत आणि विचार आहेत.

विलास वाघोलीकर: योग्य. जीएंच्या कथांत मृत्यू, बालस्वभाव असे महत्वाचे पैलू येतात. तसेच जीएंच्या कथेतील “सत्ता” या पैलूबद्दल सविस्तर विवेचन करता येईल.तरी तो मोठाच पुस्तिकेचा विषय होईल. वाचकांनी यावर जरूर लिहावे असे वाटते. विलास वाघोलीकर

संजीव सावरगांवकर: अहो कथेच्या बाबत हा एक आयाम झाला. अजून सत्ता हा विषय आहेच. बाकीचा कथा आस्वाद वेगळाच.

यतीन गुळवणी : “दंश” हा (आपणा) मानवासाठीचा प्रकार, पण नागासाठी तो विनयभंगाचा प्रकार व त्या नंतर मृत्यू म्हणजे बलात्कार करून हत्या. थोडक्यात “त्या” सापासाठी “बलात्कार करून हत्या. हे करून “तो” साप परिपूर्तीने श्रांत झाला. हा कथानकाचा पहिला अध्याय.

दुसऱ्या भागात “त्या” सापाची कहाणी खोटी ठरवून वृद्ध सापप्रमुखाच्या इशाऱ्यावर इतर साप “त्या” सापाची हत्या करतात. “तो” साप दुर्बल होऊन निर्जीव झाला. त्या गर्दीत काहीच करायला न मिळालेल्या एका लहान सापाने “त्या” सापाला फरपटत दूर नेऊन स्मशानात टाकून दिले. हा कथानकाचा दुसरा अध्याय होतो.

तिसऱ्या भागात वृद्ध सर्पप्रमुख भावी प्रमुखाला दूर खडकाच्या टोकावर मोकळ्या हवेत घेऊन जातो. “त्या” सापाने वर्णन केलेली सौंदर्यवती खरोखरच आपण पाहिली असल्याचे सांगून इतर सापांसमोर सांगायचे नसल्याने एकांतात सल्ला देतो. “"उद्या तू प्रमुख झाल्यावर तुला त्या सापांवर सत्ता गाजवायची आहे.

सत्ता व स्वप्न एकत्र नांदू शकत नाहीत. तेव्हा अशा स्वप्नांची बीजे दिसू लागली की ती त्वरीत निष्ठुरपणे ठेचून काढ.'

त्यानंतर वृद्ध प्रमुख साप पुढे सरकतो व आपले जीर्ण हताश शरीर उन्हाने धगधगलेल्या खालच्या खडकावर फेकून देऊन आत्महत्या करतो. हा तीसरा अध्याय संपतो.

तीन मृत्यू

पहिली आत्महत्या सौंदर्यवतीच्या दृष्टिने. पण 'त्या' सापाच्या दृष्टिकोनातून 'वासनापूर्ती!

दूसरी 'त्या' सापाची विवरातल्या इतर सापांकडून सामूहिक हत्या!

तिसरा मृत्यू म्हणजे वृद्ध प्रमुख सापाची आत्महत्या! (कदाचित भावी प्रमुख साप इतरांना अपघाती मृत्यू म्हणून सांगेल.)

जीएंनी हे तीन मुख्य कथा जोडताना क्लिओपात्रा आणि आदम व इव्हच्या उपकथानकांचे गुंफण अगदी सफाईदारपणे करून वर अत्यंत तर्कशुद्ध तत्वज्ञानाची पखरण! तत्वज्ञानातील कळसाध्याय म्हणजे 'सत्ता आणि स्वप्न यातील भेद सत्ताधारी व्यक्तीने कसा हाताळावा व व्यक्ती म्हणून स्वप्न कसे जोपासावे'

सुनीळ सामंत: सत्ता आणि स्वप्न यातला भेद म्हणजे Practicality / Emotion हा असावा का? दोन्ही एकत्र का नांदत नसावेत?

सुनीळ सामंत: जीएंच्या वेगवेगळ्या कथांमधे सत्ता चा अर्थ वेगवेगळा आहे. या कथेमधे तो परंपरांचे, समूहाच्या विचारधारांचे रक्षण या अर्थी आला असावा असे मला वाटते.

जयश्री जंगले : माझे मतः

नंतर कड्यावरून उडी मारून मरण पावलेला साप हा सत्तालालसेने अंकित आहे. सर्वांनी हल्ला करून मारलेल्या वृद्ध सापाकडे आपल्यापेक्षा अधिक काहीतरी आहे, आपले स्वप्न त्याने सत्यात आणले आहे आणि त्यामुळे तो आपल्यापेक्षा इतरांच्या नजरेत श्रेष्ठ ठरू शकतो, हे तो सहन करू शकत नाही. म्हणूनच तो इतरांना त्याला ठार करण्याची आज्ञा देतो. आपले स्वप्न इतर कुणी साध्य केले की जगण्याचा आधार संपलाच. तेही असे आगळे स्वप्न, जे एकदाच साध्य होऊ शकते... नंटर तो जे तरूण सापाला सांगतो, ते अर्थातच असत्य. (टिपिकल सत्ताधारी...) “सत्ता नाही, स्वप्न नाही, मग जगायचे कशाला?” ही त्याची खरी वेदना...

“जगण्याचा हेतू” हे या कथेचे बीज आहे.

क्लिओपात्रा, आदम/ईव्ह यांच्या उपकथाही हेच बीजरूप दर्शवतात.

श्रीकांत देशमुख : वास्तविक सत्ता आपसुक येत नाही. आधि सत्तेची भावना (विचार/ईमोशन) मनात येते. आणि ती भावना पुढे स्वप्नात बदलते. तद्नंतर सत्तेचे हे स्वप्न पुर्ण करण्यासाठी सुरु होतं ते सत्तेसाठीचे मार्गक्रमण. तेही भल्याबुऱ्या मार्गाने. आणि एकदा सत्ताधीश झालेली व्यक्ती प्रयत्नशील राहते ती पुर्णकश सत्ताधीश होण्यासाठी. स्थापीत सत्ता टिकविण्याचा प्रयत्न करतेच करते. त्यासाठी मार्गातील सर्व अडसर दुर करणे हे त्याचे प्रथम कर्तव्य ठरते. तो सत्ताधीश राजकीय असो वा धर्मीक असो. जेव्हा तो गलीत गात्र होतो तेव्हा आपलाच विचार पुढे चालवणारा शिष्य चेला तयार करुन आपली सत्ता अहर्निश अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करतो.

जि. ए. च्या कथांमधील पात्रांच्या वागण्यात मला जो पैलु दिसतो तो म्हणजे

सत्तापदाचे जतन करतांना तथाकथीत सत्ताधारी /धर्मवीरांचा दांभिकपणा हा स्थायीभाव असतो.

राजेश उनवणे : 👌 खूप चांगले प्रश्न.. 🙏

सर नमस्कार...सत्तेचा सारीपाट मोजक्या शब्दात अभिव्यक्त करने कठिण गोष्ट आहे, हे अगदी खरे आहे..

आपले दोन मुद्दे महत्त्वाचे वाटले..

...पण तिसरा मुद्दा..????

...हत्या केल्याचे नैराश्य आणि तेही सत्ताधारी असलेल्या वृद्ध सापाला...?

. हे कारण असावे असे मला तरी अजिबात कथेत दिसून येत नाही...!

आपण गैरसमज करून घेऊ नये.. घेणार नाही याची खात्रीही आहे..

एक निखळ चर्चा या उद्देशाने माझे मत मांडले आहे 🙏

सुनीलजी...धन्यवाद 🙏

सत्तेचा व्यापक अर्थ आणि तोही जीएंच्या मनातला शोधण्याचा आपला प्रयत्न स्तुत्य आहे...त्यावरील आपले विचारमंथन वाचण्यास उतावीळ झालो आहे...! आपण सुंदर लिहिता...आणि का नाही लिहिणार तसे आपण?....

कारण या ग्रुपची सत्ता शेवटी आपल्याच हातात आहे... 😀 🙏

दिलिप बडे: सत्ता व स्वप्न एकत्र राहू शकत नाहीत,हे खर आहे.संवेदनशीलता ठेऊन सत्ता राबवता येणार नाही.सत्ताधारी आपली संवेदनाशीलता गोठवतातच.

संजीव सावरगांवकर: हे आहे ते मैत्र, जी. ए. च्या कथा, साहित्यामुळे मिळालेली सुहृद, साहित्यावर सर्वांगाने विचार करणारा मित्र परिवार. ते मित्र वर्तुळातील मेरू मणी आहेत पण त्यांनी कधीच सत्ता गाजविली नाहीये. सुनील जी पण तुम्हीही लिहाच सत्ता या संकल्पनेवर...

दिलिप बडे: तो साप" स्त्रि सौंदर्याने अलौकिक सुखाला प्राप्त होतो.तिला दंश केल्यानेही त्या सर्पाचा आनंद द्विगुणीत होतो.येथे मानव योनित स्त्रि दर्शनाने आनंद होईल आणि सर्प योनित दंशाने भूख भागेल.असा भेद करता येईल का?

अलका तडकलकर : प्रत्येक प्राण्यांचे एक स्वतंत्र जग असते.त्यात त्यांचे अन्न, निवारा,गति,व आयुष्य ठरलेले असते.

सर्प आणि माणूस यांचेही असेच भिन्न भिन्न जग आहे.या जगात त्यांचे जगण्याचे व मरणाचे नियम वेगवेगळे आहेत.

सुख,आनंद, यश,अपयश,देदीप्यमान यश,सत्ता याची कल्पनाही वेगवेगळी. पण struggle for existence हा नियम सर्वांनाच लागू आहे.

तो साप देदीप्यमान यश घेऊन आनंद व्यक्त करण्यास अंधाऱ्या विवरात येतो पण त्याचे यश अविश्वसनीय वाटते.त्यास प्रायश्चित्त दिले जाते.

मग तरूण व वृद्ध सापडत संवाद सुरू होतो.जमिनीखाली राहणारे आपण आता खूप उंचीवर आलोत आता पुढे जायचे कुठे ? समोर तर अथांग समुद्र दिसतोय. तरूण सापाला पुढचा मार्ग दाखवून वृद्ध साप स्वतःला खडकावर लोटून देतो. मिळवायचे काय राहिलेय ही अस्वस्थता जणू त्यास विळखा घालते.

धन्यवाद

डॉ.अलका तडकलकर

मंजिरी देशमुख: अत्युच्च, अप्राप्य असं काही तरी मिळविणारा आपल्यापैकी कुणीतरी एक आपल्यापेक्षा वरचढ होऊन सत्तेला सहज आव्हान देऊ शकतो, आपल्या सत्तेला त्याच्यामुळे धोका आहे हे स्पष्टपणे कळत असल्याने वृद्ध सर्पनेता भावी आव्हानकर्त्याचा वध इतर सर्पांकडून करवतो. तरुण सर्पाच्या हाती वृद्ध सत्ताधीश सत्तेची सूत्रे सोपवितो. त्या वृद्ध सर्पाने सत्तांतरासाठी नेमका हा क्षण का

गाठावा? काही तरी अलौकिक करावं आणि या जन्माचे सार्थक व्हावं अशी आस प्रत्येक जण आपल्या उराशी बाळगून असतो. पण तो झळाळणारा अलौकिक क्षण त्या तरुण सर्पाने मिळविला. नेमक्या याक्षणाने वृद्ध सर्प सत्ताधिशाला आपल्या विकल वृद्धत्वातून असा क्षण पुढे कधीही न मिळण्याच्या अशक्यतेची तीव्र जाणीव होऊन त्याच्या पुढच्या पिढीत त्याच्या इच्छेनुसार सत्तांतर करतो.

पण मग वृद्ध सर्प प्राणत्याग का करतो? वृद्ध सर्प थकलेला पण चाणाक्ष आहे. ज्याप्रमाणे त्याने सत्तांतराचा नेमका क्षण ओळखला तसाच त्याने त्याच्यातून सत्ता वजा झाल्यानंतर अति सामान्य जीवन जगणं किती यातनामय आहे हे जाणलं आहे. असं जीवन म्हणजे जीवंतपणी क्षणोक्षणी मृत्यू. हे हतबल करणारं जगणं वृद्ध सर्प मोठ्या हिमतीने नाकारतो व स्वतःला उंचावरून खाली लोटून देऊन प्राणत्याग करतो.

सर्प ही कथा नेते व त्यांचं राजकारण आणि त्यातील क्लिष्टता समजण्यास मदत करते.

आणखी एक गोष्ट जी एं च्या कथा वाचताना मला नेहमी आठवतात ती डार्विनच्या उत्क्रांतीची तत्वं survival of the fittest and struggle for existence.

संजीव सावरगांवकर: ही नेहेमीचीच जग रहाटी आहे. फक्त या कथेत ती उत्कृष्ट पणे मांडली आहे. माध्यम सर्प पिढी.

अलका तडकलकर : उत्कृष्ट म्हणजे तो साप सर्व काही प्रामाणिकपणे आपला आनंद व्यक्त करतोय, पण जे अवर्णनीय आहे असे सुख मिळाल्याचे ऐकून त्याच्या आनंदात सामील न होणारे साप त्याला दंश करतात.

आणि वृद्ध साप वयापरत्वे मरणारच असतो पण तेवढे दिवसही जगणे त्यास नकोसे वाटते

हे दृष्यचित्रण कथेचे वजनदार प्रसंग आहेत

विलास वाघोलीकर: आपण विचारपूर्वक वृद्ध सर्पाची मनोदशा उलगडून सांगीतली आहे, याबद्दल धन्यवाद. I) तरूण सर्प ,त्याची धडपड, त्याची अचिव्हमेंट हे कथेत महत्वाचे आहेतच. पण सत्ता स्पर्धा, वृद्ध सर्पाकडून निषेध व हत्येची शिक्षा हेही सत्तेचे बदलणारे रंग दाखवणारे म्हणून महत्वाचे आहेत. विदूषकमध्ये शेवटी धर्मगुरूकडून विजयराज, विदूषक, चंचला, (ध्रुवशीला, वाचक) यांना जे धक्के बसतात त्याची आठवण होते. संक्षेपाने येथे तसेच घडते. 2) मानवी जीवनाचे शरीर (सामर्थ्य व इड) मन (काम क्रोध मद मत्सर इ. षडरिपू) सामाजिक (व कौटुंबिक महत्व) वर्चस्व, अर्थ, हे पैलू असतात. प्रत्येकजण स्वतःकडे जास्त मार्जिनल युटिलिटी घेण्याचा प्रयत्न करतो, याला सत्ता म्हणता येईल.जीएंनी त्यांच्या सर्प आदी कथांत सत्तेचे पैलू सामर्थ्याने दाखवले आहेत. आपला प्रतिसाद आवडला. धन्यवाद. विलास वाघोलीकर.

राजेश उनवणे :...मस्त लिहिलं आहे.. 👌 👍

मला या कथेचा उत्तरार्ध काय असेल असा एक गमतीचा प्रश्न पडतो..

.....म्हणजे तरुण साप उंच खडकावरुन एकटाच आपल्या सर्प समाजात परत येतो, तेव्हा सर्प समाजातील सर्व साप त्याला, “वृद्ध साप कोठे आहे?” याची निश्चितच विचारणा करतील... तेव्हा तो त्यांना, “ "वृद्ध सापाने आत्महत्या केली", असे सांगेल का?...

..आणि जरी त्याने सत्य सांगितले , तर ते सर्व साप त्यावर विश्वास ठेवतील का?

किंवा

तूच त्यास मारले अथवा ढकलून दिले असावे अशी शंका सर्प समाजातील सापा मध्ये (निदान काही सापामध्ये) उत्पन्न होईल का ?

आणि ते त्यास तसे विचारायचे धाडस करतील का?

Nagesh Kulkarni: यावर एक कथा होईल..

दिलिप बडे: घरी चला,अस काही करू नका.अस त्यांना तू का म्हणाला नाहीस.तस करण्यापासून तू त्यांना का आडवले नाहीस.2)तुला सत्तेचा मोह झाल्यानेच तू त्यांना कड्यावरून ढकललस3)सर्वांनी त्याचा निषेध करून प्रमुखावर हल्ला करून त्याचाही वध केला4)किंवा तरूण नेतृत्वावर विश्वास दाखवून तो खर बोलत आहे अस मानल जाईल5)तर्काला अंत नाही.

श्रीकांत देशमुख : अफलातुन कल्पना. एक दुसरीच कथा नक्कीच यावर होईल. तथापी तरुण साप हा होऊ घातलेला नायक असल्याचे सर्प समाजाला ज्ञात आहे. त्याचा पुढिल नायक रुपात स्विकार निश्चित असल्याने “ जनता “ रुपी सर्प समाज तो नवनायक जे सांगेल ते स्विकारतील असे वाटते.

राजेश उनवणे : खर आहे.. ✔️ 🙏

पण मला वाटत ही कथा परिपूर्ण आहे...तिचा दुसरा भाग लिहिता येईल...नाही असे नाही..पण मूळ लेखक आदरणीय जीए यांनी तिचा हा उत्तरार्ध कथेचा शेवट करताना, निश्चित विचारात घेतला असणार...! त्यामुळे ही कथा जास्तीत जास्त

परिपूर्ण व परिणामकारक कशी होईल याची त्यांनी काळजी निश्चित पणे घेतलेली आहे...!

(अर्थातच हे वैयक्तिक मत आहे...)

विश्वेश्वर नांदेडकर : हे unending होईल. फक्त कथेवर विवेचन व्हावे. इतर कल्पना विस्तार चर्चा ग्रुप वर व्हायला हरकत नाही.

श्रीकांत देशमुख : सुनिळ सामंत सरांनी "सत्ता" हा एक भव्य सारीपाट सगळ्या समुहापुढे मांडला. आजवर सत्ता म्हणजे काय असा विचार मनात आला नव्हता. त्यावर काही लिहावे बोलावे तर माझ्यासारख्याला काहिच माहिती/ज्ञान नाही. पण उत्सुकता असल्याने आधुनीक गुरु "गुगल" ची मदत घ्यावी वाटली. त्यातुन जे हाती आले ते महासागरात शिरल्यावर वाटावे तसे. कारण सत्ता, सत्तांतर, अधिसत्ता हे शब्द राज्यशास्त्राचा भाग आहेत आणि मुळात राज्यशास्त्र हा मोठा विषय. त्या अनुषंगाने या समुहावर चर्चा अपेक्षित नाही /नसावी.

परंतु आंतरजाल धांडोळ्यात जे हाती लागले ते म्हणजे सत्तेच्या वेगवेगळ्या व्याख्या विचारवंतांनी(कौटिल्य, साॅक्रेटीस, अरीस्टॉटल पासुन अब्राहम लिंकन पर्यंत) करुन ठेवल्यात. Politics among nation ह्या ग्रंथात माॅर्गेन थाॅ ह्यांनी सत्ता, सत्तेची रुपे (राजकीय, धार्मिक ,आर्थिक ई. ई.) यांचा सखोल ऊहापोह केला.

अर्थात आपल्या समुहावर हा विषय चर्चेला त्या दृष्टीकोनातून आलेला नाही. परंतु माँर्गेन थाॅ यांची एक व्याख्या मला व्यक्तिशः पटली जी कथेच्या संदर्भात कदाचीत योग्य असु शकेल. ती व्याख्या अशी कि

"एका व्यक्ती द्वारे ईतर व्यक्तीं किंवा समुहाच्या मन, विचार, कृतीवर नियंत्रण ठेवण्याची प्रक्रिया म्हणजे सत्ता."

मुलतः या पृथ्वीतलावर मानव वा कोणताही प्राणी अस्तित्वासाठी जगत झगडत असतो. मंजीरीजींनी जे स्पष्ट केले Strugle for existence and survival of fittest. तसेच हे.

या अनुषंगाने कोणताही जीव या पृथ्वीतलावर तग धरुन असतो. एकदा का त्याच्या जिवाची शाश्वती झाली कि मग डा◌ॅमिनन्स अधिकारीता वगैरे येत असावे ज्याची परीणिती शेवटी सत्तेमध्ये होत असावी.

या समुहावरील दिग्गजांपुढे माझे वरील निवेदन धार्ष्ट्य करण्या सारखेच आहे याची मला नम्र जाणीव आहे. तथापी ह्या समुहातील विचारवंत नवख्यास लिहीणेस उत्साहीत करीत असतात. म्हणुन हा प्रयास केला.

राजेश उनवणे : सहमत आहे.... ✔️ 👍

दुसरी कथा निश्चितपणे कल्पनाशक्तीला ताण देऊन कोणी प्रतिभावान लेखक लिहूही शकेल...!

पण या कथेतील "वृद्ध साप" हा राजकीय-मानवी- स्वभावाचा अर्क आहे... तोच या कथेचा नायक आहे....!

भूत-वर्तमान- भविष्य याच व्यवहारिक ज्ञान त्याच्यापाशी आहेच, यात शंकाच नाही... उलट ते ज्ञान त्याने आत्मसात केलेले आहे.

व्यवहारिक ज्ञाना प्रमाणेच आध्यात्मिक ज्ञान त्याच्यापाशी आहे, पण ते आत्मसात करू न शकल्याची खंत त्याला आहे...आसक्ति जिंकू शकलो नाही हे प्रामाणिकपणे तो कबूल करतो..!

“तो साप” याच्या हत्येत वृद्ध सापाचा सहभाग आहे...पण तो स्वत: त्याला मारण्याच्या कृत्या मध्ये भाग घेत नाही...कसलेल्या राजकारणी प्रमाणे तो पडद्याआड आहे..

..." तो साप" याने आजतागायत सांभाळून ठेवलेल्या वासनेचा मनसोक्त उपभोग घेऊन नंतर ती वासना दंश करून मारून टाकली असली (वृद्ध सापाने त्याच्या या कृतिवर संशय व्यक्त केला आहे..-जीए 🙏) असे कथेत आहे.

वासना जिंकल्याचा त्याचा दावा अहंकारयुक्त भाषेत व्यक्त झाल्याने वृद्ध सापाचा त्याच्या या दाव्यावर विश्वास नाही..!

त्याच्या हत्येस अनुमोदन दिल्याने तरुण साप याने प्रथम हल्ला केला व नंतर इतरांनी...!

" तरुण साप" याच्याकडे "तो साप" सारखी स्वप्ने नाहीत, हे वृद्ध साप आधी त्यास विचारून घेतो.

स्वप्ने पहाणाऱ्या "तो सापा" विषयी वृद्ध सापाला ममत्व आहे..शेवटी तो सत्ताधीश आहे.. सर्व सर्प समाजाचा पालक आहे!

"तो साप" ची हत्या केल्याबद्दल आजन्म तो डाग "तरुण साप " याच्या कारकीर्दीवर एखाद्या सावली प्रमाणे साथ देईल याची पुरेपूर व्यवस्था मरताना तो करून जातो....!

सत्ता व स्वप्ने संपली आहेत. जगून आता उपयोग नाही. पण जाताना तुझ्या कृत्याबद्दल तुला अशी शिक्षा देऊन जातो, असेच वृद्ध सापाने मनात म्हटलं असणार.

एका कसलेल्या सत्ताधीश राजकारण्या प्रमाणे...!

(हे वैयक्तीक मत कथेचा अर्थ असाच आहे असा दावा करीत नाही...सुचले ते लिहिले. 🙏)

दिलिप बडे: जी.एं.चा भाव लक्षात घेता त्या सापाला संवेदनशील आनंद"मिळाला हे कथेचे मुळ असावे.सत्ता"दर्शन ही दुय्यम मांडणी असावी.

अलका तडकलकर : होय. एखाद्याला मिळणारा निरलस आनंद ही व्यक्त करणे शिक्षेस पात्र होते.

विश्वेश्वर नांदेडकर : स्वप्न आणि त्याच्या पूर्तते चा क्षण आणि त्याचे अफलातून वर्णन हाच कथेचा मूळ गाभा आहे असे माझे मत आहे. सत्ता संघर्ष , मानवी स्वभावाचे विविध अंगाने दर्शन या सगळ्या अनुषंगिक बाबी जी ए क्या सगळ्या कथा मधून येतातच

अलका तडकलकर : ध्यानी मनी नसताना त्या सापाला सौंदर्याचे दर्शन घडले.सहवास मिळाला व दंश करून तिला आपल्यासारखे (विषारी) केले. हा आनंद मानावा की एक चमत्कारिक घटना.?

मलाच पडलेला हा प्रश्न.

यतीन गुळवणी : रूढ अर्थाने ही घटना म्हणजे

१ सौंदर्यवतीच्या अर्थाने सापाला पकडून त्याच्याकडून चाववून घेऊन जीवन संपवणे. अर्थात आत्महत्य!

२ सापाच्या दृषीने त्याला उपद्रव करणाऱ्यापासून आणखी जास्त उपद्रव होऊन प्राण पणाला लागू नये म्हणून स्वःताचा बचाव करण्यासाठी चावून (आपल्याला देणगी मिळालेल्या) विषाचा वापर करून समोरील शत्रूचे प्राण हरण करणे.

आता या कथेत साप त्या सौंदर्यवतीला फक्त ओळखतचं नाही तर तीच्या सहवासाच्या अभिलाषा बाळगून तीच्या महालात व सभोवताली फिरत असतो. आणि ज्यावेळेस ती सौंदर्यवती टोपलीतून त्या सापाला बाहेर काढून त्याचे तोंड

आपल्या गळयाकडे नेते त्यावेळेस तो साप अनेक वार दंश करून तीला निर्जीव करतो. आता प्रश्न उपस्थित होतो की, त्या सापाला

तिच्याबद्दल वाटणाऱ्या अभिलाषेतून त्याला नेमके काय अभिप्रेत होते?

अ) त्या सापाला त्या सौंदर्यवतीला दूरून पाहात राहून नेत्रसुख हवे होते की

आ) पूर्वी सर्कशीत सुंदरी सापांना अंगाखांद्यावर फिरवण्याचे प्रयोग दाखवीत होते. तसे त्या सापाला त्या सौंदर्यवतीचा शारीरिक सहवास अपेक्षित होता की.

इ) तीला वारंवार दंश करून तीच्या दर्शनाचा, सहवासाचा लाभ इतर कोणाला मिळू नये म्हणून तीला कायमचे संपवायचे होते.

पण मग एक प्रश्न उरतोच की आवडलेल्या त्या सौंदर्यवतीला संपवण्यात त्या सापाला का कृतकृत्य वाटले?

जी. एं. ची हीच तर खुबी आहे की ते वाचकालावर अर्थ काढण्याची जबाबदारी सोपवतात. धन्य धन्य जीए!!

संजीव सावरगांवकर: तो सर्प हा या कथेतील एकदम वेगळा सर्प आहे. जमिनीच्या खालील सर्प विश्वात म्हातारा सर्प सोडला तर जमिनीवरील विश्वात कोणीही गेलेले नाहीत. त्यामुळे त्यांना जमिनीवरील जग, स्त्रिया, स्त्री देह लालसा, वासना याचा लवलेश ही नाही. तो सर्प मात्र या सर्व अभिलाषा त्याच्या मनात, त्याच्या स्वप्नातील विश्वात बाळगून आहे. त्याच्याही नशीबाचा भाग म्हणजे हे स्वप्नातील विश्व त्याच्याकरता अस्तित्वात येते. त्यामुळे त्याची भोग लालसा, वासना उफाळून येऊन, ज्या वेळी राणी, विवस्त्र होऊन त्याला जवळ करते ती तिचा देहत्याग म्हणुन पण तोच क्षण सर्प मात्र वासनेच्या अति भोगत अनंत दंश करून, तिच्या मृत शरीरावर अती श्रमाने शांत होऊन पडतो. लेखकाने पुरुष वासना लालसा सापाच्या माध्यामातून प्रकट केली आहे. लेखकाला जे अभिप्रेत होते ते त्यांचे लेखन वैशिष्ट्य आहे. सर्प शारीरिक सहवासाची अपेक्षा ठेवत नाहिये तर स्त्री ची माऊ

मुलायम कांती च्या स्पर्शाची अभिलाषा ठेऊन आहे. पुढील क्षणात त्याच्या अनेक दंशावर ती स्त्री मरण पावली हे त्याचे लक्ष्य नाहीच. सर्प कृतकृत्य होतो ते फक्त स्पर्शाची आसक्तीच्या मुळे. माणसासारखी, पुरुषांचे सारखी विचार शक्ति ठेऊन तो ते क्षण उपभोगत आहे हा वाचकाचा, मानवाचे विचार किंवा स्वप्न रंजन असते. मी थोडेसे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. बोलून जास्त चांगले अभिव्यक्त होता येईल.

राजेश उनवणे : आपला प्रश्न भावला...त्याहूनही..

"प्रयत्न करीत आहे, नवोदित आहे " हे वाक्य अधिकच भावले...! 👍

आपण पुरस्कार प्राप्त लेखिका आहात व एखादा लेखक दुसऱ्या लेखकाचे लिखाणावर जेव्हा भाष्य करतो, ते नेहमीच वाचनीय असते.. आपले लिखाण कौतुकास्पद आहे..धन्यवाद..! 🙏

एक सांगावेसे वाटते,

"सर्प" कथेतील सूतोवाच खूप मोठे होईल या विचाराने काही मला जाणवलेल्या कथेतील अनेक गोष्टींचा उल्लेख करणे मूळ सूतोवाच मध्ये टाळले गेले होते.. त्यामुळे सूतोवाच मोठे झाले असते..!

त्याबाबत मागील लिहिलेल्या एका माझ्या स्फुटात माझ्याकडून ग्रुप-सदस्यांची माफी ही मागितली गेली होती...!

ते सूतोवाच अपूर्णच होते.

तरीही ग्रुपमधील सर्व मान्यवरांनी त्या सूतोवाच बद्दल कौतुकास्पद लिहिले यातून त्यांच्या मनाचाच मोठेपणा दिसून येतो...त्या सर्वांचे आभार...! 🙏

सुनीलजी नमस्कार..! 🙏

आपली परवानगी गृहित धरून..,

मूळ सूतोवाच नंतर, सूतोवाचचा पुढील भाग-१ मी पोस्ट करीत आहेत.....! 👇

(भाग-2 ही तयार आहे.. पण थोडे चेंजेस करून तो ही पोस्ट करतो...!)

[09:06, 14/03/2023] राजेश उनवणे : ---- जीएंच्या “सर्प” कथेच्या अनुषंगाने “सर्पाविषयी माहिती” व मूळ सूतोवाचमध्ये विस्तारवादाच्या भयाने न केलेले "सर्प कथे वरील पुढील सूतोवाच"------

(भाग-१)

नागराज किंवा किंग कोब्रा हा भारतातील पूर्व व दक्षिण भागात आढळणारा दुर्मिळ साप आहे. हा नावाप्रमाणेच नागराज आहे.

.महाराष्ट्र-कर्नाटकच्या सीमाभागामध्ये बांदिपूर, कोइमतूर, निलगिरी, तसेच केरळमध्ये आणि आसाममधील अरण्यात नागराजाचे अस्तित्व आहे.

नागाला इंग्रजीत कोब्रा म्हणतात. हा विषारी साप १ ते १.५ मिटर इतका लांब असतो. त्याचे शास्त्रीय नाव “नाजा नाजा” असे आहे. हे नाव संस्कृत “नाग” यावरुन लॅटिनमधे घेतलेले आहे. नाजा म्हणजेच कोब्रा. याच्या १५ जाती आहेत. हाही भारतात मोठ्या प्रमाणावर आढळतो. सपाटीपासून ते २००० मिटर उंचीपर्यंत हा सापडतो. नागाचे भक्ष्य उंदिर, घुशी, बेडुक व पक्षी असते.

नाग (कोब्रा) व नागराज(किंग कोब्रा) यांच्यामध्ये फरक आहे.

किंग कोब्राला मराठीत “नागराज” असे नाव आहे. नागासारखा फणा व फुत्कार असणारा हा जगातील आकाराने सर्वात मोठा (५ मिटर्स + लांबीचा) विषारी सर्प आहे. याचे शास्त्रीय नाव “ऑफिओफॅगस हॅना” म्हणजेच “सर्प खाणारा” असे आहे. ऑफिओफॅगस प्रजातिमधील नागराज हा एकमेव साप आहे. ज्याच्या खाण्यात धामण, लहान अजगर, सर्व विषारी साप असतात. साप अगदीच दुर्मीळ असतील तर सरडे, पक्षी आणि लहान कुरतडणारे प्राणी तो खातो.

दक्षिण भारतात चहाच्या मळयात नागराजामुळे अनेक मृत्यू झाले आहेत. एरवी नागराज मानवी वस्तीजवळ जात नाही.

याची मादी पालापाचोळयाचे घरटे बनवून त्यात अंडी घालते व पिल्ले बाहेर येईपर्यंत अंड्याचे संरक्षण करते. जंगलातून त्याचे प्रामुख्याने वास्तव्य आहे.

किंग कोब्रा लांबीला सर्वाधिक व विषाच्या प्रभावात सर्वाधिक. याच्या विषाने माणूस अर्ध्या तासाच्या आत मरू शकतो. दिसायला रुबाबदार असा हा साप लांबीला पाच ते साडेपाच मीटर असू शकतो. याचा फणा इतर नागांपेक्षा छोटा असतो.

हा साप घनदाट जंगले पसंत करतो व कमीत कमी माणसाच्या संपर्कात येतो.

अभ्यासकांच्या मते हा सर्वाधिक उत्क्रांत साप आहे.

सापांमध्ये अतिशय दुर्मीळ असे सहचरी जीवन जगतो (काही काळापुरतेच). अंडी टाकण्यासाठी हा साप घरटे बांधतो. तसेच पिल्ले बाहेर येईपर्यंत अंड्याचे रक्षण करतो. ते काम मादीचेच असते.

नागराज एका वेळी ३८०-६०० मि ग्रॅम विष अंतरक्षेपित करत असल्याने नागराजाने दंश केलेली व्यक्ती पंधरा मिनिटात मरण पावते. सरासरी ३०-४५ मिनिटामध्ये मृत्यू ओढवतो. नागराजाने दंश केलेल्या ७५% व्यक्ती मरण पावतात.

नागराजाची मादी हा एकमेव साप अंड्यांचे रक्षण करतो. जंगलातील वाळलेली पाने आणि गवताचा उंचवटा करून त्यामध्ये मादी २०-४० अंडी घालते. अंड्यामधून पिले बाहेर पडेपर्यंत मादी या पानांच्या घरट्यावर वेटोळे घालून बसते. जवळ आलेल्या प्रत्येक प्राण्यास मादी भीती दाखवते. पानांच्या घरात तापमान २८ अंश सेंटीग्रेड ठेवलेले असते. अंड्यातून पिले बाहेर येण्याच्या वेळी मादी घरट्यापासून दूर जाऊन एखादे भक्ष्य खाते.

आपली पिले खाण्याचा नागराजाच्या मादीचा स्वभाव नाही.

अंड्यातून बाहेर पडलेली पिले ४५-५५ सेमी लांबीची असतात. त्यांचे विष प्रौढाइतकेच प्रभावी असते. पिले जन्मापासून थोडी चिडखोर असतात.

कर्नाटक राज्यातील शिमोगा जिल्हयातील अगुंबे वर्षावन संशोधन केंद्रात नागराजाचे संरक्षण आणि संशोधन केले जाते. आणि....

जीए तेथून जवळच राहत होते. धारवाड-शिमोगा अंतर २१५ किमीच्या आसपास आहे.

अलका तडकलकर : 100% सत्य व वैज्ञानिक दृष्टिकोण ठेवत लिहीलेला लेख 👆

मंजिरी देशमुख: नागांविषयी अत्यंत माहितीपूर्ण लेख आवडला.

विलास वाघोलीकर: विवेचन मोठे झाले, तरी एकत्र, भाग I, भाग 2.... करून कृपया विवेचन द्यावे ही विनंती. (मी तसे करतो) आता कथेसंबंधी आपल्या विवेचनाची वाट पहातो. गुड डे. विलास वाघोलीकर

माधव पुराणिक : कथा सर्प - सांजशकुन

विवेचन -डॉ माधव पुराणिक

वाचकांचे प्रश्न

प्रश्न १- तो साप परत परत दंश - फक्त स्पर्श का करतो ?

प्रश्न २ - दंशानंतर तो साप याला जे अदभुत सुख मिळते त्याचे स्वरूप काय? ते सुख स्त्रीपुरूषांच्या नेहमीच्या उत्कट, धुंद, "मोहात यशस्वी झाल्यास क्षणिक तृप्ती

देऊन नंतर अनंत असमाधान करणारे सुख"(जी एंचे शब्द ,कथा काली) यापेक्षा वेगळे कसे ?

प्रश्न ३ -" एक दैदिप्यमान साम्राज्य मावळत असता तूच त्याला आता निरोप दे " यांचा अर्थ काय ?

यांचे उत्तर ज्ञानेश्वरीतल्या सहाव्या अध्यायातल्या ओव्या 211 ते 290 मध्ये कुंडलिनी शक्तीच्या अनुभवाच्या विविध टप्प्यांच्या वर्णनात आहे.

"पिंडे पिंडाचा ग्रासू | तो हा नाथसंकेतींचा दंशु |

परि दाऊनि गेला उद्देशू| महाविष्णु|| "

(ज्ञानेश्वरी, अध्याय ६ ओवी २९१)

अर्थ - योग साधनाच्या द्वारे अशा रीतीने पिंडाने पिंडाला ग्रासणे हे नाथसंप्रदायाचे रहस्य आहे. परंतु श्रीकृष्णांनी त्याची नुसती दिशा दाखविली आहे.

१ प्रश्न १ यातील शब्द दंश व कथेतला" परत परत दंश "

प्रश्न २ मधील अदभुत सुखाचे स्वरूप

प्रश्न ३ मधील साम्राज्य अंत

याचे स्पष्टीकरण जर वरील २११-२९० ओव्या वाचल्या तर मिळू शकते.

विषयाचा विस्तार मोठा असल्याने मी सवडीने सखोल विवेचन करीन.

सुंदर स्त्री म्हणजे शारीरिक मानसिक , स्थूल, आकर्षित करणाऱ्या बाह्य वासनेचे प्रतिक ,जीवाचे प्रतिक.

तो साप म्हणजे त्या वेळी जागृत झालेल्या कुंडलिनी शक्ती चे प्रतिक. कुंडलिनी म्हणजे इच्छा, ज्ञान व क्रिया(कृती, कर्म) यांची एकत्रितपणे एकाचवेळी कार्य करणारी सूक्ष्म शक्ती.

ही एकत्र बाह्य जगाकडे (वस्तू, स्त्री इ) धावते (आसक्ती) किंवा आत्मसत्तेकडे धावते ((विरक्ती).तो साप मधल्यामध्ये आहे.

दंश करून तो साप स्वतः मधील स्थूल वासनेची (मनातील स्त्री प्रतिमेची, आठवणींची, कल्पनांची, इच्छांची, विचारांची) हत्या करतो.

२ सत्ता- या कथेत मुख्य आत्मसत्तेचे व त्याला पूरक असे व्यक्ती व समाज यांच्यातील काळानुसार, परिस्थितीनुसार बदलणाऱ्या परस्परसंबंधांचे, सत्तेचे वर्णन आहे.

पात्र परिचय

अ)तो साप - अद्भुत,(सूक्ष्म) शक्तीचा पूर्वी अनुभव घेतलेला पण अजून जीव अवस्थेत असलेला (जीव = मन+बुध्दी+प्राण +अहंकार). जीवाचे क्रोध, ईर्ष्या, द्वेष ,गर्व इ विकार दाखविणारा, जीवनाचा शोध घेणारा प्रवासी

तो साप- द्वेषाचा आविष्कार - "कारण त्या दोन सापांना दिलेल्या प्रायश्चितात त्याने स्वतः भाग घेतला होता. त्या दोन सापांवर इतरांनी कडाडून हल्ला केला होता आणि दंश करून त्यांची हत्या केली होती"

तो साप - ईर्ष्येचा, गर्वाचा, दर्पाचा आविष्कार - " पण हे अंधारे विवर, त्यातील सडलेली हवा आणि त्यातच निर्जीवपणे जगणारे तुम्ही हे पाहिल्यावर माझ्याच सामर्थ्य आले. माझ्या सुखाला तुलना नाही इतके ते परिपूर्ण होतेच पण तुमच्या समोर आता त्यावर ईर्ष्येची झळाळी चढली आहे"(इतर सापांना सांगतो)

तो साप - सुखाचा आविष्कार - " ते मला पूर्ण माहित आहे तो हर्षाने थरथरत म्हणाला"

तो साप - दिव्य वासनेचे वर्णन - " परंतु या आमचे देखील डोळे दिपवणाऱ्या सौंदर्याला मात्र तोड नव्हती.या एका क्षणाने मी झपाटल्यासारखा झालो आणि लालसेने माझे सारे अंग विजेप्रमाणे झाले. त्याच क्षणी डोळयांवर प्रकाश किरण पडावा त्याप्रमाणे एक साक्षात्कार झाला (येथे लालसा ही पूर्णत्वाचा दिव्य जाणिवेची लालसा)

तो साप - सामान्य वासनेचे वर्णन - " रस्त्याने जात असता त्यांच्या उत्पादक पिंडऱ्या व त्याखालील गोऱ्या पावलांच्या लाल फळांच्या तुकड्याप्रमाणे दिसणाऱ्या त्याचा पाहून मी अनेकदाच आपल्यासारखा झालो आहे. (शारीरिक व मानसिक वासना)

आ)वृध्द साप - सूक्ष्म शक्तिची ज्ञानाने / ऐकीव / प्रत्यक्ष इतरांच्या मध्ये पाहिलेला नेता. आता वयाप्रमाणे ती जीवघेणी आशा संपल्यावर मित्र अशा मृत्यूला स्वीकारणारा

"माते ,मृत्यू कोणालाही टळला नाही आणि तो अटळ आहे. ती तर मानवी जीवनाची अत्यंत आशेची निशाणी आहे. शेवटी शेवटी तर साऱ्या चलच्चित्रात तोच एक आढळ निश्चल विश्वास माणसापुढे उभा राहतो.ती आपत्ती नसून विश्रांती आहे." - जी एक - कथा काली)

स्वप्नपूर्ती साठी आसक्ती कमी न करू शकल्या ची निराशा/अपयश बाळगणारा

"हे बघ , माझे शरीर विकत झाले त्यावेळचा माझा झोप नाहीसा झाला आणि दहशत देखील पूर्वीचा विकार राहिला नाही त्यावेळी एकच एक गोष्ट पूर्वीच्या घरी राहिली ती म्हणजे तिच्याविषयी वाटत आलेली आसक्ती"(वृध्द साप तरूण सापाला सांगतो)

इ)इतर दोन साप - " दुसऱ्या एकाच सोन्याचा रांजण राखत बसलेला एक हजार वर्षे आयुष्याचा सर्पराज दिसला असे तो सांगत होता दोनच दिवसापूर्वी तुझ्यासारखा एक आपल्याला सर्पमणी असलेला साथ दिसला असे सांगत आला

होता" (तरुण साप त्या सापाला सांगतो) या दोन सापांना तो दिव्य अनुभव आला असावा.

ई) तरूण साप - सामान्य स्वप्न न पाहणारा/ पाहू शकणारा /तशी इच्छा नसलेला/ तसे ज्ञान मिळविण्याची / तशी क्रिया/ साधना/ उपासना करण्यासाठी कुवत नसलेला माणूस.हीच त्याची नियती.

" एकंदरीने तुझ्या बाबतीत स्वप्नाबद्दल इशारा देण्याची फारशी गरज दिसत नाही ती बाधा तुला होणार नाही कारण त्याबाबतीची सुरक्षित दिसतोस एखाद्या स्वप्नाने झपाटून जाण्याची आशा महानगर भीती म्हण तुला कधी त्रस्त करणार नाही"(वृध्द साप तरुण सापाला म्हणतो)

अशा उपदेशाने सामाजिक सत्तेचे सातत्य चालू ठेवायला मदत करतो.आफली सामाजिक भूमिका सोडतो व व्यक्ती म्हणून मृत्यू स्वीकारतो.

उ) इतर वृध्द साप - मृत्यू ची वाट पाहत असलेली जराजर्जर माणसे

ऊ) सापांचा घोळका / इतर साप - समाजातील नियतीशरण अस्तित्व पुढे सरकवणारी माणस

ए) सर्व मापात असणारा अस्तित्ववादी परात्मभाव

प्रत्येक सापाचा त्याला आलेला स्त्रीचा, वासनेचा अनुभव वेगळा असतो.त्यामुळे तो साप यांचा अनुभव ते इतर साप जाणू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्यातील सत्तासंबंधात, नातेसंबंधात भयावह हास्यास्पदता निर्माण होते. ते संबंध कोणत्या ही सापाचे , व्यक्ती चे जीवन समृद्ध करीत नाहीत.व्यक्ती एकटी जगते, हवे/ दिव्य अनुभव घेते व मृत्यू पावते.

तो साप याच्या वेगळ्या अनुभवाची (वेगळ्या प्रतिभेची, लेखनाची, प्रयोगाची) इतर साप (वाचक, श्रोते इ), वृध्द साप (साहित्यातील परंपरारंक्षक नेते) उपेक्षा करतात, वंचना करतात, त्याला अनुल्लेखाने मारतात.

माधव पुराणिक- भ्रमणध्वनी ९६२३४४२२२१

संजीव सावरगांवकर: माधव राव, आता आणखीन काय लिहायचं राहिलय. अहो मूळ कथा वाचतांना येवढ्या मुंग्यां मेंदूला नव्हत्या आल्या त्याच्या 100 पट मेंदूला दंश झाले. घरात वाचून दाखविले तर त्यावर ही चर्चा सुरू झाली आहे. हे विश्लेषणात्मक लेखन हेच कथेचे विवेचन होऊन बसलंय. त्याचा आस्वाद आणि कथेचे परत वाचन तुम्ही क्रमप्राप्त करून ठेवले आहे. एका वेगळ्या पद्धतीने केलेल्या आस्वादक लेखाबद्दल शतशः धन्यवाद.

राजेश उनवणे : भाग-२

१) "सर्प" कथेत "तो साप" भाषणात म्हणतो, "डोळ्यावर प्रकाशकिरण पडावा त्याप्रमाणे एक साक्षात्कार झाला, मला नंदनवन आणि त्यातील स्त्री यांची आठवण झाली. त्यांच्या निर्व्याज सुखात वासना निर्माण करून त्यांचा अध:पात आपल्या पूर्वजाने घडवून आणला असा एक कायमचा दुष्ट डाग आपल्या कुळावर पडून गेला आहे. कदाचित जर ते खरोखरच घडले असेल, तरी त्यात शरम वाटण्याजोगे काहीच नाही. अत्यंत तृप्तीचा क्षण निर्माण करूनही सदैव अतृप्त, ताजी राहणारी ही वासना--कोणी का निर्माण करो. त्यात लज्जेचे कारण नाही. ती निर्माण झाली ती स्त्रीच्या देहामूळेच आणि तो देह काही त्याने घडवलेला नव्हता."

(स्पष्टीकरण -- स्त्रीच्या देहामूळे निर्माण झालेली देहातील वासना एका शरीराला जन्म देते व ते शरीर, तो देह मात्र काही त्याने निर्माण केलेला नाही. घडवलेला नाही. ते कार्य कोणी केले याबाबत जीए कथेत मौन बाळगतात. – -- "जीएंच्या कथेत नियती कशी ठाण मांडून बसलेली असते" – या माझ्याच मागे लिहिलेल्या वाक्याची आठवण येथे करून देतो.

वासनेतून निर्माण झालेल्या देहाने एका दुसऱ्या देहाला जन्म दिला आहे. एका वासनेने दुसऱ्या वासनेला जन्म दिला आहे.- असेच जीए यांना सुचवायचे आहे.

आदरणीय जीए, आपले विचार आपल्या कथेतून जेव्हा आपण मांडता तेव्हा वाचकासमोर एकच कर्तव्य उरते. – “नि:शब्द होणे”......मनोभावे प्रणाम..!)

२) तो साप पुढे म्हणतो, “अशा शरीराऐवजी ती स्त्री जर निव्वळ हाडांचा सांगाडा झाली असती, तर पहिल्या सापाने हजार वर्षे घालवली असती तर त्याला आपल्या किमयेने वासनेची एक ठिणगीदेखील उत्पन्न करणे अशक्य झाले असते. उलट साप जरी नसता तरी त्या देहात आज ना उद्या वासना निर्माण झालीच असती. मात्र त्यावेळी आपण ढगाकडे पाहताना, पाण्याकडे पाहताना, चांदण्या मोजताना ही वासना निर्माण झाली, म्हणून ढग, पाणी वा चांदण्या यांना त्यांनी दोषी ठरवले असते, इतकेच.”

(स्पष्टीकरण -- जीए यांनी हा उल्लेख सापाच्या “कात टाकणे” या कृतीशी संलग्न केला आहे.

साप पक्ष्याप्रमाणेच, नैसर्गिकरीत्या कसा मरतो याचे उत्तर अद्यापपर्यंत मिळालेले नाही.

सापाच्या बाह्य पेशी जेव्हा मरतात तेव्हा तो संपूर्ण त्वचा टाकतो. त्यास आपण “कात टाकणे” म्हणतो.

साप कात टाकतो तेव्हा त्याचा पुनर्जन्म झालेला असतो. कात टाकणे हे त्याच्यासाठी खूप वेदनादायक असते. कात टाकल्यावर तो बऱ्याच वेळ तसाच पडून राहतो. यासाठी तो एकांतवास निवडतो.

साप हा शीत रक्ताचा प्राणी आहे म्हणजे त्याला मनुष्यासारखं स्वतःच्या शरीराचं तापमान स्वतः नियंत्रित करता येत नाही. सापांना जेव्हा शरीर थंड अथवा उबदार करायचे असल्यास तेव्हा त्यांना थंड वा उबदार जागेची गरज भासते. रणरणत्या उन्हात सापाचे शरीर जास्त गरम झाल्यामुळे साप थंड जागेच्या शोधात बाहेर पडतात. शक्यतो पाणथळ जागेच्या जवळ थांबतो. साप हा दिवसा संचार करणारा प्राणी आहे. बहुतेक साप रात्रीच्या वेळी कात टाकतात. तेव्हा एकांतवास असतो.

नवीन त्वचा निर्माण होणारी ही नैसर्गिक कृती "तो साप" आपल्या भाषणात सांगतो.

ती कृती त्याच्या तोंडी दाखवताना म्हणूनच जीए वाक्यरचनेत म्हणतात, "आपण ढगाकडे पाहताना, पाण्याकडे पाहताना, चांदण्या मोजताना ही वासना निर्माण झाली, म्हणून ढग, पाणी वा चांदण्या यांना त्यांनी दोषी ठरवले असते, इतकेच."—

कथेतील हे वाक्य सापाच्या "कात टाकणे" कृतीच्या ठिकाण व रात्रीच्या वेळेशी अशाप्रकारे संलग्न आहे.)

३) "तो साप" त्याच्या भाषणात पुढे म्हणतो,

"डोळ्यावर प्रकाशकिरण पडावा त्याप्रमाणे एक साक्षात्कार झाला, मला नंदनवन आणि त्यातील स्त्री यांची आठवण झाली. त्यांच्या निर्व्याज सुखात वासना निर्माण करून त्यांचा अध:पात आपल्या पूर्वजाने घडवून आणला असा एक कायमचा दुष्ट डाग आपल्या कुळावर पडून गेला आहे. कदाचित जर ते खरोखरच घडले असेल, तरी त्यात शरम वाटण्याजोगे काहीच नाही."

-----आदरणीय जीए यांनी कथेत "नंदनवन व स्त्री" या उपकथेचा उल्लेख केलेला आहे. "ती कथा कोणती?" हा मला पडलेला प्रश्न होता. व त्याचे उत्तर माझ्या अल्पमतीने शोधण्याचा प्रयत्न केला.

ते उत्तर असे----

ही कथा कुंती, माद्री, व पंडू राजा यांच्या काळातील आहे.— "पंडू राजाचा वासनेमुळे झालेल्या मृत्यू" --च्या घटनेशी जीए यांनी हा संदर्भ जोडलेला दिसून येतो.

त्यासाठी कुंतीची पार्श्वभूमी, तिची माहिती घेणे जरुरीचे आहे.

कुंती जरी चार पुत्रांची माता होती, तरी तिचा उल्लेख "चिर-कुमारी" असाच महाभारतात आहे.

कुंती ही यदूवंशी राजा शूरसेनची कन्या होती. त्याने तिचे नाव "पृथा" असे ठेवले. ती वसुदेव व सुतसुभा (शिशुपालची आई) यांची बहीण होती. वसुदेवपुत्र भगवान श्रीकृष्णाची आत्या होती.

ती दहा वर्षाची असताना तिला कुंतीभोज (वसुदेवचा मित्र} राजाने दत्तक घेतली. "कुंतीभोज राजा हा नागवंशी होता." दत्तक गेल्यानंतर कुंती कधीही शूरसेन या आपल्या जन्मपित्याकडे, त्याच्या घरी गेली नाही. ती नागवंशी घराण्यात एकरूप झाली. आणि राजा कुंतीभोजची कन्या म्हणून "कुंती" अशी ती प्रसिद्ध पावली.

महाभारतात अर्जुनाने नागजातीतील "उलूपी" नावाच्या मुलीशी लग्न केले होते हे येथे आवर्जून नमूद करावेसे वाटते.

माद्री ही कुंतीपेक्षा लहान व सौन्दर्यवती होती. तिला पाहून पंडूचे मनात एकेदिवशी वासना निर्माण झाली. त्यात त्याचा शापामुळे अंत झाला. प्रायश्चित्त म्हणून माद्री सती गेली.

पण सती जाण्यापूर्वी दु:खाच्या आवेगात कुंतीने माद्रीला दोष दिला. "तू स्वत:स का सावरले नाहीस, शाप माहित असताना तुझ्याही मनात पांडूराजा विषयी वासना कशी काय निर्माण झाली, तू त्याला थांबवले का नाहीस?" वगैरे, वगैरे कुंती माद्रीस बोलली.

कुंती जेव्हा पाच पुत्रांना घेऊन हस्तिनपूरला परत आली, तेव्हा सगळा दोष मात्र तिच्याच माथी मारणेत आला.

"तू वयाने मोठी होतीस, तू सतत लक्ष ठेवणे गरजेचे होते, तुझेच ही घटना घडू न देणे हे कर्तव्य होते,"-- वगैरे, वगैरे.

म्हणून "सर्प" कथेतील जीए यांचा "तो साप" म्हणतो, "मला नंदनवन आणि त्यातील स्त्री यांची आठवण झाली. त्यांच्या निर्व्याज सुखात वासना निर्माण करून त्यांचा अध:पात आपल्या पूर्वजाने घडवून आणला असं एक कायमचा दुष्ट डाग

आपल्या कुळावर पडून गेला आहे. कदाचित जर ते खरोखरच घडले असेल, तरी त्यात शरम वाटण्याजोगे काहीच नाही.”

कारण कुंती “नागवंशातील” होती.*

(आदरणीय जीए – आम्ही नि:शब्द आहोत. तरीही मनात विचार आला की, जणू आपण आपली मूळ कथा एखाद्या उपकथेला नेहमीप्रमाणे (एक संदर्भ विदुषक,उपकथा “हंस-कावळा) नेहमीच जोडत असता,

आणि.....

प्रिय जीए, अशी उप-कथानके मूळ कथेशी जोडून आपण जोडून आम्हा वाचकांची, अगदी सत्वपरीक्षा घेता. तेही -ऱ्या कथेतील त्या फक्त "एका वाक्यासाठी."-- आता प्रणाम तरी किती वेळ करायचे तुम्हाला? तरी पण... प्रणाम)

४) आणखी नागासंबंधी पुराणातील उदाहरणे पाहू. ही माहिती देण्याचा उद्देश आपल्या भारतीय संस्कृतीत नाग या प्राण्यास किती महत्त्वाचे स्थान होते, हे आहे.

अ) हिंदू धर्मामध्ये “नवनागस्तोत्रात” आहे. त्यामध्ये नागाच्या नऊ नावांचा उल्लेख आहे. ते स्तोत्र खालीलप्रमाणे---

अनंतं वासुकीं शेषं पद्मनाभंच कंबलं |
शंखपालं धृतराष्ट्रं तक्षकं कलियं तथा||
एतानि नव नामानी नागानांच महात्मनां|
सायंकाले पठेन्नित्यं प्रातः काले विशेषतः||
तस्य विषभयं नास्ति सर्वत्र विजयी भवेत् |

----------------ऱ्या स्तोत्रात अनंत, वासुकी, शेष, पद्मनाभ, कम्बल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक आणि कालीय या नऊ प्रकारच्या नागांच्या नावांचा किंवा जातींचा उल्लेख आला आहे.

ब)	समुद्रमंथनासाठी वासुकी नागाला दोरी म्हणून वापरले होते. मंदार पर्वतापासून बनवलेली रवी घुसळण्यासाठी. भगवान शंकर यांनी सागरमंथना नंतर आलेल्या विषाचे प्राशन केले. त्यामुळे त्यांना गळयात प्रचंड जळजळ सुरू झाली. या जळजळीपासून थंडावा मिळावा म्हणून त्यांनी नाग गळयाभोवती लपेटला. त्यामूळे त्यांना विषप्राशन सहन करता आले, अशी कथा आहे.

विष्णू हे सदैव शेषनागाच्या शय्येवर आराम करीत असतात, असे पुराणात सांगितले आहे.

क)	विश्वामित्राची तपस्या मेनकेने त्याच्यात वासना निर्माण करून भंग केली.

इंद्राने तिला त्याची तपस्या भंग करण्यास पाठवले होते. विश्वामित्र मेनकेच्या सौंदर्याने मोहित झाला. त्याची वासना जागृत झाली. तपस्या भंग झाली. त्या दोघांपासून शकुंतलेचा जन्म झाला.

(येथे वृद्ध सापाने, वासना जिंकू न शकल्याचे, आसक्ती जिंकू शकलो नसल्याचे निराशेने म्हटलेले कथेतील वाक्य आठवते.)

त्यानंतर राजा दुष्यंत व शकुंतलेचा प्रेमविवाह झाला. त्यांचा पुत्र राजा “भरत”. त्याचेवरून आपल्या देशाचे नाव “भारत” पडले.

ड)	पुराणकाळात भारतात “नाग” नावाची एक जमात होती, अजूनही आहे. नागालॅंड प्रांतात ते मोठ्या प्रमाणात होते, असे मानले जाते. डॉ. आंबेडकरांच्या मते महाराष्ट्रातील महार हे नागवंशीय आहेत. म्हणून बाबासाहेबांनी नागपूरला धर्मांतर केले आहे.

ई)	हिंदू धर्मात एक पूजा केली जाते. तिचे नाव कालसर्प योग पूजा असे आहे.

कालसर्प म्हणजे जन्मकुंडलीत जेव्हा राहू व केतू हे दोन ग्रह समोरासमोर येतात , आणि इतर सर्व ग्रह ह्या दोघांच्या मध्ये येतात तेव्हा ग्रहदशा वाईट आहे, असे समजले जाते. ती दूर करण्यासाठी केली जाणारी पूजा म्हणजे कालसर्प पूजा.

ही सर्व उदाहरणे या कथेत साप/नाग या प्राण्याची निवड जीए यांनी का केलेली आहे हे विशद करण्यासाठी आहेत.

५)आता "तो साप" याने भाषणात सांगितलेला "साक्षात्कार" या विषयी.

साक्षात्कार होतो म्हणजे कुंडलिनी जागृत होते.

श्रीकांतजी, यांचा या विषयावरती दांडगा अभ्यास असलेने त्यांनी *प्रथम या चर्चेत "कुंडलिनी जागृतीचा उल्लेख केला, तो मला खूप भावला.

कारण सुतोवाच लिहिण्याच्या दिवशीच बासरीवादक आदरणीय श्री. गिंडे यांचा कुंडलिनी जागृतीचा अनुभव रविवारी मी ऐकून आलो होतो.

कुंडलिनी ही प्रत्येकात सापासारखी जन्मत: वेटोळे घालून बसलेली आहे. तिचा आकारच सर्पाकृती आहे.

असा साक्षात्कार अनेकांना झाला असेलही ... रामालाही झाला असेल आणि रावणाला ही.... पण त्या साक्षात्कारामध्ये सदैव स्वतःला स्थिर ठेवणे हे तेवढेच कठीण कार्य असते.

अहंभाव/ वासना कधी डोके वर काढतील हे सांगता येत नाही... त्यामूळे रावणाला अंत झाला.

कथेतील "तो साप" ही त्याच मार्गाने मृत्यू कडे गेला.

आदरणीय जीए हे प्रत्येक घटनेचा, व्यक्तिचा, त्यामागील कार्यकारणभावाचा, परिस्थितीचा किती बारकाईने अभ्यास करीत असतील.., त्याची टिपणे काढत असतील व परत परत शब्दांच्या जाळ्यात त्यातील नाट्य पकडुन कथेचे असे उत्सव कसे साजरे करत असतील याची कल्पनाही करता येत नाही.

राजेश उनवणे : माधव सर नमस्कार... 🙏

आपण सर्प कथेतील आध्यात्मिक दृष्टिकोण सुंदररीत्या, अभ्यासपूर्ण सांगितलेला आहे. तो वाचल्यावर

आपला तो अधिकारही असल्याचे जाणवते...! 🙏

....विशेषत:-- “ तो साप” याने स्थूल देहातील वासनेची हत्या केलेली आहे..म्हणजेच तिच्यावर, वासनेवर विजय मिळवलेला आहे, अशाप्रकारे त्याच्या शरीरातील वासनेच्या साम्राज्यशाहीचा अंत झाला आहे, हे आपण ज्ञानेश्वरीतील ओवीचा आधार घेऊन छान समजावून सांगितले आहे.

ते सांगताना नाथ संप्रदायचे महत्त्व आपण नमूद केलेले फारच आवडले..

श्री दत्तप्रभू यांच्या या नऊ अंशावताररापैकी, म्हणजेच

नवनाथपैकी शेवटचे नाथ म्हणजे "नागनाथ"..!

...नागनाथ यांच्या जन्माची कथा सुद्धा अशीच आहे. जनमेजय राजा सर्व नाग-सापांना नष्ट करण्यासाठी सर्पऱ्याग करीत होता व त्यांच्या रक्षणासाठी नागनाथ यांचा जन्म झाला..!

असो.

*...सर्प कथेचा मसुदा किंवा साचा म्हणू , तयार करताना आदरणीय जीए यांना हे सर्व माहिती असणारच यात शंकाच नाही...त्यांचे वाचन, त्यावरील अभ्यास ते करत होतेच आणि चिंतन ही खूप विस्तृतपणे ते करत असणार...!

मग त्याची गुंफण करताना वर्तमानातील सत्तेची सूत्रे, सत्ताधारी यांच्या सत्तेसाठीच्या कारवाया याची जोड़ देताना संपूर्ण कथानकात एकसंधता कशी राहील याची ते घेत असलेली दक्षता खरोखरच विस्मयकारक आहे...!

जागतिक , देशीय व मराठी साहित्य सृष्टीत त्यांची योग्य ती दखल अजूनही घेतली गेलेली नाही, याची खूपच खंत वाटते....!

पुरुषोत्तम मोने: 1.तें नंदनवन म्हणजे ईव्ह व आदम यांच्या कथेतील नंदनवन.

२.दुसऱ्या देहाला जन्म देण्याचा कसा संबंध लागतो?

माधव पुराणिक : कथा सर्प (सांजशकुन,१९७३,७ पानी कथा)

विवेचन (भाग ३)- डॉ माधव पुराणिक

“ तो साप :आत्मसत्ता व बाह्यसत्ता यातील द्वंद्वाचा अटळ अंत

वाचकाचा प्रश्न - “सर्प” कथेतील सत्तेचे स्वरूप काय ?

कारण १)वृद्ध साप- नेता २) तरुण साप -प्रमुख अनुयायी ३) इतर साप - अनुयायी व सामान्य नागरिक ४) तो साप व इतर दोन साप - स्वप्न पाहणारे वेगळे नागरिक आणि अनुयायी अशी सत्तेची उतरंड किंवा व्यवस्था यशस्वीपणे अस्तित्वात आहे.

तो साप याला आलेल्या दिव्य अनुभवामुळे त्याचा या सत्तेशी संघर्ष होतो व त्याला वृध्द साप (सत्ताधीश), देहदंडाची शिक्षा ठोठावतात व तरुण साप व इतर साप या अनुयायांकडून निर्दयपणे चिरडला जातो.

या घटनेचे व सत्तेच्या व्यवस्थेचे काय नाते आहे?

उत्तर - अस्तित्वाचे / सत्तेचे दोन भाग असतात-

पहिला भाग- हा व्यक्तीविशेष (totally subjective) असतो त्याला आत्मसत्ता म्हणतात (स्वप्न)

दुसरा भाग - हा व्यक्तीचे समाजातील इतरांशीचे नाते असते, जे सामाजिक / राजकीय सत्तेच्या चौकटीत व्यक्त होते - त्याला बाह्यसत्ता म्हणतात. (सत्ता)

बाह्य सत्ता ही व्यक्तीच्या सामाजिक/ राजकीय नात्यांतील वागण्या बोलण्याचे नियम ठरवते. ते व्यक्तीला अपरिहार्यपणे पाळावे लागतात. कारण व्यक्ती एकटी राहू शकत नाही. तिला समाजात रहावे लागते.सर्व समाजाला शारीरिक +मानसिक सुख मिळवण्यासाठी किंवा मिळण्यासाठी हे (समाजस्वास्थ्याचे / विवाहसंस्थेचे / नागरिकांच्या मालमत्ता व जीवरक्षणाचे) नियम ठरवलेले असतात. या नियमांच्या अन्यायकारक अंमलबजावणीमुळे , परंपरागत साचेबंदपणामुळे,व्यक्तीच्या जीवनात दुःख, वेदना, वंचना इत्यादी भावना निर्माण होतात. याला जी ए " गूढरम्य नातेसंबंधातील जीवघेणा दंश" म्हणतात. व्यक्ती व समाज यातील राजकीय व सांस्कृतिक संबंध "भयावहरीत्या हास्यास्पद" असतात असे जी ए यांना वाटते. याचा प्रत्यय या कथेत वारंवार येतो.

पण व्यक्तीला जीवनाचे साफल्य या नातेसंबंधात राजकीय सामाजिक कौटुंबिक यामध्येच शोधावे लागते हा अस्तित्वाचा मूलभूत प्रश्न आहे. तो जी ए यांनी या कथेत चित्तथरारक, स्वप्नमदिर वातावरणात कलात्मकतेने साकार केला आहे.

आत्मसत्ता म्हणजे प्रत्येकाला स्वतःला घडविण्याचे निर्णय स्वातंत्र्य.या स्वातंत्र्याबरोबरच प्रत्येकावर निर्णयाची जबाबदारीही येते. समाजातील बहुतांश व्यक्ती हे निर्णयस्वातंत्र्य (Freedom to choose) घेत नाहीत पण काही व्यक्ती उदाहरणार्थ तो साप व इतर दोन साप हे निर्णय स्वातंत्र्य घेऊन धैर्याने अंधारात उडी टाकतात व जीवनाचा शोध घेतात.

शेवटी अशा व्यक्ती जे मिळवतात ते त्यांच्या जीवनाचे सारतत्व (Essence)असते ते त्यांनी आपल्या असणे / अस्तित्व किंवा सत्ता(Being , Existence, Freedom to live) यापासून सुरुवात करून मिळवलेले असते. परंतु हे सारतत्व त्यांना समाजातील इतरांसमोर व्यक्त करून त्यांच्या समाजाची मान्यता मिळवण्याची गरज वाटते / असते/ निर्माण होते. ती त्यांची अस्तित्ववादी अस्मिता मी "असा घडलेला आहे "असते.

ही समाजमान्यतेची प्रेरणा “तो साप “याच्यामध्ये इतकी प्रखर आहे की दोन दिवसांपूर्वीच आपण आपल्याला आलेला दिव्य अनुभव सांगताच इतर दोन सापांना त्याने व इतरांनी चिरडून मारले होते याचीही आठवण त्याला राहत नाही हे जीए नी अतिशय उपरोधकपणे दाखवलेले आहे.

शिवाय दिव्य अनुभवांचे एक वैशिष्ट्य असे की ते शब्दात सांगता येत नाहीत आणि शब्दात सांगण्याचा प्रयत्न केला तर ते इतर सामान्य अनुभवांप्रमाणे वाटतात हेही जी ए यांनी सूचित केले आहे. याखेरीज जे दिव्य अनुभव अचानकपणे, अनपेक्षितपणे, आकस्मिकरित्या येतात.त्याच्यामागे सातत्याने प्रयत्न नसताना येतात ते तसे परत येतीलच असे नाही असे दर्शवून त्या दिव्य क्षणांशी अशक्यता ही त्यांनी सांगितली आहे.

तो साप म्हणतो "त्या क्षणापासून आयुष्य बदलून गेले इच्छेला फळ येणे अशक्य वाटत असूनही तिला दिशा लाभली पुन्हा एकदा निदान ते दृश्य दिसून ,स्मृती तेवत राहावी म्हणून मी त्या प्रासादाभोवतीच अतृप्त प्रदक्षिणा घालत राहिलो.

सुख आणि दुःख ,तृप्ती आणि असमाधान यासारख्या परस्परावलंबी द्वंद्वांचा अनुभव घेतल्यानंतर, तो साप द्वंद्वापलीकडच्या शांतीचा ध्यास घेऊन जमिनीवर प्रवास करीत होता. ते अशक्य स्वप्न पूर्ण करण्याचा निर्णय तो साप याने खूप कायापूर्वीच घेतला होता.("फार थोडा वेळ देखील या अंधाऱ्या जागेत तुमच्या संगतीत घालवणे माझ्या जीवावर येई. त्यामुळे लवकरच मी येथून कायमचा निघून जाणार होतो.")

या दोन सत्तांमधील सत्तांतरांचे जे प्रसंग तो साप याच्या संदर्भात आहेत ते खालील प्रमाणे आहेत -

तो साप व इतर साप यांचा संवाद,

घटना -तो साप याच्या दैदीप्यमान अनुभवाबद्दल चर्चा

तो साप यांचा मनोनिष्ठ दृष्टीकोन - “ कृतार्थ ,अनुपम अनुभव”

इतर साप यांचा मनोनिष्ठ दृष्टीकोन - ".. सर्वसाधारण अनुभव "

वस्तूनिष्ठ दृष्टीकोन - " वैश्विक शक्तीचा नित्य अनुभव"

हुर्सैलचे(1869-1938) तत्व - दोन्ही बरोबर कारण ज्ञान स्वतंत्र, स्वयंभू असते. ते पूर्ण ज्ञातानिष्ठ वा वस्तूनिष्ठ नसते. (Principle of Phenomenology)

ज्ञानाला अर्थ असतो पण तो व्यक्ती ला समजेल (अर्थसफलता) असे नाही (अर्थविफलता)

मग बाह्य सत्तेचा नियम मोडला गेला (असत्य आढ्यतेने सांगितले - तरूण साप) व शिक्षा दिली गेली.

असेच तो साप व वृध्द सापाच्या निर्णायक संवादात पण घडले.

बाह्य सत्ता १) दहशत २) भय ३) चिंता ४) शारीरिक छळ ५ वेगळ्या व्यक्तींची उपेक्षा, वंचना ६) जरब ७) धमकी ८) कठोर शिक्षेची उदाहरणे इ सर्व उपाययोजना करून व्यक्तीच्या आत्मसत्तेवर नियंत्रण ठेवते असे जी ए यांनी प्रभावीपणे दाखविले आहे.

वृद्ध साप तरूण सापाला सत्तांतर करताना -आत्मसत्तेवर नियंत्रण ठेवण्याचे कारण सांगतो की "जे साप स्वप्न पाहून आत्मसत्ता अनुभवतात ,त्यांच्यावर अधिक सत्तेची व वैभवाची आसक्ती नाहीशी होते.अशा सापांची संख्या वाढल्यास प्रचलित सत्ता उध्वस्त होऊ शकते."

पण त्याबरोबरच स्वप्न पाहण्याचे ,जीवनाचा नवीन अर्थ शोधण्याचे महत्त्वही अधोरेखित केले आहे.कारण व्यक्ती ही दोन स्तरांवर जगत असते एक व्यक्ती म्हणून आणि एक समाजाचा भाग म्हणून असे वृद्ध नेताही तरुण सापाला त्याच्या शेवटच्या क्षणांतही सांगतो.

शेवटी वृद्ध साप जीवनाच्या गणिताचे समीकरण मांडतो -

वृद्ध साप म्हणजे सामाजिक सत्ता आणि वैयक्तिक आत्मसत्ता यांचे स्वप्न. म्हणजे आधी तो कोणीतरी विशेष असतो मग शेवटी सामाजिक सत्ता जाते, वैयक्तिक आत्मसत्तेचे स्वप्न भंगते व तो शून्य किंवा रिता होतो.

तसेच तो सापही आधी वैयक्तिक आत्मसत्तेचे स्वप्न बघतो/ अनुभवतो आणि नंतर त्याची अधोगती होत होत शेवटी तोही रिता व शून्य होतो किंवा ठरतो.

शेवटी स्वप्न सत्य झाले तरी ते फक्त त्या व्यक्तीपुरतेच सत्य असते हेही स्पष्ट केले आहे ते स्वप्न समाजापुढे व्यक्तीने मांडण्याचा प्रयत्न केल्यास समाजाच्या राजसत्तेच्या नियमात जर बसले नाही तर ती व्यक्ती उध्वस्त होते असे ठसठशीतपणे दाखविले आहे.

अस्तित्ववाद हा अनुभवप्रामाण्य मानतो. त्यामुळे व्यक्तीचे अनुभव हे त्याचे स्वतःचे (सब्जेक्टिव्ह) असतात आणि प्रत्येक व्यक्ती ही वेगळी ,अनोखी ,अजोड असल्याने त्या व्यक्तीचे अनुभव ही तसे वेगळेच असतात. यामुळे विश्वात प्रत्येक व्यक्ती ही एकतर स्वतःला घडवून एकाकी ताऱ्याप्रमाणे चमकते किंवा स्वतःला घडवता न आल्याने केवळ असते व मातीचा कण म्हणून राहते.पण अस्तित्ववादाच्या दृष्टीने मातीचा कण आणि आकाशातला तारा यांच्या अस्तित्वाचे जीवनाचे मूल्य ,अस्तित्व म्हणून एकच आहे आणि ते महत्त्वाचे आहे तेथूनच त्यांना पुन्हा आपले अस्तित्व घडविण्याची सुरुवात करायची संधी मिळते निर्णय स्वातंत्र्य मिळते, जबाबदारी येते. प्रत्येक क्षणाला एखादी घटना घडते व त्या घटनेतून आपल्याला ज्ञान मिळू शकते अर्थसफलता जाणवू शकते आणि असे क्षण वेचत आणि असेही क्षण यात अर्थविफलता जाणवते, ते क्षण पण सांभाळून घेत ,क्षणोक्षणी ,व्यक्तीच्या जीवनाचा अटळ प्रवास मृत्यूकडे चाललेला असतो. काहींना ते दिव्य क्षण जाणवू शकतात.

तो दिव्य क्षण तो साप व इतर दोन भावांनी अनुभवलेला आहे

अशा दिव्य क्षणांचा आशादायक दृष्टीकोन व्यक्तीजीवनाच्या सुखदुःखमय पटावर जीएनी रंगवलाआहे.

माधव पुराणिक

भ्रमणध्वनी ९६२३४४२२२१

विलास वाघोलीकर: वेगळा दृष्टीकोन, जीएंच्या शब्दांचे सविस्तर विवेचन, मुद्देसूद लेखन. आपल्याला धन्यवाद. विलास वाघोलीकर

राजेश उनवणे : दिलीप सर,

आपल्या प्रतिक्रियेबद्दल काय लिहाव असा मला प्रश्न पडला होता.

कथेचे सुतोवाच अधिक सविस्तरपणे लिहिताना, आपल्या प्रतिक्रियेने पडलेल्या या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाले व उत्तर/प्रतिसाद लिहिण्यास उशीर झाला त्याबद्दल क्षमस्व.

आदरणीय जीए हे व्यक्ति म्हणून, माणूस म्हणून १००% कॅरेटचे सोने होते. म्हणूनच लेखक/ साहित्यिक या नात्याने त्यांनी जागतिक वाङ:मयात अमृताशी पैजा जिंकणाऱ्या भाषेच्या माध्यमातून प्रतिभाशाली कथांचे अनेक सुवर्णालंकार निर्माण केले आहेत. आपल्या प्रतिभाशक्तीने निर्माण केलेल्या या कथांविषयी त्यांची व्यक्तीश: भावना कशी होती याबाबत त्यांनी मौन धारण केले होते. अर्थात खऱ्या साक्षात्कारी व्यक्तीस मौन अतिशय प्रिय असते, असे इतिहासात डोकावून पाहिले की जाणवते.

ही असमाधानाता प्रत्येक जातिवंत, सच्च्या कलाकारापाशी असते.

नियती ही एक कलाकारच आहे. तिने ही सृष्टि एका प्रयत्नात निर्माण केली नाही, तर अनेकदा केली, अनेकदा करून मनासारखी वाटली नाही म्हणून नष्ट केली, परत निर्माण केली, नष्ट केली. हे सतत घडत गेले असे विज्ञानही मानते. नियतीने प्रत्येकवेळी तिच्या निर्मितीतील दोष दूर केले असावेत व त्या निरंतर चिंतनातून सृष्टीचे हे रूप जन्मास आले असे म्हटले जाते. हे परिपूर्ण रूप तिला निश्चितच आनंदीत करून गेलेले असणार.

याच आनंदाचा शोध जातिवंत कलाकार घेत असावेत, असे वाटते.

जीए ही तसेच असणार. हा त्यांचा शोध, नियती कशी त्यांच्या कथात सातत्याने दर्शन देते यावरून दिसून येतो.

दिलीपजी, जीएंच्या कथामधून हा शोध घेणे प्रत्येक वाचकास प्रत्येकवेळी शक्य होत नाही. आपण मला जीएंच्या सर्व कथांची समीक्षा करण्याची विश्वासपूर्ण विनंती केलेली आहे. त्यास प्रत्येकवेळी पात्र ठरेनच, अशी पात्रता माझ्यापाशी नाही, असे वाटते. सेवानिवृत्तीनंतर सध्या अनेक सामाजिक उपक्रमाशी जोडला गेलो असल्यामुळे, इच्छा असूनही फक्त "जीए एके जीए, जीए दुणे जीए.." हा एकच पाढा घोकणे मला जमेल असे वाटत नाही.

अर्थातच, सूतोवाच करण्याचा हा प्रवास माझ्यासाठी निश्चितच आनंदाचा होता.

तो आनंद सुनीलजी यांनी स्वत:हून पुढाकार घेऊन, सुतोवाच ग्रुपमध्ये मला ॲड करून मिळवून दिला त्याबद्दल त्यांचे व आपण जे माझ्याविषयी प्रसंशोदगार काढलेत त्याबद्दल आपले मनापासून आभार व धन्यवाद...!

दिलिप बडे: प्रतिसाद वाचला.आवडला.प्रतिक्रिया लिहीतो.

सांगाडा---- निळासावळा

यतीन गुळवणी : ऑक्टोबर 1956 च्या मौजच्या अंकात छापून आलेली सांगाडा ही कथा जानेवरी

1959 मध्ये प्रकाशित झालेल्या नीळासावळा या कथासंग्रहात समाविष्ट आहे.

ही कथा आहे नाडगौडा मास्तरांच्या शिक्षकी सेवेतील शेवटच्या कामाच्या दिवसाची. दुसरे दिवशी सुट्टी, तिसऱ्या दिवशी गॅदरिंग व तोच दिवस त्यांच्या “एक्स्टेंशन” संपण्याचा !. पस्तीस वर्षे एकाच शाळेत शिक्षकी करून अखेरच्या दिवसाचा घटनाक्रम या कथेत रंगवला आहे.

नाडगौडा मास्तर शाळेच्या पायऱ्या चढताना नेहेमीप्रमाणे थबकले पण ते त्यांना दमल्यासारखे वाटत होते महणून. त्यांना आपल्या वाढलेल्या वयाची जाणीव झाली. त्यात सकाळी तुकारामाचा फोटो पुसताना हातातून निसटून खाली पडल्याने फोटोची काच फुटली. सदऱ्याची बटणे हरवली. वर औषधाच्या गोळ्यांची पुडी ते घरी विसरले. मुलगी कमलच्या खुप दिवसांनी आलेल्या आठवणीने मास्तरांची हुरहुर वाढत होती.

मास्तर आत शिरताच नव्या पिढीच्या झिंझ्या वाढवलेल्या पोरे बाजूला सरकली. अंगठा तुटलेल्या वाहणेकडे पाहत मास्तर सायन्स हॉलमध्ये गेले. वाटेत त्यांना फाटक, शलिनी, सहस्रबुद्धे अशा जुन्या विद्यार्थ्यांच्या आठवणी आल्या. पण त्या साऱ्यांनी मास्तरांशी संपर्क ठेवला नाही. त्यांना वाटले की आपल्याविषयी कोणालाच अगत्य नाही.आपण आता मेलो तरी आनंदतील, पण दोन तास आधी मेलो असतो तर शाळेला यायचा त्रास तरी वाचला असता म्हणून दूषणे देतील.

सायन्स हॉलमध्ये डोक्यात वाकडा खिळा ठोकून लाकडी दांड्याला अडकवलेला मानवी सांगाडा होता. त्याच्या बाजूच्या खुंटाळयावर मास्तरांनी छत्री ठेवली. ऑफिसमध्ये सही करायला जाण्यासाठी वळताना त्यांचा तोल गेल्यासारखा होऊन छातीत कळ येऊन ते टेबलाच्या कडेवर आदळले. त्यांनी मारुती गड्याला हाक मारली. मारुतीने दुर्लक्ष केले. कळ विरताच मास्तर सावकाश ऑफिसकडे वळले. दोन चार इतर मास्तरांनी सही केल्यानंतर नाडगौडा मास्तरांनी सही केली. त्याच दरम्यान जोशी हेडमास्तरांचे आगमन झाले. नाडगौडांकडे न पाहता ते स्वताच्या केबिनमध्ये गेले व त्यांनी आतूनच " उद्या रिलीज ऑर्डर तयार होईल " असे संगितले. जोशी बारा वर्षानी शाळेत आले व हेडमास्तर होऊन बसले.

नाडगौडा मास्तरांना जोशींची दोन महिन्यपूर्वीच्या वागणुकीची आठवण झाली. आजच्यासारखे अस्वस्थ वाटल्यामुळे मास्तरांनी रजेची चिठ्ठी एका पोरासोबत पाठवली होती.तो पगाराचा दिवस असल्याने पगार घरी पाठवण्याची विनंती त्या चिठ्ठीत लिहिली होती. जोशींनी उलटपावली ‘‘रजा मंजूर पण पगार घरी पाठवण्याची प्रथा अयोग्य व फारच जरूर असल्यास स्वतचे तीस रुपये पाठवत आहे ‘‘ असे उत्तर पाठवले. मास्तरांनी पैसे घेतले नाहीत. पण त्यांचा उजवा हात इतका थरथरू लागला की तो त्यांना डोक्याखाली दाबून धरावा लागला.

नाडगौडा मास्तर सायन्स हॉल मध्ये परतले. त्यांचा तास साडेबाराला असल्याने घाई नव्हती. पण त्यांची हुरहुर वाढतच गेली. प्रथम मुलीची कमलची.आठवण. तिचे बापटशी प्रेम जमले होते. पण बापटच्या वडिलांनी मास्तरांना फसवलेले असल्याने बापट मास्तरांना प्रथमदर्शनी अनुकूल नव्हता. कमलने जेव्हा बापटशी लग्न करायचा विचार मांडला तेव्हा मास्तरांनी खवळून कमलच्या थोबाडीत मारली. वर बापटला चार अपशब्द ऐकवून आले. दुसऱ्या दिवशी कमलची चिठ्ठी मास्तरांना शाळेत मिळाली.

प्रिय दादा..

मी माझी निवड केली आहे. मी जात आहे. घराची किल्ली सोबत आहे. माला माझे आयुष्य आवडते. ते सुखवावे असेसुद्धा वाटते. बापुचे आयुष्य तुम्ही घालवलत, माझेसुद्धा तसेच व्हावं असे मला वाटत नाही. क्षमा करा मला. मी फार स्वार्थी आहे.

तुमची कमल

जाता जाता कमलने आणखी एका दुखऱ्या जखमेवर घाव घातला. बापू हा मास्तरांचा मुलगा. पण तो हॉकी खेळण्याच्या नादात तिसऱ्यांदा मॅट्रिक नापास झाल्यावर मास्तर संतापून त्याला इतके अपशब्द बोलतात की त्यामुळे बापू ने विहिरीत उडी घेतली होती.

वास्तविक ते जेव्हा मुलकी नापास झाले होते तेव्हा मास्तरांच्या वडिलांचे असेच शब्द होते. वर डोके रक्तबंबाळ होईपर्यंत खडावांचा मार. पण त्यामुळे मास्तरांच्यात पीळ आला. परीक्षा पास होईपर्यंत अनवाणी पायांनी राहून, एक वेळ जेउन राहिले..

कमल गावातच होती. तिला दोन मुले झाली. पण तिने मास्तरांशी संबंध तोडले होते.

दोन्ही मुलांच्या दुराव्यानंतर मास्तरांना पश्चाताप झाला. पण आता त्याचा काही उपयोग नव्हता.

आज या सर्व जुन्या आठवणीने मास्तर व्याकुळ झाले. आज तुकारामाचा फोटो फुटल्याने हे सारे झाले, मनावरील झाकणाला तडा गेला असे त्यांना फार वाटू लागले. आज काम असते तर त्या परिचित ओझयाखाली या साऱ्याचा विसर पडला असता.बाहेरच्या ताणलेल्या उन्हाची झळ, बाजूच्या कारखान्यातील धाडधाड आवाज, मधून मधून कुत्र्याचे ओरडणे यामुळे मास्तरांची अस्वस्थता वाढली. ऑफिसमधून वर्तमानपत्र तरी आणावे म्हणून उठणार तोच त्यांच्या छातीतून अणकुचीदार कळ उठली व डोक्यात हजारो घोडमाश्या उडाल्यासारखे वाटले.

त्यांनी घाबरे होऊन मारुतीला हाक मारली, "अरे, पाणी घेऊन ये रे ग्लाससभर. मला कसंसंच वाटतंय.. लवकर ये."

मास्तर मटकन खुर्चीत बसले. त्यांचे कपाळ ओले झाले होते. समोरचा मारुति गाडी त्यांना सांगाड्यासारखा भासू लागला. इतका की त्यांना वाटले तो सांगाडाच आपल्यासमोर दात विचकून उभा आहे. आता तो वाकून मारूतीसारख्या घोगऱ्या आवाजात "साहेब, पाणी पाहिजे? साहेब, पाणी घ्या." असे म्हणतो आहे असे त्यांना वाटले. शेवटी त्या कठोर हाडांच्या हाताचा स्पर्श मास्तरांच्या धगधगीत कपाळाला झाला आणि त्यांनी गप्पकन डोळे मिटून घेतले. नाडगौडा मास्तरांचा मृत्यू झाला.

ही कथा मला आवडली. जी. ए. नी नाडगौडा मास्तरांची प्रतिमा बारीक सारिक बरकाव्यासहित उभी केली आहे. अशी हुबेहूब माणसे मी मागच्या पिढीत पहिली आहेत. सुदैवाने त्यांची मुले दुरावली नाहीत. पण स्वता कष्ट उपसून शिकल्याने पुढच्या पिढीने असेच शिकावे असा अट्टहास धरणाऱ्या व्यक्ति समाजात, कार्यालयात, कारखान्यात दिसतात. पण बदलत्या काळाचे भान न ठेवल्याने मास्तरांचा घात झालाच पण आपली माणसेही दुरावली. सायन्स हॉल मधील सांगाड्याची सांगड जी. ए. नी अत्यंत चपखलपणे साधली आहे. वर्णन तपशीलवार आहे. असे वाटते की घटना आपल्यासमोर नव्हे आपणावरच घडत आहे. माणसाच्या अखेरच्या क्षणी काय भावना असू शकतात याचा आलेख जी. ए. पूर्वघटनांशी जोडून नेमकेपणाने मांडतात.

मृत्यूबद्दल जी. ए. ना प्रचंड कुतूहल असावी. त्याबद्दलचे त्यांचे कयास त्यांनी अनेक कथांतून दाखवले आहेत. सदर कथा ही त्यापैकीच एक आहे..

विलास वाघोलीकर: गुळवणीजीं नी छान कथासार दिले आहे. त्यांना मी धन्यवाद देतो. 💐💐💐💐💐💐💐💐💐 सांगाडा (निळासावळा कथासंग्रह)

1)जीए एक प्रतिमा घेतात व त्या मुख्य आधारे कथा लिहितात. हे objective correlative असते. या कथेत नाडगौडा सरांच्या समोर, शाळेतील सायन्स हॉलमधील सांगाडा येत असतो. क्रोध या एका भावना-अतिरेकाने सर्व आयुष्य कसे झाकाळून जाते ते कथेत दाखवले आहे.

2)क्रोध वाईट असतो.त्याच्या अतिरेकाने विवेक जातो. त्यामुळे माणसाच्या वर्तनाचे अनेक पर्याय रद्द होतात.. सरांची बायको मागे वारली होती. सर दोन मुलांना सांभाळत असतात. मुलगा बापू अभ्यासात मागे पडत असतो व हॉकी खेळण्यात पुढे जात असतो. तो अनेकदा नापास झाल्यावर, सर त्याला रागवतात.तो हाय खावून आत्महत्या करतो.

3)मुलगी स्वतः चे लग्न प्रेमविवाहाने ठरवते. त्यावेळीही सर रागवतात. पण ती लग्न करते व एका गावात राहून सर्व संबंध तोडते.

4)रागाच्या भरात तडातडा बोलल्यानंतर माणूस शांत होवून दुसरी बाजू शोधतो. त्यावेळी माणसाच्या संज्ञा प्रवाहाचा कसा प्रवास होतो, हे जीएंनी यथातथ्यपणे दाखवले आहे. पण वेळ गेल्यावर सर्व घडून गेलेले असते. व उपयोग होत नाही.

- 5)त्यामुळे सर एकाकी पडतात. त्यात संत तुकारामाच्या अभंगांचा त्यांना आधार असतो. अनेक ठिकाणी ते संदर्भ आहेत. जीएंनी धर्मपरंपरेचा किती बारकाईने अभ्यास केला होता हे कळते व आश्चर्य वाटते.

6) सरांनी ही शाळा लहान असताना कष्ट करून मोठी केली. (या वेळी वस्त्र कथेतील डिसोझाची आठवण होते.)थोडे मनाविरुद्ध झाले की जग आपल्या विरुद्ध

आहे असे समजून सर वागतात. सर्व्हिसच्या शेवटच्या दिवशी त्यांना ॲटॅक येवून ते जातात. त्या मृत्यूवेळचे वर्णन हुबेहुब केले आहे. त्यावेळी जी ए लिहितात -

***

- - -आज निदान खूप काम असते तरी त्या परिचित ओझ्याखाली त्या साऱ्याचा विसर पडला असता. बाहेर आता ऊन ताणल्यासारखे झाले आणि त्याच्या झळीने त्यांचे डोके एकदम दुखू लागले. बाजूच्या कारखान्यात चक्राचा पट्टा सुटल्याप्रमाणे काहीतरी कोसळत असल्याचा धाडधाड आवाज येवू लागला व मधूनमधून ओरडण्याची माळ ओढल्याप्रमाणे एका कुत्र्याचे तुकडे तुकड्या तुकड्याचे ओरडणे ऐकू येऊ लागले. मास्तरांनी अंगठ्यांनी डोळे दाबताच त्यांना थोडे बरे वाटले.

ऑफिसमधून वर्तमानपत्र तरी आणावे म्हणून ते उठणार तोच त्यांच्या छाती अणकुचीदार कळ उठली व डोक्यात हजारो घोडमाश्या उडाल्यासारखे वाटले. त्यामुळे घाबरे होऊन त्यांना मारुतीला हाक मारली, "अरे, पाणी घेऊन ये रे ग्लासभर. मला कसं तरी वाटतंय. लवकर ये."

ते मटकन खुर्चीत बसले व धापा टाकू लागले. आता त्यांचे कपाळ ओले झाले होते. त्यांनी हातरुमालाने चाळिशी पुसली, कारण समोर काहीतरी तलम पसरल्यासारखे वाटू लागले. समोर हाडांचा सांगाडा इकडून तिकडे शांतपणे फिरत होता व त्याच विचकल्या दातांची रेषा खडूने रेघ काढल्याप्रमाणे दिसत होती. मास्तरांचे डोके जड झाले व समोर टेबला वरच त्यांनी अंग टाकले.

आपल्याला काहीतरी विलक्षण चमत्कारिक होत आहे असे त्यांना जाणवू लागले. - पण काय ते त्यांना समजेना.

चिंध्यांच्या ढिगात काहीतरी शोधावे त्याप्रमाणे काय होत आहे हे समजण्यासाठी ते चाचपडू लागले. लाल पेटलेल्या पडद्यासमोर सांगाडा हसत डोलत

होता व त्याच्या रिकाम्या छातीतून कारखान्यातील कर्कश आवाज, कुत्र्याचे भुंकणे, मोटारीच्या हॉर्नचा फवारा असले वेडे आवाज ऐकू येत होते. थोड्या वेळाने सांगाडा खिदळू लागला. बायका पिन काढतात त्याप्रमाणे त्याने डोक्यातील खिळा काढून टाकला व हलकी पावले टाकत तो मास्तरांकडे येऊ लागला.

मास्तरांचे डोळे विस्तृत झाले. त्यांनी हात वर उचलून त्याच्याकडे बोट दाखवले; पण ते सारखे थरथरत होते. “मारुती - मारुती..." त्यांनी पुन्हा हाक मारण्याचा प्रयत्न केला; पण आता त्यांचा घसा जळल्यासारखा झाला होता. “कमल, बघ ग हा...

तो सांगाडा तेथून गेला नाही. उलट अगदी समोर येऊन टेबलावर हात ठेवत वाकून तो त्यांच्यापुढे उभा राहिला. पण त्याला आता मारुतीसारखेच पिवळसर बटबटीत डोळे होते. (आणि त्यातून तुकारामाच्या फोटोमागील झुरळे तुटल्या माळेच्या मण्याप्रमाणे एकेक बाहेर पडत होती.) त्याचा आवाजही मारुतीसारखा घोगरा होता. तो सारखा म्हणत होता, “साहेब, पाणी पाहिजे? - साहेब, पाणी घ्या,” बिनहिरड्याचे दात विचकत होता.

शेवटी त्याने आपला हात उचलला. त्या टोकदार कठोर हाडांच्या हाताचा स्पर्श मास्तरांच्या धगधगीत कपाळाला झाला व त्यांनी गप्पकन डोळे मिटून घेतले.

मारुतीने ग्लास टेबलावर ठेवला व त्यांच्या कपाळावरील हात बाजूला घेऊन त्या खुर्चीतच सरळ बसवले.

****

मृत्युक्षणाचे वर्णन करणे अवघड असते. मरणसमयी जाई तर्क जाणत्याचा.... जीएंनी अनेक कथांमध्ये याचे ललित वर्णन केले आहे. त्यामुळे जीएंची अवघड भाषा तुलनेने सोपी होते.अशीही ही कथा लक्षणीय झाली आहे.

धन्यवाद. विलास वाघोलीकर

रमा गर्गे: या कथेत सगळयात मध्यवर्ती काही असेल तर ते मास्तरांना स्वतःचे अनुभव समोरच्याच्या बाबतीत तसेच असावे वाटणे हे आहे।

त्यांच्या वडिलांनी अपमान केल्यावर एकवेळ जेवून अनवाणी राहून त्यांनी यश मिळवलं।बापू पण तसाच पेटून उठेल असे त्यांना वाटले होते।

मुलगी तिच्या आईसारखी आत्मभाव जपणारी आहे असेच त्यांचे मत होते,ल.त्यामुळे ती कधी आपल्याला तोडून टाकेल असे त्यांना स्वप्नातही वाटले नव्हते.

मात्र दोन्हीही मुलांच्या स्वभावाची जातकुळी निराळी निघाली,हे शल्य मास्तरांना त्रास देत होते।

आतला सांगाडा जरी सारखा असला,सर्व शरीर संस्था जरी समान काम करत असल्या तरीही प्रत्येक जण अद्वितीय असतो हे यात सांगायचे असावे।

दिलिप बडे: बापू , कमल यांच्या प्रमाणेच संराची पत्नी सुद्धा त्यांच्या क्रोधाला निमित्त ठरली असावी?मास्तरांच्या जीवनातील बारकावे टिपून जी.एं.नी कथेला धार आणली आहे.

सुनीळ सामंत: अतिशय सुंदर विवेचन यतीनजी. कथा बरेच दिवसांत वाचलेली नाही. तरीही पूर्णतः डोळ्यांसमोर उभी राहिली. जीएंनी या कथेत व्यक्तिरेखा उभारताना जसे नेमके ब्रशचे ़जोरकस फ़टकारे मारले आहेत तसेच तुम्हीही कथेचे वर्णन यथातथ्य केले आहे. तुम्ही लिहिलेले एक वाक्य "अशी माणसे मागच्या पिढीत पाहिली आहेत" हे मनाला स्पर्श करून गेले. खरेच अशा ़ध्येयाबाबत कणखर व्यक्तींची संख्या कमी कमी होते आहे का?

जीएंच्या कथांचा एक कालखंड असतो. एक दिवस वा दिवसाचा एक भाग. आणि त्या काही तासांत होत्याचे नव्हते होऊन जाते. ही कथाही तशीच आहे. अतिसय सुंदर बांधणी आणि मनाला जबरदस्त चटका देणारी कथा.

सुनीळ सामंत: विलासजी, खुप छान विवेचन.

तुम्ही त्यात क्रोध या गोष्टीचा कथेवरचा परिणाम दाखवला आहे. ते वाचताना माझ्या मनात आलेला विचार.-

जीएंच्या कथांमध्ये एक एक स्वभाव मध्यवर्ती असतो. कधी काम, कधी क्रोध, कधी मोह,... या प्रकारेही जीएंच्या कथांचे वर्गीकरण करता येईल? त्यावर एक चांगला लेख होऊ शकेल?

मृत्यूक्षणाच्या वर्णनाबाबत आपले observation बरोबर आहे.

सुनीळ सामंत: रमाजी, तुम्ही कथेकडे वेगळया अंशांतून पाहिले. थोडे विस्तृत लिहायला हवे होते.

सांगाडा हे मला कणखरतेचे प्रतिक वाटते. लवचिकतेचा अभाव. कथेचा मध्यवर्ती भाव. हे तुम्ही लिहिलेले वाचल्यावर लक्षात आले.

विलास वाघोलीकर: चांगले निरिक्षण. मानवी अस्तित्वात शरीर , मन, आत्मा येतो. मनाचे एकेक रंग घेवून जीएंच्या कथा पाहता येतील धन्यवाद.

दिलिप बडे: जी.एं.च्या कथांना consciousness च्या तीन पातळ्या 1)आदिम पातळीवरचे विचार2)ऊत्पादक-परस्परावलंबी-प्रगत विचार3)ऊन्नत विचार-आस्था करूणा तन्मयता समर्पण नम्रता कृतज्ञता-निरपेक्ष त्याग-निर्मळता-अदंभ-क्षमा-संयम-सहिष्णुता या सर्व भावनांच्या पातळीवर विचार करता येईल.4)देहबद्ध मी”च्या विलीनपणाचा अनुभव मेंदुविज्ञानाने मान्य केला आहे.5)विचारांच्या पल्याडचे अस्तित्व आणि जाणिव याची ओळख जी.एं.च्या

कथेत शोधता येईल का?एकेक भावना-एकेक विचार-एकेक रंग---सामंत सरांनी अफलातुन खेळ सुचवला आहे.

संजीव सावरगांवकर: आधी कथा समजणे, रुजणे, उमजून व्यक्त करणे हीच प्रक्रिया खूप महत्वाची आणि कठीण ही. त्यानंतर वर सुचवलेला अफलातून खेळ खेळणे म्हणजे बुद्धी, लेखन प्रक्रिया, विचार धनाचे पेरणे, खूप अवघड पण तेवढेच आनंद द्विगुणित करणारे असेल. सुरू करू यात....

विलास वाघोलीकर: जीएंनी या कथेत सांगाडा ही मध्यवर्ती प्रतिमा घेतली आहे. कथेत काही ठिकाणी त्या प्रतिमेला धरून इतर भावअवस्था येतात. सांगाडा काय दाखवतो? सर्व महत्वाचे झडले आहे व आता किमान हाडे काही दिवस उरणारी राहिली आहेत. सरांच्या आयुष्यातील पत्नी, मुलगी ,मुलगा जीवनातून गेले आहेत. शाळेतही त्यांचे काम कोणाला आठवत नाही. नवीन येणारा डोक्यावर बसला आहे. त्यामुळे आता आपण सांगाड्यापुरते राहीलो आहोत असे सरांना वाटते.

- सांगाडा हा तसा भीतीदायक वाटतो. बिचकवणारा टाकतो. कमलला सरांमुळे बिचकल्यासारखे झाले.सरांना कमलच्या आठवणीने बिचकल्यासारखे झाले. सायन्स हॉलमधला सांगाडा असा आठवणीत येत असतो.

- सायन्स हॉलमध्ये सांगाडा खिळयाला अडकवलेला होता. पण सरांच्या मृत्यू क्षणी एकेक संवेदना नष्ट होतात.त्याचे प्रतिमामय चित्रण जीएंनी केले आहे. त्यात मृत्यू अगदी नाकाशी येतो. तेव्हा त्यांना मारूती शिपायाऐवजी सांगाडा तरंगताना दिसतो. त्याचे दात खडूने काढलेले वाटतात. अशा तुकड्या तुकड्यांच्या प्रतिमांनी जीएंनी सरांचा मृत्यू समय - मृत्यूक्षण,” दाखवला “ आहे. यामुळे कथेचे शिर्षक सांगाडा हे अत्यंत समर्पक आहे.

- धन्यवाद. विलास वाघोलीकर

दिलिप बडे: अव्यक्तातुन जिवाला चेतना मिळते.चेतना निघून जाते.सांगाडा ऊरतो.अस म्हणतात---विचार-भावना-वर्तन या शारिरीक क्रिया.चेतना पारदर्शी - शुद्ध असते.नाडगोंडा सरांचे सुखदुख शरिराचे.सर मरण पावले.चेतना अनेक रूपाने अ-मृत असते.

मंजिरी देशमुख: सर्व प्रकारे शुष्क झालेलं निष्प्राण शरीर म्हणजे सांगाडा. नाडगौडा मास्तरांचं जीवन सायन्स हांॅलमध्ये लटकवलेल्या सांगाड्यासारखं आहे. त्यांचं व्यावसायिक आणि कौटुंबिक जीवन ध्वस्त झालेलं आहे. शाळेसाठी त्यांनी अपरिमीत कष्ट उपसलेले असूनही त्याची जाण तिथे काम करणाऱ्या कुणालाही नाही. त्यांच्या मुलांनी त्यांच्या रागावण्यामागची कळकळ समजून न घेताच मास्तरांशी कायमचा दुरावा साधला.कोणतंही प्रेम वाट्याला नसलेलं मास्तरांचं जीवन म्हणजे त्यांच्या डोक्यात नियतीने ठोकलेला खिळाच होय. तसेच सांगाड्याच्या डोक्यातील खिळ्यासारखा कायमचा रुतून बसलेला निर्दय हा शेरा जणू सोबती घेऊन मास्तर समाजात वावरत असतात. (इथे आपली दुखरी जखम घेऊन वावरत असलेला अश्वस्थामा आठवतो.)

त्यांच्या काळजातली माया कुणीही समजून न घेतल्याने मास्तरांचं जीवन प्रेमाच्या ओल्या भावनेपासून वंचित आहे. त्यांचं अस्तित्व बेदखल केल्या गेलेलं आहे. शेवटी श्वास जड होताना सांगाडा त्यांच्या डोळयासमोर उभा आडवा फेर धरतो व ते डोळे मिटतात. मरणाने मास्तरांची सुटका केली असं म्हणता येईल.

मायेची ओल मिळावी यासाठी धडपडणाऱ्या मास्तरांना त्यांचे प्राण गेल्यानंतर त्यांच्याविषयी मायेनं बोलल्या गेलं. त्यांची दखल घेतली गेली. परंतु आता केवळ सांगाडा म्हणून शिल्लक राहिलेले मास्तर या सर्वांपलिकडे गेले आहेत.

सांगाड्यासारखं निष्प्रेम जगणं वाट्याला आलेल्या लोकांसाठी जीवन किती कठीण असेल याची कल्पना जी.एंच्या सांगाडा या कथेने येते आणि वाचक बेचैन होतो.

श्रीकांत देशमुख : जीवशास्त्रीय दृष्टिकोनातुन सांगाडा म्हणजे ज्या शरीरातून जीव (चैतन्य /स्पिरीट) निघुन गेला व फक्त हाडे उरलीत असा शरीराचा ढाचा. तथापी त्याचवेळी शरीरातील सर्वात शुष्क व कठीण (ताठर/टणक अवयव) भाग. तेव्हा असे चैतन हरवलेले आयुष्य असलेल्या नाडगौडा ची कथा आकारताना जि. एं. नी सांगाड्याचा प्रतिमात्मक उपयोग केला असावा काय?

दोन मुद्दे महत्वाचे वाटतात.

१) सांगाडा सदृष्य चैतन्य हरवलेले जीवन

२) ताठरपणा : ज्यामुळे समाजातील लोक व कुटुंबातीलहि सर्व आप्त (मुल्गा मुल्गी, बायको) दुरावले/दुखावले.

मंजिरी देशमुख: हा ताठरपणा दोन्ही बाजूंनी दिसतो. मास्तरांकडून तसेच त्यांचा मुलगा मुलगी, आणि शाळेतील माणसांकडून देखील.

दिलिप बडे: मुद्धा क्र.1शिर्षकासाठी तंतोतत

माधव पुराणिक : सांगाडा (निळासावळा ,१९५६, १२|| पानी कथा)

विवेचन - डॉ. माधव पुराणिक

निर्णायक घटनांमधून माणसांच्या अस्तित्वातून
झंकारणाऱ्या मृत्यूच्या गूढ सुरावटी

प्रत्येकजण एखाद्या निर्णायक घटनेमधून ती सुटी सुटी करून अर्थ काढत असतो. उदाहरणार्थ एका व्यक्तीची भूमिका,दुसऱ्या व्यक्तीची भूमिका, प्रसंग, स्थळकाळ, स्वभाव, मानसिक पार्श्वभूमी इत्यादी.असे विलगतेने विकल्पांचे वस्त्र विणत जीवनाच्या आकलनाचा पोत निर्माण करायचा प्रयत्न करतो. कारण आपण समग्रतेने, एकात्मतेने जीवनाकडे न पाहता एखाद्या बौद्धिक ,तार्किक आकारातून ,अनुमानातून त्या निर्णायक घटनेचा आपल्या व्यक्तिमत्त्वानुसार सीमित अर्थ काढायचा प्रयत्न करतो.

पण जी ए कुलकर्णी यांची त्या घटनेकडे पाहण्याची दृष्टी एकात्मतेची आहे. ते व्यक्ती त्याच्या मनातील भावना व घटना यांच्या मागचे अंतिम सत्य जाणण्याचा कलात्मक व नाट्यमय प्रयत्न करतात. जणू अमूर्त, अलौकिक ,अपार्थिव जीवनवस्त्राचा सुंदर पदर फडकवत असतात.असे करताना त्यांना त्या क्षणी जे अनुभवायला येते ते जी ए उत्कटतेने ,निखळपणे , अद्वितीय प्रतिभेने , सामर्थ्याने लखलखीत प्रतिमासृष्टीतून व्यक्त करतात. असे व्यक्त होताना , ते सत्य वाचकाला तीव्रतेने जाणवणाऱ्या शारीरिक व मानसिक संवेदनांतून प्रतीत होते.त्याला दिपवून टाकते व अस्वस्थ करते.

कथेत सांगाडा हे प्रतीक मृत्यूचे आहे. मृत्यूमध्ये, जगताना येणारे लहान मोठे मृत्यू पण सामील होतात.("सारेच लहानमोठे मृत्यू, लहानमोठे जन्म ! खरे मरण म्हणजेच या चक्रातून मुक्ती असते." - कथा वस्त्र ,जी ए कुलकर्णी). मृत्यू या संकल्पनेत अटळ, अनोळखी दुःख, सततची व कायमची निराशा, न संपणाऱ्या व्यथा, तीव्र कुरतडणारी वेदना, नसतेपणाची चिंता ,अनामिक भीती , काळजी, गत आयुष्यातील टोकाच्या कृतींचा व त्यांच्या परिणामांचा क्षणोक्षणी वाटणारा अपराधगंड, नातेसंबंधातील जीवघेण्या दंशानंतरही मनात दाटून येणारी व्याकुळतेची

शेवटची एक छटा, सर्वांनी तिरस्कार व उपेक्षा केली तरी अपरिहार्यपणे जगावे लागल्यामुळे येणारा एकटेपणा इ. भावनांचा चा समावेश होतो.

या दृष्टिकोनातून कथेतील एक अंकी नाटक -घटना आपण पाहू या.

प्रवेश / घटना १ - पात्रे १ नाडगौडा मास्तर २ त्यांची उपवर मुलगी कमल

प्रसंग - कमल ,''मी -मग तुम्ही- तुम्हाला मी विचारणारच होते... ती एकदम अडखळली. मला लग्न करायचं आहे - ते बापट आहेत ना - त्यांच्याशी. तुम्ही - "

मास्तरांचा संताप अनावर झाला. मास्टर वेड्याप्रमाणे तिच्याकडे धावले व त्यांनी काडकन तिच्या मुस्कुटात दिली पण पुन्हा त्यांचा संताप अनावर झाला.

मास्तर ओरडले "माझं तोंड काळ केलं तेवढं पुरे. उद्यापासून घराबाहेर पडायचं नाही. जा, चालती हो इथून "

कारण त्या मुलाच्या वडिलांनी मास्तरांची व्यवहारात मोठी फसवणूक केली होती.म्हणून मुलगाही तसाच असेल असा समज करून व मुलीने पहिल्यापासून आपल्याला या बाबतीत सांगितल नाही म्हणून या निर्णायक क्षणी मास्तरांच्या अहंकाराला जीवघेणी ठेच पोचली, लग्नासारख्या आयुष्य बदलणाऱ्या घटनेत मुलगी आपले संपूर्ण ऐकेल असे त्यांचे स्वप्न होते,अशी त्यांची स्वप्रतिमा होती.त्याला धक्का पोहोचला. त्यांचा विवेक सुटला ,तारतम्याचे त्यांना भान राहिले नाही व नियतीने, अनाकलनीय गूढ शक्तीने त्यांच्या ताबा घेतला व हे पाऊल, हा हात त्यांनी उचलला. अशा घटनेकडे वाचक अनावर, अमानुष राग या विकारांचे परिणाम, दोघांच्या स्वभावातील ताठरपणा,फसवणूकीची घटना इ तुटक दृष्टीने पाहतो.

पण जी ए या घटनेतून सांगाडा या मृत्यूच्या प्रतीकाचे भावरूप उभे करतात.

या घटनेमुळे दोन व्यक्तींच्या अनेक वर्षांच्या, निकटच्या रक्ताच्या , आतड्याच्या नातेसंबंधाचा अंत होतो म्हणजे त्यातील आपुलकी, माया ,स्नेह, माणुसकी जाऊन त्या नात्याचा एक भावरूप सांगाडा उडतो. (बाह्य सत्ता)

त्या सांगाड्याकडे प्रवास करताना मनातील सहजप्रेरणा राग, भीती, अहंकार या पराकोटीच्या होतात व त्या व्यक्तीच्या मनातील कोमल भावनांचा विनाश करतात.

अस्तित्ववादी आशयसूत्राप्रमाणे मास्तरांनी स्वतःला असे घडवले आहे की ते म्हणतील तेच सत्य आणि तसेच घडले पाहिजे व सर्वांनी वागले पाहिजे. या घटनेमुळे त्यांच्या या स्वप्रतिमेचाही, मानसिक भ्रामक विश्वाचाही चक्काचूर होऊन त्याचा फक्त सांगाडा शिल्लक राहतो. (आत्मसत्ता)

साधे, छोटेसे ,कौटुंबिक स्वप्न व घरातील मुलगा व मुलगी यांच्या निर्णयस्वातंत्र्यावर, जगण्याच्या पध्दतीवर स्वतःची सत्ता या दोन्हींचे तुकडे तुकडे झाल्यावर मास्तरांच्या आशावादी जीवनाचा फक्त सांगाडा त्यांना खुणावत राहतो.

हा जीवनचक्रातला मास्तरांमधील चैतन्यमयतेचा मोठा मृत्यू.

प्रवेश/ घटना २ -पात्रे नाडगौडा मास्तर , त्यांचा मुलगा बापू

प्रसंग दहावीचा निकाल लागलेला असतो

मास्टर बापू समोर उभे राहिले.” बाप्या ,नापास झालास ? त्यांनी रागाने विचारले. बापूने हुंदका दिला. बस रडत असाच. तू काय पोटाला शेण खातोस की काय?

मास्तरांनी फळीवरील एकेक पुस्तक गाठोड्याप्रमाणे रपारप बापूवर फेकायला सुरुवात केली. रेड्या, आत्ताच्या आत्ता चालत हो. जा मसणात कुठेतरी. तुझा विटाळ नको ,या घराला या हाताला ,या डोळ्यांना.

दुसऱ्या दिवशी दहा अकरा वाजता मास्तरांना ती बातमी समजली बापूने रामाच्या देवळातील विहिरीत उडी घेतली होती.

या घटनेकडे आपण मास्तरांचा स्वभाव, बापूंचे शैक्षणिक अपयश, त्याची खेळाची आवड, इ. विलग दृष्टीने पाहतो. जी ए या घटनेच्या अंतिम मूळ स्वरूपाकडे जातात.

वडिल व मुलगा यांच्यातील नात्यांच्या या प्रसंगात प्रथम भावनिक सांगाडा उरतो. ते नाते लगेच निराशाजनक, अपेक्षाशून्य व काळजात घुसलेल्या मर्मांतक दु:खाच्या बाणाने विरून जाते.

“रात्रभर मास्तरांची तळमळ चालू होती. पण आता रागाच्या भर ओसरला होता. फक्त दुःखाची ओली पावले येरझाऱ्या घालत होती.”

इतकेच नव्हे तर या प्रसंगात तो सांगाडाही “रामाच्या देवळातल्या विहिरीच्या पाण्यात” नष्ट होतो(राम म्हणतो) व नियती व्यक्तीला जीवनातले शेवटचे टोक गाठायला भाग पाडते.

मग मास्तरांच्या मनात बापूची आठवण केवळ सांगाडा रुपाने राहते

नंतर मास्तरांना लगेच पश्चाताप होतो पण नियतीची गूढ शक्ती त्यांना आधीच सीमापार घेऊन गेलेली असते व त्या घटनेचे झालेले परिणाम मास्तर पश्चातापाने पुसून टाकू शकत नाहीत - या प्रसंगात व त्यांची मुलगी कमल हिच्या बरोबरच्या लग्नाच्या निर्णयप्रसंगात सुद्धा.

प्रवेश/ घटना ३ - पात्रे - मास्तर व शाळेतील मुले

“मास्तर आत शिरले. त्यांना पाहताच एखादा महारोगी गर्दीत शिरावा त्याप्रमाणे पोरे पटापट बाजूला सरली व त्यांचे शब्द आकसले.ते सारेजण आपल्याकडे रोखून पाहत आहेत अशी तप्त जाणीव मास्तरांना झाली. त्या पोरांच्या मनात काय चालले आहे हे त्यांना माहीत होते. प्रत्येकाच्या मनात तिरस्कार भरून राहिला आहे.आपल्या पावलांनी त्यांच्या मनात “निर्दय थेरडा.....” असे शब्द

उमटत आहेत. आपल्याविषयी लोक काय बोलतात याची त्यांची जाणीव नवीन नव्हती.”

या घटनेकडे आपण मास्तरांचा वाटणारा अपराधगंड ,घडलेल्या आपल्या चुकीच्या वागण्याबद्दलचा पश्चाताप व खंत, तसेच मुलांना त्यांच्याबद्दल वाटणारा तिरस्कार ,समाजातील इतर लोकांना त्यांच्या समाजमान्यतेनुसार नसलेल्या वागण्याबद्दल द्वेष, चीड इत्यादी प्रकारे तुकड्या तुकड्यांनी बघतो. पण जी ए त्या घटनेकडे एकात्मिक अंतिमतेने अनुभव घेऊन व्यक्त होतात.

व्यक्तीच्या बाह्य जीवनात (बाह्य सत्ता) समाजातील इतर लोक, व्यवसायानिमित्त भेटणारे लोक(इतर मास्तर, शाळकरी मुले हेडमास्तर, शिपाई, इ) इत्यादींचा दैनंदिन जीवनावर, मनावर, जीवनातील आनंदावर, सुखावर,मोठा प्रभाव असतो. या सर्व लोकांची व्यक्तिकडे पाहण्याची दृष्टी जर नकारात्मक, उपेक्षेची,वंचनेची, कठोरपणे दुर्लक्ष करण्याची,तुच्छतेची,असेल तर व्यक्तीचा व त्या या सर्व नात्यांचा या सर्व सामाजिक नात्यांचा भावनिक अंत होतो व फक्त त्यांचे जिवंत कलेवर उर्फ सांगाडा व्यक्तीच्या मनात व या सर्वांच्या मनात राहतो.

आपण आतापर्यंत ३ सांगाडे पाहिले.

पहिला सांगाडा -कौटुंबिक नातेसंबंधांचा भावनिक मृत्यूरूपी सांगाडा.

दुसरा सांगाडा -व्यावसायिक (शाळा, शिपाई मुले इ) नातेसंबंधांचा अनेक वर्षे मानसिक अंताकडे - सांगाड्याकडे हळूहळू निश्चित पण अटळपणे, अनिवार्यपणे होत जाणारा मनाचा थरकाप करणारा प्रवास.

तिसरा सांगाडा - समाजातील इतर लोकांचे मास्तरांबद्दलचे मत किंवा तिरस्काराची तीव्र भावना.

(“कमलचा नवरा तर मास्तरांचा उल्लेख “खाटीक “म्हणूनच करत असे.)

यामुळे घर किंवा शाळा यांच्याव्यतिरिक्त जे मास्तरांचे प्रत्यक्ष व मानसिक विश्व असते ते उध्वस्त होते, नीरस होते कंटाळवाणे होते ,शुष्क होते. मास्तरांची ही या लोकांबद्दल तशीच भावना असते.त्यामुळे झपाट्याने ,वेगाने हे भावविश्व कोसळत जाते.

“तो कुलकर्णी वास्तविक मराठीचा मास्तर पण घरी टेबलावर पहावी तो चारमिनाराची पाकीटे ,कंगवे ,सिनेमाची नागडी मासिके ,....पाच सहा तास पांचट दुधाचा रतीब घातला की गवळी मोकळा.बाकीचेही तसेच भक्त नव्हेत ,हमाल लेकाचे! दिल्या कामाचे टाकल्या दामाचे.”

“हेडमास्तर जोशींना पाहताच त्यांचा संताप अनावर होत असे हात थरथरत”

“खरे म्हणजे बापट मास्तरांच्या एका जुन्या मित्राचा मुलगा पण त्यांनी त्या मित्राचे नाव टाकले होते. त्या मित्राने मास्तरांच्या आईचा एकुलता एक दागिना - बोरमाळ वापरायला घेतला होता व आज उद्या करत चालढकल करून तो विकून टाकला होता”

या सर्वांमुळे मास्तरांच्या गतजीवनाचा एक सांगाडा तयार होत जातो व तो मृत्यूकडे त्यांना हळूहळू पण निश्चितपणे ,थंडपणे, नकळत घेऊन जात असतो.

“एखाद्या जुन्या दप्तराप्रमाणे इतक्या वर्षांच्या आयुष्याचे गाठोडे सायंस हॉल मधल्या सांगाड्याच्या पायाशी ठेवून ते आता बाहेर पडणार होते.”

या सर्व प्रसंगात व्यक्तीने निर्णायक क्षणी केलेल्या कृत्याचे परिणाम काय होतील हे त्या व्यक्तीच्या तर्कानुसार, अपेक्षेनुसार ठरत नसते तर दोन माणसांमधील जी गूढ, आंतरिक शक्ती नियतीची असते , पूर्वसंस्कारांची असते ,व्यक्तीच्या नेणिवेतील किंवा अबोध मनाच्या तळाशी असलेल्या आदिम भावनांच्या रूपात असते ती ठरवते व याचे मास्तरांना अतिशय आश्चर्य वाटते.

“पण कमलनेही तसेच म्हणावे याची त्यांना फार विषणता वाटली.आपल्याच श्वासाची पोरगी ती. मी बापूला तसं का म्हणालो याचा तिला समज हवा होता. हजारो

पोरांना बाप शिव्या देतात; पण त्यांच्यापैकी सारेच का विहिरीत उड्या घेतात? छट! कमलने तरी जाता जाता तशी लाथ मारायला नको होती ,तसे म्हणायला नको होते."

शेवटी हे विश्व कोरडे होत होत त्याचा एक भव्य पण मास्तरांना हादरवणारा सांगाडा तयार होत जातो.

प्रवेश / घटना ४ अंतिम प्रसंग - पात्रे मास्तरांचा जिवंत सांगाडा व

" मातीचे अनेक पक्षी असलेल्या कपाटाजवळ डोक्यात वाकडा खिळा ठोकून लाकडी दांड्याला अडकलेल्या मनुष्याचा सांगाडा होता"

मास्तरांची मानसिक शक्ती जरी राग, संताप, क्रोध, चीड इत्यादी भावनांनी व्यक्त होत होती तरी त्यांचे शरीर दुर्बल सामर्थ्यहीन ,केविलवाणे व खचलेले होते.

"मला शिस्तीच्या गोष्टी सांगतोय पण हा सारा संताप ओसरल्यावर मात्र त्यांचे लाथ मारलेले मन असहाय धापा टाकू लागले होते."

" मास्तरांनी पैसे घेतले नाहीत पण चिठ्ठी वाचल्यानंतर त्यांचा उजवा हात डोक्याखाली दाबून धरावा लागला इतका तो थरथरू लागला होता. अरे ३५ वर्षे मी इथे काढली...."

असे सर्व आयुष्य सांगाड्यासारखे झाले तरी मास्तरांना जगावेच लागत होते.जगणे हे पर्यायहीन असते.

(माणसं काय कुत्री काय कुणा वाचून मरत नाहीत. भावाचा आधार तुटला म्हणून तू मेली नाहीस. तू गेलीस म्हणून ते कुत्रे उपाशी मरणार नाही."- कथा वस्त्र, मिस डिसूझा)

मृत्यू कधी येईल हे माहीत नसते.असे असताना ,एके दिवशी मास्तरांच्या शरीराचा व मनाचा सांगाडा कसा झाला हे जीए यांनी अतिशय प्रभावीपणे व्यक्त केले आहे. मास्तरांचा अंत होतो तेव्हा मास्तरांजवळ आपल्या आयुष्यात त्यांना सांगण्यासारखे एकही सन्मानचिन्ह (जी ए यांचा शब्द कथा काली)नसते ,यश नसते, कर्तबगारी नसते, सुख व आनंदाचे खूप क्षण नसतात व अशा रीतीने मृत्यू त्यांच्यावर

अचानक , अनपेक्षितपणे प्रहार करतो व ते मृत्यूला अगतिकपणे, असहायपणे ,नाईलाजाने ,दु:खव्यथांनी कोसळत सामोरे जातात , मागच्या सांगाड्यात शिरतात.कारण त्या वाचून त्यांना गत्यंतर नसते. असे जीए कुलकर्णी यांनी अस्तित्ववादातील स्वतःला घडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या पण नियतीच्या अनाकलनीय प्रभावाने उध्वस्त झालेल्या, एकाकी अपयशी जीवनाचे करूण चित्र या कथेत हृदयविदारकपणे रंगविलेले आहे.

“सांगाड्याने डोक्यातील खिळा काढून टाकला व हलकी पावले टाकतो मास्तरांकडे येऊ लागला”

सांगाड्यात जणू नियतीची अनाकलनीय क्रूर व भेदक शक्ती शिरली व त्या शक्तीने मास्तरांना जणू मगरमिठी घातली आणि त्यांच्या शरीरातील जीवनरस शोषून घेऊन त्यांचे आपल्यासारखेच एका सांगाड्यात रूपांतर केले.

नंतर जणू तो सांगाडा परत गेला आपल्या जागी उभा राहिला व जगात असेच जगणाऱ्या इतर माणसांची त्यांच्या मृत्यूक्षणाची वाट पहात निर्विकारपणे समोर पाहू लागला.

या कथेत आणखीही काही अशाच घटना आहेत त्या घटनांकडे जीएंच्या दृष्टीने पाहण्याचा आपल्याला प्रयत्न करता येईल असे मला वाटते.

माणसाच्या शरीराचा सांगाडा व त्याकडे अटळ प्रवास करणारे माणसाच्या शरीरातले चैतन्य हे या कथेत अतिशय कलात्मकतेने दाखविलेले आहे.

माधव पुराणिक - भ्रमणध्वनी ९६२३४४२२२१

सुनीळ सामंत: अत्यंत विचारपूर्वक कथा वाचून तुम्ही हे लिहिले आहे हे जाणवते. दंडवत. यातील प्रत्येक नाट्यप्रवेश हा एक एक खिळाच बसावा तसा वाचकाच्या मनात एक ठाम प्रतिमा बनवत जातो.

सांगाडा हे मृत्यूचे प्रतिक आहे की अमरत्वाचे? खरे तर सांगाडा मृतच असतो. पण त्यामुळेच अमरही. हजार लाख वर्षे तसाच्या तसा रहाणारा आपल्या शरीराचा एकमेव भाग म्हणजे सांगाडा.

दिलिप बडे: मास्तरांचे वर्तमान आयुष्य हे मृतवत सांगाडा आहे.व वास्तवातील सर्व मानवी जीवनही सांगाडा"च आहे.अस जी.एं.ना सुचवायच आहे का?

माधव पुराणिक : नाही. प्रत्येकजण प्रयत्नांनी/ योगायोगाने जगण्यातले भावसाफल्य, आनंद व सुख, समाजमान्यतेची सन्मानचिन्हे , प्रेम/प्रणय/शारीरिक वासना यातील स्थळकाळातीत,शब्दातीत क्षण, उदात्ततेकडे (sublimation) व शांतीकडे (ultimate peace) झुकणारे अनुभव, नात्यातील गूढरम्य, मनोज्ञ घटना नक्कीच अनुभवू शकतो. स्वतःला सतत घडवायचा प्रयत्न करू शकतो पण हे सर्व मृत्यू /सांगाडा या अंतिम सत्याच्या चौकटीत. जन्म व मृत्यू या दोन कालबिंदूंच्या पोकळीत. सांगाडा म्हणजे जड वस्तू नक्कीच अमर आहे पण तो जी ए यांना अभिप्रेत असलेल्या मानवी सुखदुःखाच्या, अनुभवांच्या ,शब्दात व्यक्त होऊ शकणाऱ्या भावनांच्या पलीकडे आहे या अर्थाने तो मानवी जीवनाचा मृत्यू आहे

दिलिप बडे: पुराणीक सर,जी.एं.नी कोणत्या मनोहारी भावावस्थेच समर्थन केले आहे?

माधव पुराणिक : त्यांनी कोणत्याही मनोहारी भावावस्थेच समर्थन केलेलं नाही. पण त्यांच्या कथेतले नायक अथक प्रयत्नांनी असे क्षण अनुभवण्याचा, जीवनातील प्रश्नांची सातत्याने, धैर्याने उत्तरे शोधण्याचा मनापासून प्रयत्न करतात.

त्यात ते मृत्यूलाही समर्पण व्हायला/ त्याचा स्वीकार करायला मागे पुढे पहात नाहीत/ घाबरत नाहीत जरी निराशेच्या अपयशाच्या कठीण परिस्थितीच्या शोकात्म ढगांची सावली त्यांच्यावर सतत पडत असली तरी.

दिलिप बडे: खर आहे.अंतिम सत्य अस काही अस्तित्वात नाही.अस जी.एं.नीच लिहून ठेवल.जेवढ दिसत तेवढच आपल जीवन.तेच आपल विश्व.

माधव पुराणिक : जन्म आणि मृत्यू ही अंतिम सत्याची रूप आहेत.त्यांचा अनुभव व्यक्तीला त्याच्या येणाऱ्या जीवनातील अनुभवांवरून त्याच्या आकलनशक्ती वरून ,बौद्धिक कुवतीवरून, असामान्य प्रतिभेवरून ,आत्मिक उपासनेच्या अनुभवांवरून, वयाप्रमाणे सतत बदलत असतो, वेगळा वाटत असतो पण त्या शब्दातल्या अनुभवांमागे मागे या दोन भावावस्था आहेत. त्या संकल्पना म्हणून अंतिमच समजल्या पाहिजेत जरी त्या आपल्या जीवनातल्या शेवटच्या क्षणापर्यंत आपल्याला बदललेल्या स्वरूपात अनुभवाला आल्या तरी. प्रत्येकाने सतत घडायचा / घडवायचा प्रयत्न करायला नको का? निदान सांगाडा कथेतल्या नाडगौडा मास्तरांच्या जीवनावरून.

मेघा महाजन : Sunder katha saransh sir dolya samor pratyakh Nadgavada mastar ubhe ahet vatale thanks 🙏

यतीन गुळवणी : 🙏 🙏

जी. ए. कुलकर्णी खरोखरच महान कथाकार आहेत. त्यांनी निर्माण केलेले साहित्य वैश्विक आहे.

सुनीळ सामंत: जीएंच्या कथांचा वाचकांच्या रोजच्या व्यवहारातील विचारांवर काही परिणाम होतो का? माझ्या तरी अख्ख्या आयुष्यावर झाला. एक तर वयाच्या पंधराव्या वर्षीच जीएंची गाठ पडली. पण ती चर्चा या ग्रुपवर नको. हे आठवण्याचं कारण सांगाडा ही कथा. (घर ही दुसरी)

सांगाडा या कथेचा माझ्या कौटुंबिक वागण्यावरम सामाजिक संबंध ठेवण्यावर बराच परिणाम झाला. तो एक धडाच होता. एक- तर आपले निर्णय दुसऱ्यांवर लादू नयेत. सांगावेत. समजावण्याचा प्रयत्नही करावा. पण हेका धरून बसू नये. दोन- तुटण्याची पाळी आलीच तर लवकरात लवकर आपल्या भावना व्यक्त करून जुळवून घ्यावे. कायमचे तुटणार नाही याची काळजी घ्यावी. तीन- शब्द वापरताना जमेल तितका विचार करावा. भावनेच्या भरात शक्य तो बोलूच नये. अगदी शारीरभाषाही संयत ठेवावी. आयुष्यात माणसांहून मौल्यवान काहीच नसते.

जीए इतर लेखकांप्रमाणे (खांदेकर, वपु, पुल,) सुविचार वेगळे लिहीत नाहीत. तत्वे पात्रांच्या तोंडून वदवतात. पण तीही मोघम. मी जसे वर तीन सूत्रं लिहिली तशी लिहिणं ही जीएंची पद्धत नव्हे. जीएंच्या कथांतून तळाशी ती सामान्यजीवनसूत्रही असतात. ती वाचकापर्यंत पोहोचतात. अनेक वाचक ती नकळतपणे आत्मसातही करतात. मग अनेक वर्षांनी लक्षात येते, आपण हे या कथेतून आपल्याही नकळत शिकलो की. सांगाडा या कथेबाबत माझे तसे झाले आहे.

विलास वाघोलीकर: आपण मनापासून लिहिले आहे. धन्यवाद. आपल्या " वयाच्या पंधराव्या वर्षीच जीएंची गाठ पडली. पण ती चर्चा या ग्रुपवर नको.."या वाक्यापाशी मी थबकलो. ललित अनुभव हा सर्वस्पर्शी असतो. मला वाटते, आपण नंतर समग्र जीए कसे वाचले, ते जरूर लिहावे. आपण जीएंच्या संसारकथांचे मूलाग्राही, थोडक्यात विवेचन केले आहे. घर, तुती.... इत्यादी कथा वाचायला लागलो की आपण पूर्णपणे त्या लहान गावी, त्या गल्लीबोळात, त्या माणसांच्या

जवळ जावून भेटतो. अगदी जिवंत, सर्वस्पर्शी भेटतो. मग एखाद्या जवळच्या, प्रेमळ वडीलधाऱ्याप्रमाणे जी ए तेथून मला जीवनधडे देतात. आपण पराकोटीचे प्रयत्न केले तरी विश्व एवढे मोठे, गुंतागुंतीचे आहे की , ते विश्व आपल्याच तालात जात असते.(नियती) ही प्रखर जाणीव जीए करून देतात. हा माझ्यावर जीएंचा परिणाम झाला, व तो मी माझ्या एका लेखात लिहिला आहे. माझी आपणास विनंती आहे की , हा मोठा लेखक आपल्या जीवनात वयाच्या पंधराव्या वर्षी टपकल्यावर काय झाले, हा ललित अनुभव आपण पाना दोन पानात अवश्य लिहावा. व ते " मुक्त चर्चा" ग्रुपवर द्यावे, ही नम्र विनंती. आपल्या पोस्ट बद्दल खूप धन्यवाद. गुड डे. विलास वाघोलीकर.

सुनीळ सामंत: चर्चा सांगाडा या कथेभोवतीच रहावी यासाठी तसे लिहिले.

दिलिप बडे: जी.एं.च्या कथा जीवनदाह"दर्शन घडवतात.भाबडा आनंद नाकारतात.ज्ञानाची चिकित्सा व तपासणी करायला भाग पाडतात.

राजेश उनवणे : वाह सुनीलजी 🙏

"शिक्षक हा जरी विद्यार्थ्यांना शिकवित असला तरी तो शेवटपर्यंत विद्यार्थीच राहिला पाहिजे.....,

ज्ञान गोळा करत राहिला पाहिजे, ते आत्मसात करून त्याच्या विद्यार्थ्यापर्यंत ते पोहोचवत राहिला पाहिजे..!"

हाच आपण सांगीतलेला संदेश आहे. आणि

"जीए यांच्या कथेतून नकळत शिकत गेलो" हे आपले वाक्य तर खूप दाद देण्याजोगे आहे.!

. 👍 आजही आपली ती प्रक्रिया चालू आहे हेच आपल्या लेखातून स्पष्ट होते...!

प्रस्तुत कथे मध्ये शाळेतल्या मुलांना शिकवणारा नाडगौडा मास्तर स्वतःच्या मुलांना घरात काय शिकवत होते? स्वतःला त्यांच्यासमोर व पत्नीसमोर बाप-पति या नात्याने व एक शिक्षक म्हणुन कसे वर्तन करत होते, कसे सादर करत होते याचे चित्र अतिशय मार्मिकपणे जीएनी या कथेत रंगवले आहे...! वाचक मात्र कथा वाचून मास्तरच्या आयुष्यातील घटनांनी व्यथित होतो..पण जीए यांना फक्त ती व्यथा मांडायची नाही आहे. अशा दुखद घटना कित्येक व्यक्तींच्या आयुष्यात घडत असतात..(किंबहुना याहूनही भीषण असतात)

पण त्यासाठी "शिक्षक" हे मुख्य पात्र जीए का निवडतात, या प्रश्नालाच, सुनीलजी आपण आपल्या लेखणीतून अधोरेखित केलेले आहे.

आदरणीय जीए यांना आमचा Salute आहेच..पण आपल्यालाही सुनीलजी Salute आहे.....!

दिलिप बडे: नाडगौडा मास्तर आपल्या मुलांना घरी काय शिकवत होते?हा कालसापेक्ष प्रश्न ठरतो.मुलीने ज्याच्याशी लग्न केले त्याच्या वडिलाने मास्तरांना फसवले.म्हणून हे नाते नको असा सरांचा तर्क त्यांच्या ठिकाणी योग्य वाटतो.खेळात करीयर करता येते"हि दिशा 50वर्षापुर्वी नव्हती.मुलांना शारिरीक शिक्षा सर्वच पालक करत होते.मुलाने खेळण्यापेक्षा अभ्यास करावा येथेही सरांची अपेक्षा वेगळी वाटत नाही.चोर का बेटा चोर"हो भी सकता है,नही भी/आज ,बापासारखी मुल नसतात हे मान्य होण्यासारख आहे.50वर्षा पुर्वी सरांचा तर्क बरोबर वाटतो.

विश्वेश्वर नांदेडकर : तर्क त्या काळचे अनुषंगाने कितीही बरोबर आसला तरी ते मुलांना जे शब्द वापरतात ते मात्र जी ए नी आगदी संस्कारक्षम वयातील मुलांना

खोल जखम करतील आसेल मास्तर. चे तोंडातून वदवले आहेत. या काळात ही मुलाला बोललेली वाक्य अंगावर शहरे आणतात. कोणताही संवेदनशील मुलगा ती वाक्ये ऐकल्यावर आत्महत्येचा विचार करेल.

मला आजपर्यंतचे चर्चे वरून एक कोडे पडले आहे , मास्तरचे मृत्यू नंतर कोणीही त्यांचे बाबत वाईट बोलत नाही उलट चांगलेच बोलतात , याचा अर्थ मस्तरची देखील एक चांगली बाजू निश्चित असणार , प्रदक्षिणा सारखेच या कथेबाबत ही म्हणता येईल का , सोळा सतरा वर्षाचे मुलांनी घेतलेल्या निर्णयाबद्दल आनेक् अडचणींना तोंड देत वाढलेल्या मास्तरला दोष देणे कितपत योग्य आहे. दुर्दैवाने मास्तर चे मृत्यू नंतर त्यांचे बद्दलच्या लोकांच्या प्रतिक्रिया या , अबोल आणि उत्कृष्ट मास्तर गेले , आणि काहीतरी दुर्मिळ हरवले आशि सगळ्यांची भावना झाली आणि प्रेतावर वस्त पांघरावे तही दुःखाची छाया सर्वत्र पसरली. हे वर्णन जी ए नी मुद्दाम केले आहे हे तर आपण समजले पाहिजे नाहीतर इतर कथा प्रमाणे त्यांनी मृत्यूवर च कथा संपवली असती. नक्कीच त्यांनी मास्तरांचे जे एक चित्र वाचकांचे मनात तयार झाले , जसे आपण सगळ्यांनी चर्चेदरम्यान सांगितले , त्याला छेद देण्यासाठीच तो परिच्छेद कथेला जोडला आहे. पण दुर्दैवाने चर्चे दरम्यान त्यावर कोणी विचार केलेला दिसून आला नाही

सागर कुलकर्णी: कथा वाचल्यानंतर जीए यांचा संत साहित्याचा किती उंचीचा अभ्यास होता हे विशेष जाणवते. तुकारामांच्या काही ओळी त्यांनी या कथेत सहजगत्या पेरल्या आहेत. किती ताकदीची ही कथा लिहिली आहे.

सागर कुलकर्णी: ही कथा शेवटी शेवटी तर विलक्षण नाट्यात्मक आणि चमत्कारिक अनुभूती देऊन जाणारी कथा आहे.

जेव्हा कथेमध्ये सांगाड्याची एन्ट्री होते तेव्हा तर अक्षरशः अंगावर भीतीने काटाच उभा राहतो.

मास्तरांचे या जगातून निघून जाणे आणि ते जात असताना दुःखाचे वस्त्र सगळ्या गावावर पसरून राहिल्यासारखे वाटणे हे सुद्धा अतिशय माणसाचे मन चरकून ठेवणारे असे प्रसंग कथेत आहेत.

1956 साली प्रकाशित झालेली प्रत्येकान एकदा का होईना वाचायला हवीच.

सागर कुलकर्णी: एक चांगला शिक्षक मुलांना सोप्याकडून हळूहळू अवघड गोष्टी शिकवत असतो. कथेतले मास्तरही तसेच आहेत.

आणि त्याच पद्धतीने जीए कुलकर्णी हे थोर लोकशिक्षक, समाजशिक्षक होते असे आपण म्हणू शकतो.

सोप्या, सुखाच्या गोष्टी सांगत सांगत दुःखाचे विराट आणि अंगावर येणारे भयकारी रूप जीए एकत्रित प्रकट करतात.

जीए कुलकर्णी यांना शतशत प्रणाम. 🙏 🙏 🙏

सागर कुलकर्णी: कथेच्या तंत्राबद्दल आणि रचनेबद्दल, घट्ट बांधणीच्या घाटाबद्दल जर विचार केला तर ही कथा अतिशय प्रयोगशील अशी कथा आहे.

कथा पुढे पुढे जात असताना गत आयुष्यातील अनेक गोष्टी मास्तर या कथेत प्रकट करतात.

या अर्थाने ही अत्यंत दमदार आणि प्रायोगिक कथा म्हटलं तरी हरकत नाही.

जाणकारांनी याच्यावर अजून भाष्य करावे ही विनंती. 🙏 🙏 🙏

अलका तडकलकर : सांगाडा वर माझे विचार

अलका तडकलकर : कथा- सांगाडा पुस्तक-निळासावळा लेखक-जी ए कुलकर्णी

कथाविवेचन

या कथेतील नायक म्हणजे नाडगौडा मास्तर. यांच्याभोवती कथा वेष्टित होते.या कथेतून त्यांच्या जीवनातले नैराश्य प्रकटते त्याचबरोबर मानवी स्वभावाचे विविध अंगाने प्रदर्शन होते.त्यामुळे कथा वाचून झाल्यावर प्रत्येकाचे जीवन unique असते.हा संदेशही मिळतो. No repeatation in lifestyle. It differs from person to person हेही प्रकर्षाने जाणवते.

नाडगौडा मास्तरांचे गृहस्थाश्रमापूर्वीचे जीवन हे संस्कार स्वीकारण्यात धन्यता मानणारे असते तर गृहस्थाश्रमातील जीवन हे स्वीकारलेले संस्कार देण्याचा अट्टाहास करणारे असते. त्यामुळेच त्यातून मिळणाऱ्या आनंद व दुःखाची होणारी सरमिसळ ही या कथेची रूची वाढवणारी आहे.कथेत सांगाडा हे प्रतिक घेऊन कथेची सुंदर गुंफण केली गेली आहे

सांगाडा मनुष्याचा असो किंवा कुठल्याही पृष्ठवंशीय प्राण्याचा, तो एक शरीराचा भरभक्कम असा आधार असतो.जसे घराला भिंती व छताचा आधार(भौतिक अर्थाने).पण खरा आधार असतो नात्यांचा(ते असल्याशिवाय घर उभे राहत नाही)तो चांगला असेल तर जीवनही आनंदात जाणार पण नसेल तर घर कोसळते. तेव्हा त्या घराच्या भिंती नव्हे तर सर्व नातेसंबंध आणि स्नेह पार धुळीला मिळालेले असतात (कारणे अनेक).अशावेळी ते घर उध्वस्त होते आणि मग घराच्या नुसत्या खुणाच शिल्लक राहतात.नाडगौडा मास्तरांना सर्वच नातेसंबंधातून नैराश्य येते/अपयश येते त्यामुळे त्यांचे मनही उध्वस्त होते.फक्त शरीराचे जगण्याला आधार आहे एखाद्या सांगाडा म्हणून पण त्यात चैतन्य प्रवाहित होत नाही.अचेतनावस्थेतील शरीर हे जणू चालताबोलता सांगाडा झालाय असे जीएंना सुचवायचे असावे.घर उध्वस्त झाल्यावर जीवनही उध्वस्त. असे उध्वस्त जीवन मृत्यूकडे जाणारे ठरते.हा दुःखाचा शेवटचा षट्कार.

धन्यवाद.

अलका तडकलकर

दिलिप बडे: सांगाडा”तो शरिराचा पर्यायाने अस्तित्वाचा आधार असतो.अखंड चर्चेत सांगाड्याकडे एवढ्या सकारात्मक रितीने कोणी पाहिले नाही.आपण सांगाड्याच्या मुलभूत महत्वाकडे लक्ष वेधले.धन्यवाद मॅडम

माधव पुराणिक : कथा सांगाडा (निळासावळा,१९५६,१२|| पानी कथा)

विवेचन भाग ३ - डॉ माधव पुराणिक

“सांगाडा” प्रतिमा - बीजापासून 1956 वृक्षापर्यंत 1971 प्रवास

:अमरत्व (सांगाडा) मृत आहे -क्षणभंगुर जीवन इंद्रधनुष्य आहे”

जी ए कुलकर्णी यांच्या कथांमध्ये “सांगाडा” ही प्रतिमा परत परत येते.याचा अर्थ ती प्रतिमा त्यांच्या जीवनदृष्टीचा जीवननिष्ठेचा किंवा जीवनाच्या आकलनाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

सांगाडा ही प्रतिमा प्रथम “सांगाडा :कथेत (1956) यामध्ये तीन ठिकाणी आली.नंतर ती “सांगाती” ,(1970)च्या कथेमध्ये आली. शेवटी “अस्तिस्तोत्र” या कथेमध्ये 1971 मध्ये आली.

या प्रतिमेद्वारे जी ए कुलकर्णी यांनी असे भावविचार व्यक्त केले आहेत की अफाट जड विश्व (समुद्र , सांगाडा इ) हे जरी अमर असले तरी मृत आहे कारण ते चैतन्यहीन व सुखदुःखाच्या अनुभवाच्या पलिकडचे आहे.

याउलट मानवी जीवन हे क्षणभंगुर असले तरी, त्यात माणुसकी, ध्येयवाद, अंतिम सत्याचा शोध , नात्यातील भावसाफल्य या मूल्यांमुळे ते उत्कटतेच्या इंद्रधनुषी रंगाने चमकू शकते.

पण या जीवनात सतत बदल होत असतो व काळ (मृत्यू) हा सर्वभक्षक त्याला सतत व्यापून राहतो.

आता या ३ कथांतील “ सांगाडा “ ही प्रतिमा पाहू-

कथा “ सांगाडा (१९५६)

१ “ ऐंशी-नव्वद फुटांचे प्राणी खवल्याखवल्यांच्या अजस्त्र शैपट्या व शेपाचशे दात. त्यांची आठवण होतात जणू सारे प्राणी त्यांनी परसात पाळल्याप्रमाणे थोडे हसले.८० फुटांचा सांगाडा आपल्या सायन्स हॉलमध्ये बसणार देखील नाही. आपल्याला टेबलखुर्ची मग त्या सापळ्यातच टाकावी लागेल. सापळ्यात आपण ,आपणातही एक सापळा ,मग त्यात आणखी कोणी... त्यांना हा विचार फार गमतीचा वाटला.”

सांगाडा या शब्दाचा एक अर्थ सापळा पण आहे म्हणजे या अजस्त्र प्राण्यांच्या अनादी अनंत जीवनसातत्याच्या सापळ्यात आपणही क्षणभर अडकलो आहोत असे नाडगौडा मास्तरांना वाटले.

२ “एखाद्या जुन्या दप्तराप्रमाणे इतक्या वर्षांच्या आयुष्याचे गाठोडे सायन्स हॉल मधल्या सांगाड्याच्या पायाशी ठेवून ते आता बाहेर पडणार होते.”

निवृत्तीच्या दिवशी जणू नाडगौडा मास्तर सामाजिक आणि सांस्कृतिक नात्यांच्या मृतसांगाड्यातून ,बाहेर पडणार होते.

आपले उरलेले क्षणभंगुर आयुष्य नव्या आशेने जगायला सुरुवात करणार होते.

३ “ ती कमलची आठवण ! आजच का ती इतक्या तीव्रतेने जागी व्हावी ? तिला प्रथम बोट धरून शाळेच्या मराठी विभागाकडे त्यांनी आणले. त्याप्रमाणे आज तिची आठवण त्यांच्याबरोबर आत आली. समोर टेबलावर बसली. छोट्या कमल प्रमाणेच मधून मधून बिचकत त्या सांगाड्याकडे पाहू लागली. ते, मास्तरांना ती आठवण नको होती पण आज तिचा हट्टच होता. काही केल्या कमल, कमलचे लग्न

, तिची दोन मुले यांची चित्रे समोरून जाईनात. मास्तर त्यांच्या ओझ्याने ने व्याकुळ झाले.”

मृत्यू म्हणजे तीव्रतम दुःख.त्या अगोदर मास्तरांच्या मनात त्यांना तीव्र दुःख देणारी आठवण जागी झाली व त्या आठवणीने त्यांचे मन व्यापून टाकले व भग्न केले. मास्तरांचे व्यथित मन घाबरून सांगाड्याकडे म्हणजे पुढे येणाऱ्या मृत्यूच्या जाणिवेकडे पाहू लागले.

४ “ निर्दय !...निर्दय !... आवारातील वाळूवर वाहनांचा आवाज करीत मास्तर सायन्स हॉलमध्ये आले.त्यांनी छत्री डाव्या बाजूकडून उजव्या काखोटीस मारली व दरवाजा उघडला. मातीचे अनेक पक्षी असलेल्या कपाटाजवळ डोक्यात वाकडा खेळा ठोकून लाकडी दांड्याला अडकलेल्या मनुष्याचा सांगाडा होता.त्याच्या बाजूच्या खुंटाळयावर त्यांनी छत्री ठेवली व टोपी काढून हातरुमालाने उजाड डोक्यावरील घाम टिपला. आता ऑफिसमध्ये जाऊन सही केली की बाह्य जगाचा संबंध संपला.”

सांगाड्या शेजारच्या खुंटाळयावर टोपी ठेवली की बुद्धीने, डोक्याने , भावनांनी मास्तरांचा बाह्य जगाशी असलेला नातेसंबंधाचा सांगाडाच निर्माण झाला आणि नाडगौडा मास्तर आपल्या स्वप्नमय ,भ्रामक अंतर्मनातील विश्वात रममाण झाले.

नाडगौडा मास्तर सायन्स शिकवत असत व सांगाड्या संबंधित सर्व शास्त्रीय माहिती ,इतकी वर्ष 35 वर्ष विद्यार्थ्यांना देत असत.या अर्थाने ते सांगाड्याशी , त्याच्या रचनेशी व्यावसायिकरीत्या दैनंदिन जीवनात एकरूप झाले होते.

नाडगौडा मास्तरांचे जीवनमूल्य आपल्या माणसांवर मनापासून माया करण्याचे होते जरी ते ती व्यक्त करू शकले नाहीत आणि विद्यार्थ्यांना ज्ञानदान देऊन त्यांचे आयुष्य समृद्ध करण्याची ही त्यांना तळमळ होती या अर्थाने त्यांच्या क्षणभंगुर जीवनात किंचित सुखाचा शिडकावा झाला आहे असे म्हणता येईल.

५ शेवटी तीव्रतम दुःख म्हणजेच सांगाड्याच्या रूपाने मृत्यू मास्तरांना भेटतो. नंतर मास्तर आपल्या मूळ आकारात म्हणजेच निराकारात विलीन…

दिलिप बडे: सांगाडा अनंतात विलिन होतो.पंच महाभुतांमध्ये त्याच रूपांतरण होते.महाभुतं अक्टिव असतात.मग सांगाडा अचेतन कसा म्हणावा?सर्वच जड चेतन जग particles व wave नी बद्ध आहे.जड चेतन हा भेद रहात नाही.सर्व काही अद्वैत, चेतन आहे.(तरीही हे मिथ्या कसे म्हणावे ?)पुराणीक सर तिन्ही कथा एकत्र ठेवुन केलल आपल विश्लेषण आवडल.काळाच अस्तित्व नसाव अस वाटत.

माधव पुराणिक : कथा सांगाडा (निळासावळा, १९५६,१२|| पानी)

विवेचन - भाग ४ - डॉ माधव पुराणिक

सांगाडा अमर पण अभंगांत क्षणभंगुर विश्रब्ध शांती

कथा सांगाडा मध्ये जी ए कुलकर्णी यांनी प्रथमच अध्यात्मिक अनुभवांचा व्यक्तीच्या सुखदुःखावर होणारा परिणाम तुकारामाच्या खालील अभंगातून व्यक्त केला आहे -

“ (संत तुकारामाच्या) फोटोवरील काच फुटली त्यामुळे तसे झाले असावे. त्याला आज नवीन काच घातलीच पाहिजे असे त्यांनी ठरवले... आंघोळ करून सकाळी ते फोटोपाशी बसले की वातीला ज्योत लागावी त्याप्रमाणे त्यांचे मन शांत, प्रसन्न होत असे.अभंगाच्या गोळी बोलू लागल्या की तप्त शरीरावर पाण्याच्या धारा पडल्याप्रमाणे वाटे.

“ खावें ल्यावें द्यावें | जमाखर्च तुझ्या नांवें | १

आता चुकली खटपट |झाडापाड्याचा बोभाट | २

आहे नाही त्याचें | आम्हां काम सांगायाचें | ३

तुका म्हणे चिंता | भार वाहे तुझ्या माथां | ४

(ओवी १२८६, सार्थ श्रीतुकारामाची गाथा)

... त्या फोटोसमोर त्यांच्या आयुष्यातील सुरकुत्या नाहीशा होत. विश्रब्ध शांतीने डोळे ओलावत. शबरीने गोड फळे निवडली तसा तुकोबाने रसाळ शब्दांचा संसार मांडला. त्यातील चोखपणा निराळाच. त्यांचाच आनंद बावनकशी. नाहीतर सर्वत्र फुकाचा व्यवहार आणि त्या गदारोळात कोणीतरी माप घेऊन बसलाच आहे. आयुष्य मोजावया बैसला मापारी -दात विचकत ,समोरच्या सांगाड्याप्रमाणे.

ओवीचा अर्थ -" हे देवा, आम्ही खाणें, घेणें, देणें हे सर्व व्यवहार करितों, पण ह्याचा जमाखर्च तुझ्या नावानें करितों १

आतां आम्हांला कोणतीही खटपट करणें नको व रोजचा आढावा झडतीची(रोजचा हिशेब पुरा करण्याची कामगिरी आम्हांकडे नाही.२

आता अमूक आहे, अमूक नाही हें सांगण्याचेंच काय तें आमचें काम आहे.३

तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा , मी आपला सर्व भार तुमचे मस्तकीं घातल्यामुळें आम्हांस कांहीं चिंता करणे नको.४

झाडापाडा म्हणजे आपल्या दैनंदिन कृत्यांची ,भावनांची रोज दिवस संपल्यावर स्वतःने स्वतःशी केलेली (झडती),तपासणी, किंवा कबुली.

मनुष्य म्हणजे एक पानाफुलांनी डवरलेले झाड आहे. रोजच्या त्याच्या भावना ,विकार ,विचारांमुळे त्याच्या मनातील ही पाने त्यांचा अनुभव घेतल्यावर खाली स्मृतीमध्ये किंवा आठवणींमध्ये मनाच्या तळाशी जमा होतात, जरी वाऱ्यावर उडून गेली तरी.

रोज अशा भावनांचा- पानांचा आढावा घेऊन त्यांच्याकडे " इदम् न मम "अशा वृत्तीने पाहून, त्यातील नित्कृष्ट, नकारात्मक ,वासनामय पाने आपल्या

स्मृतीतून स्वच्छ करणे काढून टाकणे म्हणजे झाडापाडा. ही सर्व करणे निष्कामपणाने भगवंताला अर्पण केल्याने काढून टाकता येतात.

बोभाटा म्हणजे मोठ्याने हाक मारणे किंवा ओरडणे. भक्त किंवा साधक किंवा सामान्य संसारी माणूस माऊलींच्या फोटो समोर बसून या सर्व आपल्या दैनंदिन कृत्यांचे एकतर मोठ्याने बोलून किंवा मनातल्या मनात आत्मनिवेदन करीत प्रार्थनेच्या किंवा शरणभावाच्या स्वरूपात माऊलीला करत असतो.हे करताना त्याचे मन हे सर्व स्वतःच ऐकते व शुद्ध होत जाते.

" त्या फोटो समोर त्यांच्या आयुष्यातील सुरकुत्या नाहीशा होत."(सुखदुःखाच्या उसळणाऱ्या लहरी, विकारांच्या उसळणाऱ्या लाटा यांच्या मनावरच्या सुरकुत्या. त्या नाहीशा झाल्याने मन स्तब्ध स्थिर व शांत पाण्याप्रमाणे विश्रब्ध होत असे.

शरण भावामुळे त्याचा अहंकार ,अस्मिता किंवा इतर मनातील विकार नाहीसे होतात व तो मनाच्यापलीकडे त्यावेळेपुरता अभंग ऐकताना जातो.

अभंग ऐकणारा किंवा भजन स्वतः म्हणणारा, गुणगुणणारा ,ठेका धरणारा माणूस आपल्या मनात एका अज्ञात ,अलौकिक ,अपार्थिव, सर्वशक्तीमान संकल्पनेचा ,स्वरूपाचा भाव जागवतो. या भव्य, दिव्य, अनाकलनीय, नवरसातील शांत रसाचा आविष्कार करणाऱ्या शक्तीसमोर संसारी माणसाची रोजच्या व्यवहारातील मर्यादित,अपुरी, शक्ती नाहीशी होते व तो या अथांग अपार शक्तीचा एक भाग होतो व त्याला विश्रब्ध शांतीचा अनुभव येतो. त्याचे सामाजिक,कौटुंबिक ,व्यावसायिक ,मानसिक इ नातेसंबंधांमुळे, त्यातील जीवघेण्या दंशामुळे(जरी काही वेळा ते मुग्धमधुर ,गूढरम्य, प्रेमलीन रोमांचकारी ,नवनवोन्मेषशाली, निर्मितीक्षम, इत्यादी असले तरी) तप्त झालेले मन या अमृतवर्षावामुळे शांत होते , प्रसन्न होते.

यानंतर नाडगौडा मास्तर माऊलींना फक्त आपल्याला एवढे सुख मिळाले ,एवढा आनंद मिळाला ,एवढे दुःख नाहीसे झाले, एवढ्या व्यथा मिटल्या, एवढ्या काळीजकळा ओसरल्या इत्यादी सांगणे एवढेच त्यांचे काम राहते.त्यांच्यावरील सर्व

भविष्याच्या चिंतेचा ,नसतेपणाच्या चिंतेचा ,मृत्यूच्या भीतीचा, निराशेच्या काजळीचा भार ही अनाकलनीय भावरुप असणारी शक्ती स्वतःवर घेते.व नाडगौडा मास्तर त्यातून मुक्त होतात, जोपर्यंत ते त्या माऊलींच्यासमोर त्यांच्या अभंगात पूर्णपणे स्वतःला विसरून बुडालेले असतात तोपर्यंत.

या दुःख मुक्तीच्या दैनंदिन अनुभवाला पण काळाचे कुंपण असते , नियतीच्या कठोर शक्तीची मगरमिठी पण असते. एके दिवशी ते तुटते आणि त्या दिवशी इतर सर्व सांसारिक चिंता, दुःखमय आठवणी मास्तरांच्या मनात एखाद्या प्रपाताप्रमाणे प्रवेश करतात ,एखाद्या धबधब्याप्रमाणे कोसळू लागतात, अनावर वेगाने त्यांच्या दुर्बल मनाचा ताबा घेतात.

जी ए कुलकर्णी यांनी येथे क्षणभंगुर, क्षणजीवी इंद्रधनुषी मानवी जीवनातले दिव्य क्षण व्यक्त केले आहेत पण त्याचबरोबर शेवटी त्याला शेवट असतो ,त्याला मर्यादा असतात व व्यक्ती शेवटी त्या मृत अमर सांगाड्याच्या दिशेने आपला अटळ प्रवास नकळत करते व त्या सांगाड्यात विलीन होते.

("पण आज मात्र सकाळी त्या शांतीची साय धरली नव्हती. फोटोवरील काच फुटल्यामुळे तसे झाले असावे.")

तुकाराम महाराज म्हणतात -

आता बरें जालें | माझे माथांचें निघालें |१
चुकली ही मरमर | भार माथांचे डोंगर | २
नसता कांहीं जोडी | केली बहुतें तडातोडी | ३
झाला झाडापाडा | तुका म्हणे गेली पिडा | ४
(ओवी १२८७,सार्थ श्रीतुकारामाची गाथा, विष्णुबुवा जोग महाराज प्रत)

ओवीचा अर्थ -

माझ्या मस्तकावरील सर्व गोष्टींची जबाबदारी निघाली संसाराचा भार खाली उतरला हे फार बरे झाले. २

अनेक प्रकारचे डोंगराएवढे (कर्तव्याचे) भार मजवरचे निघाल्यामुळे (संसाराची) करकर चुकली. २

काही प्राप्ती नसून या कामक्रोधादि विकारांनी माझी फार ताडातोडी केली होती (ती चुकली). ३

तुकाराम महाराज म्हणतात ,माझी सर्व पिडा निवारण झाली म्हणून रोजचा खटाटोप संपला (आता संचित कर्मांचा हिशेब संपला आहे.त्यामुळे जन्ममरणरूप संसाराची ही पीडा संपली आहे. ४. (१२८७)

सांगाडा हे सर्वभक्षक काळाचे, मृत्यूचे ,विनाशाचे ऱ्हासाचे ही प्रतीक आहे हे जी ए कुलकर्णी यांनी संत तुकारामाच्या पुढच्या अभंगातून स्पष्ट केले आहे -

आयुष्य मोजावया बैसला मापारी |१
तूं कां रे वेव्हारीं संसाराच्या | २
नेईल ओढोनी ठाऊकें नसतां | ३
न राहे दुश्चिता हरिविण | ४
कठिण हे दुःख यम जाचतील | ५
कोण सोडविल तये ठायीं | ६
राहतील दुरी सज्जन सोयरीं | ७
आठवीं श्रीहरी लवलाहीं | ८
(ओवी २१०८, सार्थ श्रीतुकारामाची गाथा, विष्णुबुवा जोग महाराज प्रत)

ओवीचा अर्थ -

अरे, तुझे आयुष्य मोजण्याकरता काळ हा मापाड्या बसला आहे असे असून तू संसारव्यवहारांमध्ये का राहिला आहेस ? १,२

तुला न कळतांच तो(स्त्रीपुत्रादिकांच्या परिवारांतून तुला) ओढून येईल, ह्याकरितां तू हरिचिंतनावाचून दुश्चित्त राहू नकोस. ३,४

तुझ्याकडून झालेल्या पापकर्मांबद्दल यम मोठी शिक्षा करील. ते दुःख मोठे कठीण आहे. त्यावेळी त्यापासून तुला कोण सोडवील ? ५,६

तुझे सोयीरसंबंधी व इष्टमित्र, सज्जनादि त्यावेळेस सर्व दूर होतील. याकरिता तू मोठ्या त्वरेने श्रीहरीचे चिंतन कर.७,८

यावरून स्पष्ट होते की सांगाडा उर्फ मृत्यू दात विचकत व्यक्तीच्या मनात अनामिक तीव्र भिती निर्माण करत बसलेला आहे

संसारातील सुखदुःखाच्या गदारोळात ,कोलाहलात, गुंतागुंतीत, असंगतीत, विसंगत घटनांमध्ये , कर्णकर्कश ध्वनींमध्ये ,कानठळ्या बसवणाऱ्या आवाजामध्ये, कार्यकारणभावरहित प्रसंगांमध्ये, पर्यायहीन जीवनामध्ये , अर्थहीन संवादामध्ये हा सांगाडा उर्फ सर्वभक्षक काळ बसला आहे.

संसारी माणसाने त्याकडे लक्ष द्यावे अशी तुकाराम महाराजांनी वरील अभंगात सांगितले आहे. जी ए कुलकर्णी यांनी ही अध्यात्मिक अनुभवांची शक्ती ही नियतीच्या शक्तीवर काही वेळापुरती तरी मात करू शकते.त्यापासून व्यक्तीची सुटका करू शकते ,तिला सामर्थ्यवान करू शकते असे स्पष्टपणे दाखवून दिलेले आहे.

अध्यात्मिक शक्ती व नियतीची शक्ती यातील द्वंद्व या कथेमध्ये जी ए कुलकर्णी यांच्या असामान्य प्रतिभेने साक्षात केले आहे, नाट्यमय ,कलात्मक व चित्तथरारक पणे व्यक्त केलेले आहे.

माधव पुराणिक भ्रमणध्वनी ९६२३४४२२२१

श्रीकांत देशमुख : व्वा! खुपच सखोल व अभ्यासपूर्ण 👌 आपले चिंतन मनन श्रेष्ठ प्रतीचे आहे. 🙏

सुनीळ सामंत: सर, कमाल लिहिले आहे हे. तुम्ही या कथेला ज्या प्रकारे समजून घेतले आणि आम्हाला उलगडून दाखवले. या उंचीचा अनुभव येणं हीसुद्धा एक मोठी अध्यात्मिक अवस्था आहे. दंडवत तुम्हाला.

माधव पुराणिक : कथा सांगाडा (निळासावळा,१९५६, १२|| पानी कथा)

विवेचन (भाग ५) - डॉ माधव पुराणिक

नादसंवेदनांची वाजणारी करूण सुरावट

जी ए कुलकर्णी यांच्या कथातील प्रतिमा कथेतील गूढ, तरल अमूर्त आशयाला वाचकाच्या मानसिक स्तरावर व शारीरिक स्तरावर ठसठशीतपणे उमटवण्यासाठी आलेल्या असतात.

त्यामुळे आशय सौंदर्यपूर्ण आकार घेऊन मनातल्या विविध पातळयांवर झिरपत जातो. या प्रतिमा कथेतील प्रसंगांशी, पात्रांशी व परिसराशी पूर्णपणे एकजीव झालेल्या असतात.

विश्वात नाद सगळीकडे भरून राहिलेला आहे. सांगाडा या कथेत या अनाहत नादाचाही काही ठिकाणी अनुभव येतो.या नादाची विविध रूपे मानवी आवाज, वस्तूंचा कोलाहल, परिसरातला गदारोळ, दोन व्यक्ती समोरासमोर आल्या तर त्यांच्या मनात एकमेकांविषयी उमटणाऱ्या मानसिक प्रतिमांचे आवाज, एकाच व्यक्तीमध्ये दुसऱ्या व्यक्तीबद्दल गतकाळातल्या आठवणींचे उमटणारे ध्वनी या कथेत आढळत…

मंजिरी देशमुख: कथा सुक्ष्मपणे वाचताना तिच्यातील ध्वनी, (स्वर,सुर,लय,) रंग, प्रतिमा यांचा उपयोग समजून घेण्यासाठी कसा करावा याचं प्रात्यक्षिक आपण दिलंत. या लेखामुळे वाचक जी ए कथा सरधोपटपणे न वाचता निराळ्या दृष्टीकोनातून अधिक सजगपणे वाचू लागेल. खूप धन्यवाद तुमचे 🙏 🙏

संजीव सावरगांवकर: माधवराव, अहो कथा एकच. ती किती प्रकाराने आस्वाद घेऊन वाचता येते, त्याचा आनंद घेता येतो, ती कथा, त्यातील पात्रे, स्थाने, व्यक्ति चित्रे, त्यांची मानसिकता, त्याच्याकडे असलेली बोली भाषा, राग, लोभ, उद्वेग, चीड, संताप, उद्विग्नता, शब्दांचा, वाक्यांचा चपलख वापर, एकमेकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, आयुष्यातील त्यांचे महत्व, अथवा त्यांना neglect करणे, इतके सारे विभ्रम तुम्ही अधोरेखित करून दाखविले आणि किती प्रकारांनी कथा वाचता येते हा आमच्यासारख्या नव्या वाचकांना वस्तुपाठ दिला असे म्हणावयास हरकत नाही. आता परत कथावाचन समजून उमजून करून मास्तर समजून घेणे अपरिहार्य आहे. एक कथा, इतके विचार तरंग व आयाम तुम्हाला कसे सुचतात आणि तुम्ही ते लेखन प्रवाहात कसे आणता, या करीता तुमचीच एक आगळीवेगळी जी. ए. वाचक, आस्वादक म्हणुन मुलाखत घ्यावी असे मनात आहे. केंव्हा योग येईल तो आपल्या सर्वांसाठी "जी. ए. सुदिन" असेल. आमची ही वैचारीक भूक तुम्ही कायम भागवत राहा अशी माझी तुम्हाला आग्रहाची, प्रेमाची विनंती आहे. धन्यवाद. 🙏

साधू.--- कथासंग्रह : सांज शकुन

संजीव सावरगांवकर: कथा: साधू.

कथासंग्रह : सांज शकुन. प्रथम प्रसिद्धी: मराठवाडा दिवाळी अंक 1965.

**

आमच्या गवऱ्या आम्हीच थापल्या|
आम्हीच राखाव्या मरणापर्यंत ||
दोन पायासाठी पृथ्वीही वाटोळी |
करू टाळाटाळी मरणापर्यंत || कवी: आरती प्रभु

जीए यांची कोणतीही कथा नियतीवादाचा विचार करता, त्यांच्या कथेतील पात्रांचे उन्नयन ती पात्रे पाहू शकत नाही. जे जे आपल्या आयुष्यात येईल, जीवनात येईल, ते ते आचरण्याची त्यांची तयारी, त्यांची पात्रे, कथा नायक बव्हंशी स्वीकारताना दिसतात. अगदी जाणीवपूर्वक, डोळे उघडे ठेवून घटना स्वीकारतात. ही पात्रे काहीही झाले तरी, दैव आडवे आले तरी, अगदी वादळ वाऱ्याने त्यांना घाबरवले तरीही, ती पात्र शांतच राहतात. वेदना स्वीकारतात. घटना अगदी अपरोक्ष पाहतात. अगदी मृत्यू ही अलिप्तपणे स्वीकारतात. मग साधू सारखी कथा वाचून झाल्यावर वाचकाला प्रश्न पडतो की या साऱ्या कथेतून त्या पात्राच्या पदरी दुःख का पडते ? त्याला मृत्यू का कवटाळतो? त्या त्या पात्रांची नियती अशी का लिहिली जाते? नियती कडून का स्वतः लेखकाकडून? का त्याच्या लेखनाद्वारे ? सर्व प्रश्नच प्रश्न पडतात.

बरेच वेळा कथेतून आपण सत्याच्या शोधाकडे वळतो.

ज्यावेळेस, ज्या क्षणी हा सत्याचा शोध सुरू होतो,तेंव्हा

त्या घटनेतील तथ्याचा शोध किती खोलवर खोदून न्यायचा हे मात्र वाचक ठरवितो. मग खोदण्यात कुठे थांबायचे ह्याची त्याला जाणीव होते. मग लक्षात येतं की त्या तथ्याचे पापुद्रे जसजसे उलगडावेत तसतसे सत्य अधिक खोल जात राहते आहे. ते का जाते ? त्याचा तळ का सापडत नाही? का तिथपर्यंत आपली शोधक दृष्टी पोहोचते का ? वाचकाची दृष्टी बऱ्हंशी नाही पोहोचत. आणि समजा पोहोचली तर आपल्या दृष्टीचे ते पूर्वग्रह त्या सत्याचे निखळ स्वरूप दाखवतीलच का धुसर स्वरूप दाखवतील , हा प्रश्न पडतो? मग अंतिम निखळ सत्य असे काही तरी असते काय? या मुद्द्यावर वाचक येऊन थांबतो.

प्रत्येक कथा ज्याला त्याला त्या वाचकाच्या नजरेतूनच समजून जाते. त्याचे स्वर जुळले तर ती कथा भावते, नाहीतर मनातून निसटते, जेव्हा भावते तेव्हा आस्वाद घेण्याचे वेगवेगळे आयाम सापडत जातात व कथा पुन्हा वाचनप्रत्ययाचा आनंद देत वाचक वाचनाची पुनरुक्ती करतो. मग कथा आणखीन आकळते. त्याचे कारण शोधू लागलो तर माणसाच्या आकलण्याच्या, जाणिवेच्या, समजून घेण्याच्या, अनंतमिती ,कवडसे, विचार कोंब असतात. त्यातीलच केव्हा कोणता उफाळून बाहेर येऊन समजशक्ति वाढवून जातो हे लक्षात येत नाही. तसा प्रत्येक वाचक, साक्षेपी वाचक, एकाच वेळी कथेतील व व्यक्तिगत आयुष्यात अनेक पातळीवर जगत असतो, राहत असतो, विचार करत असतो. त्या विचारधारेत तो असतो. मग अखेर प्रश्न मनात होतो तो एकच की या अनेक पदरी जगण्यातील या कथेचा , कोणत्या क्षणाचा, स्थळाचा वा कथेतील इतर व्यक्तिमत्त्वांचा कोणता असा पदर सुटतो की ज्यामुळे जीवनाचा हात सुटतो मग त्या पात्राला मृत्यूदार हे सुखाचे "एक्झिट" असे का वाटू लागते ?

आता साधू या कथेकडे वळताना

कथेची सुरुवात हीच मुळी नेहमीपेक्षा वेगळी आहे. कथानायक कोणाचा मृत्यू क्षण केव्हा आहे हे अलिप्तपणे सुतोवाच करत राहतो. स्वतः साधूचा प्रवेश गावाच्या

वेशीवरच झाला होता. त्या साधूला कशाचे वरदान होते? का त्याची ती नियती होती? का त्या द्रष्टा म्हणायचे ? का भविष्यwetta म्हणायचे? का मृत्यूदूत म्हणायचे? पण स्वतःचा मृत्यू स्वतःच्याच मुलाच्या हस्ते होण्याचे विधी लिखित त्याचे कपाळी

लिहिलेले आहे हे जगावेगळे द्रष्टा पण फक्त त्याच्याच नशीबात आहे, आणि तेही केवळ एका शापामुळे.

साधूच्या नजरेला एखाद्याचा विशेषतः एखाद्याचा मृत्यू कथन करण्याचे अटळ भाष्य नियतीने लिहिलेले आहे. त्यातील पहिली घटना म्हणजे ती मुलगी विहिरीत पडते व मरते. दुसरी घटना त्या लहान मुलाचा मृत्यू जळून होणारा आहे. या दोन घटनांना तो स्वतः साक्षी राहत नाही. कारण त्यांचे नजीकचे भविष्य त्याला आधी दिसतेय, त्याने ते पाहिले आहे. मात्र स्वतःच्या मृत्यू क्षणाला साक्षी राहण्याची शिक्षा त्याला त्याच्या नियतीने देऊन ठेवलेली आहे. ती अटळ आहे.ते त्याचे प्राक्तन आहे. ठरलेल्या ठिकाणी, ठरलेल्या व्यक्तीकडून , ठरलेल्या वेळी घडणारी स्वताच्या मृत्यूची घटना त्यानी फार वर्षांपूर्वी जाणलेली होती. गेली अनेक वर्ष साधूला हे माहित होते. त्याच्या घराबाहेर पडण्याआधी, त्याच्या मुलाच्या जन्म होण्याआधी, नव्हे त्याही आधी. हे सर्व त्याने एखादे नाटक अलिप्तपणे पहावे त्याप्रमाणे तो ते सारे पहात आला होता. पुढे घडणारी घटना, असंख्य निर्माण होणाऱ्या माणसांच्या भविष्यातील अमर्याद रेषां रेषा अनिवार्यपणे तयार होत होत, घटनेच्या त्या क्षणापर्यंत पोहोचणार होत्या. साधू हे निर्विकार पणाने पाहत होता म्हणजे त्याला ते दिसतच होतं.

या कथेतील भरत, साधूचा मुलगा, जन्मताच मातृयोग टाळून घेऊन आयुष्य जगत आला होता. आठव्या वर्षापर्यंत घरात राहून नंतर घरातून पळून गेला होता. त्याच वेळेस साधू म्हणजे संसारी नवरा, बाप व मुलाला शोधणारा संसारी गृहस्थ होता. त्या गृहस्थाचा पुढे तो साधू झाला. तो साधू कसा झाला ? कुठल्या कारणामुळे वा परिस्थितीमुळे झाला, याची माहिती कथेमध्ये नाही. मात्र भरत घरातून पळून गेल्यापासून भरताचा शोध साधू? घेत होता. अंतिम घटनेच्या क्षणाचा मागोवा , तो

भरताचा शोध घेताना, त्याला त्यावेळेस आकलन झाला नव्हता. पण घडण्याचा क्षण यावा लागतो त्याला ओढून आणता येत नाही ते ते त्या क्षणी घडावे हे नियतीचे विधी लिखित आता मात्र त्याला ते स्वच्छ दिसले होते व तो स्वतःच्या पायाने गावातील देवळात येऊन बसला होता.

भरताच्या नजरेत साधू व लोकांचे मृत्यू क्षण सांगणारा, अघटीत वक्तव्य करणारा, लोकांच्या दुःखाला कारणीभूत असणारा, असा माणूस म्हणून त्याला साधूला मारायचे आहे. जेव्हा त्याला मारण्याची वेळ येतेच. त्या वेळेसही भरत स्वतःबद्दलच जास्त बोलतो. त्याला साधूचा भूतकाळ माहिती नाही. ते आपले वडील आहेत हेही त्याला कळलेले नाही, कळणार ही नाही. त्यांचा मृत्यू कोणत्या क्षणी, कोणत्या हत्याराने तो करणाऱ्या बाबतही त्याला माहीती नाहीये. शेवटी तो साधूला त्याला तो का मारणार आहे त्याचे कारण सांगतो "तुझ्यासारखा माणूस जिवंत राहणे धोक्याचे आहे. मी तुला मारण्यासाठी आलो आहे. तुझ्या जिभेने मृत्यू घडतोय. तुझ्या शब्दांनी अशुभ घडते." भरताच्या या सर्व वक्तव्याने साधू घाबरेल, भिऊन जाईल, ही सर्वसाधारण माणसा ची कल्पना भरतान मनात धरलेली असते. मात्र साधूला या सर्व गोष्टींची पूर्वकल्पना असल्याने भरताला कळो ना कळो पण साधूला त्याचे अटळ बोलणे, सांगणे क्रमप्राप्त होते. कारण ती साधूचे नियतीच आहे. ती कथेची गरजही आहे. साधूचे बोलणे हेच कथेचे भरतवाक्य होते.

(अरे भरता) बोललेल्या शब्दाप्रमाणे घडावे हे सामर्थ्य फक्त नियतीचे आहे. मानवाचे नाही. मी बोलतो म्हणून ते घडत नाही, तर ते घडणारे आहे, ते मला दिसते व ते मी बोलतो. कारण तो माझा "शाप" आहे, दृष्टेपणा नाही व माझे बोलणे देखील अनिवार्यच आहे.

या माझ्या शापामुळे मी इतरांपेक्षा जास्त दुर्दैवी आहे. त्यामुळे मला भविष्यातील आशा, स्वप्ने यांचा फसवा आनंदही मिळत नाही. पण दुसऱ्या बाजूने मी अत्यंत सुखी सुद्धा आहे कारण मला कशाचाच राग नाही, कसले दुःख नाही. तू मला मारणार आहेस पण मला मृत्यूची भीती नाही की तुझ्याविषयी द्वेषही नाही. मला

मारण्याचे काम लवकर कर, मी असेही म्हणणार नाही किंवा थोडा वेळ अजून जगण्याची याचना नाही करणार नाही. स्वतःचा होत असणारा मृत्यू निर्भयपणे स्वीकारणारा साधू हा त्याच्या नियतीने बांधला गेलेला आहे. या उलट तर भरता ला साधूच्या या कथनातील काही समजले नाही. त्याने सुरा उगारला व शांत बसलेल्या साधूच्या छातीत खुपसला व साधूचा अटळ मृत्यू अस्तित्वात आला.

कथा इथे संपते. पण त्या थांब्यावरती जी. ए. आपल्याकरता अनंत प्रश्न निर्माण करून जातात. म्हणजे बघा, या कथेची सुरुवात साधू गावातील वेशीतून गावात प्रवेश करता झाला असे लिहून जातात व आपल्यासारखा सामान्य वाचक तो साधूच आहे हे गृहीत धरून पुढील कथा वाचतो. जी.ए. यांचे वैशिष्ट्य हे की एक-दोन वाक्यात तुमच्यापुढे त्या कथानकाचे चित्र उभे करतात. वास्तवात साधू हा कुटुंब घटकातील नवरा, बाबा, बाप आणि घर सोडून देऊन मुलाला शोधणारा माणूस आहे. या प्रतिमेमध्ये व पहिल्या वाक्य यात थोडी vangyokti आढळते जी.ए. आपला कथानायक, तो साधू कसा झाला? त्याला शाप कोणी दिला? का दिला? असे काय त्याचे कर्तृत्व होते की त्याला शाप मिळावा की भविष्यातील लोकांचे व त्याच्या स्वतःच्या फक्त मृत्यूच्याच घटना ती या घटनेच्या आधी त्यालाच दिसतील, दुग्धोचर होतील व आपल्या अभद्रवाणीने, निरपेक्षपणे तो ते घडणारी घटना लोकांना सांगेल. याचा कथानकात लेखक म्हणून कोठेही उल्लेख जाणवत नाही.लेखकाने लिहिले म्हणून ते गृहीतक म्हणून कथा पुढे वाचायची. लेखकाने साधूचे नियती अशी ठरवलेली आहे.

आता प्रश्न हा की वाचक म्हणून आपण त्या अमूर्त घटनेत कथानकात कथेत आपण तेच पाहतो जे आपल्याला जीए जाणवून देतात. कथाप्रवाहात आपण बिनविरोध पुढे जात राहतो. आपण तेच पाहतो जे आपल्याला दाखवले जाते. मग आपली बुद्धी जे दिसते ते भावते, ते दिसत नाही, अशा त्या रिकाम्या जागा आपल्या स्वतःच्या अनुमानानुसार, इच्छेनुसार, पूर्वग्रह धरून, ती फ्रेम भरून काढत जातो, तसे

काळे पांढरे चित्र रंगवतो व आपल्या मनातील त्या चित्राला आपण पूर्णत्व देतो. या कथेत समजून घेणारे, ज्ञात होईल असे कोणतेही अंतिम सत्य मृत्यू शिवाय आपल्या हाती कधीही लागत नाही. कथेत "शाप " असण्याचे, दिल्याचे अंतिम सत्य असेलही. पण या घटनेपर्यंत आपण कथेमध्ये पोहोचू शकत नाही मग वाचक म्हणून आपण काय करतो तर त्या "शाप" दिलेल्या घटनेचे गृहीतक धरून आपल्या कथा वाचनाच्या वाटेवर आपले ग्रह ,पूर्वग्रह, अपेक्षा, इच्छा, चुकीच्या भावना अतिशय अव्यक्त कल्पना यांच्या आरोपण करून कथा वाचतो. व कथा आस्वाद घेताना समजेल ना समजेल अशा गडद धुक्याचे पांघरूण पसरवून वाचनासाठी ठेवून देतो. मग त्यामुळे आपण वास्तवासंबंधी आपल्या पडलेल्या आपल्या मूलभूत प्रश्नांना आपण हात घालतो व त्या सत्याच्या शोधाकडे वळतो.

हे झाले कथेबाबत. साधू च्या मनोव्यापारात जर वाचक म्हणून आपण शिरू शकलो तर त्याची वेदना कशी असेल.....

साधू म्हणतोय....

तर माझ्या वेदनेला अर्थ यावा ही आशा आता फोल वाटू लागली आहे, इतकेच नाही तर त्या वेदनेला काही अर्थ येऊ शकतो का? अशी ही शंकाही मनात येत आहे"

(..... आणि आत असह्य व्याधीने ग्रस्त असले प्रमाणे त्याच्या चेहऱ्यावर वेदना दिसली कथेतील पहिला प्यारा)

2. पुढे साधूला देवळात प्रवेश करण्याआधी एक विचार मनी आलाय. *प्रवास संपत येत असताना मनाला येणारा संथ मोकळपणा त्याच्यात आला त्याने हरणाचे कातड जमिनीवर पसरले व तो त्यावर बसला.*

हरीण हा प्राणी कायम कळपात राहणारा, गतीशील, चंचल, पण मृत्यूनंतर त्याचे कातडे साधू का वापरत आहे हे कायमचं कोडं कथेत आहे.

साधु संथपणे विचार करीत असेल, अंतर्मुख होऊन स्वतःशीच बोलला असणार....

दर क्षणी नव्या स्वच्छ डोळयांनी मान वर करून करून क्षितिजा पलीकडे एक एक क्षितिज उत्साहाने पहात पाऊल पुढे टाकावे, भरताला ,आपल्या मुलाला शोधावे, असे आयुष्याच स्वरूप असावे ही भाबडी आशा ठेवून पुढे जावे, परंतु त्या अज्ञात, न कळलेल्या शापामुळे, आपले आयुष्य मात्र खाली बसून, गुडघ्यात मान घालून, आपले जुने आयुष्य आठवत ते खूप असहाय्य पणे आठवत असता, ते आपल्या पायाखालून सटकून निघून जात आहे ही वस्तुस्थिती दिसतेय. ही साधूच्या आयुष्याची परिणीती आहे. ती त्याची लेखकाने लेखणीतून आणलेली, आलेली नियती आहे.

पुढेही कथेत साधूच्या मनातला विचार आहेच घडणार क्षण यायच्या वेळेस येत असतो , मानवाच्या उत्सुकतेमुळे तो कधी आधी येत नाही किंवा त्याला वाटणाऱ्या भीतीमुळे तो पुढेही जात नाही. हे त्याला कधीच समजून चुकलं होतं.

स्वतःचा मृत्यू कोठे, कधी, कसा आहे हे, तो सामान्य, तरीही शापित असलेला माणूस, साधू म्हणून जाणून होता. त्याची नियतीशरणता लेखक म्हणून जी.ए. यांनी बरोबर पकडली आहे. या कथेतील त्यांची विचारधारा दुखांकडून दुःखाकडे जाते. त्यांच्या विचारसरणीचा तो मार्ग आहे.तो मार्ग सोडणे त्यांचे हाती नाही.(मग ते नियतीच्या हाती आहे काय?). माणूस जन्माने दुःख भोगतो जन्म व मृत्यूच्या आयुष्याच्या मधील प्रवासात नियती त्याची फरफट करत असते. नियतीशी पाप पुण्य संकल्पना जोडलेली असते. म्हणून माणूस दुःख भोगतो. कधी तो दुःख स्वीकाराच्या संबंधित जाणीव पाशी ठरवतो, कधी अपरिहार्य पण दुःख भोगतो, कधी न बोलता दुःख भोगतो, किंवा मग दुःख स्वीकाराच्या भूमिका शांतता शोधतो. "कथानायक साधू शांतता" शोधणारा आहे. त्याच्या मृत्यूनंतर शापोवाणी होणार नाहीये, इतर घडणारे भविष्यातील मृत्यू तो लोकांना सांगणार नाहीये, त्याचे हे विधीलिखित त्याला माहिती आहे. आणि म्हणून तो मृत्यू येणार असूनही शांत आहे.

तर भरत तरुण रक्त, समाजसेवेच्या नावाखाली मुद्दामून हत्या करण्याचे कारण शोधत, स्वतःच्या बापाचा, जन्मदात्याचा अनाहूतपणे नाश करण्यासाठी, साधूच्या छातीत सुरा खुपसून समाज मानवाला भविष्यातील मृत्यूच्या घटना कळल्यापासून रोखणार म्हणून स्वतःला मिरवून घेतो आहे.

कथा संपते. पण ही कथा अनेक प्रश्न निर्माण करते. समाजाला द्रष्टा नकोय ,भविष्यवाणी नको, नियतीयुक्त मृत्यू नकोत, कटू पण सत्य बोलणारे मानव नकोत. पण जर तसा एखादा या समाजाच्या कळपात दिसलाच तर, त्याच्या मृत्यू क्षण , कोणत्याही कारणानेz त्वरित कोणत्यातरी माध्यमातून, आणला जातो. ही नियती कथा इथे संपते का इथून सुरू होते याचे आकलन मात्र होत नाही.

जसा साधूचा मृत्यू अटळ तशी जीएं सारख्या प्रतिभावंतांच्या भाळी अश्वत्थामा च्या कपाळी भळभळणारी जखमे सारखे कथेतील दुःखही आढळत आहे.अश्वत्थामाची वेदना शमत नाही त्याप्रमाणे जीएनच्या कथेतील दुःखाचे स्वरूपही आपल्यासमोर उभे ठाकते. या व आशा कथांमध्ये एक प्रकारचा ताण असतो व तेच कथेचे प्राणतत्त्वही असते. मग ती पराभव कथेतील मधील "रुक्मिणी% असो किंवा बळी मध्ये "aamoshi" असो,अथवा सोडवण मधील "डॉक्टर" असो शालोट मधील "काशी" असो किंवा विदूषक मधील " "दोन्ही राजकुमार" असोत. अशी कितीतरी पात्रे शापित जीवन जगत असतात व मृत्यूच्या अधीन होत असतात त्यांना लेखकाने ठरवलेल्या नियतीने बांधून टाकलेले असते व मृत्यू शिवाय त्यांना मुक्ती ही नसते.

अशी ही साध्या माणसाची साधू का झाला व शाप का मिळाला याचे उत्तर न सांगणारी जन्म मरण या दोन टोकांमधील मानवाच्या आयुष्याचे ताणे बाणे दाखवणारी आणखीन एक मृत्यू कथा का नियतीकथा हा प्रश्न वाचकाच्या पुढे ठेवून जीए कथा थांबवतात. का संपवतात? का खंडित करतात? का आणखीन पुढे विचार करायलाही लावतात, हा प्रत्येक वाचकाचा प्रश्न असेल.

(वरील लेखाकरता साहित्य संदर्भ घेतले आहेत खालील पुस्तकातून 1.सहोदर 2.मूळ कथा 3.नारायण धारप यांचा समर्थांचा विजय या पुस्तकातून आणि 4. सिनेमा पॅराडीसो. या पुस्तकातले काही विचार या लेखात वापरलेले आहेत)

आस्वादक: संजीव सावरगावकर.

कोथरूड, पुणे 7350002870.

मंजिरी देशमुख: वाचकाला वेगवेगळ्या दृष्टिकोनातून कथा पुन्हा पुन्हा वाचण्यासाठी प्रेरित करणारं साधु या कथेचं अत्यंत समर्पक आणि अनेक प्रश्नं निर्माण करणारं अभ्यासपूर्ण सुतोवाच. 🙏 🙏

सुनीळ सामंत: अतिशय सखोल आणि वेगवेगळ्या अंगांनी केलेलं विश्लेषण. हे आधी अजून दोन तीनदा वाचतो. मग कथा पुन्हा वाचतो आणि मग लिहितो.

पण एक गोष्ट लिहायची आहे. ती वेगळीच. हल्लीच वाचनात आले की जीएंच्या कथासंग्रहांचं आरेखण (कथांची वेगवेगळ्या संग्रहांत निवड व क्रमवार मांडणी) करण्यासाठी भटकळांनी एका विदुषीची मदत घेतली आणि त्यावर बराच विचारविनिमय करून हे काम झालं. असे काही असावे याची अटकळ मला पुर्वी होती. याचे उदाहरण म्हणजे सांजशकुन. यातील २६ कथा कालक्रमाने नाहीत. इतरही कोणता ठोकळ क्रम नाही. मग काय असावे.

या कथासंग्रहातील सुरुवातीची कथा शून्यवादावर आहे. हे जग निरर्थक, शून्य पोकळ कसलाही नियम नसलेले आहे असे काहीसे. शेवटच्या क्था मानवी प्रयत्नांना बळ देणाऱ्या आहेत. मधल्या कथा निव्वळ नियतीवाद (पण नियमांनी बांधलेला) आहे. कथा संग्रहाला एक प्रवास आहे.

साधू ही यातील मध्यावरची कथा.

अर्थात जीएंच्याच कथा असल्यामुळे मी जितके ठळक आणि ठोकळेबाज म्हटले तसे ते नाही. निळ्या रंगाची शेड हळूहळू बदलत जावी (गायतोंडेंच्या चित्रांसारखी) तशा त्या आहेत. हा फ़रक फ़ारच सूक्ष्म आहे. मला जाणवला. किंवा जाणवल्यासारखे वाटले.

साधू ही या कथासंग्रहातील मध्यावरची कथा आहे.

दिलिप बडे: सांजशकुन मधील कथांचा, विषय व खोलीनुरूप क्रम जी.एं.नी सुद्धा ठेवला असावा का?

सुनीळ सामंत: असेच मी समजत होतो. मध्यंतरी (याच महिन्यात) कुठेतरी जीएंच्या पुस्तक प्रकाशनाच्या प्रोसेस बद्दल वाचले. भटकळांकडे जीए कसे पोहोचले वगैरे. त्यात एका विदुषींचा उल्लेख होता ज्यांनी ते काम जीएंच्या सहमतीने केले.

संजीव सावरगांवकर: बव्हंशी ठेवला असणार आहे. पण आपल्याकडे अश्या प्रक्रिया, का कथा निवडल्या, त्यामागचे मनोगत काय हे जी. ए. स्वतः व त्यांचे प्रकाशक यांनी कोणत्याही प्रकारचे डॉक्युमेंटेशन करून ठेवलेले नाही. मराठीत कथा संग्रहाला प्रस्तावना, लेखकाचे मनोगत, प्रकाशकाचे विचार किंवा एखाद्या विचारवंतांनी लिहलेले चिंतन यामुळे त्या साहित्यावर माहितीपूर्ण प्रकाश, लेखकाची विचार व लेखन पद्धती यावर भाष्य होत असते. तसे जी. ए. यांच्या कथा साहित्या बाबत घडले आहे. आणि मराठी वाचक त्या अतिशय सुंदर प्रक्रियेला मुकला आहे, हे खेदाने म्हणावेसे वाटते.

सुनीळ सामंत: मला जे काही वाचलेले आठवते ते खाली लिहीत आहे. जीएंच्या शाळेतला एक मित्र (बहुधा पांडुरंग कुमठा) याच्याकडे जीएंनी आपला

कथासंग्रह निघावा अशी इच्छा व्यक्त केली. त्यासाठी खर्चाची तयारीही दर्शवली. कुमठांचे मित्र (की नातेवाईक) रामदास भटकळ यांनी ते काम स्विकारले व पैसे न घेता करायचे ठरवले. पण त्यासाठी त्यांना योग्य व्यक्ती संपादक म्हणून हवी होती. ते काम (बहुधा विजया राजाध्यक्ष) यांनी केले. यातली नावे चुकीची असण्याची शक्यता आहे.हे मी कुठे वाचले वा व्हिडिओत पाहिले तेही आठवत नाही.

संजीव सावरगांवकर: हे झाले व्यवहाराचे बाबत. साहित्य का लिहिले, ते स्वतःकरीता होते का? का चोखंदळ वाचक वर्ग मिळावा या करीता होते. त्यावर प्रकाशन झाल्यानंतरच्या प्रतिक्रिया उलट सुलट याचे डॉक्युमेंटेशन असायला पाहिजे होते. या बाबत बोलणे संयुक्तिक राहील.

विश्वेश्वर नांदेडकर : लेखकाचे मनोगत , एखाद्या सुसंस्कृत लेखकाची प्रस्तावना आणि प्रकाशकाचे मनोगत हे अनेक पुस्तकां प्रमाणे जी ए च्या पुस्तकांना नसतात. ही प्रकरणे जर असती तर बऱ्याच गोष्टींचा उलगडा होवू शकला असता, असे माझे ही मत आहे.

दिलिप बडे: जी.एं.चा पत्रव्यवहार या मधुन काही माहिती मिळू शकेल असे वाटते.

संजीव सावरगांवकर: नाहीये, ती व्यक्तिगत पत्रे आहेत. स्वतः च्या लेखनावर जी. ए. नि काही प्रतिक्रिया दिल्याचे आढळत नाही. कथा लिहिली की लेखक म्हणुन नाळ तुटली असे म्हणुन ते वाचकांवर सर्व सोडून देत असे बोलले जाते.

विश्वेश्वर नांदेडकर : काही कथा वर त्यांनी विस्ताराने लिहिले आहे पत्रातून. प्रदक्षिणा , चद्रावळ, गुंतवळ वगैरे

सुनीळ सामंत: साधू या कथेतील दोन गोष्टींवर लिहितो आहे.

१) अनिवार, अनिवार्य या शब्दांचा जीएंनी केलेला वापर. भरताच्या जन्मावेळीच, नाही त्याही आधी स्वतःच्या जन्माच्या वेळी, नाही त्याही आधी.... हा परिच्छेद वाचताना मला इस्किलार मधील कोळी आणि मासा यांवरचा परिच्छेद आठवला. कोण कुठला हा मासा, कोण कुठला मी आणि कुठले हे जाळे. या तिघांनी हे असे एकत्र यायचे हे माझ्या जन्माच्याही आधी, नव्हे जेव्हा पहिला मासा जन्माला आला तेव्हाच... अनिवारपणे चाललेले हे जग. यातली प्रत्येक घटना अनिवार, ूपुर्वलक्षी. प्रत्येक क्षण हा आधीच्या क्षणातून जन्माला आलेला अनिवार आणि पुढच्या क्षणाला जन्म देण्याचे अनिवार्य भागधेय घेऊन आलेला. जीएंचा शुद्ध नियतीवाद दाखवणारी ही कथा आहे. प्रयत्नांना, व्यक्तीला, कणबरही यात वाव नाही.

२) बाप आणि मुलगा, ज्ञानी आणि अज्ञानी यांच्यातील संवादाचा अभाव, मुलाला बाप काय बोलतो आहे हे समजूनच न येणे. अज्ञान्याला ज्ञानी काय बोलतो आहे ते खुळेपणाचे वाटणे. बापाला मुलाच्या गळ्याभोवतीचा फ़ास दिसूनही काही न करता येण्याची हतबलता. आणि मुलाला आपण काहीही करू सकतो याचा अभिमान.

विलास वाघोलीकर: 💐 💐 💐 💐 💐 💐 💐

साधु - लेखक - जीए कुलकर्णी - प्रतिसाद - व्ही एस वाघोलीकर

या कथेचे संजीवजींनी छान सविस्तर विवेचन केले आहे. मी त्यांना धन्यवाद देतो.

-1. नियतीवाद हा विचार आहे- श्रद्धा आहे. नियतीवाद विचारसरणीत माणूस पुढीलप्रमाणे श्रद्धा ठेवतो - भौतिक घटना या पूर्वनियोजित नियतीप्रमाणे होत

असतात, अशी ती श्रद्धा असते. त्यातही पुढे जावून, कठोर नियतीवाद सांगतो की , मानवी इच्छा स्वातंत्र्यही वरवरचे असते. इच्छास्वातंत्र्याने त्या माणसाला आपण स्वत : कृती करत आहे असे वाटले तरी, ती कृती पूर्वनियोजित नियतीप्रमाणे घडत असते , असे कठोर नियतीवाद मानतो.

- अशा नियतीने ठरवलेल्या घटना माणसाला थोडा वेळ आधी कळाल्या व त्या बदल करण्याचे सामर्थ्य नसेल तर त्या माणसाला ती शिक्षा ठरेल. तो स्वमृत्यूसह प्रत्येक घटना स्थितप्रज्ञपणे पहात जीवन काढेल अशी ही नियतीवादातील पुढील कल्पना या कथेत घेतली आहे. काजळमाया मधील गुलाम कथेतही कुबडा कापडावर चित्र काढतो. तसे घडत जाते. मुसाफिर स्वमृत्यूचे चित्र पाहतो त्यानंतर सिद्दीशेजारचा वृद्ध मंत्री त्याला मारतो.तेही कापडावर उमटते. माणूस भूतकाळ भविष्य झालेला पहातो. पण भविष्य भूतकाळ झालेला बहुतेक तो पाहू शकत नाही.... असे तेथे म्हटले आहे.

2.अतिश दाभोळकर यांनी जीएंच्या कथांची सर्वसाधारण प्रशंसा केली. पण या नियतीवादावर, कठोर नियतीवादावर, व विशेषतः साधु कथेवर त्यांनी टीका केली होती. आश्चर्य वाटेल, पण जीएंनी अगदी सुरुवातीच्या कथांमध्येसुध्दा हा नियतीवादाचा सूर लावला आहे. त्यांच्या संसार कथांतही अप्रत्यक्षपणे नियतीवाद येतो.त्यांनी "सोडवण" (रक्तचंदन) कथेत म्हटले आहे, “हे अगदी तसेच व्हावे, हे कुणीतरी पूर्वीच लिहून ठेवले आहे, ब्लू प्रिंट सारखे".

- 3. मृत्यू या घटनेबद्दल विचार करताना नियतीवाद जास्त ठळकपणे पुढे येतो. मृत्यू या घटनेमध्ये, तो मृत्यू हा संभवनीयतेचा परिस्थितीव्यूह होता असे स्पष्टीकरण दिले जाते. म्हणजे याचे स्पष्टीकरण असे -परिस्थितीचे घटक असतात. त्यांच्या एकत्र येण्याने परिस्थिती व्यूह होतो. प्रत्येक घटकाची गणीती संभवनीयता शोधता येते. त्यावरून त्या सर्व परिस्थिती व्यूहात ती मृत्यू घटना किती होईल, याची संभवनीयता शोधता येते. पण असे स्पष्टीकरण असले ,तरीही मृत्यू होण्यापूर्वी जाणीवेत असताना, त्या माणसाला काय वाटते ? मृत्यू झाल्यावर त्याच्या आजूबाजूच्या जवळच्या

माणसांना काय वाटते? मृत्यूच्या त्या परिस्थितीव्यूहामध्ये सापडलेल्या माणसांना, तो मृत्यू हा नियतीमुळे त्या वेळीच येणार होता असे वाटत असते. जीएंच्या अनेक कथांमध्ये मृत्यू हा नियतीबध्द दाखवला आहे. उदाहरणार्थ - ऑर्फियस, एका देवाचा मृत्यू, रक्तमुखी, इस्किलार, गुलाम, पाणमाय इत्यादी.

- 4. साधु कथेत तीन मृत्यू दाखवले आहेत. ते केव्हा होणार हे साधुला कळत असते. पण तो ते मृत्यू टाळू शकत नाही. साधु पुढे जात असतो. त्यावेळेला मागे मृत्यू होत जातात. कालीदासांनी म्हटले आहे -" , दरक्षणी जीवावर, मृत्यू हजार दिशांनी घाला घालण्याचा प्रयत्न करत असतो. तरीसुद्धा जीव मागील क्षणी जिवंत कसा राहीला हेच आश्चर्य मानले पाहिजे." म्हणून ही कथा वाचल्यावर माणसांवर मृत्यूचे प्रहार कसे होतात याची अनुभूती वाचकाला मिळते. यात कथेचे यश आहे. जीएंचे शब्द सामर्थ्य , रचना सामर्थ्य या कथेतही व्यक्त होते.

- धन्यवाद. विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: उत्तम मुद्दे.

गुलाम मधील उल्लेख योग्य आणि पुढचा आहे.

मृत्यू या घटनेबद्दल विचार करताना नियतीवाद जास्त ठळकपणे पुढे येतो- याचे कारण मानवी जीवनातील १००% ठरलेली घटना म्हणजे मृत्यू. तो कधी आणि कसा होणार हे माहित नसले तरी तो होणारच हे नक्की माहित असते. अटळ.

अतिश दाभोळकर कोण? त्यांनी हे कुठे लिहिले आहे?

जीव मागील क्षणी जिवंत कसा राहीला हेच आश्चर्य मानले पाहिजे खरेच की.

अलका तडकलकर : साधू या कथेकडे मी कथा न पहाता एक जीवनप्रवास वर्णन म्हणून पाहते.

विलास वाघोलीकर: विवेचनात ओझरता उल्लेख केला आहे. पूर्ण संदर्भ शोधून नंतर सांगतो धन्यवाद.

संजीव सावरगांवकर: त्याने काय साध्य होते? कथा, साहित्य मुल्य, जी. ए. यांची कथेतील विचारधारा वाचक म्हणुन आपल्याला काय भावली, समजली, उमगली ह्याचे सर्वांगाने विश्लेषण व्हावे असे वाटते.

मंजिरी देशमुख: मृत्यू हा अनेक घटकांचा एकत्र येण्यातून परिस्थितीव्युह तयार होतो हे वाक्य अनेक अशा घटनांचा कार्यकारणभाव दाखवून देतो. तसंही आयुष्यात अचानक वाट्याला येणाऱ्या गोष्टींसाठी प्रारब्ध किंवा नियती हे नाव/उत्तर देऊन मनाचं समाधान करतोच माणूस.

सुरेख विवेचन 👍

सुनीळ सामंत: अल मख्तूब मख्तूब

मंजिरी देशमुख: सर्वसाधारण माणसापेक्षा काही विशेष बाबींचं ज्ञान (अतिंद्रीय) हे शापवतच असतं. साधूला लगतच्या किंवा दूरच्या भविष्यात होणाऱ्या मृत्यू घटना दिसतात. हे ज्ञान म्हणजे एकप्रकारे साधूला मिळालेला शापच आहे. त्याचं जीवन जास्त वेदनामय आहे.शेवटी भरतच्या मानेभोवतीचे वळ त्याचा,काळा भेसूर चेहरा दिसून आपल्या आठव्या वर्षी घर सोडून निघून गेलेल्या आणि आज तरुण भरतचे मृत्यू क्षण कळून निर्विकार साधूच्या डोळ्यात पाणी जमू लागले.

आयुष्यात घडणाऱ्या अटळ आणि अतर्क्य घटना म्हणजे जीवन असून ते प्रारब्धाचं देणं आहे हे जी ए सांगतात असं वाटतं.

जी एंना त्यांच्या स्वतःच्या जीवनात त्यांच्या अनेक प्रिय जनांच्या अकाली मृत्यू क्षणांना सामोरं जावं लागलं हे मनात पुन्हा आलं साधू ही कथा वाचताना.

माधव पुराणिक : कथा साधू- (सांजशकुन, १९६५, ३ पानं)

विवेचन - डॉ. माधव पुराणिक

सोनेरी क्षणभंगुरतेकडून लाल अमरत्वाकडे करुण प्रवास

अस्तित्वाच्या आकाशाकडे जाणारा उंच माझा झोका

कथा साधू - सारांश व मुख्य संकल्पना

साधू ही पदवी किंवा नाव आयुष्यात नंतर मिळण्याच्या पूर्वी तो एक कौटुंबिक वातावरणातला निरागस मुलगा होता. त्याच्यावर नियतीने जणू दोन आसुडाचे फटके मारले -

जी ए म्हणतात - ‘‘जन्म दिल्यावर मूल व मुलाचा आनंद मागे ठेवून आई निघून गेली.(धाकट्या भावाच्या जन्माचा आनंद व आईचे प्रयाण ही आर्तकरुण विरोधलय)

‘‘ मुलगा देखील आठव्या वर्षी घरातून पळून गेला व घरच बसून गेले.’’ (आठ वर्ष धाकट्या भावाबरोबरच्या निरागस आनंदावर उभा राहू पाहत असलेलं त्याचे भावनिक घर जणू कोसळले)

त्यावेळी साधूचे वय एक बारा तेरा वर्षाचे धरले तर त्याच्या उमलू पहात असलेल्या / घडू पाहत असलेल्या सामाजिक व कौटुंबिक भावविश्वावर या दोन घटनांमुळे पराकोटीचा ताण आला आणि तो एका निर्णयाकडे - त्याच्या आयुष्याला निर्णय आकार देणाऱ्या निवडीकडे / पर्यायाकडे / रस्त्याकडे / अपरिहार्य मार्गाकडे जणू खेचला गेला. धाकट्या भावाचा शोध हेच त्याच्या आयुष्याचे ध्येय बनले.

या अनेक वर्षांच्या शोधयात्रेमध्ये साधूने, नियतीने त्याच्यापुढे अपरिहार्यपणे टाकलेल्या कठीण मार्गाकडे वळताना अनेक उपाय केले असतील. भावाला शोधण्याकरता अनेक तांत्रिक उपाय, अघोरी प्रयत्न केले असतील. कदाचित शेवटी अध्यात्मिक उपासनेकडे साधू व्हायला प्रवृत्त झाला असेल व त्याला माणसांच्या भविष्यातील मृत्यूसूचक घटना पाहण्याची शक्ती प्राप्त झाली असेल. तेव्हाच त्याला त्याच्या भावाचा शोध लागला. येथे जीएं नी नियतीची सार्वभौम शक्ती स्पष्टपणे दाखविली आहे. ते म्हणतात

“या गावाजवळच्या रस्त्याने तो अनेकदा गेला असेल. पण त्याला कधी ते देऊळ दिसले नव्हते की गावात शिरण्याची इच्छा झाली नव्हती.

पण घडण्याचा क्षण यावा लागतो. त्याला ओढून आणता येत नाही. सारे काही आमच्याच क्षणी घडावे, एक निमिष मागेपुढे नाही याची आकृती चिरेबंदी बांधलेली असते.”

येथे साहजिकच राजा ययाती व त्याच्या साधू झालेल्या भावाच्या अनेक वर्षानंतर झालेल्या भेटीची आठवण होते.

साधूचा भाऊ भरत हा आसपासच्या पंचक्रोशीतल्या अंधाऱ्या अनितीमान साम्राज्याचा एक सरदार तर साधू हा अंधाऱ्या भविष्यात पाहण्याची शक्ती असलेला एक साक्षीदार.दोघेही अंधारयात्रेचे प्रवासी. ही जोडी मोठी विलक्षण , अद्भुत वाटते.

साधूच्या जीवनात त्याचे ध्येय- जे भावाला शोधण्याचे होते ते सफल झाले व क्षणभंगुर जीवनात ध्येयप्राप्तीचा आनंद त्याला प्राप्त झाला.पण या क्षणिक आनंदाला मृत अमरत्व - हे त्याच्या भावाच्या रूपाने त्याच्या गळयातल्या कृष्णसर्पाच्या वेटोळयाने वेढून बसले होते.

ज्या भावाच्या मायेच्या ओढीने साधू आयुष्यभर वणवण भटकला तेच भावाचे नाते त्याला शेवटी जीवघेणा अखेरचा दंश करणार होते. व्यक्ती आणि सामाजिक नातेसंबंध यांच्यातल्या द्वंद्वाची करूण अखेर जी एं यांनी कलात्मकतेने सूचित केली आहे.

दोन्ही भावांच्या जीवनावर नियतीची गूढ, अनाकलनीय, पाशवी शक्ती क्षणोक्षणी प्रभाव टाकत असते व त्यांना एका अपरिहार्य मृत्यूच्या क्षणाकडे नेत असते.

साधूला पहिली आठ वर्ष भावाची निरागस माया मिळाली. नंतरही शेवटी त्याला भावाचा शोध लागल्यामुळे त्याला त्याचे ध्येय साध्य करता आले. एवढे थोडे क्षण ,थोडा काळ सोडला तर या क्षणभंगुर गूढरम्य क्षणांना उरलेले जीवन एका अर्थाने मृतवत होत शेवटी अटळ मृत्यूच्या क्षणाकडे नेते असे जाणवले.

साधू या कथेतून व खाली निर्देश केलेल्या इतर चारही कथातून जी ए कुलकर्णी यांना जीवनाचे जे आकलन सूत्र सापडले ते म्हणजे “क्षणभंगुर जीवनाला मृत अमरत्वाचा फास”

जी ए म्हणतात की या आयुष्यातच असे लहान मोठे भावनिक मृत्यू येत असतात व ते शेवटी मोठ्या मृत्यूच्या क्षणाकडे नेत असतात. (“सारेच लहानमोठे मृत्यू, लहानमोठे जन्म ! खरे मरण म्हणजेच या चक्रातून मुक्ती असते.” - कथा वस्त्र ,जी ए कुलकर्णी).

मृत्यू या संकल्पनेत खालील भावनांचा समावेश होतो

१ अटळ, अनोळखी दुःख, (जशी साधूला आपल्या आईच्या मृत्यूनंतर व भावाच्या पळून जाण्यानंतर वाटले तसे दुःख)

२ सततची व कायमची निराशा, (जसे साधूला अनेक वर्षांच्या परिश्रमानंतर सुद्धा जेव्हा भावाचा शोध लागत नाही ही भावना मनात दाटून आल्यावर वाटते तसे दुःख)

३ न संपणाऱ्या व्यथा, (जसा काळ पुढे जात होता बालपणाचा, तारुण्याचा व प्रौढपणाचा तसे साधूच्या मनात या न संपणाऱ्या भावाच्या शोधाची भावना दुःखव्यथेचे रूप घेऊन येत होती.)

४ तीव्र कुरतडणारी वेदना, (भावाच्या बरोबर घालविलेल्या निर्मळ बालवयातल्या आठवणी, नंतर सतत आठवल्याने साधूच्या मनात त्याचे सुख कुरतडल्याची भावना निर्माण करीत होत्या)

५ नसतेपणाची चिंता (साधूला आपला भाऊ या जगात नसेल ही त्याच्या नसतेपणाची चिंता सतत भेडसावत होती)

६ अनामिक भीती (साधूच्या मनात नियती किंवा दुसरी न समजणारी शक्ती आपल्याला कुठे गाठेल ,आपल्यावर काय प्रहार करेल ,आपले काय होईल ? तसेच या शक्तीमुळे भावाचे काय झाले असेल ही अनामिक भीती साधूला ग्रासून टाकत होती.)

७ काळजी (साधूच्या मनात भावाबद्दल जे मायेचे धागे निर्माण झाले होते, त्यामुळे त्याची त्याला काळजी वाटत होती.)

८ गत आयुष्यातील टोकाच्या कृतींचा व त्यांच्या परिणामांचा क्षणोक्षणी वाटणारा अपराधगंड (जशी साधूच्या भावाने पळून जाण्याची टोकाची कृती केली तसेच साधूनही त्याच्या शोधा करता आपल्या भावी आयुष्याच्या सुखावर पाणी सोडले. ही टोकाचीच कृती होय. या टोकाच्या कृतीचा नंतर जसे जसे साधूला भाऊ शोधण्याबाबत अपयश येऊ लागले तसे तसे त्याच्या मनात त्या कृतीबद्दल स्वतःविषयी अपराधगंध निर्माण झाला असावा.)

९ नातेसंबंधातील जीवघेण्या दंशानंतरही मनात दाटून येणारी व्याकुळतेची शेवटची एक छटा,(ही माणुसकीची खूण शेवटच्या क्षणापर्यंत कशी असते हे जीए यांनी असे व्यक्त केले आहे-

“ आता आपणा मुळेच तेथे काळवंडलेला वण उठणार हे त्याला जाणवले आणि अनिवार्यतेच्या निर्विकार, अभेद्य बंधनातही त्याच्या डोळयात पाणी जमू लागतात त्याने ते मिटून घेतले.”

१० सर्वांनी तिरस्कार व उपेक्षा केली तरी अपरिहार्यपणे जगावे लागल्यामुळे येणारा एकटेपणा (भविष्यात घडणाऱ्या घटनांचे ज्ञान प्राप्त झाले तरी साधू ही गोष्ट आपल्या भावापर्यंत पोचवू शकत नाही व या दृष्टीने तो एकटाच असतो ही अपरिहार्यता जीएं नी कलात्मकतेने व्यक्त केली आहे.

"भरताला त्याच्या बोलण्यापेक्षा काहीही समजले नाही."

कथा साधू मध्ये पहिल्यापासून शेवटपर्यंत विनाशाच्या अनेक छटा प्रतिमांच्या रूपाने जी ए यांनी व्यक्त केल्या आहेत. त्या खालील प्रमाणे -

-विनाशाच्या दृकश्राव्य प्रतिमा व वातावरण निर्मिती

या छटा निराशा, दुःख ,व्यथा, वेदना ,यापासून सुरू होऊन ते तीव्रतम दुःख - मरणापर्यंत जातात.

याच्याकरता जी ए कुलकर्णी यांनी खालील प्रतिमांचा अतिशय समर्पकपणे वापर केलेला आहे

१ त्याची पावले झाडाच्या शीतल सावलीत शिरली व मागून भयानक किंकाळी ऐकू आली. (असह्य अंतिम वेदनेचा हुंकार)

२ ते मुल आता जळून मरणार आहे. (निरागस बाल जीवाचा अतिभीषण अंत)

३ ती मुलगी विहिरीत पडून मरणार आहे.(नवपरिणित तरुणीच्या स्वप्नांची अनपेक्षित करूण अखेर)

४ त्या निरनिराळया व्यक्तींकडे पाहताच त्याचा जर्जर चेहरा काळवंडला आणि आत असह्य व्याधीने ग्रस्त असल्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर वेदना दिसली. (अंतराला व्यापून राहणाऱ्या काळीजकळा)

५ तेथे पडवीचे खांब गेले होते. मूर्ती भंगली होती आणि जुन्या वास्तूत असणारी नाशाची अवकळा सगळीकडे भरून राहिली होती. (माणसांच्या भावविश्वाचा आधार असणारी मूर्तीची व जुन्या वास्तूची संकल्पना यांचा उध्वस्तपणा)

६ बाजूच्या झाडांची उदास सळसळ सोडली तर भोवती सगळा आवाजच पुसून टाकल्याप्रमाणे शांत होते.(आसपासच्या निसर्गामध्ये सुद्धा जाणवणारी उदासीची सळसळ आणि शांतता सुद्धा अमानवी म्हणजे माणसाच्या शब्द सुद्धा नसणारी)

७ एक राकट तरूण हातात लखलखीत सुरा घेऊन दारात उभा राहिला. डोळयांसमोर परक्या देवळाचे चित्र दिसे. या साऱ्याच्या ओढीने त्याचे रक्त आटून गेले होते. माझ्या संतापाने माणसे चळाचळा कापतात. (जीवनाचा शेवट सूचित करणाऱ्या जिवंत प्रतिमा)

८ भरत म्हणाला, " मी तुला मारण्यासाठी आलो आहे. तुझ्या जिभेने मृत्यू बोलतो तुझ्या शब्दांनी अशुभ घडते.(मरणाच्या आसपासचे क्षण साक्षात करणाऱ्या प्रतिमा)

९ भरताच्या गळ्याभोवती कृष्णसर्पाच्या वेटोळ्याप्रमाणे फासाची खूण उमटली. साधूने त्याच गळयाभोवती मागे स्वतःच्या हाताने दृष्टीचे मणी बांधले होते. आता आपणामुळेच तेथे काळवंडलेला वण उठणार हे त्याला जाणवलं आणि अनिवार्यतेच्या निर्विकार ,अभेद्य बंधनातही त्याच्या डोळयात पाणी जमू लागतात त्याने ते मिटून घेतले. (दृष्टीचे मणी काळवंडलेले वण, निर्विकार बंधन व विकारांमुळे मायेमुळे बंधनमुक्त झालेले डोळयातील पाणी यातील विरोधलय विलक्षण सामर्थ्यवान आहे.)

जी एं च्या कथांतील सोनेरी व लाल रंगाच्या प्रतिमा

साधू या मुख्य पात्राचे जीवन सतत भयाने व अविरत जाणवणाऱ्या दुःखांनी व्यापली आहेत. ही दुःखे मानसिक पातळीवर व अस्तित्वाच्या पातळीवरही या दोघांना जाणवतात. हे दोघेही नियतीच्या, जगाच्या, गुंतागुंतीच्या व्यवहारासमोर ,घटनांसमोर केविलवानणे ,असहाय , गोंधळलेले, भांबावलेले व हरवलेले दिसतात.

साधू ,त्याच्या जीवनात सुसंगत व विसंगत तसेच असंगत घटनांचा अनुभव घेत असतानाच, अनेक प्रकारे आपल्या ध्येयप्राप्तीचा प्रयत्न करताना दिसतो व त्यातून त्याच्या हाती जे लागते ते एकाच वेळी जीएं च्या अनेक कथांच्या शेवटी जे आढळते ते म्हणजे तो क्षण सार्थ झाल्याचा भाव (भाऊ सापडला म्हणून)व तो क्षण व्यर्थ झाला झाल्याचा कारण तो आता साधू आता मानवी सुखदुःखाच्या पलीकडे (जणू मृत अमर) गेला आहे.

जी ए म्हणतात “ या माझ्या शापामुळे मी इतरांपेक्षा जास्त दुर्दैवी आहे. कारण त्यामुळे मला आशा, स्वप्ने यांचा फसवा आनंद देखील मिळत नाही. पण त्याबरोबर इतरांपेक्षा सुखी देखील आहे कारण मग मला कशाचाच राग नाही, कसले दुःख नाही.(ही जी ए यांच्या मताप्रमाणे सुखदुःखातील अमानवी स्थिती आहे.)

जी एं ना हा अस्तित्ववादी साक्षात्कार - मानवी जाणिवेच्या अमूर्त, अपार्थिव, अलौकिक पातळीवर झालेला आहे. त्यांनी त्यांनी तो भयावह,अद्भुत अनुभव आपल्या प्रतिभेने मानसिक पातळीवर व्यक्त करताना व त्याही पलीकडे रंगांच्या ,रूपाच्या संवेदनांच्या स्तरावर व्यक्त करताना सोनेरी व लाल रंगांचा अतिशय प्रत्ययकारी उपयोग केलेला आहे. जणू जी यांच्या इंद्रधनुष्यात दोनच रंग असावेत सोनेरी (जीवन) जो लाल (विनाशकारी)होत होत या अंधारात नाहीसा होतो.

या रंगांच्या प्रतिमा खालील पाच कथांमध्ये जीए यांनी या कथांमधील जीवनसूत्र “क्षणभंगुर रम्य जीवन व त्याला व्यापणारे मृत अमरत्व” हे आशयसूत्र व्यक्त करताना वापरलेल्या आहेत.

हे प्रतिमांच्या वापरातील साम्य, सातत्य व त्यांचे विविध प्रयोग जाणवणे ही रसिकाला मोठी आनंदाची गोष्ट आहे.

१ कथा साधू (सांजशकुन, १९६५, ३ पानी)

१ साधू म्हणाला," हा प्रकाशाचा किरण बघ. आता तो सोनेरी आहे पण तो थोड्या वेळाने लालसर होईल. तो माझ्या आयुष्यातील शेवटचा रक्तक्षण ठरेल तुला झाला की माझी वेळ संपली.

२ समोर धगधगीत जाळ पेटला होता व त्यातून ठिणग्यांचे कारंजा वर उडत होते. त्याच्या लालसर प्रकाशात तो लोहार तांबड्या समुद्रातील मंथनातून वर आलेल्या कृष्णाकृतीप्रमाणे दिसत होता. बाजूला एका लाकडी कोणत्या वर एक लहान मूल झाडाच्या सतत लवलवणाऱ्या हजार जिभा व ठिणग्यांच्या टिकल्या पहात होते.

३ भरताचा चेहरा द्वेषाने लाल झाला त्याने सुद्धा उगारला व डोळे मिथुन शांत बसलेल्या साधूच्या छातीत खुपसला. तिच्यातून रक्ताची धार उसळली व प्रकाशात लालसर होत चाललेल्या धुळीत पडून ती लालसर वाहू लागली.

२ कथा भिंत (सांजशकुन, १९६३)

१ एके ठिकाणी सोनेरी माती होती तिचा स्पर्शही हाताला उन्मादक वाटे. एकाने त्यात मातीचे छोटे घर बांधले.... नंतर त्याने हर्षाने आपल्या आईला हाक मारली. पण शांत, विकल होऊन भिंतीला टेकून बसलेली आई कुठे गेली कोणास ठाऊक.

२ टेकड्यांच्या उतरणी वरील सूर्याचा सोनेरी प्रकाश पिवळ्या रेशमी वस्त्रा सारखा वाटे. मी धावत त्या प्रकाशात जाऊन उभा राहिलो आणि तो उत्कट प्रकाश ओंजळीत घेऊ लागलो.

"अरे वेड्या, ‘‘ कोणीतरी गंभीर आवाजात म्हणाले "या क्षणिक मोहिनीत वेळ घालवू नको. हा इथला प्रकाश क्षणात नाहीसा होईल त्या भिंती पलीकडे प्रकाश आहे तो कधी जराग्रस्त होत नाही व त्यात कसलीही छाया पडत नाही. माझ्या शेजारी एक जटाधारी योगी हातात एक ग्रंथ घेऊन उभा होता.

३ एका पक्षाची चोच सोन्याची होती. त्याच्या काळ्या रेशमी पंखांवर रक्त उधळल्याप्रमाणे लाल पाने उमटली होती. त्याच्या स्वरामुळे मनाला कोमल पालवी फुटत गेल्याप्रमाणे वाटे. हे मी ऐकत असता योग्याचा आवाज ऐकू आला "वेड्या ,तो पक्षी क्षुद्र आहे ,त्याचा स्वर पाण्यावरील रेषेप्रमाणे क्षणभंगूर आहे पण त्या भिंतीवर जो पक्षी आहे तो अमर आहे त्याच्या गीतात क्षणिक सुखाचा उन्माद नाही ,भासमान दुःखाची आर्तता नाही पण चिरंतन शांती आहे."

३ कथा काली (सांजशकुन,१९७३, ४|| पानी)

१ गाभाऱ्यातील एका कोपऱ्यातून लालसर प्रकाश कालीच्या मूर्तीवर पडत असल्याने तिच्या सर्वांगावर रक्तछटा होती आणि डोळ्यांच्या खालच्या कडा अग्निरेषेप्रमाणे दिसत होत्या.

२ प्रवासी कालीला म्हणाला," मी पळत असता मृत्यू माग काढत माझ्या मागे धावत येत आहे असे होऊ देऊ नको तर मीच मृत्यू पुढे येऊन त्याला सन्मुख झालो एवढेच एक मानचिन्ह माझ्यापाशी राहू दे.

रक्तरेषा असलेल्या उग्र डोळ्यांची तिची नजर त्याच्यावरच खिळली होती. त्याने डोळे मिटतात तिच्या खड्गधारी हात उंचावर गेला. खड्गाचे रुंद पाते ओलसर रक्ताने माखल्याप्रमाणे चमकले व एका प्रहाराने कालीने त्याचा शिरच्छेद केला.... तिने त्याचे ताजे धड त्या ठिकाणी ठेवले व त्यात जळता पलिता ठेवला.

४ कथा गीतपाखरू (सांजशकुन, १९६५, ३ पानी)

१ एका संध्याकाळी दोन्ही संधिप्रकाशाच्या कुशीत आधार घेत प्रवाशाने बियांवर वाकून भग्न हृदयाने अश्रूंची शिंपण केली. नंतर एकदा रखरखत्या उनाने मन पेटल्याप्रमाणे होऊन त्याने बोटांवर सुरीचा प्रहार केला व ती लाल वेदना सहन करत उष्ण रक्ताची धार त्यांच्यावर फिरवली.

२ ते चारही कोंभ एकत्र आले व त्यांचा एक दिव्य पक्षी होऊन आभाळात उडाला त्याचे पंख निळे होते, डोळे रक्तथेंबासारखे, चोच जांभळ्या मखमली सारखी व डोक्यावरील रत्नतुरा सोनेरी होता. तो बाणाप्रमाणे वर उडाला व आपल्यासारख्या चार- सहा पाखरांच्या संगतीत तो चांदण्यातून येणाऱ्या प्रकाश तंतुसारख्या आवाजात गाऊ लागला. त्याचा आवाज ऐकताच मागच्या प्रवाशांचे चेहरे उजळले.

क्षितिजाची कड (प्रवाशाच्या) हाताला लागली व एका शेवटच्या आर्त, हताश ताणाने प्रवाशाने पलीकडे शरीर ढकलले पण त्याचा चेहरा सौम्य, तृप्त अशा स्मितात स्थिरावला होता.

५ कथा सांगाती (सांजशकुन, १९७०, ६ पानी)

१ किंचित घोगरा, गोंजारणारा, ध्वनीने दुधावर साय आणणारा आवाज तो आवाज नि:संशय माझ्या आईचा होता.....

मी दुसऱ्या ठिकाणी आधार धरताच आलेला आवाज दादांचा होता-....

एका काळवंडलेल्या हाडातून आलेला आवाज मेधाचा होता," हा माझा हात तुझ्या हातात दिला होता"....

चांदीच्या घागऱ्यांपैकी एकच खाली ओघळल्याप्रमाणे त्या मूठभर काड्यांतू गोल मंजुळ स्वर आला. हा तर माझ्या पिवळ्या सोनपक्ष्याचा आवाज.....

जळजळीत तप्त रंगाचे हे शब्द माझ्यावर वाढत्या वेगाने आढळू लागले.माझे अंग बधिर झाले त्या निर्जीव शरीरातून.... भोवतालच्या रंगीत रेषा एकमेकांवर आदळल्या ठिणग्यांच्या उल्का उडाल्या व विरून गेल्या.

अभेद्य अंधार पुढे सरकला व माझ्यावर पसरला.

समारोप - कथा साधू ही रसिकाला सर्वसंहारक, ढासळणाऱ्या गूढरम्य व सुखी जीवनक्षणांची , विश्वाच्या विराट पोकळीच्या अंधारमय प्रकाशाच्या पटावर घडत असलेल्या घटनांची कलात्मक प्रतीती देते. दृष्टांत कथेतून विराट जीवनदर्शन घडवते.

माधव पुराणिक

भ्रमणध्वनी - ९६२३४४२२२१

मंजिरी देशमुख: साधू या कथेवरील अत्यंत विस्तृत, सुक्ष्म, आणि अभ्यासपूर्ण विवेचन कथा समजून घेण्यास अतिशय मदत करणारं आहे. तुमच्या अभ्यासू वृत्तीला 🙏 🙏

सूड --- पुस्तक..निळासावळा

अलका तडकलकर : ☘ कथा..सूड

☘ पुस्तक..निळासावळा ☘ लेखक..जी. ए. कुलकर्णी

☘ प्रथम प्रसिध्दी मे-जून1955

....

कथा विवेचन

एका गावातील बसस्थानकाजवळ घाणेरड्या वस्तीतील ती शाळा आहे.

खूप जुनी झाल्यामुळे त्या शाळेवर कळा चढलेली. जणू कुपोषित मुलांसारखी. शाळेची इमारत अवकळा आलेली तर शिक्षकवृन्द सुरकुतलेला. अवसानहीन, कामापेक्षा इतर चटरफटर गोष्टी चघळत वेळ काढणारा असा.

थोडक्यात शाळेच्या अवतीभवती व शाळेतील वातावरण उल्हसित नसणारे.

अशा शाळेत ती (नवीन शिक्षिका) येते. चांगली सेकंडक्लास एम.ए. असलेली. तरूण. त्यामुळे एक तरूण उच्चविद्याविभूषित महिला आता स्टाफमध्ये सामील होणार या विचाराने सगळ्यांना ती कोण , दिसायला कशी, बोलायला वागायला कशी, शिकवायला कशी असेल यावर चर्चा सुरू होते आणि एका सुंदर तरुणीचे चित्र प्रत्येकाच्या मनात उमटते.पण प्रत्यक्षात जेव्हा ती शाळेत हजर होते तेव्हा सर्वांच्या कल्पना फोल ठरतात.तिचे सौंदर्य लोभस, आकर्षक असे नसते. तिचे रूप सुमार असले तरी तिच्या जाणिवा खूप उच्च दर्जाच्या असतात. तिच्या हालचालीतून तिचे सौंदर्य ओसंडत असते. पण दिसण्यावर आसक्त होणारे

वागण्यावर कसे होतील? तेथे पाहिजे जातिचे. असो तर अशा या बाई शाळेत रूजू होताच तिला दिलेले वेळापत्रकानुसार काम प्रामाणिकपणे करू लागते.नावीन्यपूर्ण शिकवू लागते.मराठी,भूगोल हे विषय शिकवताना जीव तोडून शिकवणे, शैक्षणिक साहित्याचा वापर करणे,गोड आवाजात कविता म्हणून दाखवणे अशा सर्व प्रकाराने विद्यार्थ्यांवर पकड मिळवण्यासाठी आपले गुणकौशल्ये पणाला लावते. परंतू कोरड्या विहिरीतून पाणी कसे मिळणार? तिला वर्गातील मुलांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही.मुले दंगा करतात.त्रास देऊन तिला रडवेली करतात. मुलेच काय सहकारीही तसेच वागतात.एकदा तर ती स्टाफ रूममध्ये येऊन रडतेही. पण तिला कुणीच समजून घेत नाहीत. ही कथा सांगणारा एक शिक्षकही तिचे मनोधैर्य वाढेल असे काही करत नाही.खरेतर तिच्या नावीन्यपूर्ण शिकवण्याची पध्दत, पोटतिडिकीने शिकवणे या सर्व गोष्टी सर्व शिक्षकांना समजून आलेले असते तरीही तिला मदत करायला कुणी पुढे येत नाही. तिच्याविषयी एक प्रकारची असूया प्रत्येक शिक्षकाच्या मनात रूजत असते.

उन्हाळ्याची सुट्टी लागणार असते. या सुट्टीत प्रत्येक शिक्षक आपण कुठे जाणार, आपला सुट्टीतील पत्त्या काय असणार आहे या बद्दल चर्चा करतात परंतू कुणीही तिची दखल घेत नाही.उलट तिला तर टर्मिनेशनची नोटिस आलेली असते. सहकाऱ्याना ते माहित झालेले असते तरीही तिची विचारपूस कुणीच करत नाही.इतक्या आढ्यतेचे ते सहकारी. ती मात्र कुणाशीही चकार शब्दही न बोलता निघून जाते.तेव्हाही तिच्याबद्दल कुणीच काही बोलत नाही.तिच्या जाण्याने कुणाचेही अंतःकरण हेलावत नाही.कारण कुणीच तिला आपलेसे केलेले नसते.चांगले स्वीकारणे कधी कधी अहंकाराला डसणारे असते अशा विचित्र शिक्षक व विद्यार्थ्यांत राहूनही मिळालेल्या सेवाकाळात नेहमीच निर्दय थट्टा,विरोध, द्वेष, सहन करूनही कुणाबद्दल तोंडातून एकही अपशब्द न काढता, कुणाचीही तक्रार न करता उलट हे सारे सहन करून आपले इतिकर्तव्य करून जाते.

ती कुणासमोरही शरणागत होत नाही किंवा स्वतःचा संयम ढळू देत नाही

काही लोक स्वतःला त्रास झाला तर त्याचा वचपा काढायची एकही संधी सोडत नाहीत परंतू इथे ही एक उच्चविद्याविभूषित स्त्री कितीदाही अपमानास्पद वागणूक मिळाली तरी काही प्रतिसाद न देता निघून जाते.तिचा हा संयम व समजदारपणा पुरूषी अहंकारावर एक सूड उगवल्यासारखाच असतो.

ती गेल्यावर मात्र तिच्या सद्गुणांचा दरवळ पसरते आणि मग तिचे अस्तित्व पुन्हा दिसणारे नसते.

सर्व सहकाऱ्यापैकी हा शिक्षक थोडा वेगळा असतो.भावनिक असतो.तिच्या व्यथा याला कळतात.आपण तिला काही मदत करू शकलो नाहीत याची जाणीव होते.ती जरी कुरूप असली तरी गुणवान तितकीच होती. तिच्या गुणांवर प्रेम करणारा कोणीतरी असेलच आपण तिचा मात्र तिरस्कार केलाय.यावरचा तिचा निःशब्द प्रतिसाद हाच आपल्यावर उगवलेला सूड आहे असे त्या शिक्षकाला वाटते.

कथासारांश

माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन च्या मते कोणत्याही शैक्षणिक संस्थेचे श्रेष्ठत्व तेथील इमारती आणि उपकरण नाहीत तर तेथे कार्यरत शिक्षक त्याची विद्वत्ता व चारित्र्य यावर असते

पण कथेतून शाळेत शिक्षकाची निष्क्रीयता व मानवीमूल्याची अवहेलना या गोष्टी समाजावरच एक प्रकारचा सूड घेतल्यासारखे आहे.असे वाटते.

डॉ. अलका तडकलकर

सुनीळ सामंत: अतिशय सुंदर विवेचन अलकाजी. आभार. संपूर्ण कथा त्यातील अनेक बारकाव्यांसह डोळ्यासमोर आली.

सूड या कथेचे शिर्षक सूड का आहे हे मला नीट समजलेले नाही.

मला ही कथा आपल्या मध्यमवर्गीय भारतीय मूल्यांतील ढोंगीपणावर जीएंनी घेतलेला सूड आहे असे वाटते.

मध्यमवर्गीय भारतातील सर्वात पवित्र असे स्थान म्हणजे शिक्षकांचे. त्यांच्या मनात लोभ, मोह, मत्सर, आदी षड्इपूंना जागा नाहीच जणू. काम तर फ़ारच दूर. या पावित्र्यावरच पहिला घाला जीए घालतात ते "ती" येणार हे कळताच सर्व पुरुष शिक्षकांच्या मनात उचंबळून आलेल्या भावनांचं वर्णन करून.

दुसरी ढोंगीपणाची कमाल म्हणजे "सौंदर्य हे बाह्य नसून आत्म्याचे सौंदर्य पहावे" वगैरे अध्यात्मिक मूल्यांचे. "ती" आल्यावर तिचे बाह्य रूप पाहून सर्व शिक्षकांचा अपेक्षाभंग होण्याचं जीएंनी केलेलं वर्णन हा दुसरा सूड.

ही कथा अगदी आपली तुपली आहे. आपण जे बोलतो आणि आपल्या मनात जे असतं त्यातल्या विरोधाची कथा आहे ही. जीएंनी असा फ़टका दिलाय की आपल्याला चारचौघांत ढोंगीपणाकरताना एकदातरी ही कथा आठवलीच पाहिजे.

अलका तडकलकर : अगदी बरोबर. इथे या कथेत एका चांगल्या गुणांचा वाईट मनोवृत्तीने (विद्यार्थी, सहकारी,व्यवस्थापन हे सर्वच) घेतलेला हा सूड आहे पण काही काही वेळा मौन सर्वार्थ साधनम् हे त्या नव शिक्षिकेने सर्वापुढे ठेवलेला एक वसतुपाठच..जणू सूड उगवावा असा.

दिलिप बडे: https://youtu.be/x1GidiyUGnA

सुड" ऑडिओ वाचन.

विलास वाघोलीकर: विवेचक - व्ही एस वाघोलीकर

- यात निवेदक " मी" ची भूमिका ,तटस्थ पण बारकाईचा निरीक्षक अशी आहे. त्यामुळे तो कथेच्या ओघात कुठे गुंतलेला दाखवला असता तर ,कथेचा ओघ

बिघडला असता.शेवटी कथा करूण वाटते ती त्याच्या अलिप्ततेमुळे. अर्थात “मी “च्या आवडी थोडया प्रखर आहेत. पण तो संवेदनशीलही आहे. भारा तांबे यांच्या कवितेचे महत्व “ मी” ला कळते. आपण व , सर्व इतरेजण टोकाचे वागलो हे त्याला जाणवते.

- कथेचे नाव सूड हे अनेक पैलूंतून आले आहे, असे वाटते. शिक्षक पेशाला योग्य उत्साही ,ज्ञानी अशी “ ती” आहे. रसिकतेने सुरांच्या सहाय्याने कविता शिकवणे. नकाशा रंगीत खडूंनी भूगोल शिकवणे. उलट उत्तरे न देता स्वतः सहन करणे असे “ ती” चे गुण दाखवले आहेत.

- पण आजूबाजूच्या परिस्थितीने “ ती” च्यावर उडवलेला सूड आहे. फक्त दोन महिन्यांची नोकरी देणे. त्यानंतर सहकाऱ्यांनी जाहीर निरोप न देता टर्मिनेशन ऑर्डर देणे हा एक सूड. इतर शिक्षकांची हेटाळणी. थोराड विद्यार्थ्यांचे हसणे व त्यांनी दुर्लक्ष करणे. हाही मानसीक सूड आहे.

- जीएंनी त्यांच्या कथांत अस्तित्व जगत असताना अशी अनेक वातावरणे दाखवली आहेत. शिक्षकी पेशाचे थोडे नकारात्मक वातावरण ,सांगाडा, माणूस नावाच्या बेटा, वासंती, पडदा, इत्यादी अनेक कथांत येते. सूड ही सुध्दा अशीच लक्षणीय कथा आहे.

- धन्यवाद. विलास वाघोलीकर

श्रीकांत देशमुख : कथा समजुन घेण्यासाठी वेगळ्या दृष्टिकोनातून उपयुक्त विवेचन 👍

संजीव सावरगांवकर: कोणत्याही प्रकारचे कठोर शब्द न वापरता अथवा शाल जोडीतील शब्द, भावना यांचा आसुरी आसूड न उच्चारता सुड या कथेतील प्रत्येक पात्राने संयमित बोलून, सौम्यपणे आपल्या सुडाच्या अध्यारुत भावना प्रकट केल्या

आहेत. यात जी. ए. यांचे लेखक म्हणुन कौतुक करावे हे ह्या कथेचे वैशिष्ट्य म्हणता येईल. वाचायला सोपी, सरळ, कोणतेही छुपे आचार विचार नसलेली गहन कथा आहे. सर्व आस्वादक यांनी त्यात सुंदर भर घालून कथा परत का वाचावी लागेल याचे वेगवेगळ्या आयामात अप्रतिम विवेचन केले आहे. त्यानाही धन्यवाद. 🙏

विलास वाघोलीकर: संजीवजी, आपण या लघुकथेचा (खरेच दोन पानांची) चांगला आस्वाद घेतला आहे. पण तोही अगदी थोडा झाला आहे. सविस्तर वाचण्याची सवय असलेल्या माझ्यासारख्याला हूरहूर लावणारा आहे. जी एंचे प्रत्येक कथेतील झळाळलेले शब्द निरखून घ्यायचे, हा या ग्रुपचा फायदा आहे. त्यामुळे आपणास विनंती करतो की ," प्रत्येक पात्राने सूड भावना संयमितपणे व्यक्त केली आहे" याबद्दल आपण आणखी थोडेसे तरी लिहावे. धन्यवाद. गुड डे. विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: कोणत्याही प्रकारचे कठोर शब्द नसलेली ही कथा (शिर्षक सोडून) हे प्रथमच जाणवले. आणि तरीही माझ्यामते ही कथा म्हणजे सामाजिक व्यवहारात (विशेषतः लैंगिकतेच्या दृष्टीने) मुरलेल्या ढोंगावर कठोर प्रहार करणारी आणि आरसा दाखवणारी आहे.

- सोडवण --- पुस्तक - रक्तचंदन

गौतमी कोंडे: कथा - सोडवण

पुस्तक - रक्तचंदन

नियती आणि जीए ह्यांचे एक वेगळेच नाते आपल्या त्यांच्या अनेक कथांतून जाणवते. वाट्याला आलेलं दुःख त्यातून पुढे जाण्यासाठी कितीही शक्ती एकवटली तरी नियतीच्या आघाताने आयुष्याचे तुकडे झाल्यावाचून राहत नाही. ह्याचे एक उत्तम उदाहरण जीएं नी ह्या कथेतून मांडले आहे. "ज्या व्यक्तीच्या आयुष्याचे तुकडे अनेकांकडे गहाण आहेत त्याने सुखी जीवनाचा अट्टाहास सोडावा."

अशाच गहाण पडलेले आयुष्याचे तुकडे सोडवणाऱ्या व ज्यांचा प्राण पाण्यावर तरंगणाऱ्या भेंडाच्या मोळीखाली तडफडतो आहे अशा डॉक्टर फाटक ह्यांची ही कथा. आईच्या हातांना जे यश होतं ते आपल्या हाती का लाभू नये ? ह्या प्रश्नाने च ते स्वतःला कोसत राहिले. त्यांनी सवतःला एक डॉक्टर, नवरा, मित्र म्हणून अपयशी मनलेच परंतु जेव्हा एक वडील म्हणून वाट्याला अपयश आले तेव्हा ते खचून गेले. बाहेरील जगापासून वेगळे करून एका बंगल्यात बंद करून घेतले. मुलीच्या अचानक जाण्याने त्यांच्या आयुष्याला लागलेली काळी बुरशी अधिकच दाट होत गेली.

आपल्या प्रत्येकावर असे कर्ज असतेच ज्याची सोडवण करणे आपल्याला भाग असते. पुढे त्या कर्जातून थोडे हलके होण्याची संधी प्रतिस्पर्धी डॉक्टर दातेंकडून चालत येते. रक्ताच्या मुलीला गमावल्यानंतर , एका दुसऱ्या मुलीचा जीव वाचवण्याचा योग त्यांच्या हाताना आला होता. भेंडाच्या मोळी खाली गहाण पडलेलं आयुष्य सोडवण्याची संधी परंतु ती सुद्धा हातून निसटून गेल्यावर डॉक्टर फाटक अपराधी मनाने परतत असताना, एक जुना मित्र भेटतो. ज्याच्या नजरेला ते

नजरही मिळवू शकत नसत, त्यांना आजूबाजूच्या अनोळखी चेहऱ्यांत ओळखीचा चेहरा पाहून सुख जागे झाल्या सारखे वाटले.

रामदास दिवगी नावाच्या मित्रासोबत त्याच्याच खोलीवर जुन्या आठवणींना उजाळा देताना त्यांना अनेक गोष्टींची उकल झाली. तामस द्रव्य जसजसे शरीरभर पसरू लागले तसतसे झालेल्या जखमांची जाणीव होत गेली. ह्या वेळी झालेली जाणीव ही इतकी उत्कट होती की त्यात वृंदाचा(त्यांच्या मुलीचा) भास झाला. अन तिच्या मिठीत विसावल्या नंतर डॉक्टर फाटक आयुष्यातले शेवटचे पण मनमोकळे हसले. अनेकांकडे गहाण पडलेल्या आयुष्याची सोडवण तर झालीच नाही...

त्यांचे नेहमी ठिकठिकाणी चष्मा विसरणे , शर्टाच्या खिशातून वर येणारे पेन सवयीप्रमाणे दडपून बसवणे ह्यातून नक्कीच जीएं ना काहीतरी वेगळे मांडायचे असणार... ह्याची उकल मला सध्यातरी झालेली नाही.

यतीन गुळवणी : छानच विवेचन! ठसठसणाऱ्या वेदना मांडण्यात जीएंचा हातखंडा आहे. एखाद्याच्या वेदनेच्या मुळाशी जीए वाचकाला हाताशी धरून इतक्या सफाईदारपणे

नेतात की वाचक अंतर्मुख होऊन अस्वस्थ होतो. खरेतर आपल्या सर्वांनाच काही ना काही शल्य असते, पण जीए त्यात समरस होऊन ते दुखणे स्वत: भोगल्याप्रमाणे अकृत्रिम

ओघाने प्रसंगात आणून

नेमक्या शब्दात व्यक्त करतात. अशा प्रसंगांच्या गुंफणीची विण इतक्या कलात्मकरीत्या बळकट करतात की आपण विस्मित होतो.

Paramjit Singh: सोडवण ह्या कथेत तले दोन फारच सुंदर प्रसंग. आयुष्यातील कारण आणि परिणाम यांची स्पष्ट कल्पना करून सदैव स्वच्छ

सूर्यप्रकशात निःशंक जगणारी जी पुष्कळ अत्यंत मूर्ख आणि उथळ माणसे असतात त्यापेकीच तो एक. त्याला काय सांगायचे,आणि त्याला समजणार तरी काय. कागदाची घडी घालावी त्याप्रमाणे त्याने आपल्या सोईप्रमाने जीवनाची घडी घालून ठेवली आहे. आणि त्या रकान्यात चांगल्या वाईटाचा शूद्र हिशोब तो लिहीत बसला आहे. त्याने कधी बेभान फेऱ्या घातल्या नाहीत त्याला काय संगाचे.

Paramjit Singh: Phaatkaana वाटले हे व्यवहरी हसणे डेल काँगीला पसंद पडले असते.

हा देशपांडे क्लब चा सेक्रतरी होता संगीत कार्यक्रमांत त्याची लुडबुड असे. नाटकातही तो आपल्या बायको बरोबर काम करी. तो वांगमय मंडळाचा कार्याध्यक्ष आणि कला मंदिराचा उपाध्यक्ष होता.त्याला माहित नव्हती अशी एकच गोष्ट होती ती म्हणजे त्याचा स्वतःचा डॉक्टरी धंदा. एखाद्या बोकड गांधरवा प्रमाणे रात्री नाटकात काम करायचा, हा कसला डॉक्टर हा तर शुद्ध खाटीक खुनी

विलास वाघोलीकर: 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐

- सोडवण कथा ही वेगळ्या ,डॉक्टरी पार्श्वभूमीवर आहे. जीएंनी घर, वस्त्र इ. कथांतही असे वातावरण दाखवले आहे.या कथेमध्ये डॉ फाटक मध्यवर्ती आहेत.पण इतर व्यक्तींभोवतीही कथा फिरते. रामदास दिवगी, पत्नी शालू, मुलगी वृंदा , तसेच महादू नोकर, नरोतम, डॉक्टर दाते, डॉ. दामले यांच्या भोवतीही कथा फिरते.

- डॉक्टरी व्यवसायातल्या खाचाखोचा दाखवल्या आहेत. डॉ. फाटकांच्या डोक्यावर बसणारे दारूचे व्यसन , त्यांचे कन्याप्रेम व पोहणे, कथेतील दोन अपघात यांचे वर्णन परिणामकारक पद्धतीने केले आहे. वृंदाचा अपघात व कथेशेवटी झालेला फाटकांना अपघात यांचे वर्णन करून, अपघाती मृत्यूचे तांडव कथेत दाखवले आहे. मानसशास्त्रज्ञाच्या कुशलतेने जीएंनी त्या वेळची मनस्थिती उलगडली आहे.

- कथेत डॉ फाटक महत्वाचे आहेत. दिवगीबरोबर शालूचे लग्न ठरले होते. ते मोडून फाटकांनी प्रेम विवाह केला. सिगारेट ओढणारा दारुडा, बेलगाम, अशा प्रकारे फाटक जगत होते. त्यांची लहान मुलगी वृंदा पोहायला गेलावर तो नरूकडे दारू प्यायला जातो. व दुसरीकडे पोहताना अपघात होवून ती मरते.

- दिवगी भेटल्यावर तो घसा कोरडा पडल्याचे सांगून रम पितो व चपटी बाटली खिशात ठेवतो. दारू चढते. त्याला भास होतात. (तळपट कथेत दानव्वाला रुक्मीचा भास होवून सर्पदंश होतो, त्याची आठवण होते.) त्याला रस्त्यावर वृंदाचा भास होवून तो बसपुढे जावून अपघाती मरतो.

- ही कथा अनेककेंद्री आहे. दिवगीही महत्वाचा आहे. तो उच्च शिक्षित पण दारूडा आहे. त्याचे शालूशी लग्न ठरले होते पण डॉ फाटकांच्या प्रेमविवाहामुळे झाले नाही. तोही भिरभिर फिरतो.

- ही कथा शालू -वृंदा भोवतीही फिरते. शालूला मन मोडून रहावे लागते. वृंदाच्या अपघाती मृत्यूनंतर ती नरोत्तमबरोबर पुण्याला परगावी जाते. कथेत इतर डॉक्टरांची चित्रे छान रंगवली आहेत.

- काही वाक्ये --(आई) - *तिने लावलेले झाड कधी गेले नाही व तिने कडेवर घेतलेले मूल कधी रडले नाही.*

- सगळ्यांना सगळा अर्थ समजला व कोणाला काहीसुद्धा गूढ वाटले नाही.

- मृत्यूसंबंधी - एखाद्या परिस्थिती व्यूहात मृत्यू होतो. कोरडेपणाने पाहीले तर ती घटना संभवनीयतेने झाली असे वाटते. पण ललित कलाकृतीत त्या माणसांशी संबंधीत इतर माणसांना तो मृत्यू नियतीबद्ध वाटतो. व कलाकृतीत ते योग्य असते."- हे अगदी असेच व्हावे असे फार पूर्वीच कुणीतरी लिहून ठेवले होते. - एखाद्या ब्ल्यू प्रिंटप्रमाणे." असे जीएंनी कथेत लिहिले आहे.

- अशी ही लहान गावातील ,अनेककेंद्री घटना दाखवणारी कथा एक लघुकादंबरी वाटते.

- धन्यवाद. विलास वाघोलीकर

💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐

संजीव सावरगांवकर: कथा : सोडवण

कथासंग्रह: रक्तचंदन

प्रथम प्रसिद्धी: 1962, हंस दिवाळी अंक

....

सभोवार काळा काळा,
सारा सपाट हा विस्तार |

दिशाहीन काळोखाला,
नाही मुळी अंतपार ||

जरी उडणे अटळ
हे पंख घेऊनी शापित |

कोठे जाशील पाखरा, काळोखांच्या दिगंतात ||

(कवी: नागेश, 1957)

माणसाच्या आयुष्याच्या उभारीत,ऐन उमेदीत पंखांमध्ये खूप बळ असत, तारुण्याचा उन्माद असतो. मी म्हणेल ती पूर्व दिशा असते. आणि तरीही प्रत्येकाच्या मनी काही खंत असते, अपूर्ण इच्छा असतात, हातून निसटून गेलेले काही अवघड

क्षण असतात, चांगल्या वाईट कडू गोड आठवणी असतात. आयुष्याच्या संध्याकाळी किंवा कणाहीन झालेल्या मनाच्या उभारी करता तुम्हाला तुमच्या भूतकाळ त्रास देतो. काही काही जुने गुंते, काही कोडी, काही हुमान आयुष्यात प्रयत्न करूनही सुटलेले नसतात. त्याचा एक गुंड गोळा होऊन मनावर बसतो. काही आठवते, काही आठवत नाही. काही सोडायचे आहे, पण ते सुटत नाही. नुसता विचार गोंधळ तयार होत राहतो.

कधी मन म्हणते तर कधी शरीर म्हणते यातून आता सुटका करून घेऊ यात. आणि त्याच्या गुंतळयातून सोडवून घेऊन ज्याला जमते तो यशस्वी होतो, तर त्या गुंतवली मध्ये अजूनही अडकत जातात व सोडवण अपेक्षित ठेवणारे असतात ते डॉक्टर फाटक यांच्यासारखी एक माणसाची मनोवृत्ती.

सारा गुंता झालाय आयुष्याचा, ज्याप्रमाणे त्या पेन मधील स्प्रिंगची ताकद कमी करून टोपण धरून ठेवण्याची शक्ती कमी करणाऱ्या गतिहीन, कायम उडणाऱ्या टोपणासारखा. टोपण आहे घट्ट न बसणारे, ते प्रतीक म्हणून घेतले आहे. सुटका होत नाही, सोडवण मिळत नाही, सहज सुटत नाही, प्रश्नांची उत्तर मिळत नाहीत पण मग टोपण जपावे लागतं, आपणच उघडे पडू नये म्हणुन.

डॉक्टर फाटकाच्या मेंदूमध्ये मागील आयुष्याच्या काळोखातील दिगंत आठवणींचा कल्लोळ, दारूच्या नशेत विसरायाच्या ह्या कल्पनेने, ह्या तंद्रीत असतानाच मृत्यू वेळ अनपेक्षित पणे डॉक्टरांवर झडप घालते. विचारांच्या गुंत्यातून, झालेल्या अपराधाच्या न्यूनगंडा मधून विद्यार्थ्यांनीच त्या नियतीने सुटका करून डॉक्टरांची कायमची पण अर्धवटच सोडवण केली आहे. मृत्यूच्या दरवाज्यात नेऊन सोडलंय पण जीव जाण्याची सोडवून मात्र झालेली नाही.

कथानायक डॉक्टर दादा फाटकांची न्यूनगंडाची माळ पार ते लहान असल्यापासून सुरू होऊन वर्तमान काळापर्यंत त्यांच्याकरता एक ठसठुसणारी जखमच होऊन राहिली आहे. ती अनिवार्य सल कायम त्यांचे काळीज सुद्धा ठसठसत ठेवायची. आईने आपल्याला खूप दिले तिच्याच बोटांना यश मात्र ती

द्यायला विसरली होती. परदेशी रुग्णांना करता चांगला हात गुण असलेले डॉक्टर , त्यांच्या वैद्यकीय ज्ञानाने आसमंतात प्रसिद्ध झाले होते,पण कमाई काही होत नव्हती. त्यांचे मित्र डॉक्टर त्यांचा वापर करून घेऊन स्वतःचा फायदा व व्यवसाय वृद्धी करून घेत होते. मात्र फाटकांचा दवाखाना कायमच ओसाड राहिला. त्यांचे असणारे दारूचे व्यसन, दारू पिण्याच्या नादापायी सख्या मुलीचा विहिरीत पडून झालेला मृत्यू, डॉक्टर, स्वतः डॉक्टरी पेशात असून पेशंटला दुर्मिळ रक्तगटाचे रक्त देण्याचा नकार देण्याचा नाकर्तेपणा दाखवतात. पत्नी शालू ने वृंदाच्या मुलीच्या अपघाती आकस्मिक मृत्यूनंतर परस्पर घराबाहेरच जाण्याचा घेतलेला निर्णय, व्यवसाय डबघाईला आलेला असताना सुद्धा जगण्याचा प्रयत्न करण्याची आशा सोडून देणे, या सर्व आयुष्य तुकड्यांच्या आठवणीतून मनाच्या तळापासून सोडवण व्हावी ही इच्छा मनी धरून आयुष्य जगण्याचे खंत त्यांना जगूही देत नव्हती आणि मरणही देत नव्हती.

डॉक्टरांच्या मनोविकारातून निराशावाद, चिंतातूर, आत्ममग्न, पराभूत, एकलकोंडेपणा, निष्क्रिय, माणूसघाणे,अबोल, अशी अंतर्मुख मनोवृत्त जाणवते. आयुष्याचा फोलपणा जाणवतो. कण्याचा ताठरपणा गमावलेले डॉक्टर हळूहळू सोडवणं न होणाऱ्या गर्तेत गुंतत जातात. त्यामुळे ते जीवनरस नसलेले, स्वताच्या आयुष्य रेषेपासून विलग झालेले, तुटलेपणाची आस असलेले जाणवतात.

त्यांना भोवतालच्या व्यक्तींशी, प्रसंगांशी, समाजाशी अर्थपूर्ण संबंध जोडता येत नाहीत व त्यात त्यांना अपयशच येते त्यामुळे पराभवाची एकाकीपणाची, तुटलेपणाची जाणीव, मनात असल्याने सोडवण करून घेणे अवघड होत जाते.

कथेतील डॉक्टर फाटकांच्या संदर्भात आलेले कथाभर पसरलेले त्यांचे मनोविचार गोळा केलेत तर काय जाणवतं.

1) त्यांना सिगरेट च्या व्यसनापासून सोडवण नाही.

2) स्वतः गुन्हेगार आहोत ही प्रबळ मनो भावना वृंदा चा बुडून आलेला मृत्यू, तिच्या अंगाला बांधलेले दोरी तुटून निर्जीव भेंडाची मोळी वृंदाला तरंगती न ठेवता स्वतः पाण्यावर तरंगत राहते. तर तिचे, वृंदाच रक्त आपल्या हातावर आहे आणि आपल्या स्वतः रक्तदान करून त्या रोगी मुलीचा जीव वाचवायचा का नाही या मानसिक उलघालीत सोडवण न होणारे मन मात्र विचार जास्त नकारात्मक करत जाते. डॉक्टर पेशाला न शोभणारी उत्तर देऊन ते उगीचच शब्दात अडकून बसतात. गाठी जास्तच घट्ट होतात पण सोडवणूक मात्र होत नाही.

3) शालूची प्राप्ती होऊन, संसार वेलीवर फुललेले वृंदा नामक फूल, दारूच्या आसक्तीत, फक्त दहा मिनिटे वृंदाकडे दुर्लक्ष झाल्याने,तिचा बुडून झालेला मृत्यू , त्याचा सल शालूला आयुष्यभर जाणवतो. डॉक्टर फाटक ना सोडून पुण्याला राजरोसपणे ती नरोत्तमाजवळ राहण्याचा निर्णय करून स्वतःची सोडवण मात्र करून घेते.

4) असेच देवगी बाबतीतही घडतं. म्हणजे देवगी डॉक्टर फटकांच्या करता एक आयुष्यसल होऊन बसलेला. भला मोठा काटा होऊन ही सतत हसत राहिला आहे. केंब्रिज रिटर्न या माणसाला आयुष्य सोपे करून जगण्याची कला अवगत होती. नवीन आयुष्य जगत, मोकळा बोलणारा माणूस. शालू बरोबर डॉक्टरांचे लग्न झाल्याचे कळताच त्यांचा खून करावा ही कल्पना मनी धरून डॉक्टरांच्या कडे गेला तर त्यावेळी डॉक्टर मुलीला पोहण्यासाठी घेऊन गेले म्हणून वाचले. त्याच गाफिल क्षणी दारूने त्यांचा घात केला. वृंदा चा मात्र जीव गेला. दिवगी मात्र बिंदास्त आयुष्य जगत, शालू वरील प्रेम, डॉक्टरांचा खून करण्याचा विचार, क्लबचा सेक्रेटरी, "कृष्ण विलास"(जगण्याची वृत्ती),रम (शौक)याचा फक्त वर्तमान जगणारा माणूस म्हणून तो कुठेही न अडकता या सर्वा मधुन करून घेतलेली त्याची स्वतःची ही सोडवणं.

5) दारूच्या नशेत देवगी कडून बाहेर पडल्यावर ती शारीरिक, मानसिक, दोलायमान परिस्थितीत वृंदाचे दिवा स्वप्न पाहत असतानाच तिला (?) वाचवायचे नादात बस पासून वाचलेले, खिशातील दारूची फुटलेली बाटली, अन रस्त्यावर

पडलेले फाटक, बेवडे म्हणून समाजाकडून हिणवले गेले. पण मृत्यू ने त्यांना कवेत न घेतल्याने आयुष्याचे भणंग तुकड्यांचे बेशुद्ध स्मृतीत मात्र कोणतीही सोडवणं न होता पडून होते.

त्यांच्या आयुष्याचा संपूर्ण असा विचार केला तर त्यांच्या आयुष्यात गहाणवटी तरी किती शिल्लक होत्या.की ज्यातून त्यांना सुटका मिळाली नाही, सोडवण सोडवण्याची संधी मिळाली नाही. त्या गहाण वटी म्हणजे

विहिरीत आयुष्याचा एक तुकडा,(वृंदा चा मृत्यू)रामदास कडे दुसरा, शालूकडे तिसरा, दारूमुळे चौथा , रक्तदान न केल्यामुळे पाचवा, स्प्रिंगची ताकद कमी झाल्यामुळे नेहमी टोपण उडणाऱ्या पेनची बटन दाबण्याचे प्रतिक्षिप्त क्रिया सहावा, यातून त्यांची कधीच सोडवणूक झाली नाही.

आणि हेच शल्य घेऊन डॉक्टर फाटक निष्फळ आयुष्याच्या शेवटी रस्त्यावर (बेवारस) बेशुद्धावस्थेत पडून होते. त्यावेळी त्यांचे पेन मात्र वेगळ्या प्रवासाला गेलेले होते.

निर्जीव गोष्टीलाही पुढे चाल मिळाली पण सजीव मात्र दुर्लक्षित राहिला.

लेखन सीमा

संजीव सावरगांवकर

सुनीळ सामंत: अतिशय सुंदर सुरुवात करून दिलीस गौतमी. धन्यवाद. पेन दडपून बसवण्याबद्दल तुला पडलेल्या प्रश्नाचे उत्तर संजीवजींनी अतिशय काव्यमय पद्धतीने दिले आहे. हे मलाही अजिबातच समजले नव्हते.

यतीनजी, संजीवजी आणि विलासजी तसेच परमजीतसिंगजी यांनी कथेतील इतके बारकावे नेमके टिपले आहेत की आता माझ्याकडे सांगण्यासारखे काहीच नाही.

१९५७ च्या या कथेत जीएंनी नियतीवादाची पक्की गाठ मारल्याचे जाणवले. ती नंतर पक्की होत होत इस्किलारमधे घट्ट झाली. दिवगी सुरा घेऊन फाटकांना मारायला आला होता. पण फाटक वाचले. हे त्यांचे व दिवगीचे सुदैव की दोघांचेही दुर्दैव? पण दिवगीला त्यातला नियतीचा संकेत समजला, फाटकांना तो समजला नाही. सांगूनही समजला नाही. कारण (प्रवासी-) ज्ञानाचा क्षण मागेपुढे करता येत नाही.

विलासजींनी म्हटल्याप्रमाणे ही कथा अनेक केंद्री आहे. वृंदाला शाळेच्या ट्रिपबरोबर जायचे असते, पण आई बरोबर जायचे म्हणून ती ट्रिपला जात नाही आणि पोहायचे म्हणून आईचा हात झटकते. शालूचे लग्न ठरते दिवगीबरोबर, करते फाटकशी आणि रहाते तिसऱ्याबरोबर. घोड्यावर बसायची ईर्ष्या आणि घोड्याची भिती एकत्र देऊन दैवाने विनोद केलेले डॉ. दिवगी.

या कथेतील प्रत्येकच पात्राची एक एक वेगळ्या वर्तुळातली कथा आहे. अगदी पेनाचीही.

फ़ारच सुंदर कथा. समजून वाचावी तितकी उतरत जाते. आत आत.

दिलिप बडे: https://youtu.be/dQR_ka5m0dM

सोयरे ◆ जी.ए. कुलकर्णी ◆ सांजशकुन

अलका तडकलकर : ◆ कथा-सोयरे ◆ लेखक-जी.ए. कुलकर्णी

◆ पुस्तक-सांजशकुन

....

◆ कथावैशिष्टये- 1.रंगांचे सांकेतिक अर्थ लक्षात येतो 2.कथेत बिभित्स ,करूण रस शेवटपर्यंत भरून आहे.3 कितीदाही वाचा लवकर कळत नाही.3 कर्म सिद्धान्ताची खूप सुंदर मांडणी

....

◆ कथेतील टप्पे/दृष्ये

दृष्य1

एका मंदिराला असंख्य पायऱ्या आहेत.तो अर्ध्या पायऱ्या चढून जातो कुठल्यातरी आशेने मनोमन सुखावत. त्यामुळे मंदिराभोवती त्याला सगळेच सुखावणारे दृष्य दिसत असते. मंदीराची पुष्करिणी,नील मण्यासारखे पाणी, लाल कमळे इ.

ते मंदिर कोणत्या देवतेचे आहे हे त्याला माहीत नाही.तिथे काय घेऊन जावे याचीही कल्पना त्याला नाही पण

मन आसावले असल्याने समोर एक समोर मुलगी येते तिच्या हातात अनेक हार असतात एखादा तरी विकत घ्या म्हणते. याला तिचा निरागस भाव आवडतो

झगझगीत नाणे देत एक पांढऱ्या लाल फुलाचा हार घेतो.मंदिराच्या दालनात प्रवेश करतो.

दृष्य2

गाभाऱ्या जवळ एक रेखीव आकृतीची तरूणी फुले वाहत असते.तिला पाहताच हा धुंदावतो. बावरतो. तिच्या एका दृष्टीक्षेपात स्वतःला विसरून तिच्या मागे धावतो.

दृष्य3

त्याचे पाऊल चुकते.दृष्टी भ्रमिष्ट होते आणि अंधाऱ्या पायऱ्या उतरत तेलकट भिंतीवर डोके ठेचकाळत,रक्तबंबाळ होत तिचा शोध घेत एका विस्तीर्ण चौकात येतो.तिथले दृष्य बिभित्स असते.ओंगळवाणे. न पाहावणारे. हा तिथून वेगाने बाहेर पडू पाहतो.तोच एक रोगिष्ट मुलगी त्याची अनामिका पकडते व मला अंगठी दे म्हणते (अन्वयार्थ वेगळाच)

तिच्या त्या स्पर्शाने हा भयभीत होतो.वेड्यासारखे हातवारे करत पळत सुटतो.पुन्हा अनेक अंधाऱ्या पायऱ्या उतरत घाणेरडी चिवट कोळिष्टके पाहत पुढे सरकतो.मनात काहीशी घालमेल सुरू होऊन तिचा शोध घेऊ लागतो.

दृष्य4

एक करारनामा जिना चढून जुनाट दार ढकलताच ती दिसते.गुडघ्यात मान खाली घालून. भिंती जवळच्या एका चौरंगावर. तिला हा ओळखतो. हा मध्ये जातो तर तिथे जांभळया रंगाच्या चेहऱ्याची अनेक माणसे याला दिसतात. ते यास म्हणतात आम्ही तुला दसऱ्याचे सोने देण्यास थांबलो आहोत (सूचक सीमोल्लंघन)

हा सर्वांना अडवत तिला तिथून सोडवून नेऊ पाहतो. परंतू ती यास तिरस्काराने झिडकारते. जे यास अनपेक्षित असते.जिच्यावर जीव जडला तिचे असे वागणे मन बधिर करते. जळून खाक होतो.निर्जीव होतो

दृष्य5

पुन्हा खूप पायऱ्या उतरत जातो.यावेळी त्यास विषारी हिरवेगार पाणी असलेली पुष्करिणी,हाडे धुवणारा सांगाडा , शिळया वाळलेल्या पाकळया दिसतात(सारेच अर्थपूर्ण).

सभामंडपात येताच यास

त्यास कीड लागलेली फरशी दिसते.गाभाऱ्यात एक अजस्र माणूस दिसतो.त्याच्यासमोर एक अणकुचीदार चोचीचे घुबड असते.तो लालभडक पक्षी वाहत असतो.

त्या माणसाला चेहरा नसतो.

दृष्य6

पुन्हा एक विस्तीर्ण चौक तेथील भिंतीना छत नाही व अंधारात सावल्या सतत घुसळून जाणाऱ्या वर लाल रंगांचे अनेक डोळे तरंगत असतात.इथे त्यास आपल्या पापाची जाणीव होते.निष्ठूरपणाचीही.तशा त्या कुंद, अमंगल ठिकाणी आपल्या पापाचा सोक्षमोक्ष लागणार हे यास कळून येते..बोटे नसलेली ती मुलगी पुन्हा यास भेटते अंगठी मागते.बोट तोडू घेऊन निघून जाते.त्या अंधारात अनेक (तुटलेल्या बोटांची) माणसे दिसतात.ते यास म्हणतात आता तू इथेच रहा.कारण तू आता आमच्या पैकी एक आहेस.आम्ही तुझे सोयरेआहोत

- कथा सारांश

दुसऱ्यास नरकाच्या यातना दिल्यास आपल्यालाही तीच नरकयातना भोगणे क्रमप्राप्त असते.हाच कर्म सिद्धांत

.... 🌹

धन्यवाद.

कथाविवेचन- डॉ अलका तडकलकर

मंजिरी देशमुख: सोयरे या अतिशय कठीण कथेचं वाचकाला कथा समजून घेण्यास मदत करणारं विवेचन आवडलं.

अलका तडकलकर : 🙏 अगदी खरे आहे.

आता इथून सुरुवात होईल. जी कथेचे बारकावे उघडण्यासाठी उपयोगी पडेल.

मंजिरी देशमुख: सोयरे या कथेतील रंगांचा वापर वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यातील जांभळा रंग मृत्यू दर्शवतो असं वाटतं. “आम्हाला जांभळा रंग आवडतो. आम्हाला बिनआठवणीचे ओठ आवडतात” या वाक्यावरून मला सोयरे ही कथा मृत्यूशय्येवर असलेल्या व्यक्तिची कथा वाटते. जीवन-मृत्यूच्या हिंदोळ्यावर असलेला तो हातून घडलेल्या चुका व त्यापोटी आलेली पश्चात बुद्धी आणि जीवनात न मिळू शकलेल्या व आता कायम वंचित राहिलेल्या गोष्टीं या दोन्हींमुळे कष्टी झालेला असा प्रारंभीचा तो नंतर सर्व आठवणी विरुन गेलेला व प्राक्तन स्विकारलेला अशा त्याची ही कथा आहे. थोडक्यात ही मृत्यू च्या वाटेवर निघालेल्या प्रवाशाची कथा आहे असं वाटतं.

व्यक्तीचा मृत्यू पर्यंतचा प्रवास दाखवणारी कथा वाटते ही.

दिलिप बडे: https://youtube.com/watch?v=4-jO-J5Icoc&feature=share

सोयरे; वाचन कस्तुरी आफळे

संजीव सावरगांवकर: कथा : सोयरे

कथासंग्रह: सांज शकुन

प्रथम प्रसिद्धी - "प्रतिष्ठान ऑक्टोबर 1968"

आस्वादक: संजीव सावरगांवकर, कोथरूड, पुणे.

7350002870

****

उतरती उन्हे,
काढती खपल्या |
लांबल्या सावल्या, आयुष्याच्या ||

अंगणात उभे,
वास्तव निशब्द |
शेवटी प्रारब्ध,
उरलेले ||

कविता:
संधिकाल
कवी:अनामिक

**** सोयरे ही मूळ कथा अभ्यासाला व वाचनासाठी घेतली तेंव्हा खालील वाचनात आलेले जी. ए. यांच्या कथेचे बाबत काही विचार लिहायचा मोह आवरत नाहीये.

"कथा" हा गद्य कथात्मक साहित्याचा एक स्फुट प्रकार असल्याकारणाने व तिच्या मर्यादित अवकाशामुळे कथेत व्यक्तिचित्रण करताना सामान्यतः व्यक्तीच्या जीवनातील एखाद्या टप्प्याचे, अवस्थेचे किंवा विशिष्ट जीवन अनुभवाचे चित्रण केले जाते. पण जीए मात्र आपल्या कथेत केंद्रस्थानी असलेल्या व्यक्तीच्या समग्र जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न करतातच. शिवाय बऱ्याचदा ते दुय्यम स्त्री पात्रांचे चित्रण हे मुख्य पात्रा इतकेच तपशिलाने, संवेदनशीलतेने करताना दिसतात. त्यांच्या

या वैशिष्ट्यविषयी रा.ग. जाधव लिहतात "आयुष्याचा एखादा छेद किंवा एखादा काप म्हणजेच स्लाईस किंवा एखादी कक्षा व भावस्थिती प्रकाशित करण्यासाठी जीए कथा निर्मितीला उद्युक्त झाले आहेत असे वाटत नाही, म्हणूनच त्यांच्या कथांना कादंबरीचे "वजन" प्राप्त होते असे म्हटले जाते. "

सोयरे कथा हा कोणाही एका व्यक्तीच्या आयुष्याच्या बालपणापासून मृत्यू रेषेपर्यंत झालेला प्रतीकात्मक प्रवास आहे. कथानायक मी म्हणजे कोणीही व्यक्ती अभिप्रेत आहे. कथेत "मी" कधी मागे फिरलेला नाहीये, तो पश्चात्ताप झालेला दिसत नाहीये. या शेवटच्या प्रवासातील चढउतार जरी असले व ते त्याला पूर्णता माहिती नसले, तरी ते अनुभव घेताना त्याची उलघाल होत नाही. तो पुढे चालतच राहतो. आलेले आणि येणारे अनुभव, लहान मुलगी, तरुणी, स्त्री या रूपात त्याला त्याच्या सहनायिका कथेत प्रवाह पतीत ठेवतात. पण या प्रतिमा स्वतः मात्र अलिप्त राहतात.

अर्ध्या पायऱ्या चढूनही "मी" चे अंग सावरेच्या बोंडा प्रमाणे (हलके सर) झाले होते. कोणत्यातरी आशेने "मी" रेंगाळतो. डाव्या बाजूने आलेली मुलगी, बालिका, तिचा हसरा चेहरा व नाचरे निरागस डोळे यांच्या सुखाने त्याचे मन ओसंडत असताना तिच्या हातावर एक झगझगीत नाणे ठेवून, देवळात वाहण्याकरता एक लाल पांढऱ्या फुलांचा हार घेतो. जणू तो त्याचे बालपणच घेऊन मंदिराकडे निघालाय.

निम्मा प्रवास झालेला "मी" तारुण्याच्या मंदिरात प्रवेश करता झाला व त्या तरुणी च्या एका कटाक्षाने त्याचे सारे आयुष्य संपून, संपुष्टात ठेवल्याप्रमाणे झाले. मंदिरात नेलेला हार त्याने मूर्ती कडे टाकला, म्हणजेतोअर्पणcकेला नाही. (तारुण्य, संस्कार जाणत नाही पण तरुणीच्या स्त्रीच्या तारुण्याची धुंदी मात्र जाणते व अशा अनपेक्षित कृती घडवूनआणते, हे कदाचित अभिप्रेत असावे).

मंदिरात उजवीकडे जाणारा " मी " याचा अर्थच मुळी असा निघतो की अनैसर्गिक प्रदक्षिणा घालणे (आपली नेहेमीचीच प्रदक्षिणा डावीकडून सुरू होऊन उजवीकडे पूर्ण होते), संस्कारविरुद्ध,रूढी विरुद्ध कृती करणे व त्याचे फळही लगेचच

"मी" ला मिळते. "मी" चे पाऊल चुकीचे पडते. तो गर्तेत सापडतो. नरकासमान चक्रव्यूहात सापडतो. होत्याचे नव्हते होऊन जाते.

त्याला सभोवतालच्या वातावरणाची माहिती नाही. त्यातील खाचाखोचा समजत नाही. आणि पायात पुढे जायचे बळ नाही या अवस्थेत "मी" असताना, ती मुलगी येते. आता ती हसरी नाही, अवखळ डोळ्याची नाही, निरागस हास्याची नाही, प्राजक्तासारख्या सोनसळी कातडीचे नाही. तिचा विटलेला चेहरा, ठसठशीत सुजलेले सर्वांग असलेली, बोटे नसलेल्या हाताने तिने "मी" कडे सोन्याचे अंगठी मागितली आहे. सोने शुद्धतेचे प्रतीक आहे तर अंगठी बंधनाच प्रतीक आहे आपल्या संस्कृतीत शुद्ध बंधने, प्रेम, निष्ठा, अव्यभिचारी वर्तणूक, श्रद्धा याचा प्रतीक आहे. त्या बंधनातून मुक्त व्हा असे तिचे अपरोक्ष मागणे "मी" कडे आहे हे जाणवते.

"मी" ची मानसिकता, विचारधारा अजूनही शुद्ध व पवित्र असल्याने त्यापासून सुटका करून घेणे या एकाच विचाराने दाट छाया विस्कटत "मी" धावत सुटला, भरकटला. पण तिच्याबाबत (ती कोण हे एक गूढ आहे बर का) "मी" ला त्या क्षणी एक निराळीच भावना कुरतडू लागली की तिला घेऊन या ठिकाणाहून दोघांनी निसटले पाहिजे. असे सारखे त्याला वाटू लागले. पुढे ती दिसताच तिला भेटण्याआधी व घेऊन जाण्याआधीच अडचणींचा डोंगर त्याच्या पुढे पुढे उभा राहतो तो शिरस्त्राण घातलेल्या माणसांच्या रूपाने. त्यांच्या तोंडी अकल्पित, अनभिज्ञ अशा कल्पना बोलल्या गेल्या गेल्या, त्याचा संदर्भ "मी" ला काही लागला नाही. "चेहऱ्यावर जांभळा रंग आवडतो, बिना आठवणीचे ओठ प्रिय वाटतात व दसऱ्याचे सोने तुला देण्यासाठी थांबलो आहोत" (यावर या क्षणी तरी काही कल्पनाविस्तार व वेगळी विचारधारा लगेच मला लिहिता येईल असं वाटत नाही कदाचित पुढे काहीतरी सुचलं तर ठीक)

(हे प्रिय व्यक्ती) चल माझ्याबरोबर येथून आपणाला तात्काळ निसटले पाहिजे, "मी" ने तिच्या खांद्याला स्पर्श करत म्हटले. माणसाच्या आयुष्यात असे काही प्रसंग येतात की त्यावेळेस त्या घटनेमध्ये आपण आपल्या प्रिय व्यक्तीला गृहीत धरून

चालतो व त्या अप्रिय घटनेपासून, शब्दांपासून माणसांच्या पासून दूर नेऊ इच्छित असतो. अगदी त्याच क्षणी आपण निष्कारण (म्हणजे तेव्हा आपल्याला दुसऱ्या व्यक्तीची कारणमीमांसा माहीत नसते, आपण झिडकारले जातो, अपमानित केले जातो) व आपला अपेक्षाभंग होतो. ते करणारे आपले सोयरेच असतात. त्याच वेळेस सामाजिक व्यवहारही हेच सांगतो अति प्रेमच तुम्हाला अतीत व द्वेषा कडे घेऊन जातं.

कथेचा गाभा सांगणारे खालील वाक्य जीए यांना ज्या क्षणी सुचलं व ज्या क्षणी ते शब्दबद्ध केलं गेलं त्यावरून त्यांची शब्दांवरती हुकूमत, निसंदीग्ध वाक्यरचना व साहित्य बुद्धिमत्ता याचे कौतुक केले पाहिजे. या अशा प्रकारच्या त्यांच्या विचाराला अजूनही गेल्या पन्नास वर्षात तोड नव्हती व पुढील पन्नास वर्षात नसणार आहे. एवढे विचार पूर्ण गर्भित अर्थ असणारे विचार वाक्य परत लिहिले जाईल असे वाटत नाही.

काही वैश्विक विचारी लेखक म्हणतात "तुम्ही जेवढे वैयक्तिक लिहाल तेवढेच ते वैश्विक होत जातं". जीएन चे हे वाक्य वैयक्तिक नसलं तरी वैश्विक व मानवाचे मनापासून चे दुःख सांगणारे आहे हे निश्चितच.

तिचा तिरस्कार जाणवताच माझे सारे शरीर बधिर झाल्यासारखेच झाले. ज्या एका व्यक्तीने आपल्याला स्वीकारावे अशी तीव्र इच्छा मला होती त्याच नेमक्या व्यक्तीने मला झिडकारले होते आणि ज्या एका व्यक्तीला स्वीकारण्यासाठी माझे सारे आयुष्य तहानलेल्या रोपाप्रमाणे आसुसलेले होते, त्या नेमक्या व्यक्तीला नाकारण्याची वेदना आता माझ्या वाट्याला आलेली होती.

या वाक्याबरहुकूम आपले सोयरे च फक्त असे वागू शकतात हे अगदी त्रिकालाबाधित निखळ शुभ्र निर्विवाद सत्य आहे. त्याची प्रचिती

अगदी आदीकालापासून, रामायण, महाभारतातील अनेक कथा, दृष्टांत, विचार, कृतीतून अगदी आजच्या क्षणापर्यंत आपणही आपल्या आयुष्यात अनुभवले आहे, अनुभवतो आहोत, असा हा विचार आहे.

ते वाक्य आपल्याला डसते व तो डंख जास्त दाहक विषारी व सार्वकालीन आपल्या मृत्यूपर्यंत आपल्याबरोबर राहतो. आणि ही जखम बरीही होत नाही व कोणाला आपण ती दाखवू पण शकत नाही.

कथेमध्ये त्यावेळची मानसिक स्थिती जीए यांनी अगदी विषारी वाग्बाण वापरून शब्दांकित केलेली आहे.

"मी" निर्जीव पावले टाकत माघारी वळतो मी बाहेर पडतो. "मी" चा आता मृत्यू देवते कडे जाण्याचा प्रवास चालू आहे. समोर मृत्यू मंदिर दिसतंय, आता जे अनिवार्य आहे ते भोगलेच पाहिजे असे निर्विकार धैर्य "मी" मध्ये आलेले आहे? जो काय आयुष्यातील बांधून ठेवलेल्या सोयरीक सोयऱ्यांचा, नातेसंबंधांचा , सोक्षमोक्ष होणार आहे या विचाराने "मी" चे मन स्थिर झालेले आहे.

शेवटच्या क्षणी मोह सुटला आहे. मृत्यूची वाट पाहत "मी" उभा राहतोय न राहतो तोच तीच छोटे हाताची बोटे नसलेली पंजात त्याची बोटे हातात घेतलेली मुलगी आली. व "मला ही अंगठी दे" म्हणाली. "मी" ने हे सर्व निरपेक्ष निर्विकारपणे स्वीकारले. त्याच्या त्या निर्जीव, सुजलेल्या मृत हातातून ते बोट अंगठी सह सुटून आले व ते बोट व अंगठी घेऊन ती मुलगी निघून गेली.

मर्त्य विश्वात ही "मी" ला आता बंधनात ठेवणार काहीच नव्हतं. ना शुद्ध सोने, ना अंगठी,ना श्वास, ना शरीर, ना भावना,ना नातीगोती. "मी" मुक्त होतो आहे असा त्याचा (गैर) समज होता. असा गैरसमज होत असतानाच मी भोवती जमलेल्या सोयर्यांपैकी एकाने बोट नसलेला पंजा हातात घेतला व म्हणाला "आता तू येथेच रहा, तू आता आमच्यापैकीच एक झालाआहेस, आता आम्ही तुझे सोयरे आहोत आणि "मी" परत एकदा सोयऱ्यात आला व एका कोपऱ्यात निर्विकार पणे बसलो.

इथे कथा संपते.

कथेचे कडे एका वेगळ्या दृष्टीने आपण आता पाहणार आहोत.

1) जीएन च्या कथांमध्ये प्रतिमा - प्रतिकात्मक गोष्टींचा विलक्षण प्रभावी वापराविषयी केशव सदरे म्हणतात

"त्यांच्या कथातील प्रतिमा या त्यांच्या आशयाचे अलंकारण नसते तर ती जन्मजात कवच कुंडले असतात... त्यांच्या कथा म्हणजे या प्रतिमा आणि प्रतीक यांचा खेळ असतो. आणि प्रत्येक प्रतिमेला आणि प्रत्येकाला आपले कार्य व स्थान असते. बऱ्याचदा या कथांमध्ये एक मुख्य प्रतिमा व प्रतीक असतं एक विशिष्ट भाववृत्ती वा विचार अधोरेखित होतो आणि पोषक अशी अनेक प्रतीके व प्रतिमा आपापल्या जागी जाऊन बसल्या की लेखकाला अभिप्रेत असेल हा मूळ अर्थ अधिक प्रभावीपणे व्यक्त होतो.

2) जीएन च्या प्रतिमा निर्मितीच्या वैशिष्ट्या विषयी धो. वि.देशपांडे लिहितात

"जीए प्रतिमा मध्ये बोलतात आणि त्यांची प्रतिमा जेवढे काही व्यक्त करते त्यापेक्षा अनेक आयाम सूचित करते. या सूचित अर्थामुळे या प्रतिमेची व्याप्ती रुंद होते आणि त्यांनी वर्णन केलेल्या विचित्र विश्वाचे रंग स्पष्ट होतात. पात्रांच्या वर्णनातही तिचा प्रत्यय येतो. एकाच कलाकृतीत जेव्हा एखादी प्रतिमा वारंवार आवृत्ती(repeat) होते तेव्हा ती प्रतीक बनते ,तिला एक वैचारिक जीवनसापेक्ष अर्थ मिळतो. 3) प्रतिमा मुख्यता भाव संक्रमक आणि काही प्रमाणात विचार संक्रमक असते, तर प्रतीक मुख्यता विचार संक्रमक व ज्ञान संक्रमण असते, असे सांगून कुल्ली म्हणतात

"एका विशिष्ट दृष्टिकोनाचा अविष्कार करणारा प्रतिमेस प्रतीक म्हणता येईल. प्रतिमा जीवनातील सुट्ट्या क्षणांचा समुच्चय असतात, उलट प्रतीक जीवनातील सूक्ष्म आणि खोल अशा एकत्र वर आधारित असते आणि म्हणून प्रतीकाचा एक पदर नेहमी परंपराधीष्ट व समाजशापेक्ष असतो. जीवन प्रवाहाशी अनुबंध राखणारा असतो. जीएन च्या कथेच्या झुंबर मधील लोलक म्हणजे प्रतिमांचे वेगळे रूपच.

किंबहुना त्यांची सारी कथा म्हणजे एक मोठी प्रतिमाच असते आणि तिला तिचा आकार मिळतो तो लहान लहान प्रतिमा मधूनच.

4) जी. ए.आपल्या कथेतून जेव्हा मानवी जीवनाची शोकांतिका उभी करतात तेव्हा केंद्रस्थानी असलेल्या व्यक्तीच्या जीवनाशयाचे दर्शन एका मध्यवर्ती प्रतिमेतून करतात व या मध्यवर्ती प्रतिमेला पूरक अशा छोट्या छोट्या प्रतिमांचे गुंफण तिच्याभोवती करतात. त्यामुळे भावाशयाला अष्टगंधता येते आणि या प्रक्रियेत केंद्रभागी असलेल्या प्रतिमेचे रूपांतर प्रत्येकात होते लेख व लेखकाचे जीवन जाणीवची प्रतीती या प्रतिमा प्रत्येकांमधून घडते. वरील विचार आशयघनतेचे मुळे कथेतील प्रतिमा आणि प्रतिका चा वापर ,सोयरे कथा वाचनाला अधिक समृद्ध करतो व वेगळे वाचन आयाम तयार करतो.

लेखन सीमा

10 एप्रिल 2023.

संजीव सावरगांवकर: संदर्भ पुस्तक: जी. ए. यांच्या कथेतील स्त्री विश्व. लेखिका: डॉक्टर प्रमदा उज्ज्वल गावस देसाई. साभार

मंजिरी देशमुख: सोयरे या कथेचं अतिशय सुंदर आणि अभ्यासपूर्ण विश्लेषण.

यतीन गुळवणी : अलकाताईनी उघडलेल्या घड्यांतून संजीवजीनी आणखी सूक्ष्म पदर उलगडून दाखवले. दोघांचे मनपूर्वक आभार!

सहज एक विचार मनात आला. जी. ए. असताना ही चर्चा होऊन जर त्यांच्या वाचनात आली असती तर त्यांची प्रतिक्रीया काय असती. त्यांना नेमका हाच अर्थ अभिप्रेत असावा की या कथेला

आणखी कंगोरे असू शकतील?

मनमोहन आंबेकर: जी ए यांनी यावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नसती.

सुनीळ सामंत: अतिशय सुंदर आणि चतुरस्त्र विवेचन. या कथेची मांडणीच अशी आहे की प्रत्येक वाक्य काहीतरी वेगळीच दिशा देतं. त्यामुले एखाद्या गुंत्यात किंवा चकव्यात सापडल्यासारखे होते. संजीवजींनी तो गुंता अगदी हलक्या हाताने सोडवला आहे.

राजेश उनवणे : मार्मिक सुतोवाच. 👌

यापूर्वीही “विदुषक” या दीर्घ कथेवरील आपले आटोपशीर सुतोवाच उल्लेखनीय होते.

ही कथा समजण्यास अवघड वाटते. त्यावर सूतोवाच करणे त्याहूनही अवघड.

पण सोयरे कथेच्या सुतोवाचमध्ये आपण काही कथेची वैशिष्ट्ये नमूद केलेली आहेत.

1.रंगांचे सांकेतिक अर्थ लक्षात येतो 2.कथेत बिभित्स ,करूण रस शेवटपर्यंत भरून आहे.

3 कितीदाही वाचा लवकर कळत नाही. 4. कर्म सिद्धान्ताची खूप सुंदर मांडणी.

सुतोवाचचा शेवट करताना कथेचा सारांश -

दुसऱ्यास नरकाच्या यातना दिल्यास आपल्यालाही तीच नरकयातना भोगणे क्रमप्राप्त असते.हाच कर्म सिद्धांत

असेही नमूद केलेले आहे.

ही कथा वाचताना वाचक भांबावून जातो. समजायला अवघड वाटते. आणि ते खरेही आहे.

पण सूतोवाचमधील वैशिष्ट्ये व सारांश यावरून आपण कथेचे अनेकदा वाचन व चिंतन केलेले जाणवते.

आदरणीय जीए यांच्या अशा प्रकारच्या कथामध्ये नेहमीच एक मुख्य विषय किंवा थीम असते. त्या थीम भोवती अनेक रुपकांची, प्रतिकाची, त्यांच्या वेगवेगळया विषयावर असलेल्या ज्ञानाची अतिशय प्रभावी शब्दात व खास जीएं शैलीत त्यांची गुंफण ते करतात.

वाचक त्या रुपकात, प्रतिकामध्ये अडकून पडतो. मूळ थीम पासून दूर जातो. आणि कथा दुर्बोध वाटायला लागते.

आपले सुतोवाच वरून कथेच्या मूळ विषयापर्यंत आपण पोहोचलेला असल्याची जाणीव होते. ही जाणीव आपण लवकरात लवकर शब्दबद्ध करावी, ही अपेक्षा करतो.

जेणेकरून त्यातील रुपकांचे-प्रतिमांचे अर्थ समजण्यास मदत होईल.

विशेषतः सुतोवाचच्या शेवटी-- "दुसऱ्याला नरकयातना दिल्यावर, स्वतः भोगणे क्रमप्राप्त असते" -- या कथेच्या सारांशवर आपले विवेचन वाचायला आवडेल..!

श्रीकांत देशमुख : अतिशय सुंदर सुगम्य असे सुतोवाच. कथा वैशिष्ट्ये, त्यातील टप्पे व दृप्ये यांची फोड करुन लिहिलेले. त्यामुळे आम्हा सामान्य वाचकांस कथा समजण्यास खुप मदत झाली. धन्यवाद. 🙏

श्रीकांत देशमुख : संजीवजी आपण विश्लेषणा सकट केलेले विवेचन अतीशय सखोल अर्थगर्भ असुन कथेचे वाचन मनन अभ्यास ई. कसे व्हावे याचा परीपाठ आपण घालुन दिलात. अनेक सुटलेले संदर्भ व दुवे समजण्यासाठी मदत झाली.

सुनीळ सामंत: सोयरे ही जीएंची १९६८ सालची कथा. त्यांचे वय ४४ वर्षांचे. साधारण अर्धे आयुष्य झाल्याची भावना या वयात येते.

कथेतही पहिल्याच दोन ओळींत नायकाची ही भावना आहे. आयुष्याच्या अर्ध्या पायऱ्या सरल्याची भावना. कसल्याही ठामपणाची भावना नसणे व हलके असणे म्हणजे विद्यार्थी असण्याची, नवे शोधण्याची व घडवण्याची आस असण्याची खूण. त्यामुळे नेमक्या कोणत्या देवाच्या वा देवीच्या मंदिरात आपण पोहोचणार आहोत याची शाश्वती नसली तरी काही भव्य उंच ठिकाणी पोहोचण्याची खात्री आहे. एका निरागस चेहऱ्याच्या मुलीने दिलेला संमिश्र फ़ुलांचा हार तो घेतो. तांबड्या म्हणजे ऊग्र आणि पांढऱ्या म्हणजे शांत रंगाची फुले. यातून नायकाच्या मनातील कोणतीही गोष्ट स्विकारण्याची तयारी दिसते. जग निरागस आहे ही भावना दिसते.

नायकाच्या मनाची ती अवस्था बदलते एका तरुणीला पाहिल्यावर. एवढावेळ कसलाच मोह, आकर्षण, दिशा, ध्येय नसलेला तो आता मात्र एकदम त्या तरुणीच्या प्रेमातच पडतो आणि मागचा पुढचा विचार सोडून देतो. मन बावरते, दृष्टी भ्रमिष्ट होते.

आधीची अवस्था मनमोकळे, मुक्त आयुष्य जगण्याची होती. ती आता संपली आहे. एक स्पष्ट महत्वाकांक्षा जन्माला आली आहे. ध्येय मिळाले आहे. आता

ध्येयासोबत दुःखेही येतात, वासना येते, संकटे दिसतात, भय निर्माण होते, वास्तव चटके देते.

तेव्हा भेटते ती हार देणारी मुलगी. तिची निरागसता आता लोप पावली आहे. किंवा तिच्यात निरागसता पहाणारी नायकाची दृष्टी बदलली आहे. आता तो "ती " च्या आठवणीने आणि काळजीने व्याकुळ झाला आहे. आपल्या ध्येयासाठी अधीर झाला आहे.

पण! पण जिच्यासाठी नायक व्याकुळ झालेला होता तिनेच त्याला झिडकारले. तिच्या डोळ्यांतला तिरस्कार त्याला जाणवला. हे ध्येय आता साध्य होणे नाही याची कल्पना आली आहे. आपल्याला जे जगावेगळे काही करायचे होते तसले काही नाही होणार. आता आपणही हजारो इतर लोकांप्रमाणेच सामान्य किड्यासारखे आयुष्य जगणार याची जाणिव झाली आहे.

यापुढे तो वास्तवाला शरण गेला. त्याने ज्या मुलीला लाथ मारली होती तिच्याच हातात हात देऊन आपली अंगठी तिला बोटासकट काढू दिली. आसपासच्या समाजानुसार वागण्याची ही त्याची सुरुवात होती. आता तो त्यांच्यापैकीच एक झाला आणि ते त्याचे सोयरे झाले.

आयुष्यात काहीतरी वेगळे भव्यदिव्य करण्याची महत्वाकांक्षा असताना, ज्याला सामान्य लोकांचे आयुष्य हे नरकासमान, कीड्यांसमान वाटे, आयुष्याच्या धबडग्यात त्याचीही तीच गत होते आणि तो तसेच सामान्य आयुष्य जगायला भाग पडतो

यापूर्वीही मी लिहिले होते की सांजशकुन या कथासंग्रहातील कथांचा क्रम हा एक वैचारिक दिशा सुचवतो. सुरुवातीच्या कथा आत्यंतिक निहिलिस्ट व निराशावादी स्वरुपाच्या आहेत. आयुष्य निरर्थक असून हे सर्व काही शून्य आहे अशा आशयाच्या. पण हळू हळू हा विचार बदलत जाऊन मानव आपल्या कुवतीनुसार लहान वा मोठी खूण ठेवतो व हे जग वेगळ्या दिशेला नेतो , हे जग मानवी प्रयत्नांनी भरलेले आहे अशा प्रयत्नवादी कर्मवादी आशयाच्या कथा आहेत.

ही कथा वाचताना तिची तुलना आधीच्या क्रमाने, कालानुसार नव्हे) पत्रिका, अस्तिस्तोत्र वगैरे कथांशी करताना मला हे पुन्हा जाणवले.

- सुनीळ सामंत

विलास वाघोलीकर: आपण या कथा उकरण्याची छान सुरूवात केली आहे. धन्यवाद. आपला वेळ देवून, कोळाष्टके असलेला महाल, सांगाडा, जांभळे मास इत्यादीवरही थोडे फार लिहावे ही विनंती. गुड डे. विलास वाघोलीकर

अलका तडकलकर : ही कथा वाचल्यावर मला काही प्रश्न पडले ते असे

1.मंदिराच्या गाभाऱ्या जवळ ती कोण?

2.खालच्या दालनात चौरंगावर गुडघ्यात मान खाली बसलेली ती कोण?

3.जर या दोघी एकच असतील तर तिला तिथे कुणी पाठविले?

4.हा तिचा का शोध घेतोय?

5.चेहरा जांभळा रंगविणे हे कशाचे प्रतिक?

कथा खूप वेळेस वाचल्यावर मला उत्तरे सापडली ती अशी

हा मंदिराच्या पायऱ्या खूप हलका होऊन चढतोय.मनात सुख तरंगते.पण नेमके मंदीर कोणाचे ते माहित नाही तिथे काय न्यावे हेही माहित नाही.पण काहीतरी सुखावणारे मिळणार ही खात्री (दृष्य1)

गाभाऱ्या जवळ तिच्या एका दृष्टीक्षेपात हा संपुष्टात बंद होतोय.व चुकून उजवीकडील प्रवेशद्वारातून खोल गर्तेत ठेचकाळत पुढे जातोय.अचानक ती आठवतेय.आपण चुकल्याची जाणीव होतेय(दृष्य2,3)

ओंगळवाण्या ,गलिच्छ आठवणीतून (जे पुढे ओठ बंद करतात) पुढे जात ती दिसते.गुडघ्यात मान खाली घालुन बसलेली.चेहरा जांभळा केलेली.आणि तिच्या

शेजारी पहारेकरी त्याच रंगांचे चेहरे घेऊन. जे याचे स्वागत करायला तयार पण हातात आपटयाची पाने नाहीत तर कोळी घेतलेली जी आयुष्यभर सावजासाठी जाळे विणण्यात व्यस्त असतात.वाईट कर्म करणाऱ्यांचा हा एक काफिला (दृष्य4)

हा सारे समजून तिला तिथून बाहेर पडण्याचा आग्रह करतो.पण ती आता प्रेमाने नव्हे तर द्वेषाचे,दु:खाने संतापलेली,पवित्रता नष्ट झालेली.अशी ती.तिला आता नाकारण्याचा पर्याय नाही.हे यास आणखीन एक दुःख.इथू पुढे सगळेच घाणेरडे दृष्य....घाणेरडी पुष्करिणी, भीतीदायक सांगाडा जो स्वतःची हाडे धुवणारा,एक अजस्र काला माणूस जो लाल पक्षी घुबडाला अर्पण करणारा(दृष्य5)

पुन्हा एक विस्तीर्ण चौकातून हा वर पायऱ्या चढून जातोय,त्यावर वाळलेल्या पाकळया, वर लाल डोळ्याचा पहारा,बोटासह अंगठी हिसकावून पळून जाणारी किळसवाणी मुलगी.

जे हवे होते ते सारे गमावल्यानंतर इथे प्रेमाची उबग त्यास येते.तो पळून जाऊ पहातोय पण ते आता अशक्य असते.आता तोही घाणेरड्या हाताचा झालेला.मग तिथे असलेले यास सोयरीक जोडतात.तिथे राहण्यास. (दृष्य6)

कथासार प्रेमाचे नाटक करून मुलींना फसवणाऱ्या नराधमांनी ही गोष्ट आहे

धन्यवाद

🙏 डॉ. अलका तडकलकर

सुनीळ सामंत: या कथेत दोन मुली आहेत.

१- एक हार विकणारी- तीच अंगठी मागणारी- तीच अंगठी घेणारी

२- दुसरी_ एकदा गाभाऱ्यात दिसलेली- तीच नंतर तिरस्काराने पहाणारी झिडकारणारी.

मला या दोन मुली वास्तव आणि स्वप्न(महत्त्वाकांक्षा) यांच्या प्रतिक वाटल्या.

नायक जेव्हा पहिल्यांदा महत्त्वाकांक्षेशी किंवा स्वप्नाशी समोरासमोर येतो तेव्हा झपाटल्यासारखा होतो, ते स्वप्न पूर्ण करायचेच या महत्त्वाकांक्षेने तो मार्गक्रमणा करतो. पण ती त्याला मिलत नाही.

तेव्हा तो वास्तवाशी तडजोड करून आजूबाजूच्या लक्षावधी सर्वसामान्य चेहऱ्यांतील एक होऊन जातो.

ज्यांना सुरुवातीला तो क्षुद्र समजतो त्यांपैकीच आपणही एक आहोत याचे त्याला भान येते व तेच आपले सोयरे आहेत याची जाणिव होते.

माधव पुराणिक : कथा सोयरे (सांजशकुन,१९६८, चार पानी)

विवेचन (भाग १) - डॉ. माधव पुराणिक

प्रस्तावना -

अ) कथेचे शीर्षक , शेवट, सुरुवात, मुख्य पात्रे

कथेचे शीर्षक , शेवट

सोयरा या शब्दाचा अर्थ नातेवाईक ,पाहुणा, यजमान असा आहे.तसंच या शब्दाचा अमूर्त अर्थ स्वरूप ,मार्ग आश्रय, आधार हा पण आहे. संत तुकारामाचा अभंग "वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे" हा प्रसिद्धच आहे.

जी ए कुलकर्णी यांनी सोयरे हे नाव कथेला देताना वरील सर्व अर्थांचा अत्यंत उपरोधकपणे उपहासपूर्वक विनोदाच्या छटेने उपयोग केला आहे.

मृत्यूलोकातील नायकाच्या सोयऱ्यांचे वर्णन खालील प्रमाणे केले आहे-

"माझ्या भोवती पोट उमळून टाकणाऱ्या कुबट दर्पाच्व्या आकृतींची गर्दी झाली. त्यातील एकाने बोटे नसलेला पंजा घेतला व घोगऱ्या आवाजात म्हटले,"

आता तू येथेच राहा, कारण आता तू आमच्यापैकीच एक झाला आहेस.आम्ही तुझे सोयरे आहोत

ठिकठिकाणी त्यानंतर मी ठिकठिकाणी धुपून जळत असलेल्या मांसाच्या आकृतींशेजारीच एका कोपऱ्यात निर्विकारपणे बसलो.

कारण आता तेच माझे सोयरे उरले होते.”

कथेची मुख्य संकल्पना

सोयरे हा शब्द लग्न झाल्यानंतर मुलीकडच्या (किंवा मुलाकडच्या) नातेवाईकांकरता वापरतात. या कथेमध्ये नायकाने एका मुलीला लग्न ठरवण्याच्या टप्प्यापर्यंत नेऊन (किंवा आधी)नाकारले होते. तिच्या ऐवजी दुसऱ्या एका जास्त सुंदर ,धुंद करणाऱ्या ,आखीव रेखीव तरुणीचा, जीवनात स्वीकार केला होता. त्यावेळेला नाकारल्या गेलेल्या मुलीच्या नातेवाईकांना (सोयऱ्यांना) जो त्रास, दुःख, व्यथा, वेदना सहन कराव्या लागल्या त्याचा न्यायनिवाडा त्यांनी नायक मृत्यूलोकात येतो तेव्हा केला जेव्हा त्या मुलीने नायकाच्या हातातील अंगठी जी तिला पृथ्वीलोकात मिळायची होती ती घेतली.

ती मुलगी जणू लग्नाच्या आधी गौरीहराचे पूजन, वधू करते त्याप्रमाणे चौरंगावर बसली होती व नायक प्रतिकात्मकरित्या तिच्याकडे तिला घेऊन जाण्याकरता येतो. येथे वधूच्या मनातील भावना जी ए कुलकर्णी यांनी - “एखाद्या तंतुवाद्याच्या तारा असाव्यात त्याप्रमाणे अनेक शुभ्र खांब होते-” या प्रतिमेने अतिशय तरलपणे व्यक्त केली आहे.

नायकाला त्याने त्या मुलीबद्दल केलेल्या अत्यंत घोर, जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या अपराधाबद्दल, जो अपराधगंड असतो ती काळीज कुरतडणारी वेदना, नायक कमी करण्याचा, विसरण्याचा प्रयत्न अनेक वेळा त्याच्या आयुष्यात करतो पण तो असफल होतो व शेवटी जणू दैवी शक्तीच्या मदतीने हा प्रश्न कायमचा सुटेल अशी त्याला आशा घेऊन मंदिरात जातो.

येथे जी ए कुलकर्णी यांनी त्यांना वाटणाऱ्या मूल्यात्मक जाणिवेच्या महत्त्वाबद्दल स्पष्टपणे सांगितले आहे. नायकाची नीतीसंबंधी, इतरांशी कसे वागावे यासंबंधी काही मूल्ये असतात.ती मूल्ये त्याच्या जीवनाचे सार असतात व त्या मूल्यांच्या विरोधी त्याच्या हातून जेव्हा वर्तन घडते तेव्हा त्याला पराकोटीचे दुःख होते. कारण नायकाच्या मनात स्वप्रतिमा (Self-esteem),स्वाभिमान (Self-respect) असतो. त्यात त्याला स्वतःबद्दल जो आदर वाटतो त्याची एक विशिष्ट उच्च पातळी असते. तसेच इतरांना त्याच्याबद्दल जो आदर वाटतो त्याचीही पातळी त्याला जाणवत असते. त्या मुलीला त्याच्याबद्दल आदराऐवजी अत्यंत तिरस्कार वाटतो. तसेच नायकालाही स्वतःबद्दल असलेला आदर अतिशय कमी होतो. यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या गाभ्यालाच जणू काळीजकळा सतत व्यापून टाकतात.याकरता पृथ्वीलोकात जाणिवेच्या स्तरावर तो त्या मुलीला विसरण्याचा प्रयत्न करतो. पण ते त्याला शक्य होत नाही. कारण त्याचे मन वासनेने, सुखाच्या भावनेने, दुसऱ्या तरुणीने जणू आपल्या पाशांमध्ये ,आपल्या कोमल, सुंदर, हव्याहव्याशा वाटणाऱ्या सुखकर रेशमी वस्त्रांमध्ये , लग्नाच्या गाठीने बांधलेले असते.

मग नायकाला जणू कथेत वर्णन केल्याप्रमाणे दु:स्वप्न पडते किंवा काही वेळा तो जागेपणा, स्वप्न ,गाढ निद्रा या सर्व अवस्था ओलांडून त्या पलीकडच्या नेणिवेच्या अज्ञात प्रदेशात प्रवेश करतो व त्या तिथे त्याला आदिम भावनांचा जो कल्लोळ जाणवतो. तो बीभत्स रसात लेखकाने अतिशय समर्थपणे व्यक्त केला आहे. जी ए कुलकर्णी यांनी या कथेमध्ये अतिशय धैर्याने ,निर्भीडपणे ,पराकोटीच्या संवेदनाशीलतेने, विवेचक कल्पनाशक्तीने ,अद्वितीय प्रतिभेने नेणिवेच्या प्रदेशात प्रवेश करून जणू तो प्रदेश आपल्या प्रतिमांनी समर्पकपणे व्यक्त करून अस्तित्वाच्या समुद्रतळाशी जाऊन हे कथारत्न आपल्याकरता वर आणलेले आहे. मागे समुद्रमंथनातून जी १४ रत्ने बाहेर आली असे आपण समजतो ती सर्व अमूर्त होती. ती वेगवेगळ्या शक्तींच्या साकार रूपात प्रतिनिधित्व करत होती. पण जी ए कुलकर्णी

यांचे हे कथारत्न मूर्त स्वरूपात, चैतन्यपूर्ण व अर्थपूर्ण शब्दात, जीवनाच्या ,नियतीच्या अनाकलनीय शक्तीचे सुंदर साकार जाणवणारे रूपात आपणा सर्वांना सादर केले आहे.

तो ,कथानायक जणू अस्तित्वाच्या तळाशी जातो व अस्तित्वाचा अर्थ त्याला तेथे जाणवतो जो अर्थ फक्त विनाश, निराशा, एकाकीपणा, असहायता,अगतिकता,तुटलेपणा या मार्गाने बीभत्स रसात बुडून जातो.

कथानायकाला हा विलक्षण अनुभव येण्याआधी तो विविध नकारात्मक भावनांचा अनुभव घेतो जसे

१ कथानायक उदास व खिन्न होतो.

२ त्याची अजूनमधून विषण मनोवृत्ती होते.

३ तो अस्वस्थ असतो.

४ कथानायकाचे दैनंदिन जीवनात मन लागत नाही. दुसऱ्या सुंदर तरुणी बरोबरच्या संसारात सुख लाभत नाही.

५ त्याच्या मनात स्वतःबद्दल कमीपणाची, टाकाऊपणाची भावना व न्यूनगंड पण होतो व तो वाढत जातो.

६ तो स्वतःला त्या मुलीच्या संदर्भात केलेल्या वर्तनाबद्दल अपराधी,दोषी व पापी ठरवतो.

७ कथानायक स्वतःला कमी लेखतो व त्याचा स्वतःवरचा विश्वास नाहीसा होतो.

८ शेवटी तो भ्रमिष्टासारखा वागतो.

९ तू स्वतःच्या कृतीबद्दल इतरांना दोषी ठरवतो.

१० त्याला आपण नालायक व हीन आहै असे वाटते

११ त्याला आपले पूर्वायुष्य काळंकुट्ट दिसतं.

कथेची सुरुवात -

“मंदिरापर्यंत गेलेल्या असंख्य पायऱ्या चढताना माझे अंग सावरीच्या बोंडाप्रमाणे झाले. अर्ध्या पायऱ्या चढून झाल्या तेव्हा आशेने उमललेल्या मनाने मी वाटेत क्षणभर रेंगाळलो.” (पृथ्वीलोक)

“समोरच्या धूसर प्रकाशात वरवर गेलेल्या खूप पायऱ्या होत्या”(मृत्युलोकातल्या पायऱ्या या पृथ्वीलोकातल्या चैतन्याकडे जायच्या अनंत पायऱ्यांपेक्षा कमी होत्या ,शक्य होत्या)

जी एक कुलकर्णी यांनी पहिल्या दोन वाक्यातच मानवी जीवनाची शक्तीची मर्यादा व त्या तुलनेमध्ये चैतन्याची, वैश्विक शक्तीची अपार ,अथांग ,व्यापकता याचे वर्णन केले आहे. तसेच शेवटपर्यंत माणसाला आशा मागून ढकलते व इच्छा पुढे नेते हेही दर्शविले आहे.(प्रवृत्ती)

कथेतील मुख्य पात्रे

१) कथानायक मी- हा प्रौढ वयातला, स्वतःचे नीतिनियम शक्यतो पाळणारा, जीवनासक्त आहे.एका निर्णायक क्षणी त्याच्या हातून अपराध घडतो व त्याची योग्य भरपाई करण्याकरता नायक उर्वरित आयुष्यात झुरत असतो ,तळमळत असतो, अस्वस्थ असतो.

२) नायकाने नाकारलेली तरुणी - ही हार विकणारी मुलगी या स्वरूपात त्याला दिसते. या कथेत स्त्रीचे वासनाकेंद्री रूप दिसते. स्त्रीचे एकाकी ,तेजात चमकणारे ,अलौकिक रूप दिसत नाही.

३) नायकाने स्वीकारलेली तरुणी - ही सुंदर तरुणीच्या रूपात तो पाहतो

४) मृत्यूलोकातले सोयरे -

“ आम्हाला बिनआठवणीचे ओठ प्रिय वाटतात म्हणून आम्ही तुला दसऱ्याचे सोने देण्यासाठी थांबलो आहोत.” (पृथ्वी लोकातल्या अप्रिय असह्य आठवणींमुळे हे सोयरे म्हणतात की आम्हाला आता बिनआठवणींचे ओठ हवेत.) (दसऱ्याचे सोने म्हणजे हा काळा विषारी कोळी घेऊन तू आता आमच्या मृत्यूलोकात प्रवेश कर आणि पृथ्वीलोकाचे सिमोलंघ्घन कर.,)

“तिचे ओठ शोणरक्तात घडवल्याप्रमाणे लालभडक, कठोर, अस्नेह होते.” (बिनआठवणीच्या ओठांचे वर्णन)

सौम्य,मृदू, गुलाबी, स्नेहल - पृथ्वीलोकातल्या ओठांचे वर्णन-अप्रत्यक्ष)

आ) पृथ्वीलोक,मृत्यूलोक ,चैतन्यलोक

स्थूलदेह सूक्ष्मदेह, देहचैतन्य ,क्षणदर्शन,दर्शनक्षण

सोयरे ही कथा तीन स्थळांत /लोकांमध्ये घडते

२)पृथ्वीलोक किंवा वर्तमानकाळातील जग - या जगात स्थूल देह असणारी माणसे वा आकार असणाऱ्या वस्तू असतात

३) मृत्यूलोक (अधोलोक, पाताळलोक)- स्थूल देहाचा विनाश झाल्यानंतरची जागा

३) चैतन्यलोक - (Consciousness) ऱ्या दोन्ही लोकांमध्ये त्यांना व्यापून राहणारे चैतन्य, जीव, वैश्विक शक्ती

पृथ्वीलोक

स्थूल देह (पृथ्वीलोक)- वर्तमानकाळात स्थूल देहाचे चलनवलन ज्ञानक्रियारूप शक्तीने होते. ज्ञानेंद्रिये सूक्ष्म ज्ञानशक्तीने (conscious,जाणीव)कार्यरत होतात तर कर्मेंद्रिये सूक्ष्म कर्मशक्तीने कार्यरत होतात. तरीही दहा इंद्रिये स्थूल देहाचा भाग नाहीत.कारण मृत्यूच्या वेळी ही इंद्रिये स्थूल देह सोडून बाहेर जातात किंवा अकार्यक्षम होतात.

जीव स्थूल देहातूनच कौमार्य, यौवन व जरा या तीन अवस्थांचा अनुभव घेतो. तसेच तो अस्ति म्हणजे अस्तित्व, जायते म्हणजे जन्म, वर्धते म्हणजे वाढ ,परिणमते म्हणजे वार्धक्य ,अपक्षीयते म्हणजे ह्रास, नश्यति म्हणजे विनाश ,याही सहा अवस्थांचा किंवा विकारांचा अनुभव घेतो. जीवाला स्थूल देहातच "मी कर्माचा कर्ता आहे" असे वाटते व "मी कर्माचा भोक्ता आहे" असे वाटते.

पृथ्वीलोकाचे वर्णन करताना वास्तववादी वर्णन आहे त्यात निसर्ग व प्राणी सृष्टीचाही आधार घेतल्याने ती पातळी अधिक ठसठशीत झाली आहे.

मृत्यूलोक

सूक्ष्म देह (मृत्यूलोक)- स्थूल देह मृत्यू पावल्यानंतर व त्याचा संपूर्ण विनाश झाल्यानंतर सूक्ष्म देह उरतो.संपूर्ण विनाश होण्यापर्यंतच्या मानवी देहाच्या विविध विद्रूप अवस्थांच्या अतिवास्तववादी प्रतिमा या कथेत खूप आल्या आहेत. ही अवस्था जाणीव व नेणीव (conscious and unconscious) या दोन्ही अवस्था असतानाची आहे.

सूक्ष्म देहामध्ये पाच कर्मेंद्रिये ,पाच ज्ञानेन्द्रिये, पाच प्राण, मन व बुद्धी यांच्या सूक्ष्म शक्ती असतात हा देह तेजोमय असतो.

पृथ्वी लोकात स्थूल देह व सूक्ष्मदेह दोन्ही एकरूप असतात सूक्ष्म देह हा संस्कार व वासना यांनी मलिन व अशुद्ध असतो.

मृत्यूनंतर सारे संस्कार व वासना व सूक्ष्म पंच तन्मात्रा (म्हणजे पंचमहाभूतांचे अत्यंत सूक्ष्म रूप)स्थूल देहातून बाहेर पडतात व सूक्ष्म देहाबरोबर जातात. मृत्यूच्या वेळेला जो प्रबळ भाव किंवा संस्कार असतो त्याप्रमाणे जीवाला गती प्राप्त होते.

सूक्ष्म देहाचे वर्णन करताना वास्तव व कल्पित यांचे मिश्रण वापरलेले आहे.

चैतन्यलोक

कारणदेह (देहचैतन्य) सूक्ष्म देहामागे त्याचे प्रयोजन असलेले देहचैतन्य असते व हा देह फक्त आत्मज्ञानानेच नाश पावतो. देव हा केवळ हाडांचा सांगाडा रक्ता मासाचा गोळा इत्यादी नसून तो नेहमीच चैतन्यमय असतो.

देहबुद्धीत वावरणारी जाणीव ही नेहमी हेतूसहित (intentional)असते.अमुक हवे व अमुक नको असे वाटणे हे त्या जाणिवेचे(consciousness)स्वरूप असते. हे स्वरूप म्हणजे वासना होय.

देहचैतन्याचे वर्णन करताना पूर्णपणे कल्पिताचा वापर केलेला आहे.

मृत्यूचे टप्पे

१ स्थूल देहातून इंद्रिय शक्ती बाहेर पडते. डोळे निर्जीव होतात बोलणे बंद होते.हालचाल ,चलनवलन थांबते.इतरांच्या बोलण्याला प्रतिसाद मिळत नाही.स्पर्शाची जाणीव नाहीशी होते.जीभ जड होते.स्थूल देहाचा हळूहळू नाश होतो. हा नाश संपूर्ण होईपर्यंतच्या अनेक प्रतिमा सोयरे या कथेत आलेल्या आहेत.

२ ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये विकल, शक्तीहीन होतात.त्यांच्या वृतींसकट मनात प्रवेश करतात मन प्राणात प्रवेश करते.

हे संस्कार, या वासना, हे भाव जरी अमूर्त असले तरी सोयरे या कथेत जी ए कुलकर्णी यांनी त्याला मूर्त स्वरूप दिलेले आहे ती खाली निर्देशित केलेल्या ९ निर्णायक क्षणांतून जाणवते.

त्यात लेखकाने शेषभावना निर्देश करणारे खालील शब्द वापरले आहेत - वेदना, तिरस्कार, बधिरता, आसुसणे,अस्नेह, अस्वस्थता, कठोरपणा, धैर्य,ताण,बावरते,आवेग,अधीरता, हुरहुर, व्याकुळता,थरारणे इ.

३ सूक्ष्म देहाचा नाश झाल्यावर ती जीव आणि चैतन्य शिल्लक राहते. याचे वर्णन कथेत शेवटी आलेले आहे जेव्हा जीव त्या अवस्थेमध्ये राहतात व चैतन्याशी संयोग होऊन पुन्हा मनुष्यजन्म घेण्याची वाट पाहतात.

“ कथानायक बोटे नसलेल्या पंजासकट, इतर जळत असलेल्या मासांच्या आकृतींशेजारी, एका कोपऱ्यात निर्विकारपणे बसतो.”

पंचप्रेतांची रूपे

गरुडपुराणात उत्तरखंडात आठव्या अध्यायात पंचप्रेतांचा उल्लेख आहे त्यांची नावे अशी -पर्युषित,सूचीमुख,शीघ्रल,रोधक,लेखक. या सर्वांनी केलेल्या अनीतिमान अपराधांमुळे मृत्यूनंतर त्यांचा प्रेतयोनित जन्म होतो.(संदर्भ- मृत्यूविज्ञान - लेखक म. म. डॉक्टर गोपीनाथ कविराज,२००५)

क्षणदर्शन - दर्शनक्षण

या कथेमध्ये ९ क्षण असे आहेत की त्या क्षणांमध्ये लेखकाला आणि वाचकाला अंतकरणाच्या पातळीवरून त्या घटनेच्या किंवा व्यक्तीचा एक अनुभव येतो. त्याच वेळेला मनाच्या पलीकडच्या साक्षीभावातून, चैतन्यातून किंवा सूक्ष्म शक्तीतून एक वेगळेच दर्शन घडते ,दृष्टांत होतो. तो दृष्टांत नायकाला एक वेगळीच जीवनदृष्टी देतो आपले प्रश्न, अपराधगंड(guilt complex),पापगंड (sin complex),भयभीतपणा इत्यादी सोडवत सोडवत नियतीच्या अनाकलनीय शक्तीमुळे नायक या क्षणांकडे अटळपणे येतो.

अशा ९ क्षणांची मालिका ज्यात एक सुसंगत व्यवस्था (order)आहे ,हे या कथेचे अनोखे वैशिष्ट्य आहे

खालील घटना कथेच्या नायक जागृत अवस्थेत, सावध असताना (Conscious mind) वर्तमानकाळात, वास्तव जगात घडलेल्या आहेत(पृथ्वीलोक).

कथेचा नायक, “मी”प्रौढ वयात निर्वाणीचा उपाय म्हणून आपल्याला दुःखात लुटणाऱ्या प्रश्नावरचा उपाय शोधायला मंदिराकडे निघाला आहे. तेथे त्याला हार विकणारी एक मुलगी भेटते त्यामुळे त्याच्या गत आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाची स्मृती जागृत होते.

“ पण त्या मुलीचा हसरा चेहरा व नाचरे निरागस डोळे मला फार आवडले.(पृथ्वीलोकातला चेहरा) माझे मन सुखाने ओसंडत होते. तिच्या डोळयांसारखेच एक झगझगीत नाणे तिच्या हातावर मी ठेवले (निर्णायक क्षण १)(मनाच्या तळाशी दडपलेल्या अप्रिय स्मृतींची आठवण)

“तिने भुवया कोरून चेहरा जांभळा रंगवला होता.” (मृत्यूलोकातला चेहरा)(मृत्यू लोकात प्रकाश नसल्याने लाल निळा जांभळा इत्यादी रंग एकत्वाने दिसतात व ते अमानवी असतात)

नंतर त्याला गाभाऱ्यामध्ये फुले वाहणारी एक अत्यंत सुंदर तरुणी दिसते त्यामुळे त्याच्या मनात पूर्वआयुष्यातील अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीची आठवण अतिशय तीव्रतेने जागृत होते

“ त्या तरुणींची पाठमोरी रेखीव आकृती कमळाच्या उभार कळीत सूर्यप्रकाश भरल्याप्रमाणे धुंद वाटली. जाताना तिने मागे बळून एक दृष्टीक्षेप केला.पण त्या एका दृष्टीक्षेपात तिने माझे सारे आयुष्य संपुष्टात ठेवल्याप्रमाणे केले व ती निघून गेली.(निर्णायक क्षण २)(क्षणिक धुंदीचा परत अनुभव जरी त्यातून निर्माण होणारे दुःख आधी जाणवलेले असले तरी)

खालील घटना मृत्यू लोकात किंवा जीवनमृत्यूवरच्या सीमेवर संधिप्रकाशात घडलेल्या आहेत -

नंतर अनपेक्षितपणे नायक अधोलोकात जातो तेथे त्याला पृथ्वीलोकातील मुलगी अर्धमृत, विद्रुप अवस्थेत भेटते व म्हणते “मला ही अंगठी दे” पण नायक तिला लाथ हाणून झिडकारतो.

“ पण मध्येच कुठेतरी पाऊल चुकले दृष्टी भ्रमिष्ठ झाली अनेक अंधाऱ्या पायऱ्या ,धुळीत कुंद झालेल्या ओलसर खोल्या...”.(निर्णायक क्षण ३)

“तिने आपल्या पंजात माझे अंगठीचे बोट धरले व ती म्हणाली “मला ही अंगठी दे." स्वतः तिच्या हातांना बोटे नव्हती. (निर्णायक क्षण ४) (अंगठी म्हणजे दोन व्यक्तींमधील प्रेमाचा किंवा स्नेहाचा डोळाच म्हणता येईल जो अंगठीच्या वर्तुळात (खोबणीत)बसवलेल्या रत्नखचित खड्यातून (बुबूळ)सतत चमकत असतो, चकाकत असतो ,तेजस्वी किरण बाहेर फेकत असतो.)

“तिच्या आठवणीने एकदम हुरहुर वाटू लागली आणि जिव्हाळा दाटून आला.आता ती या क्षणी कोठे असेल याच एका विचाराने मी व्याकुळ झालो.” (निर्णायक क्षण ५) (नायकाला त्या मुलीबद्दल आधी वाटलेल्या सर्व चांगल्या भावना परत जागृत होतात)

“ मी तिच्याजवळ गेलो व आवेगाने तिच्या खांद्याला स्पर्श करत म्हटले,” चल माझ्याबरोबर, येथून आपणाला तत्काळ निसटले पाहिजे.” (निर्णायक क्षण ६)(नायक आपल्या आधीच्या चुकलेल्या वागण्याचे परिमार्जन करण्यासाठी तिला घेऊन जाऊन जणू नवीन आयुष्य सुरू करणार आहे असे वागतो)

“शून्य , निर्विकार लुबाडल्या गेलेल्या डोळ्यांनी आम्ही क्षणभर एकमेकांकडे पाहिले. निरोप घेण्याचा ओला अश्रूआनंद देखील आमच्याजवळ उरला नाही. इतके सारे क्षणात जळून खाक झाले होते.”(निर्णायक क्षण ७)(त्या मुलीला मृत्यूलोकामध्ये फक्त निर्विकारतेच्या अनुभव असतो पण आधीच्या आयुष्यातील नायकावर सूड घेण्याची भावना जागृत असते. तसेच नायकालाही ती मुलगी पूर्वीच्या आयुष्यात

होती तशी जिवंत व आकर्षक हवी असते व त्याला या स्वरूपातल्या मुलीच्या स्वीकार करायचा नसतो)

“जे अनिवार्य आहे ते भोगलेच पाहिजे अशी आतड्याच्या आतड्यात निष्ठूर जाणीव झाली की जे येते ते अंतिम निर्विकार धैर्य माझ्यात आले होते. आता या कुंद अमंगल ठिकाणी आपल्या पापांचा, गुन्ह्याचा काय तो एकदाचा सोक्षमोक्ष होऊन जाणार या विश्वासाने...” (निर्णायक क्षण ८) (नायकाने सर्व प्रकारे आपल्या गुन्ह्याचे परिमार्जन करायचा प्रयत्न केला पण ते झाले नाही व आता या शेवटच्या क्षणी त्याच्या मनात त्या अटळ निर्णयाच्या न्यायनिवाड्याच्या अवस्थेला सामोरे जाण्याचे धैर्य निर्माण झाले. येथे एक ग्रीक देवतेचे स्मरण होते, जी माणसाच्या घडलेल्या गुन्ह्याबद्दल त्याला शिक्षा करते पण तो जर चांगला वागला असेल तर त्याचे बक्षीस देत नाही)

“ ही मुलगी घोळक्यातून पुढे आली व बोटे नसलेल्या पंजात तिने माझी बोटे घेतली.” मला ही अंगठी दे “ ती म्हणाली अंगावर थरारलेला शहरा मी तसाच जाऊ दिला व बोटे असलेला पंजा तिच्या बोटे नसलेल्या हातात राहू दिला. तेव्हा शिरन् शीर मृत झालेल्या माझ्या निर्जीव, सुजलेल्या हातातून ते बोट अंगठीसह निसटून निघाले आणि ते घट्ट पकडून ती निघून गेली.” (निर्णायक क्षण ९) (या क्षणी नायकाच्या मनातल्या अपराधीपणाच्या व इतर सर्व भावना नाहीशा झाल्या व तो केवळ एका भीषण स्वरूपाचे शरीर असलेल्या स्थितीत सत्याला सामोरे गेला)

आणि दहाव्या क्षणी जणू कथानायकाला जीवनाच्या अर्थशून्यतेतून एकाच्या आकडा -अर्थाभाव हा जाणवतो - बरेचसे आयुष्य जगल्यानंतर.

माधव पुराणिक : कथा सोयरे - (सांजशकुन, १९६८, ४ पानी)

विवेचन (भाग २) - डॉ माधव पुराणिक

इ) बीभत्स रस -

सोयरे ही कथा जी ए कुलकर्णी यांच्या १५० कथांपैकी एकच कथा अशी आहे की ती संपूर्णपणे बीभत्स या रसाला वाहिलेली आहे. या दृष्टिकोनातून ती एक विलक्षण, अतिशय प्रत्ययकारी ,अद्वितीय कथा आहे.

प्रत्येक व्यक्तीमध्ये ,आदिम मानवापासून ते आधुनिक मानवापर्यंत सार्वत्रिक, नित्य (जन्मापासून मृत्यूपर्यंत) व सुप्त (प्रेरणा मिळाल्या शिवाय ते जागृत होत नाहीत) असे स्थायीभाव असतात.

भरतमुनींनी(ग्रंथ “ नाटयशास्त्र”, इ स पूर्व २००) आठ स्थायीभाव सांगितले आहेत. रती (म्हणजे स्त्री व पुरुष यांची प्रीती), हास्य ,शोक, क्रोध, उत्साह (म्हणजे ऊर्जा व प्रेरणा),भय ,जुगुप्सा म्हणजे (किळस)व विस्मय. हे ते आठ स्थायीभाव. यांच्यापासून अनुक्रमे शृंगार ,हास्य, करूण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स व अद्भुत हे रस निर्माण होतात.

सोयरे या कथेत मुख्य रस बीभत्स आहे व व त्याबरोबरच पूरक रस करूण,रौद्र , भयानक व अद्भुत आहेत.

वास्तव सौंदर्यातून जी ए कुलकर्णी यांनी खालील अतिवास्तव प्रतिमा निर्माण केल्या आहेत. पृथ्वीलोकातून पलीकडे मृत्यूलोकांत जाताना त्यांना त्या प्रतीत झाल्या आहेत-

बीभत्स रसाची काही उदाहरणे -

१) झुंबरातील लोलकांच्या जागी निर्मांस हाडे लोंबत होती.(मृत्यूलोक)

वर छताला सात रंगात उजळणारे हजार लोलकांचे झुंबर होते.(पृथ्वीलोक)

२) तो माणूस सोललेले लालभडक पक्षी (घुबडाला) वाहत होता.(मृ.)

गाभाऱ्याजवळ एक तरुणी(मूर्तीला) फुले वाहत होती. (पृ.)

३) कुजलेल्या कातड्यासारखा वाटणारा अंधार(मृ)

समयांच्या स्निग्ध प्रकाशात मूर्ति होती. (पृ.)

४) बोटे नसलेल्या पंजाची तरुणी (मृ)

तिने आपल्या पंजात माझे अंगठीचे बोट धरले.(पृ)

५)गाभाऱ्यात केसाळ पाठीचा अजस्त्र माणूस बसला होता.(मृ)

गाभाऱ्यात मूर्ति उभी होती (पृ)

६) हाडांचा एक सांगाडा आपले एक एक हाड निखळून काढून ते त्या पाण्यात धूत होता.(मृ)

पाण्यात कडेने लालसर कमळे फुलली होती.(पृ)

७) पुष्करणीतील पाणी हिरव्या तवंगामुळे विषारी होते.(मृ)

पुष्करिणीतील निळसर पाणी चौकोनी नीळमण्याप्रमाणे दिसत होते.(पृ)

८) तिच्या काळयाशार केसांत (पृथ्वीलोक - स्थिर ,लांबसडक, केस) केसांऐवजी सतत अस्वस्थपणे वळवळणारे कृष्णनाग होते (वासना, मृत्यूलोकातले केस)

गाभाऱ्याच्या आतल्या बाजूस पिवळयाजर्द सोन्याच्या नागाच्या वेटोळयांतून उभी असलेली मूर्ती दिसत होती.(नाग = शक्तीसंपन्नता)

९गाभाऱ्यासमोर विस्तीर्ण दालनात संगमरवरी फरशी होती (पृ)

सभा मंडपातील संगमरवरी फरशी कीड लागल्याप्रमाणे डागाडागांनी विच्छिन्न झाली होती. (मृ)

कथेचा आस्वाद

वरील उदाहरणे वाचताना व सर्व कथा वाचताना वाचकावर त्यांचा परिणाम खऱ्या किळस या भावासारखा होत नाही.

कारण या कथेत विशिष्ट व्यक्तीचा (लेखकाचा) संदर्भ नाकारला गेला आहे व तो भाव साधारण बनला आहे. तो भाव वाचकाला प्रत्येकाला आपल्यासारखाच वाटतो म्हणजे तू ती केसी भावना वस्तुतः अमूर्त नाही पण ती अमूर्त बनते व आस्वाद्य होते यालाच साधारणीकरण म्हणतात. कलावंताप्रमाणे आस्वादकाजवळही प्रतिभा असावी लागते.

"मिथ" संकल्पना

या कथेमध्ये जीए कुलकर्णी यांनी असंगत ,प्रयोजनशून्य, एकाकी, दुःखमय अशा जीवनाचं "मिथ" वापरलं आहे.

"मिथ" हे लेखकाच्या जीवनाच्या सारकल्पनेचे निदर्शक असते. लेखकाने आपल्या कल्पनाशक्तीने केलेल्या जीवनाच्या आकलनाचे प्रतीक असते. "मिथ" मधून व्यक्तीजीवनातील असंबध्दता ,अंतर्विरोध दाखवित, मृत्युपथावर चाललेल्या दुःखमय जीवनाला लेखकाने साकार केले आहे.

ई) डोळे हीआदिबंधात्मक प्रतिमा

या कथेत डोळे व अंधार या केंद्रीय प्रतिमा आहेत त्या एकूण १८ वेळा आलेल्या आहेत.त्यांना पूरक म्हणून इतर प्रतिमा आलेल्या आहेत.या प्रतिमा लेखकाने जाणीवपूर्वक परत परत वापरल्याने त्यांचे प्रतीक झाले आहे.

त्या "मिथ"ला सुसंगत व समर्पक अशा मानवी देहाच्या (विशेषतः डोळयांच्या) विद्रूप, विरूप, हिडीस, छिन्नविछिन्न प्रतिमा वापरल्या आहेत. डोळे (प्रसंगी अंगठी) या प्रतिमेच्या पुनरावर्ती वापरातून डोळा (चैतन्य, तेज, शक्ती) ह आदिबंध (मूलप्रतिमा) तयार होते. डोळे ही प्रतिमा या कथेमध्ये ९ वेळा आलेली आहे.

डोळा हे मुख्य ज्ञानेन्द्रिय असले तरी त्याच्या मागे ज्ञान शक्ती असल्याने प्रत्येकाची दृष्टी किंवा दृष्टिकोन तयार होतो. त्यातून व्यक्तीला वस्तूच्या (व्यक्तीच्या)आकाराचे व गुणधर्माचे ज्ञान होते.वस्तूचे सार कळते.त्याचा अर्थ समजतो आणि उमजतो आणि वस्तू ओळखता येतात. त्यातून व्यक्तीशी संबंधित अनेक स्मृती मनात साठवल्या जातात.

तान्हे बाळ जन्माला आल्यावर प्रथम डोळे उघडते. वयोवृद्ध माणूस मृत्यूक्षणाला शेवटचे डोळे मिटतो. या दोन बिंदूंमध्ये डोळा ही प्रतिमा प्रत्येक क्षणाला आपल्या सोबत असते. पण ती प्रतिमा क्षणोक्षणी विरोधलयीमध्ये अंर्तविरोधामध्ये, कधी सुखाचा अनुभव देते, नंतर दुःखाचा अनुभव देते ,कधी आशेचा किरण दाखवते कधी निराशेच्या सावलीत बुडून जाते (क्षणभंगुरता). अशा अनेक द्वंद्वात्मक जोड्यांतून, काळाच्या प्रवाहाला (शाश्वत अमरता , सर्वव्यापकता) पुढे नेते पण काही निर्णय अस्तित्ववादातले क्षण असे असतात की त्या क्षणात व्यक्तीला जीवनाचे आकलन अधिक सूक्ष्म ,खोल होत असते.

नियतीनमुळे असे क्षणांचा माणसाला अनुभव आला तरी त्या क्षणांची तो वाट पाहतो, त्यांचा स्वीकार करतो ,त्यांना सामोरे जातो व प्रबळ जीवनेच्छा ठेवून पुढे जात राहतो.

डोळे ही प्रतिमा वापरताना त्यात आशय प्रतिमा जास्त व संवेदना प्रतिमा कमी आहेत. खाली दर्शविलेल्या जीवनाच्या सर्व द्वंद्वात्मक अनुभवात डोळे (व त्यांची प्रतिमा) मुख्य भूमिका पार पाडतात.

तसेच अंधार ही प्रतिमा सुद्धा आदिबंधात्मक म्हणून अनेकदा आलेली आहे

याखेरीज वरील कथेत “प्रवास “हीही अनेक कथांत वापरलेली आदिबंध प्रतिमा आहे. हा प्रवास चार पातळ्यांवर होतो शारीरिक, मानसिक ,आत्मिक आणि प्रतिमात्मक / तात्विक.

काही ठिकाणी “नाग” ही पण आदिबंधात्मक प्रतिमा वापरलेली आहे.

डोळे (दृष्टी,अंगठी, तेज, चैतन्य, ज्ञान) यांच्या प्रतिमा

१ गाभाऱ्याभोवती डोळे दिपवणारे झगझगीत चांदीचे मखर होते.

२ अंधारातील डोळयांचा मंद प्रकाश प्रज्वलित लालसर झाला व ते एकदम माझ्याभोवती जमू लागले.

३ भोवतालच्या अंधारातील लाल डोळे मावळत असल्याप्रमाणे सौम्य पिवळसर झाले.

४ तेथील अंधारावर अगणित लाल डोळे तरंगत होते.

५ त्याच्यासमोर शांत ,संमंजस मोठ्या डोळयांचे घुबड होते.

६ "त्यात अस्पष्ट दिसणाऱ्या पण सतत हलत असलेल्या अनंत छाया होत्या आणि त्यांच्यावर तरंगणारे अनेक मंदप्रकाशी डोळे होते."

उ)अंधार (सावली, छाया, अंधाराचा अभाव म्हणजे प्रकाश) यांच्या प्रतिमा

अंधार ही प्रतिमा या कथेमध्ये ९ वेळा आलेली आहे.

१)" मूर्ती, समयांच्या स्निग्ध प्रकाशात चिरंतन आशेसारखी आधार देणारी वाटत होती."

२) " प्राचीन भिंती वर चढत दाट अंधारात नाहीशा झाल्या होत्या."

३) " सभोवारचा अंधार टपून राहिल्यासारखा वाटत होता."

४) " अंधारातील सावल्यांमधून एक मुलगी जवळ आली."

५) " मी वेड्यासारखा हातवारे करीत त्या दाट छाया विस्कटत धावत सुटलो पुन्हा अनेक अंधाऱ्या पायऱ्या ,धुळीने भरलेली दालने..."

६)" तिच्यासमोरच भिंतीला लागून एखाद्या तंतुवाद्याच्या तारा असाव्यात त्याप्रमाणे अनेक सुबक शुभ्र खांब होते. ते एका मागोमाग एक असे पसरत दूर अंधारात विरून गेले होते.(मृत्युलोखातही अंधारातला प्रकाश म्हणजे देहचैतन्याचा प्रकाश)

७) “आणि ते शब्द पुनरुच्चारीत होत जाऊन अस्पष्ट होत गेले व शेवटी खांबांबरोबरच अंधारात विरले.”(पृथ्वीलोकातले शब्द प्रकाशात विरतात तर मृत्यूलोकातले शब्द अंधारात विरतात. तसेच पृथ्वीलोकातले खांब प्रकाशात विरत नाहीत, स्थिर असतात तर मृत्यूलोकातले खांभ भ्रामक ,भासमय, अस्पष्ट,धूसर असल्याने ते अंधारात विरतात.)

८) “ गाभाऱ्यातून प्रतिध्वनीचे शब्द येत असल्याप्रमाणे पुन्हा त्या शब्दांची लाट पसरत जाऊन अंधारात नाहीशी झाली.” (पृथ्वी लोकातल्या गाभाऱ्यातले प्रतिध्वनी प्रकाशात विरतात तर मृत्यूलोकातल्या शब्दांची लाट अंधारात विरते.)

९) तेथील अंधारातील सावल्या सतत घुसळत होत्या आणि त्यावर अगणित लाल डोळे तरंगत होते.

ऊ)तिन्ही लोकातल्या निसर्ग व प्राणी यांच्या प्रतिमा

या सर्व परिसर व वातावरणातल्या प्रतिमांमुळे किळस हा स्थायीभाव व बीभत्स रस तीव्र होतो व आशयाला उठावदार होतो.

१ दर क्षणाला चेहऱ्यावर आढळणारी, चिकट, न सरकवता येणारी चिवट कोळिष्टके यातून मी भरकटलो. (यामुळे वास्तवाचा स्तर अधोरेखित होतो.)

२) “ त्याने हात पुढे केला व मूठ उघडली. त्याच्या काळात केसा विषारी कोळी होता.” (वास्तवाचे अधोरेखन)

३) माझे मन वठलेल्या वृक्षाप्रमाणे स्थिर झाले होते. (उत्तम प्रतिमा)

४ अ)मंदिराच्या पुष्करणीतील निळसर पाणी चौकोनी नीळमण्याप्रमाणे दिसत होते व तिच्यात कडेने कमलपत्रांच्या हिरव्या हिरव्या वर्तुळात लालसर कमळे फुलली होती.(निसर्गाचा पृथ्वीलोक)

४ ब) त्या ठिकाणी निरनिराळ्या रंगाच्या शिळ्या फुलांच्या मेलेल्या पाकळ्या इतस्तत: विखुरलेल्या होत्या.(निसर्गाचा मृत्युलोक)

ए) मुख्य भावना अस्तित्ववादातील किळस (Nausea)

या कथेतून वाचकाला किळस (Nausea, उबग, घृणा) या अस्तित्ववादातील संमिश्र भावनेचा अनुभव येतो. Nausea (१९३८) ही याच विषयावरची Jean Paul Sartre या French अस्तित्ववादी विचारवंताची कादंबरी प्रसिद्ध आहे.

किळस ही भावना शरीर व मन, देह व जाणीव यांच्यातील द्वंद्वामुळे अंर्तविरोधामुळे मुख्यतः निर्माण होते. हा अंर्तविरोध जी एक कुलकर्णी खालील परस्परविरोधी जोड्यातून व्यक्त करतात.

१) चैतन्य आणि निर्जीवता

२) जीवनासक्ती आणि जीवनविरक्ती

३)जनन आणि मरण

४) आशा आणि निराशा

५) ध्येय आणि व्यवहार

६) सौंदर्य आणि कुरूपता

७) कोमलता आणि क्रौर्य

८) निष्ठा आणि चंचलता

९) शोकात्मता आणि मूल्यगर्भता

१०) आनंद आणि दुःख,वेदना

या भावनांच्या अनुभवातून जीवन असंबद्ध आणि असंगत वाटू लागते. वरील परिच्छेदांत लिहिलेल्या कथेतील अनेक वाक्यांतून हे प्रत्ययाला येते.

कथेतील नायकाच्या अनेक भावावस्था हळूहळू पण निश्चितपणे, अटळपणे , काळाच्या प्रवाह पुढे जात असताना शेवटी त्याला किळस या भावनेच्या अंतिम अनुभवाकडे नेतात यातून बीभत्स रसाचा अविष्कार होऊन नायकाला जीवनाच्या सत्याचे किंवा गूढ अर्थाचे भावनिक आकलन होते.

ऐ) इतर कथांचे व सोयरे या कथेचे संकल्पनांचे/ प्रतिमांचे साम्य

सांजशकुन कथासंग्रहातील खालील कथांमध्ये व सोयरे या कथेमध्ये अत्यंत महत्त्वाचे साम्य आहे ते प्रत्यक्ष उदाहरणाने स्पष्ट केले आहे

नायकाला त्याचा अपराधगंड, एकाकीपणा, भय इत्यादी अस्तित्ववादी भावना या वेगवेगळ्या तीव्रतेने भासू लागतात व त्याला अनुरूप अशा प्रतिमा /भाषा / रस वरील कथांमधून आढळतो. सोयरे या कथेमध्ये अत्यंत तीव्र अशा उद्वेगामुळे बीभत्स रसाचा अविष्कार झाला आहे. तर इतर कथांमध्ये या भावनेच्या सौम्य किंवा मध्यम अनुभवामुळे भयानक व अद्भुत या रसांचा प्रामुख्याने अविष्कार झाला आहे.

या कथा खालील प्रमाणे आहेत

कथा ४- सोयरे - १९६८,चार पानी

कथा १२ -भिंत - १९६३, तीन पानी,

कथा २०- अनंत - १९७४, ९ पानी,

कथा ३०- सांगाती- १९७०, १० पानी

१) कथा सांगाती-" एका काळवंडलेल्या हाडातून आलेला आवाज मेधाचा होता "हा माझा हात हा तुझ्या हातात दिला होता.तू या ठिकाणी तुझे काय ठेवणार आहेस?"

गिधाडे नाहीशी झाली आणि झाडाच्या सुकलेल्या फांद्यांची हाडे झाली. त्यांच्या विलक्षण पिंजऱ्यात मला किंचितही हालचाल करता येईल. आता बहुतांशी उष्णता विलक्षण वाढली व त्यात ती हाडे विविध धगधगीत रंगांनी प्रकाशित झाली त्यातून पुढे मार्ग काढण्यासाठी मी एका हाडावर बोटे पसरली व प्राणाच्या आदेशाने ते बाजूला ढकलण्याची धडपड केली परंतु ते फक्त करकरले....

तो दैत्यमाणूस खाली वाकला.त्याचे झगझगीत दात जास्तच पसरले व डोळयात समजूत दिसली. त्याने आपली ओंगळ बोटे आपल्या हनुवटीखाली धरली. नंतर एखादा मुखवटा उचलावा त्याप्रमाणे त्याने आपला पाशवी चेहरा वर उचलला. आतल्या चेहऱ्याचे धगधगीत ओठ माझ्या ओलसर कपाळावर टेकले."

२) कथा भिंत- मला भिंतीची अभेद्यता एकदम मृदू झाल्यासारखी वाटू लागली. ती एकदम विरली आणि आतून एकदम अनेक हात आले व त्यांनी मला आत ओढून घेतले. त्यांच्या स्पर्शाने माझा आवाजच गेला. माझे हात वारेही कुणाला दिसले नाहीत. मी बोलायचा प्रयत्न केला.पण शब्द उमटले नाहीत.

सर्वत्र धूसर अंधार पसरला आहे. कुठेही प्रकाश नाही. सुगंधाचा कशाला स्पर्श नाही कारण कुठेच फुले नाहीत. सारे काही मेल्याप्रमाणे चिरंतन ,अमर्याद. सारी अभंग, भीषण शांतता.

आणि तिच्यात ठिकठिकाणी लखलखणारे सहस्त्र धगधगीत, फसलेले डोळे!

३) कथा अनंत - "त्या ठिकाणचा प्रकाश मंद जर्जर वाटत होता आणि सर्वत्र एक प्रकारचा असह्य कुंद वास भरून राहिला होता. समोर उंच गेलेली भिंत होती आणि तिच्या ठिकठिकाणी झरोके होते.तो आत येतात अनेक झरोख्यातून वेळेविद्रे हात एकदम बाहेर आले. त्यांच्यावरील मास सुजून काळेनिळे झाले होते व अनेक हातांची बोटे झडून गेली होती. त्याचे सर्व अंग एकदम शहारल्यासारखे झाले व तो एकदम मागे सरला. त्यावेळी त्याला मागे कुणाचा तरी धक्का लागला.त्याने वळून पाहिले तर चामडाचा केल्या असल्याने असल्याप्रमाणे दिसणाऱ्या चेहऱ्याचा, पाठीत अगदी वाकून गेलेला एक माणूस निर्जीव डोळयांनी त्याच्याकडे पाहत होता....

“ही एक स्त्री चेहरा झाकून भिंतीकडे तोंड करून बसते हे त्याला विलक्षण वाटले.तो हलक्या पावलांनी तिच्याजवळ गेला व त्याने हलकेच तिच्या खांद्याला स्पर्श केला. तेव्हा दंश झाल्याप्रमाणे ती तत्काळ उभी राहिली व भेसूर चेहऱ्याने त्याच्याकडे पाहू लागली. तिच्या चेहऱ्यावरील मास अर्धवट जळालेले असून गालांची हाडे स्पष्ट उघडी होती व डोळे विझत चाललेल्या चितेप्रमाणे होते.,”

ओ) समारोप

संपूर्ण मराठी कथावाङ्ग्यात आतापर्यंत बीभत्स रस -जो माणसातला एक दुर्लक्षिला गेलेला स्थायीभाव आहे. त्याच्याशी संबंधित, अस्तित्ववादातील किळस या भावनेचा लेखकाला आलेल्या जणू महाकालीच्या संहाररूप दर्शनाचा प्रतिभावान प्रत्यय घेऊन ही कथा अवतरली आहे.

या कथेतील ,कलाकृतीतील बीभत्स रसात परिपूर्णतेचे सौंदर्य जाणवते. त्याचा कलास्वाद रसिकाला घेता येतो.

जी ए कुलकर्णी यांना या सत्याचे , या अस्तित्वाच्या मूलतत्त्वाचे दर्शन स्वसंवेद्य झाले आहे व त्यांनी आपल्यालाही ते रसिकसंवेद्य केले आहे.

सुनीळ सामंत: धन्यवाद माधव सर. हे पुन्हा पुन्हा वाचून पहावे इतके सुंदर आहे.

दिलिप बडे: सोयरे-नात्यांबद्धलची अभिव्यक्ती.हार घेऊन आलेली मुलगी आकर्षक.गाभार्याजवळ फुले वाहणारी तरूणी हवीशी वाटणारी,पण तिच्या एका नजरेने नायकाचे सारे आयुष्य संपुष्टात आणले.दोन्ही ठिकाणी सोयरीक नाही.मुर्त्यूलोकात लादली गेलेली सोयरीक.जे आनिवार्य आहे ते भोगलेच पाहिजे.जे

अपेक्षित आहे ते कधीच मिळणार नाही.निरोप घेण्याचा ओला आश्रूआनंद देखिल आमच्या जवळ ऊरला नाही.

राजेश उनवणे : सोयरे कथा समजण्यास अवघड आहे.

डॉ. अलकाजी आपण कथेचा गाभा थोडक्यात सांगून ही कथा आम्हा समजण्यास सोपी केलेली आहे.

आपण नमूद केलेला कथेचा विषय –

“प्रेमाचे नाटक करून मुलींना फसवणाऱ्या नराधमांची ही गोष्ट आहे. दुसऱ्यास नरकाच्या यातना दिल्यास आपल्यालाही तीच नरकयातना भोगणे क्रमप्राप्त असते. हा कर्म सिद्धांत.”-

हा अगदी योग्य वाटतो.

कारण या गाभ्या प्रमाणे कथेतील रुपके/प्रतिमा/उपमा यांची तर्कसंगती व्यवस्थित जुळते.

आपणास मनापासून धन्यवाद. 🙏

यतीनजी यांनी चर्चेत अतिशय योग्य प्रश्न विचारलेला आहे. ते विचारतात ---- “जी. ए. असताना ही चर्चा होऊन जर त्यांच्या वाचनात आली असती तर त्यांची प्रतिक्रीया काय असती. त्यांना नेमका हाच अर्थ अभिप्रेत असावा की या कथेला आणखी कंगोरे असू शकतील?” —

यतीनजी यांच्या या प्रश्नाचा शोध --- आपण नमूद केलेला कथेचा मूळ विषय (गाभा) आणि त्या अनुषंगाने येणारी कथेतील रुपके/प्रतिमा/उपमा यांच्यातून मला घ्यावासा वाटला.

आणि तो घेत असताना...

कथेचा मुख्य विषय व रुपके/प्रतिमा/उपमा यांच्या तारा व्यवस्थित जुळतात असे दिसून आले.

जीए यांना अभिप्रेत असलेला अर्थच, आपण सांगितलेला आहे याची मला प्रचिती आली.

आपणास पुनश्च धन्यवाद..! 🙏

जीए यांना ही कथा सरळ मार्गाने लिहीता आली असती. पण त्यांनी त्यांच्या खास “जीए शैलीत” तिला पेश केलेली आहे.

स्त्रियांवरील अत्याचारा संदर्भातील हा विषय श्री. जयवंत दळवी यांनी सुद्धा अतिशय समर्थपणे हाताळला आहे. तो “पुरुष” या नाटकामध्ये. त्यातील पीडित स्त्री नायिका त्या नराधमाचे इंद्रिय कापून त्यास मृत्यूचा मार्ग दाखवते.

या कथेतील पीडित स्त्री नायिका कथेतील “मी” या नराधमाकडे प्रेमाचे प्रतिक म्हणून घातलेली अंगठी दोनवेळा मागते. आणि तरीही तो देत नाही, हे पाहून......,

मृत्युपंथास लागलेल्या या नराधमाचे ते अंगठी घातलेले बोट कापून त्यास भीषण, मरणप्राय वेदना देणारा मृत्यु देते.

प्रेमाचे नाटक करून, त्या स्त्रीच्या शरीराचा उपभोग घेणाऱ्या व तीस वाऱ्यावर सोडून देणाऱ्या वासनाधांच्या अनेक घटना आपण भूत व वर्तमानात घडलेल्या व घडत असलेल्या पाहत आलेलो, वाचत आलेलो आहोत. अशा वाऱ्यावर सोडून दिलेल्या स्त्रियांचे आयुष्य उद्ध्वस्त होऊन जाते. भविष्य अंधारमय होते. त्या अंधारातच मग सुडाग्नीची ज्योत पेटते. हा सुडाग्नी हाच या कथेचा विषय.

हे मंदिर अशाच सुडाग्नीने पेटून उठलेल्या अबलांचे आहे.

पण आता त्या सबला झालेल्या आहेत.

कृष्णनागाप्रमाणे त्या विषारी डंख करणार आहेत.

या सबलेचा चेहरा आता जांभळ्या रंगाचा आहे. कारण--

जांभळा रंग हा स्त्री शक्तीचे प्रतिक म्हणून जगामध्ये स्वीकारण्यात आलेला आहे. ८ मार्च रोजी जगभर “जागतिक महिला दिन” साजरा होतो. त्या दिनाच्या कार्यक्रमामध्ये, आंदोलनामध्ये जगभर जांभळा रंग वापरला जातो.

या मंदिरात कथेतील “मी” सारखे अनेक नराधम मरणप्राय वेदना देणाऱ्या मृत्यूची शिक्षा भोगत आहेत.

आज “मी”... तू ही त्यांचा “सोयरा” झाला आहेस.

(टीप :- अधिक माहितीस्तव 👇

अनेक संकटे झेलूनही स्त्रिया आजही तेजस्वी होत आहेत, बहरत आहेत, त्या संकटातून तावून-सुलाखून निघत आहेत , या विषयावर भाष्य करणारा एक चित्रपट आहे. त्याच्या नावातच “जांभळा” रंग आहे.

“द स्पेल ऑफ पर्पल” हे त्याचे नाव.

अशा महिलांच्या धाडसाला सलाम करणारा, त्यांच्या धाडसी वृत्तीचे कौतूक करणारा हा चित्रपट भारतीय आहे. दिग्दर्शिका प्राची बजानीया.

पितृसत्ताक पद्धतींशी सतत लढा देतांना स्त्रियांना होत आलेला शारीरिक-मानसिक त्रास, वेदना, शीण व त्यातून त्यांच्यात निर्माण होणारी धाडसी शक्ती, ताकद हा विषय या चित्रपटातून मांडला आहे.)

आदरणीय जीए साष्टांग दंडवत* 🙏 🙏 🙏 🙏 🙏

माधव पुराणिक : “जी.एं.च्या कथेतील स्त्रीविश्व- डॉ. प्रमदा उज्ज्वल गांवस देसाई (पुस्तक परीक्षण). “ जी.एं. च्या कथेतील स्त्रीविश्व “ हे डॉ. प्रमदा उज्वल गांवस देसाई यांचे उल्लेखनीय व महत्वपूर्ण पुस्तक, जी. एं. कुलकर्णी यांच्या

जन्मशताब्दी वर्षात (११/०७/२२-१०/०७/२३) प्रकाशित झाले आहे. हा सर्व साहित्यरसिकांकरता दुर्मिळ योगच म्हणावा लागेल. हे ४३६ पानांचे पुस्तक त्यांच्या पी.एच.डी.च्या प्रबंधावर आधारित आहे.

जी. एं.कुलकर्णी यांच्या कथेतील स्त्री पात्रांच्या व्यक्तिरेखांवर, त्यांच्या भावजीवनावर ,समस्यांवर, दुःखावर व एकूणच जीवनावर आत्तापर्यंत अशा प्रकारचे पुस्तक प्रसिद्ध झालेले नव्हते. ती उणीव या पुस्तकाने भरून निघाली आहे.

लेखिका म्हणते “ जी. एं. ची कथा स्त्रीची परिस्थिती, दुःखे, मनोव्यापार प्रकट करणारी कथा नसते तर सामान्यांच्या दुःखाचा अनुभव जी. एं. अंतिम जीवनसूत्राशी लावतात. हे दुःख निव्वळ स्त्रीचे नसते तर मानवाचे असते. म्हणून या चित्रणाला प्रतिकात्मता लाभून ही कथा भावनात्मक प्रत्ययांबरोबरच ज्ञानात्मक प्रत्यय देते. कथांमध्ये जरी स्त्रीचे सामाजिक ,सांस्कृतिक ,आर्थिक असे विविध तपशीलवार संदर्भ आले असले तरी माणूस म्हणूनच तिच्या सुखदुःखाचे, परात्मतेचे, अगतिकतेचे दर्शन ते घडवतात.”

वाचकाला स्त्रीच्या अस्तित्ववादी अनुभवांपर्यंत समर्थपणे व कलात्मकतेने पोहोचायचे असेल तर त्याच्याकरिता या पुस्तकात जी.एं. यांच्या कथेतील स्त्रीविश्व लेखिकेने प्रत्येक कथेतील उदाहरणांसह उलगडून दाखवले आहे.

स्त्रीच्या सर्व भूमिका पत्नी,माता,बहिण, कर्मचारी इ.कौटुंबिक व सामाजिक संदर्भांसह असतात. पण जी. एं. कुलकर्णी हे असे दुर्मिळ लेखक आहेत की त्यांनी या पलीकडचे स्त्रीचे भावविश्व हे एक माणूस म्हणून असते, हे प्रथमच मराठी कथावाङ्मयात अत्यंत प्रभावीपणे पुढे आणले. स्त्रीलाही भय, चिंता मृत्यू, एकाकीपणा, परात्मता ,परावलंबित्व, अस्वस्थपणा, पर्यायहीनता,असंगती इ. ,असे तिच्या अस्तित्वाशी संबंधित जे अनुभव असतात त्याचे चित्र जी.एं.कुलकर्णी यांच्या कथातून आढळते.

हे अनुभव वाचकांपर्यंत पोहोचवण्याकरता पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणात “जी.एं. चे जीवन व साहित्य” सविस्तरपणे व सर्व वैशिष्ट्यांचकट उलगडले गेले

आहे. नंतरच्या चार प्रकरणात "जी.एं. च्या पूर्वकालीन कथेतील स्त्रीचित्रण, जी.एं. च्या कथेतील स्त्रीचित्रण, त्याचे वेगळेपण व त्याची वाङ्मयीन वैशिष्ट्ये" असे तर्कसंगत विवेचन केले आहे. पुस्तकातील भाषा सोपी, थेट, रंजक व प्रवाही असल्याने हा गूढ व तरल विषय आस्वाद्य झाला आहे. शेवटी परिशिष्टांमध्ये "आधार ग्रंथांची सूची"," संदर्भ ग्रंथांची सूची" व "जी. एं. कुलकर्णी यांचे साहित्य" दिल्याने अभ्यासकांना त्याचा उपयोग होणार आहे.

लेखिकेने जी.एं.कुलकर्णी यांचे समकालीन महत्त्वाचे कथाकार कमल देसाई. चिं. त्र्यं. खानोलकर व विद्याधर पुंडलिक यांच्या कथांबरोबरही प्रस्तुत विषयाची समर्पक तुलना केली आहे.

त्यामुळे वाचकाच्या मनात त्या कालखंडातल्या कथांमधले स्त्री विश्वाचे संपूर्ण चित्र उभे राहते. इतकेच नव्हे तर त्यामुळे ही जी. एं कुलकर्णी यांच्या कथांमधील स्त्रीविश्व त्याच्या वेगळेपणाने, अस्तित्ववादी भावाशयामुळे ठसठशीतपणे उठून दिसते.

स्त्रीजीवनाच्या सर्व बाजू कामवासना, जीवनानुभव ,जैविक अनुभव, दुःख, कौटुंबिक जीवन आणि नातेसंबंध लेखिकेने विचारात घेऊन व जी.एं.च्या कथांतील उदाहरणे देऊन स्पष्ट केल्या आहेत. त्यामुळे या कथांतील अमूर्त अस्तित्ववादी आशय मूर्तपणे व्यक्त झाला आहे.

तसेच लेखिकेने जी. एं. कुलकर्णी यांच्या कथा विश्वातील स्त्रीपात्रांचे भाव शब्दबद्ध करण्यासाठी त्यांनी ज्या ऐंद्रिय संवेदनांच्या प्रतिमा वापरल्या त्यांचीही उदाहरणे दिली आहेत.

या अभ्यासपूर्ण लेखनामुळे वाचकालाही आपल्या व्यक्तिगत जीवनाचे सर्वांगीण विशेषत: अस्तित्ववादी आकलन व्हायला मोलाची मदत होईल. जी.एं. कुलकर्णी यांच्या महान प्रतिभेच्या प्रकाशात स्वतःचा जीवनप्रवास कलात्मकतेने, नाट्यमयतेने नवीन मूलभूत जाणीवांनी विस्तारत आहे असे नक्कीच वाटेल.

लेखिकेने जी. एं. कुलकर्णीं सारख्या महान लेखकाचे स्त्री विषयक चिंतनाचे आव्हान समर्थपणे नक्कीच पेललेले आहे असे मला वाटते.

डॉ. माधव पुराणिक, पुणे

९६२३४४२२२१

राजेश उनवणे : जीए यांची “सोयरे” कथा, कथेतील पहिला परिच्छेद आणि सावरी वृक्ष

“सोयरे” कथा ही जीए यांच्या कथा साहित्य-विश्वातील एक अनमोल ठेवा आहे.

माऊलीने “भावार्थ दीपिका” मध्ये अनेक उपमा, प्रतिमा यांची उधळण केलेली आहे. त्या ग्रंथाशी इतर कोणत्याही साहित्याची वा साहित्यकाराची तुलनाच होऊ शकत नाही.

जीए यांच्या कथा वाचताना मात्र ज्ञानेश्वरीचीआठवण होते.

कारण जीए यांच्या कथांमध्ये उपमा/प्रतिमा/रुपके यांची योग्य वेळी व योग्य ठिकाणी केलेली पखरण विस्मयकारक व त्यांच्या अगाध ज्ञान-साधनेची साक्ष आहे.

त्यामूळे “सोयरे “ कथेत सावरीचा उल्लेख येताच आता काहीतरी विलक्षण वाचायला मिळणार याची जाणीव होते.

या सावरीने अनेक प्रतिभावान साहित्यकारांना, कलाकारांना भुरळ घातली आहे. इंदिरा संत यांची सावरीवर एक सुंदर कविता आहे.

“मंदिरापर्यन्त गेलेल्या असंख्य पायऱ्या चढताना माझे अंग सावरीच्या बोंडाप्रमाणे झाले होते.”--- हे कथेचे पहिले वाक्य.

जीए यांच्या या कथेचा रसिकतेने आस्वाद घेणाऱ्या जीए-भक्तांना सावरी वृक्षाची माहिती असणे आवश्यक आहे.

सांवरीचा वृक्ष खूप मोठा असतो. वेदामध्ये याला “यमद्रुम” हे नांव आहे.

या झाडापासून उदी रंगाचा व तुरट असा एक चिकट पदार्थ स्रवत असतो. त्याला “मोचरस” असे म्हणतात. मोचरस हा कामवासना उद्दिपित करणारा आहे. तो कामोद्दीपक, शक्तिवर्धक असतो. तो रक्तस्राव बंद करणारा आहे म्हणून स्त्रियांचा अति ऋतुस्राव, आमांश यासारखे आजारावर गुणकारी असतो.

या झाडांच्या मुळ्या हलक्या असतात. त्यांवर एक पातळ साल असते. या पौष्टिक आहेत. या मुळ्या सावलीत वाळवून इंद्रियशिथिलतेवर देतात. अति घेतल्यास उलटया होतात.

या झाडाला काटे असतात. म्हणून त्यास “काटेसावर” असे म्हणतात. या वृक्षाला “शाल्मली” असेही नाव आहे.

“सोयरे” कथेत सुरवातीस येणारी लहान मुलगी तांबड्या व पांढऱ्या फुलांचा हार घेऊन येते.

काटेसावर दोन प्रकारची असते. एकास पांढरी फुले येतात व एकास तांबडी/लाल फुले येतात. त्यांना पाच पाकळ्या असतात. पुकेसरांची रचना वैशिष्ट्यपूर्ण असते.

फुलाच्या तळाशी पेल्यासारखा खोलगट भाग असतो. त्यामध्ये सवारी वृक्षाने सगळा जीवनरस साठवलेला असतो. तो अतिशय गोड-मधुर असतो. त्यामूळे अनेक पक्षी, भुंगे, सावरीच्या झाडाभोवती गुंजारव करत असतात. या झाडाखाली फुलांचा सडा सदैव पडलेला असतो. माकड, हरिण, खारी, अस्वल अशा प्राण्याना सावरीची ही फुले खूप आवडतात.

अशाप्रकारे काटेसावरीच्या झाडाभोवती पशु-पक्ष्यांची मैफलच जमलेली असते. याचे कारण फुलामध्ये असलेला अतिशय गोड, मधुर असा जीवनरस.

हा अतिशय उंच असा काटेरी वृक्ष आहे. चैत्रामध्ये सर्व झाडांना हिरवीगार पालवी फुटते. पण सावरीच्या झाडाला पाने कमी असतात. फुलांचे छोटे हिरवे बोंड होतात. ते उकलल्यावर पांढरा, रेशमी कापूस दिसू लागतो. वाऱ्याबरोबर तो उडत जातो. या कापसाचे अनेक उपयोग आहेत. हा कापूस उशा-गाद्यांसाठी उत्कृष्ट असतो. (संदीप-सलिल यांच्या गाण्यात एक ओळ आहे – "सावरीच्या उशीहून मऊ माझी कुशी")

ह्या कापसात लहान काळ्या बिया असतात. त्या कापसाबरोबर दूरदूर जातात. मातीत पडतात. पुन्हा अंकुर येतो. एक नवीन सावर जन्माला येते. सृजनाची, नवनिर्मितीची क्रिया पूर्ण होते.

लहानपणी आपण बहुतेकजण या कापसाच्या मागे "म्हातारे, म्हातारी-म्हातारी" म्हणत अनेकदा नाचत पळालो असू. फुलांचे हे बोंड होणे व कापसाची निर्मिती होणे म्हणजे या झाडाची ही शेवटची निसर्गप्रकिया. आता जीवनकार्य संपले.

म्हणून जीए कथेची सुरवातच या वाक्याने करतात ---

"मंदिरापर्यन्त गेलेल्या असंख्य पायऱ्या चढताना माझे अंग सावरीच्या बोंडाप्रमाणे झाले होते."---

कथेतील मी म्हातारा झालेला आहे. सावरीच्या बोंडाप्रमाणे. त्याचा मृत्यूचा प्रवास सुरू झालेला आहे. त्या पायऱ्या तो चढू लागला आहे. त्याच्या

अर्ध्या पायऱ्या चढून झाल्या आहेत. तेव्हा जीए लिहितात — "अर्ध्या पायऱ्या चढून झाल्या, तेव्हा आशेने उमलेल्या मनाने मी वाटेत क्षणभर रेंगाळलो."

मी मध्ये ही आशा कोणते दृश्य पाहून निर्माण झाली?.. तर पुष्करणीतील, त्या विहीरीतील हिरव्या वर्तुळाकृती पानातील लालसर कमळे पाहून.

हा "मी" म्हातारा झालाय. मृत्युपंथाला लागलाय. कमळाची फुले पाहून आशेने तो रेंगाळलेला आहे. अजून गुंजारव करायची सवय गेलेली नाही.

शरीर थकले आहे. पण अजूनही शरीरातील वासना संपलेली नाही. वेळ येताच ती परत परत जागृत होते आहे.

कथेच्या सुरवातीस प्रतिभावान जीएना हे सुचवायचे आहे. पुढची सर्व कथा ही याच मार्गावरून प्रवास करते.

सावरी संदर्भातील लोककथा –

सृष्टीची निर्मिती करताना ब्रह्मदेव थकले. विश्रांतीसाठी ते सावरीच्या झाडाखाली आराम करू लागले. म्हणून त्या काळात सावरीची पाने शिशिरात सुद्धा गळून पडत नसत. सोसाट्याच्या वाऱ्यातही ती गळून पडत नसत. त्याचा सावरीला गर्व झाला. वायुदेव यांना हे समजताच ते वरुणदेवांना सोबत घेऊन तिचे गर्व हरण करणेसाठी आले. दोन्ही देवांना पाहून सावरी घाबरली. तिने आपली सर्व पाने टाकून दिली व देवांची माफी मागितली. देवांनी तिला माफ केले. पुन्हा गर्व करू नकोस असा दम दिला. तेव्हापासून शिशिर ऋतूमध्ये सावरी पूर्णपणे निष्पर्ण असते.

दुसऱ्या एका लोककथेत जेव्हा एखादा पापी माणूस मृत होऊन नरकात जातो तेव्हा तिथे नरक यातना भोगण्यासाठी त्याला सावरीचे काटे टोचून टोचून शिक्षा दिली जाते. यावरूनच सावरिला यमद्रम असंही म्हटलं जातं.

(कथेमध्ये मृत्यूची जाणीव “मी” ने शेवटी स्विकारली आहे. त्याविषयी कथेत जीए लिहितात--- "आता या कुंद, अमंगल ठिकाणी आपल्या पापांचा, गुन्ह्याचा काय तो एकदाचा सोक्षमोक्ष होऊन जाणार या विश्वासाने माझे मन वठलेल्या वृक्षाप्रमाणे स्थिर झाले होते"--)

जंगलात वणवा लागला तरी सगळ्यात शेवटी जळणार झाड सावरीचच असत. तिच्या ह्या उष्णता सहन करण्याच्या गुणधर्मामुळे कोणी तिला भक्त प्रल्हादाच

रूप मानतात. तर काही ठिकाणी सावरीला प्रेतात्म्याशी जोडून तिच्या कोणत्याच भागाचा वापर करत नाहीत.

इंटरनेट वरील देवयानी या लेखिका त्यांच्या काटेसावरी वरील लेखाच्या शेवटी म्हणतात,

“सावरीच्या गर्द गुलाबी फुलांवर जेव्हा सूर्याची किरण पडतात तेव्हा त्यांचं झळाळून उठण त्या फुलांना एक तलम पोत देतात.

ते बघून अस जाणवत की जरी अंगभर काटेरी कवच ओढून घेतल असल तरी मनातली ओल हिला बरोबर जपता आलीय.आपल्यालाही असा मनातला ओलावा कायम प्रत्येक अनुकूल - प्रतिकूल परिस्थितीतही टिकवता आला पाहिजे. निरभ्र निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर चमकदार, गर्द गुलाबी रंगाच्या मोठ्या फुलांनी सजलेल्या निष्पर्ण काटेसावरीच वर्णन करणं खरोखरीच शब्दांपलिकडची गोष्ट आहे.”

अशी ही सावरी.

तिचा समर्पक वापर जीए त्यांच्या कथेत सुरवातीसच करतात.

सावरीचा हा ओलावा कथेतील तिने जपला होता. प्रतिकूल परिस्थितीतही हा प्रेमाचा ओलावा तिने जपला होता. पण हा प्रेमाचा ओलावा वासनेने अंध झालेला कथेतिल “मी” समजू शकला नाही. वासनेच्या मागे मागे धावत गेला. म्हातारा झाला तरी वासनेच्या धुंदीत असलेला “मी” तिच्या कृष्णनागाच्या रूपातील मृत्यु दिसताच परत उलट पळत सुटला. त्या वाटेवर त्याच्यासारखे अनेकजण आधीच, मृत्यूस भेटून वास्तव्यास आलेले होते. ते जणू त्याचेच "सोयरे" होते.

(हा लेख लिहिताना-- आंतरजालावरील काटे सावरीची माहिती, वैद्य गजानन लिखित “आयुर्वेद प्रसार - भाग ५ -एक औषधी वनस्पती - काटेसावरी” मधून व

झाडांच्या माहितीवर आधारित वृत्तपत्रातील काही इतरही लेखांचा आधार घेतलेला आहे)

श्रीकांत देशमुख : राजेशजी, अतीशय सखोल अभ्यासपुर्ण माहिती. आपल्या समर्पक भावगर्भ लेखनाने कथेला हा सुद्धा एक वेगळाच आयाम आहे हे कळते. आदरणीय जि. ए. किती काटेकोरपणे शब्दांचा, उपमांचा, प्रतिकांचा चपखल वापर करीत असत ह्याची पुनःप्रचिती आली. 🙏

दिलिप बडे: पुष्करिणीच्या एका कडेला ऊभा राहून हाडांचा एक सांगाडा आपले एकक हाड निखळून काढून ते त्या पाण्यात धूत होता. त्याने आपली कवटी खांद्यावरून उचलली व पाण्यात बुडवली. बुडबुडे टाकत पाणी खोबण्यात शिरून ओघळून जाताच ती त्याने परत खांद्यावर ठेवली आणि मान वळवून त्याने त्या दोन कोनाड्यांनी माझ्याकडे पाहिले. हे वर्णन म्हणजे येत्या शे दोनशे वर्षात होणारी यंत्र मानवाची भावी लाईफ स्टाईल. हे अस वर्णन जी.ए.लिहित असतील तर जी.एं.ना नियती व निराशावादी न म्हणता प्रखर विज्ञानवादी व दृष्टा लेखक म्हणावे.

सुनीळ सामंत: अगदी माझ्या मनातलं, भावना आणि ज्ञानेश्वरी हा शब्दही. स्लीला या कथेतील लीलाचं हसणं " पर्सची झिप उघडताच आतली मखमल दिसावी" ही उपमा वाचून मलाही ज्ञानेश्वरीची आठवण झाली. ज्ञानेश्वरीमुळे मराठी साहित्यात अलंकार वापरणारे लेखक वाढले आणि लोकप्रिय झाले हे खरे. पण जीएंच्या उपमा उत्प्रेक्षांच्या तोडीचं मला दुसरं कोणिच आठवत नाही. गोनिदां रसाळ लिहितात पण इतक्या चपखल उपमा नसतात. गडकरी प्रासादिक लिहितात पण उपमा ओघात सहज येत नाहीत. माझ्या मते तरी जीए याबाबत ज्ञानोबांनंतर पहिलेच.

मनमोहन आंबेकर: समजली तरी नक्कल करणे शक्य नाही. भाषा समजणेही सोपे नाही. प्रत्येकाच्या वकूबावर ते अवलंबून असेल असे वाटते. तसेच एकाला जो अर्थ जाणवला तोच दुसऱ्याला जाणवेल असेही नाही. अर्थाला अनेक मिती आहेत. पैकी काही अमूर्त आहेत. त्यांच्याच भाषेत little man you only hope to know.

राजेश उनवणे : ✔️

“एकाला जो अर्थ जाणवला तोच अर्थ दुसऱ्याला जाणवेल असेही नाही. अर्थाला अनेक मिती असतात, पैकी काही अमूर्त असतात”--- हे आपले म्हणणे अगदी खरे आहे. 👍

अशी अनेक उदाहरणे साहित्याच्या व इतर कला प्रकारामध्ये (चित्रकला, चित्रपट, संगीत, ईत्यादी) देता येतील.

“मूळ कलाकारास अभिप्रेत असलेला अर्थ आपण त्याच्या या कलाकृतीत शोधू शकतो का/ समजू शकतो का?”----

याची नेहमीच उत्सुकता सर्व रसिकांना असते.....!

उदा..." ती येते आणिक जाते,

येताना कळ्या आणिते

पण जाताना...

फुले मागते "

ही आरती प्रभू यांची कविता. त्यांनी त्यांच्या प्रेयसीला लिहिलेली आहे असाच माझा अनेकां प्रमाणे समज होता...

या कवितेला संगीत देताना पं. हृदयनाथ यांनाही तसेच वाटत होते. याबाबत त्यांनी आरती प्रभूकडे विचारणा केली.

तेव्हा त्यांनी

"ती कविता माझ्या प्रतिभेला उद्देशून लिहिलेली आहे, माझी जी प्रज्ञा आहे तिला मी हे लिहिले आहे" असे सांगितले, तेव्हा पंडितजी ही चाट पडले.

हे जेव्हा मी वाचले, तेव्हा ती कविता, ते गाणे एका वेगळ्याच उंचीवर पोहोचले आहे , याची जाणीव झाली..!

(जीए यांच्या कथा बाबत त्यांनी काहीच भाष्य केले नसल्याने तो अर्थ अमूर्त होतो...आणि शोधावा लागतो)

त्याचप्रमाणे.. मोनालिसाच्या हास्याचे अनेक अर्थ अनेक प्रतिभावान व्यक्तिंनी नमूद केले आहेत..!

थोडक्यात, आपल्या विचारांशी पूर्ण सहमत आहे.

माधव पुराणिक : कथा सोयरे -(सांजशकुन)

विवेचन - माधव पुराणिक

“सोयरे “या शीर्षकातील जी एं कुलकर्णी यांचा उपरोधिक विनोद

कथा सोयरेमध्ये पृथ्वीलोक , मृत्यूलोक आणि देहचैतन्यलोक असे तिन्ही लोक आहेत. आता “सोयरे” या शीर्षकातील उपरोधिक विनोद आपण पाहू या.

पृथ्वीलोकात सोयरे म्हणजे मुलीकडचे नातेवाईक या अर्थाने हा शब्द थोडासा नकारात्मकच वापरला जातो

सोयरा या शब्दाचा अर्थ नातेवाईक ,पाहुणा, यजमान असा आहे.तसंच या शब्दाचा अमूर्त अर्थ स्वरूप ,मार्ग आश्रय, आधार हा पण आहे.

संत तुकारामाचा अभंग “वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे” हा प्रसिद्धच आहे.

“वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें |पक्षीही सुस्वरें आळविती|

येणें सुखें रुचे एकांताचा वास| नाही गुण दोष अंगा येत |”

भावार्थ

या वनांमध्ये राहणाऱ्या विविध प्रकारच्या वृक्ष आणि येथे राहणारे प्राणी आपल्या गोड आवाजाने देवाला हाक मारणारे 🐦 हे सर्व आमचे सोयरे झाले आहेत

यांच्या सानिध्यामुळे येथील एकांतवास सुखकारक झाला आहे

येथे कोणताही गुणदोष अंगाला लागत नाही

संत तुकाराम यांनी म्हटले आहे की” पृथ्वीवरचे वृक्ष, वेली आणि पक्षी हे सर्व त्यांचे सोयरे आहेत. त्यांच्या सानिध्याने माणूस सुखदुःखाच्या पलीकडे जाऊ शकतो.”

जी ए कुलकर्णी यांनी सोयरे हे नाव कथेला देताना वरील सर्व अर्थांचा अत्यंत उपरोधकपणे , विनोदाच्या छटेने उपयोग केला आहे.

मृत्यूलोकातील नायकाच्या सोयऱ्यांचे वर्णन खालील प्रमाणे केले आहे-

“माझ्या भोवती पोट उमळून टाकणाऱ्या कुबट दर्पाच्व्या आकृतींची गर्दी झाली. त्यातील एकाने बोटे नसलेला पंजा घेतला व घोगऱ्या आवाजात म्हटले,” आता तू येथेच राहा, कारण आता तू आमच्यापैकीच एक झाला आहेस.आम्ही तुझे सोयरे आहोत

ठिकठिकाणी त्यानंतर मी ठिकठिकाणी धुपून जळत असलेल्या मांसाच्या आकृतींशेजारीच एका कोपऱ्यात निर्विकारपणे बसलो.

कारण आता तेच माझे सोयरे उरले

माधव पुराणिक : संत तुकारामांच्या आणखी एका अभंगांमध्ये सोयरे हा शब्द आलेला आहे आणि एखाद्याला जेव्हा श्रद्धेने, भक्तीने, ईश्वरी / वैश्विक /अनाकलनीय

शक्तीचा थोडासा अनुभव येतो त्या वेळेला त्याला जगातील सर्व मंडळी प्राणसखा म्हणजे सोयरे सकळ अशी वाटू लागतात.

पण जी ए कुलकर्णी यांचा नायक हा अश्रद्ध असावा. नायकाची त्याला आलेल्या अनुभवांवरून ,त्याने ठरवलेल्या नीतीनियमांवरच , बुद्धिनिष्ठ, तर्कनिष्ठ ,वैज्ञानिक, व्यावहारिक, पार्थिव, कौटुंबिक व सामाजिक नातेसंबंधातून, त्यांच्या मान्यतेच्या चौकटीत प्रत्ययाला आलेल्या जगण्यावर श्रद्धा आहे. त्यातून आपोआप घडलेल्या, स्वतःच्या स्वभावानुसार, वागण्यावर त्याचा विश्वास आहे. नियतीने त्याच्यावर केलेले आघात सोसून प्रबळ जीवनेच्छेला स्वीकार करून ,आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत, स्थळकाळाच्या बिंदूंवर तरंगत जाण्यावर त्याचा भरवसा आहे.त्याला नियतीच्या अनाकलनीय शक्तीचा अनुभव येतो आणि त्याला मृत्यूलोकातील सोयरे सकळ हे प्राणशत्रु असल्याचे वाटू लागतात.

संत तुकारामांचा अभंग खालील प्रमाणे आहे -

अवघे जन मज जाले लोकपाळ | सोईरे सकळ प्राणसखे || ४ |
तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें |जालें तुझे सुख अंतर्बाही || ५
भावार्थ
सर्व जन, लोक हे सर्व माझे, प्राणसखे सोयरे झाले आहेत
तुकाराम महाराज म्हणतात ,तुझ्या संगतीमुळे मी सर्व सुखी झालो आहे."
सार्थ श्री तुकारामाची गाथा(१३०७)
विष्णू नरसिंह जोग महाराज प्रत

सोयर कथेतील सोयऱ्यांचे हे वर्णन पहा -

“मी आत पाऊल टाकताच लाल आणि निळी शिरस्त्राणे आळीपाळीने घातलेली अनेक माणसे एकदम जमिनीतून उगवल्याप्रमाणे एकदम खांबांवरून पुढे आली.

“आम्हाला चेहऱ्यावर जांभळा रंग आवडतो” त्यातील पहिल्याने म्हटले.

एकाने हात पुढे केला व मूठ उघडली तिच्यात काळा केसाळ विषारी कोळी होता.”

माधव पुराणिक, ९६२३४४२२२१

दिलिप बडे: ती येते आणीक जाते.खुलता कळी खुलेना दोन्ही गाणी,त्यातुन कवीचा-लेखकाचा मुळ अर्थ श्रोंत्यांपर्यत पोहोचणे आकलन होणे खरच दुर्लभ.प्रत्येकाच स्वतंत्र जग झोपेतुन ऊठल्यावर सुरू होते.झोपी गेल्यावर प्रत्येकाच जग झोपी जात.या ग्रूपवर आपण जी.एं.च जग,आपापल्या वकुबा नुसारच जाणतो. जी.एं.ची समज आणि आपल आकलन यात दोन ध्रूवांमधल अंतर असाव.

राजेश उनवणे : प्रतिभावान जीए आणि रुपके/प्रतिमा/उपमा यांच्या माध्यमातून समजत जाणारी “सोयरे” कथा

१) “ झगझगीत” नाणे –

डाव्या बाजूने, हातात अनेक हार घेऊन एक मुलगी आली. “मी” ला हार नको होता. “मी” ला मंदिरात देवता कोणती आहे हेच माहिती नाही. हार कोणत्या फुलांचा घ्यावा की हळदीकुंकू व्हावे हे ही त्यास माहित नाही.

पण त्या मुलीचा हसरा चेहरा व निरागस डोळे त्याला आवडले. त्याचे मन सुखावले. ती आवडली. म्हणूनच त्याने तिच्याकडून तांबड्या-पांढऱ्या फुलांचा

मिसळ हार घेतला आहे. त्याने तिच्या हातावर नाणे ठेवले. पण ते नाणे कसे आहे? झगझगीत आहे. (तिच्या डोळ्यासारखेच- इति जीए)

----------०००

-----तारुण्याची चाहूल लागेलल्या, पण लैंगिकतेचा अर्थ न समजलेल्या, अनेक कोवळया मुली, प्रेमाच्या भ्रामक कल्पनेखाली, अशा वासनांधाकडून नेहमीच सावज केल्या जातात. त्यातही ती सुंदर असेल, तर विचारायलाच नको. मग बेगडी प्रेमाबरोबरच हाती खुळखुळणाऱ्या पैशाचा भरपूर वापर होतो. एकदा का वासना शमली, की हे शिकारी निघून जातात. त्या निरागस, निष्पाप मुलींचे आयुष्य उद्ध्वस्त करून. आता तिला आई-वडिलांचा आधार पूर्वीसारखा रहात नाही. विश्वास ठेवलेला तो प्रियकरही नाही. समाजातही नाचक्की. अशावेळी तिला एकच आधार असतो,.. तो म्हणजे ,,,,मृत्यु. (अशा घटना तिन्ही काळात घडल्या, घडत आहेत व घडणार आहेत.)

त्या बेगडी प्रेमाचे नाटक करताना, “आपण किती श्रीमंत/ पैसेवाले आहोत” याचे “मी” ने तिच्यासमोर; त्यावेळी प्रदर्शन केले होते. म्हणून हे नाणे “झगझगीत” आहे.

२) मला ही “अंगठी” दे

“मी” च्या बेगडी प्रेमावर “ती” ने निरागसपणे तेव्हा विश्वास ठेवला होता.

त्या विश्वासाने तिने केव्हा तरी, आपल्या प्रेमाचे प्रतिक म्हणून “मी” ला अंगठी घातली होती – याचा उल्लेख जीए यांनी कथेत स्पष्टपणे केलेला नाही. पण सूचित केलेला आहे.

तो सूचित होतो – “मी” हा मंदिरात प्रवेश करून चौकात आल्यावर.

मंदिरातील त्या चौकात आधीच गर्भगळीत झालेल्या “मी” ने पुढे जाण्यासाठी प्राण ताणून वेगाने धाव घेतली. पण..

मध्येच त्याच्या पायातील शक्ती गेली. तो जागच्या जागी खिळून गेला.

कारण समोर पुन्हा “ती” आली होती. हातात हार घेऊन.

पण यावेळी ती टवटवीत निरागसता तिच्यात नाही. तिचे अंग सुजलेले आहे. चेहरा गंजलेला आहे. विटलेला आहे. “मी” चे अंगठी घातलेले बोट धरून ती म्हणते, “ मला ही अंगठी दे.”

“मी” व “ती” या दोघांमधील, त्यावेळचे प्रेम संबंध (?) हे जीए यांनी “मला ही अंगठी दे” या एका वाक्यातून सूचित केलेले आहे.

३) पण –”स्वत: तिच्या हाताला बोटे नव्हती”

याचा अर्थ--- “ती” या पृथ्वीतलावर आता अस्तित्वात नाही. तिने तेव्हाच कधीतरी मृत्यूला कवटाळले आहे.

पण “तो” जरी जिवंत असला तरी वयोमानाने आता मृत्युच्या जवळ पोहोचलेला आहे. पण तो मृत्यु शांततेत येणारा नाही. भीषण असा मृत्यु त्यास येणार आहे.

कारण...

“ती” चे भूत आता त्याच्या मानगुटीवर बसलेले आहे. केलेल्या कर्माचे फळ त्यास आता ते भोगावायस लावणार आहे. (डॉ. अलकाजी यांनी सुतोवाचमध्ये नमूद केलेला – “कर्मसिद्धांत”)

४) “तिला एक लाथ मारताच,, ती जमिनीवर आदळली” आणि “अंधारातले डोळे”

तिचे हे भीषण रूप पाहून “मी” रक्त विरजल्यासारखा गर्भगळीत झाला.

तिला ती अंगठी तो परत देत नाहीच. उलट लाथ मारतो.

“ती” तर भूत असल्याने त्याचे पाऊल तिच्या मांसात रुतते. (--- हाताला पंजा नसलेले, धडावर शिर नसलेले, पाय उलटे असणे, अशी भुताची वर्णने आपण लहानपणापासून वाचत आलेलो आहोत.---)

पण त्याचवेळी--- (अंधारातील मंद डोळयांचा प्रकाश प्रज्वलित व लालसर झाला. -इति जीए)

याचा अर्थ “ती” सारख्या फसवणूक झालेल्या अनेक मुली, स्त्रिया यांनी मृत्युला स्वीकारले होते. त्या मंदिरात त्यांनी त्यांच्या वासनांध प्रियकरांचे असेच भीषण मृत्यु घडवून सूड घेतलेला आहे. ते वासनांध “प्रियकर” या मंदिरात जणू “मी” चे “सोयरे” म्हणून मृत्यूनंतर हजर आहेत. (भोवती सर्वत्र सडत चाललेल्या मानवी, जर्जर मांसाचा भोवळ आणणारा असह्य दर्प भरून राहीला होता-इति जीए)

त्या स्त्रीया ही आता “भूत” रूपाने मंदिरात उपस्थित आहेत. (सभोवारचा अंधार टपून राहिल्यासारखा वाटत होता. त्यात अस्पष्ट दिसणाऱ्या पण सतत हलत असलेल्या अनंत छाया होत्या, आणि त्यांच्यावर तरंगणारे अनेक मंदप्रकाशी डोळे होते—इति जीए)

हे डोळे त्या पीडित स्त्रियांचे आहेत. ते मंदप्रकाशी आहेत. पण “ती” ला लाथ मारताच---- –(अंधारातील मंद डोळयांचा प्रकाश प्रज्वलित व लालसर झाला, व ते एकदम माझ्याभोवती जमू लागले -इति जीए) -- त्या स्त्रिया क्रोधित झालेल्या आहेत.

“मी” ला वेड्यासारखे हातवारे करत तेथून पळून जाण्याशिवाय आता पर्याय राहिलेला नाही. ते पळणे म्हणजे भरकटणे आहे. ते प्रत्येक क्षणाला चेहऱ्यावर आदळणाऱ्या, चिवट, न सरकवता येणाऱ्या चिवट कोळीष्टकां मधून आहे.

५) “ती” डावीकडून येणे व “तो” उजवीकडे वळणे.

कथेमध्ये “ती” सुरवातीस हार घेऊन येते तेव्हा “डावीकडून” तिचा प्रवेश होतो.

पण --- मंदिरातील तिचे दर्शन हे त्या निरागस, निष्पाप बलिकेचे आता एका सुंदर तरुणीमध्ये रूपांतर झालेले आहे, हे दर्शवते. (तिची पाठमोरी रेखीव आकृती कमळाच्या उभार कळीत सूर्यप्रकाश भरल्याप्रमाणे धुंद वाटली – इति जीए)

थोडक्यात-- निसर्गनियमाप्रमाणे “कळीचे फुलात रूपांतर” झाले आहे. हेच जीए सुचवू इच्छितात.

तिचा मार्ग डावीकडून येणारा आहे. तो प्रेमाचा आहे. शांततेचा आहे.

“मी” मात्र फुललेल्या पूर्ण फुलाला पाहून, त्या तारुण्यास पाहून धुंद झाला. तिचा एक दृष्टिक्षेप त्यास अगदी घायाळ करून गेला. मन बावरल. मनात तिची अभिलाषा जागृत झाली. वासना जागृत झाली. मग...

हातातील हार मूर्तीला वाहिला गेला नाही. तो मूर्तीकडे टाकला गेला.

तो उजवीकडे वळला. कारण --

मरायला टेकला तरी शरीरातील वासना मेलेली नव्हती. तो मार्ग वासनांधासाठी होता. आपसूकच तो तिकडे वळला. आणि

हा वासनेचा मार्ग कसा होता?

(पण मध्येच कोठेतरी पाऊल चुकले, दृष्टी भ्रमित झाली. अनेक अंधाऱ्या पायऱ्या, धुळीने कुंड झालेल्या ओलसर खोल्या, वळणे घेताना कपाळावर आदळलेल्या ओबडधोबड, तेलकट भिंती यांच्या चक्रव्यूहात माझे अंग घुसळून निघाले व आंधळया पावलातून रक्त थिबकू लागले. ---इति जीए)

--------०००-------------

(टीप- जीए यांच्या सिद्धहस्त लेखणीतून लिहिल्या गेलेल्या “सोयरे” कथेतील प्रतिमा/रुपकांचा वरील अर्थ माझ्या कुवतीप्रमाणे मला समजला आहे व शब्दबद्ध केला आहे. तो तसाच आहे वा हाच अर्थ जीएंना अभिप्रेत आहे असा माझा आग्रह

नाही. ग्रुपमधील इतरही जीएभक्त यांना अनेक अर्थ या कथेतून सुचू शकतात व ते त्यांनी मोकळेपणाने लिहिल्यास ग्रुपवर त्याचे स्वागतच होईल. आणि त्याचा आस्वाद घ्यायला नक्कीच आवडेल.)

अलका तडकलकर : खूप अभ्यास आहे

एकतर ही कथा खूप रूपके वापरून विस्तारली गेली. त्यातून कर्म, प्रवृत्ती यावर मोठे चिंतन आहे

विलास वाघोलीकर: मा. अलकाजींनी कथेचे सूतोवाच मुद्देसूद व धाडशी केले आहे. राजेशजींनी जीएंची वाक्ये बोल्ड टाईपमध्ये देवून त्याचा गूढार्थ सांगीतला आहे. आपण कथेचे अनेकदा वाचन केले आहे.व applied their mind. त्यामुळे कथेचा अर्थ कळण्यासाठी दिशा मिळाली आहे. कवितेचे - कथेचे वैशिष्टय असते की तिचे अनेक अर्थ संभवतात. लावता येतात. उदाहरणार्थ बालकवींच्या औदुंबर कवितेचे अनेक अर्थ लावले गेले आहेत. ग्रुपचा उद्देश अनेक पैलू दाखवायाचा असल्याने सफल झाला आहे. अजूनही अनेक जण लिहितील ,अर्थ लावतील. स्त्रीच्या बालिका ते पुढील अनेक अवस्थांचे चित्रण करणारी ही कथा पुन्हा पुन्हा वाचली जाईल. धन्यवाद. विलास वाघोलीकर

राजेश उनवणे : कौतुक करायचे ते आदरणीय जीए यांचे...!

त्यांच्या ज्ञानपिपासू अभ्यासू वृत्तीचे..! 👍

त्यांचे अफाट वाचन, प्रत्येक विषयावर असलेले त्यांचे सखोल ज्ञान, त्यावर तितक्याच सखोलपणे केलेले चिंतन, एखाद्या विषयाला (थीम) कथेच्या माध्यमातून सादर करताना त्या विषयाची सुसंगतवार केलेली जोडणी, त्यातील पात्रांची निर्मिती, अर्थपूर्ण शब्दांची उधळण करत सोबतीला घेतलेल्या प्रतिमांचे, उपमा- रुपके यांची

रेलचेल, आणि हे सगळं मूळ विषयाला चिंतनात्मक पद्धतिने, कथेच्या माध्यमातून साकार करताना त्यांनी त्यांची स्वतः ची महतप्रयासाने कमावलेली खास जीए - शैली... हे सगळं खरोखरच विस्मयकारक आहे...!

असे लिखाण खूप कठीण असते. पण तितकेच प्रभावशाली असते...! वाचकाला कथा वाचताना आपण विलक्षण असे काहीतरी वाचत आहोत, याची जाणीव होते...! ज्यांना कथेचा अर्थबोध होत नाही ते जीए यांच्या कथा वाचण्याचे सोडून देतात...!

पण जीए यांच्या कथा वाचून काही जिज्ञासू, रसिक वाचक झपाटले जातात. परत परत ती कथा वाचत त्या कथेचा आशय समजावून घेतात...तसा रसिक, जिज्ञासू वाचकमित्र भेटला तर दुग्धशर्करा योगच...! त्याच्याशी कथेतील विलक्षणतेवर चर्चा करतात...आणि या असामान्य साहित्यिका समोर नतमस्तक होऊन... जीए -भक्त होऊन जातात...!

माधव पुराणिक : कथा सोयरे- सांजशकुन

विवेचन भाग ४ - डॉ माधव पुराणिक

अस्तित्ववादातील निवडीचे स्वातंत्र्य

परिस्थितीतले निवडीचे स्वातंत्र्य : अगतिकतेच्या मालिका

चलबिचल अस्तित्वाचे अचल वस्तूत रूपांतर :सोयऱ्यांची भेट

मुलगी आणि नायक यांच्या दुबळया स्वातंत्र्याची करूण अखेर

सरेन किर्केगार हा अस्तित्ववादी विचारप्रणालीचा एक मुख्य तत्वज्ञ त्याचे विचार खालील प्रमाणे आहेत -

“ माणूस हा विश्वाचे स्वरूप तटस्थतेने समजून घेणारा द्रष्टा नाही. मूलत: तो कर्ताआहे. आपण काय करावे, कसे जगावे हे त्याला स्वतः निर्णय घेऊन ठरवावे लागते.

अस्तित्वात बुद्धीप्रणित तत्त्वे मूर्त झाली आहेत असे नाही म्हणून ते निरर्थक आहे. योग्य जीवन मार्ग स्वतःला निवडावा लागतो. ही निवड तिच्या पलीकडच्या वस्तूनिष्ठ निकषांवर योग्य किंवा अयोग्य ठरत नाही. कारण ते निकष त्या निवडीचाच भाग असतात. एखाद्या विवक्षित जीवनमार्गात जे काही अंतर्हित असेल हे स्पष्ट करणे, त्याची तपशीलवार, सुसंगत चित्र आपल्यासमोर उभे करणे एवढेच बुद्धीचे कार्य असते. त्याचे समर्थन करणे हे बुद्धीचे कार्य नसते. व्यक्तीची निवड ही निराधार, स्वेच्छेने केलेली असते. ती निवड बुद्धिनिष्ठ निकषांवर केलेली नसते.

दोन प्रकारचे जीवन मार्ग असतात -

१) सौंदर्यान्वेशी माणूस -हा केवळ अनुभवांचा रस टाकण्यासाठी जगत असतो. वाटेल तो मोह दूर करून प्राप्त कर्तव्यनिष्ठेला त्याच्या जीवनात स्थान नसते.

२) नैतिक जीवन हे शांत ,अविकार्य पण असीम उत्कटतेने समोरचे साधेसुधे कर्तव्य पार पाडले पाहिजे यावर आधारित असते.

अस्तित्वाचे स्वरूप मानवी बुद्धीला अनाकलनीय म्हणून मानवी बुद्धीला परके असते. म्हणून ते जसे असेल तसे स्वीकारण्याचा निर्णय घ्यावा लागतो.पण निरर्थक सत्य आपल्या समंजस वर्तनाचे व नैतिकतेचे जे निकष असतात त्यांचा हे निरर्थक सत्य भंग करते.यामध्ये आपल्या मूल्यांची उलटापालट होते. मूल्यांशी प्रामाणिक राहण्यात व्यक्तीला सतत यातना भोगाव्या लागतात.

मानवी अस्तित्वाविषयीचे सत्य व्यक्तिनिष्ठ असते ,वस्तुनिष्ठ नसते. माणसाला स्वतःच्या स्वरूपाचा शोध घ्यायचा नसतो तर ते घडवायचं असते.ते घडविण्याचे त्याचे त्याला स्वातंत्र्य असते. हे स्वातंत्र्य मानवी जीवनाचे सार आहे.

(मराठी विश्वकोश,- अस्तित्ववाद)

व्यक्तीला विशिष्ट परिस्थितीत निर्णय घ्यावे लागतात. ही विशिष्ट परिस्थिती एका क्षणाची असू शकते ,काही तासांची असू शकते किंवा काही दिवसांची असू

शकते.जोपर्यंत व्यक्ती त्या विशिष्ट परिस्थितीतला महत्त्वाचा निर्णय घेत नाही तोपर्यंत ती कायम राहते.

विशिष्ट परिस्थिती आणि मर्यादित स्वातंत्र्य १

कथेचा नायक, "मी" प्रौढ वयात निर्वाणीचा उपाय म्हणून आपल्याला दुःखात लुटणाऱ्या प्रश्नावरचा उपाय शोधायला मंदिराकडे निघाला आहे. आता लवकरच मंदिराच्या पायऱ्या संपल्यानंतर, मूर्तीचे दर्शन घडल्यावर ,आपल्या मनावरचा दीर्घकाळपर्यंत असणारा ताण नाहीसा होणार, शारीरिक ताण तणाव नाहीसा होणार अशा भावनेने नायकाचे शरीर सावरीच्या बोंडाप्रमाणे हलके, तरल झाले होते आत्तापर्यंत त्याचे मन जड, सुस्त होते. ते आता या नवीन आशेने आणि अपेक्षेने हलके होऊ लागले होते.

तेथे त्याला हार विकणारी एक मुलगी भेटली.त्यामुळे त्याच्या गत आयुष्यातील एक हुरहुर जागविणारी आठवण लागली आहे." पण त्या मुलीचा हसरा चेहरा व नाचरे निरागस डोळे मला फार आवडले. माझे मन सुखाने ओसंडत होते. तिच्या डोळ्यांसारखेच एक झगझगीत नाणे तिच्या हातावर मी ठेवले."

नायकापुढे दोन पर्याय असतात.

एक बुद्धीने, तर्कसंगत सुचवलेला हार न घेण्याचा

आणि दुसरा मनात निर्माण झालेल्या इच्छेमुळे जी सुखाची भावना होते त्यामुळे तो हार घेण्याचा.नायक हे निवडीचे स्वातंत्र्य स्वीकारतो व दुसऱ्या पर्यायाप्रमाणे हार विकत घेतो.

नायकाचे जे व्यक्तिमत्व प्रत्यक्ष घडलेले असते ते त्याने निवडलेले असते - स्वतःच्या इच्छेप्रमाणे. त्याला इतर कोणताही आधार नसतो. तर्कसंगतीचा किंवा कार्यकारणभावाचा. नायकाने याबरोबरच त्याने जगाच्या स्वरूपाविषयी कल्पना ,विचार,वागण्याची चौकट ही निवडलेली असते. यामध्ये इतर व्यक्तींबरोबर कसे

वागायचे कोणत्या प्रसंगात काय करायचे हेही त्याने ठरवलेली असते. (कार्ल यास्पर्स, अस्तित्ववादी तत्त्वज्ञ)

मानवी अस्तित्वाचे विशेष म्हणजे ते सीमित असते व मृत्यूने संपुष्टात येते. नायकही प्रौढ वयात बरेचसे आयुष्य जगून झाल्यानंतर या आपल्या आयुष्याच्या अंताकडे निश्चितपणे जात असतो व मंदिराकडे जाणे हा त्याचाच एक भाग असतो.

तसेच मानवी अस्तित्व हे क्षणाक्षणात विखुरलेले असते. प्रत्येक क्षणी काहीतरी नवीन घटना घडत असते आणि त्याप्रमाणे ही पहिली घटना हार विकणारी मुलगी त्याला भेटते" ही घडते. आणि तेथे तो हार घेण्याचा निर्णय घेतो.

तो तसाच पुढे जातो आणि भविष्यकाळाला सामोरा जातो. हा भविष्यकाळ बंदिस्त नसतो , पूर्वनियोजित नसतो. त्यामुळे या भविष्यकाळाला रूप देणे त्याला शक्य असते. त्याला निवडीचे स्वातंत्र्य असते.या शक्यतेची जाणीव ,स्वातंत्र्याची जाणीव म्हणजेच अस्तित्ववादातील निवडीचे स्वातंत्र्य. (मार्टिन हायडेगर, अस्तित्ववादी तत्त्वज्ञ)

नायकाने असे रूप दिले नाही तर त्याला हे अस्तित्व शून्य आहे, निरर्थक आहे असा भास हळूहळू होऊ शकतो.

विशिष्ट परिस्थिती आणि मर्यादित स्वातंत्र्य २

नंतर त्याला गाभाऱ्यामध्ये फुले वाहणारी एक अत्यंत सुंदर तरुणी दिसते त्यामुळे त्याच्या मनात पूर्वआयुष्यातील अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीची आठवण अतिशय तीव्रतेने जागृत होते

" त्या तरुणींची पाठमोरी रेखीव आकृती कमळाच्या उभार कळीत सूर्यप्रकाश भरल्याप्रमाणे धुंद वाटली. जाताना तिने मागे बळून एक दृष्टीक्षेप केला.पण त्या एका दृष्टीक्षेपात तिने माझे सारे आयुष्य संपुष्टात ठेवल्याप्रमाणे केले व ती निघून गेली"

नायकाला येथे क्षणिक धुंदीचा परत अनुभव येतो जरी त्यातून निर्माण होणारे दुःख आधी जाणवलेले असले तरीसुद्धा.

येथे नायका जवळ दोन पर्याय असतात -

पहिल्या पर्यायांमध्ये गाभाऱ्यातून सरळ मूर्ती कडे जाणे आणि तो ज्या हेतूने मंदिरात आला होता त्या हेतूवर लक्ष केंद्रित करणे.

दुसरा पर्याय म्हणजे तसे न करता उजवीकडच्या दालनात जाणे.

नायक दुसरा पर्याय स्वीकारतो "कारण ते मंदिर कोणत्या देवतेचे आहे हे देखील मला माहीत नव्हते" बाबरलेल्या मनाने तुम्ही हातातील हार मूर्तीकडे टाकला."

विशिष्ट परिस्थिती आणि मर्यादित स्वातंत्र्य ३

नंतर अनपेक्षितपणे नायक अधोलोकात जातो."पण मध्येच कुठेतरी पाऊल चुकले दृष्टी भ्रमिष्ठ झाली अनेक अंधाऱ्या पायऱ्या ,धुळीत कुंद झालेल्या ओलसर खोल्या...".

तेथे त्याला पृथ्वीलोकातील मुलगी अर्धमृत, विद्रुप अवस्थेत भेटते व म्हणते "मला ही अंगठी दे"

तिने आपल्या पंजात माझे अंगठीचे बोट धरले व ती म्हणाली "मला ही अंगठी दे." स्वतः तिच्या हातांना बोटे नव्हती. "

अंगठी म्हणजे दोन व्यक्तींमधील प्रेमाचा डोळाच म्हणता येईल.

पण नायक तिला लाथ हाणून झिडकारतो.

येथे नायका पुढे दोन पर्याय असतात -

पहिला पर्याय म्हणजे त्या मुलीच्या झालेल्या अनपेक्षित भयचकीत करणाऱ्या दर्शनाने स्वतःच्या संरक्षण करण्यासाठी तिच्यापासून दूर जाणे.(Flight)

दुसरा पर्याय म्हणजे धैर्याने या परिस्थितीकडे शांतपणे पाहणे व मग निर्णय घेणे.(Fight)

हे दोन पर्याय अजूनही प्रत्येक व्यक्तीमध्ये आदिमानवापासून आलेले आहेत आणि नायक त्याच्या जीवनदृष्टीनुसार पहिल्या पर्यायाचा स्वीकार करतो.

विशिष्ट परिस्थिती आणि मर्यादित स्वातंत्र्य ४

“तिच्या आठवणीने एकदम हुरहुर वाटू लागली आणि जिव्हाळा दाटून आला.आता ती या क्षणी कोठे असेल याच एका विचाराने मी व्याकुळ झालो.”

नायकाला त्या मुलीबद्दल आधी वाटलेल्या सर्व चांगल्या भावना परत जागृत होतात.

येथे नायका पुढे दोन पर्याय असतात -

पहिला पर्याय म्हणजे या भावनांकडे दुर्लक्ष करून तेथून पळून जाणे.

दुसरा पर्याय म्हणजे त्याच्या जीवनदृष्टीनुसार त्याचे कर्तव्य पार पाडणे व त्या मुलीला शक्य तेवढी मदत करणे. हा दुसरा पर्याय म्हणजे नायकाचे जे नैतिक वर्तनाचे निकष असतात त्याला अनुसरून असतो.

विशिष्ट परिस्थिती आणि मर्यादित स्वातंत्र्य ५

“ मी तिच्याजवळ गेलो व आवेगाने तिच्या खांद्याला स्पर्श करत म्हटले,” चल माझ्याबरोबर, येथून आपणाला तत्काळ निसटले पाहिजे.”

नायक आपल्या आधीच्या चुकलेल्या वागण्याचे परिमार्जन करण्यासाठी तिला घेऊन जाऊन जणू नवीन आयुष्य सुरू करणार आहे असे वागतो.

येथे नायकासमोर दोन पर्याय असतात-

पहिला पर्याय म्हणजे आत्तापर्यंत त्याने तिच्याबद्दल वाटलेल्या खऱ्या भावना व्यक्त न करता, परत कोरडेपणाने त्या मुलीशी संवाद करणे.

दुसरा पर्याय म्हणजे आपल्या हृदयातल्या भावना संपूर्णपणे व्यक्त करणे.

नायक दुसरा पर्याय स्वीकारतो कारण तो त्याच्या जीवन इच्छेशी सुसंगत असतो

विशिष्ट परिस्थिती आणि मर्यादित स्वातंत्र्य ६

“शून्य , निर्विकार लुबाडल्या गेलेल्या डोळ्यांनी आम्ही क्षणभर एकमेकांकडे पाहिले. निरोप घेण्याचा ओला अश्रूआनंद देखील आमच्याजवळ उरला नाही. इतके सारे क्षणात जळून खाक झाले होते.”

त्या मुलीला मृत्यूलोकामध्ये फक्त निर्विकारतेच्या अनुभव असतो पण आधीच्या आयुष्यातील नायकावर सूड घेण्याची भावना जागृत असते. तसेच नायकालाही ती मुलगी पूर्वीच्या आयुष्यात होती तशी जिवंत व आकर्षक हवी असते व त्याला या स्वरूपातल्या मुलीच्या स्वीकार करायचा नसतो.

येथे नायकाला दोन पर्याय असतात -

पहिला पर्याय म्हणजे त्याने जी जीवनदृष्टी स्वीकारलेली असते ती म्हणजे ती मुलगी नायकाच्या शारीरिक, मानसिक सुखाच्या, उपभोगाच्या कल्पनेमध्ये बसत असेल तर तिचा स्वीकार करणे.

दुसरा पर्याय म्हणजे जर तिचे शारीरिक रूप, तिच्या मनातील नकारात्मक भावना , यामुळे त्याच्या सुखी भविष्याच्या कल्पनेत बसत नसेल तर तिचा स्वीकार न करणे.

नायक दुसरा पर्याय स्वीकारतो.

विशिष्ट परिस्थिती आणि मर्यादित स्वातंत्र्य ७

"जे अनिवार्य आहे ते भोगलेच पाहिजे अशी आतड्याच्या आतड्यात निष्ठूर जाणीव झाली की जे येते ते अंतिम निर्विकार धैर्य माझ्यात आले होते. आता या कुंद अमंगल ठिकाणी आपल्या पापांचा, गुन्ह्याचा काय तो एकदाचा सोक्षमोक्ष होऊन जाणार या विश्वासाने..."

नायकाने सर्व प्रकारे आपल्या गुन्ह्याचे परिमार्जन करायचा प्रयत्न केला पण ते झाले नाही व आता या शेवटच्या क्षणी त्याच्या मनात त्या अटळ निर्णयाच्या न्यायनिवाड्याच्या अवस्थेला सामोरे जाण्याचे धैर्य निर्माण झाले.

नायकासमोर दोन पर्याय असतात -

पहिल्या पर्यायात जर त्याच्या मनासारखे घडले नाही तर त्याचा स्वीकार न करणे.

दुसऱ्या पर्यायात काहीही घडले तरी ते अंतिम निवाडा समजून त्याचा स्वीकार करणे. कारण नायकाने आत्तापर्यंत केलेले सर्व प्रयत्न असफल ठरलेले असतात व त्याच्या यातना त्याला सतत भोगावे लागत असतात.

येथे नायक दुसरा पर्याय स्वीकारतो.

विशिष्ट परिस्थिती आणि मर्यादित स्वातंत्र्य ८

" ही मुलगी घोळक्यातून पुढे आली व बोटे नसलेल्या पंजात तिने माझी बोटे घेतली." मला ही अंगठी दे " ती म्हणाली अंगावर थरारलेला शहरा मी तसाच जाऊ दिला व बोटे असलेला पंजा तिच्या बोटे नसलेल्या हातात राहू दिला. तेव्हा शिरन् शीर मृत झालेल्या माझ्या निर्जीव, सुजलेल्या हातातून ते बोट अंगठीसह निसटून निघाले आणि ते घट्ट पकडून ती निघून गेली."

या क्षणी नायकाच्या मनातल्या अपराधीपणाच्या व इतर सर्व भावना नाहीशा झाल्या व तो केवळ एका भीषण स्वरूपाचे शरीर असलेल्या स्थितीत सत्याला सामोरे गेला.

या ठिकाणी मृत्यूच्या क्षणी नायकाला कोणताही पर्याय नसतो व तो आपल्या शारीरिक ,भावनिक मृत्यूचा स्वीकार करतो व केवळ एक अमूर्त अस्तित्व म्हणून एका कोपऱ्यात बसतो.

समारोप

सोयरे या कथेमध्ये अस्तित्ववादातील व्यक्तीच्या निवडीचे स्वातंत्र्य व त्याच्या बरोबरच त्याच्या अटळ, भीषण परिणामांची व्यक्तीवर येणारी जबाबदारी अत्यंत कलात्मकतेने व नाट्यमयतेने दाखविली आहे.व्यक्ती या जीवनात अगतिक असते ,असहाय्य असते व त्याचे अस्तित्व विशिष्ट परिस्थिती निर्माण होणाऱ्या जाणीवांना सामोरे जाते व त्याच्या जीवनदृष्टीनुसार एकाची निवड करते.

अशी निवड करीत करीतच व्यक्ती मानवी अस्तित्वाचा शेवट जो मृत्यूच्या जाणिवेने होतो त्या जाणिवेत नाहीशी होते.

माधव पुराणिक

९६२३४४२२२१

माधव पुराणिक : https://youtu.be/dkSCCI-yh7k

स्लीला- जी ए कुलकर्णी- हिरवे रावे

सुनीळ सामंत: स्लीला- जी ए कुलकर्णी- हिरवे रावे -विवेचन- सुनीळ सामंत

स्लीला ही अनेक अंगांची कथा आहे. तशी दिसायला सरळ साधी, पण मानवी मनाची गुंतागुंत, हवे -नको, बरे- वाईट, नीति- अनीति, यांचा गोंधळ ही कथा अतिशय परिणामकारक रित्या दाखवते. जीएंच्या कल्पनाशक्ती आणि उपमा उत्प्रेक्षा या अलंकारांची तर या कथेत रेलचेलच आहे. पर्सची झिप उघडताच आतली मखमल दिसावी तसे तिचे हसणे ही कल्पना केवळ जीएंनात सुचू शकते. ज्ञानेश्वरांच्या ओव्यांतून दिसणाऱ्या उपमा अलंकारांनंतर जीएं इतके समर्पक अलंकार कोणा कवीनेही वापरले नसतील.

स्लीला ही साधारण अर्ध्या तासात घडणारी आणि दोन ओळींची कथा आहे. भाऊराव आणि भाऊमामी या मध्यमवयीन जोडप्याला मूलबाळ नसते. त्यांच्या घरात शेजारची लीला नावाची लहान मुलगी अर्ध्या तासासाठी येते, बागडते आणि जाते. काहीही घडत नाही. काहीच घडत नाही. जे नाट्य घडते ते भाऊराव आणि भाऊमामींच्या मनात. हलकल्लोळ उठावा तसे कल्लोळ उठतात भावनांचे. पण बाहेर मात्र सामसूम.

भाऊरावांना वाटते हिचे दादा ताई घरी येऊच नयेत तिला न्यायला. त्यांच्या गाडीला अपघात व्हावा. अगदी चेंदामेंदा. आणि मग लीलाला सांभाळायची जबाबदारी आपण घ्यावी. त्यांच्या स्वप्नातली ती स्लीला होते. कायम त्यांच्याच घरात रहाणारी, त्यांची जबाबदारी.

भाऊमामीच्या मनात तर याहून भयानक विचारचक्र सुरू असते. तिला कोणी सांगितले असते की अशा मुलीला जर काही करून बळी दिले तर ती वर्षाच्या आत आपल्या पोटी येईल. आपल्या काकणांचा चुरा करून तो बेसनाच्या लाडवात मिसळून दिला तरी काम होणार असते. अवघे पाच मिनिटांचे काम असते ते.

पण ना भाऊराव ना भाऊमामी. कोणाचेच काही खरे होत नाही. लीला थोडावेळ खेळून आपल्या दादा ताईबरोबर घरी निघून जाते.

मनोव्यापारांचा इतका भीषण जीवघेणा खेळ. पण हा खेळ तिथेच थांबत नाही. भाऊमामी ते भयंकर कृत्य करत नाही खरे. पण ते न केल्याबद्दल ती स्वतःला दोषी समजते. आपल्याला एवढे साधे काम जमू नये याचा तिला राग येतो. आपल्या मनात इतके वाईट विचार आले याचा अजिबात अपराधगंड दोघांनाही नसतो.

जीएंचे इतर लेखकांहून वेगळेपण हे की ते साने गुरुजींसारखे सोज्ज्वळ तत्त्वज्ञान शिकवत जीए नाहीत किंवा इतर कुणासारखे पात्रांना अपराध्याच्या कक्षात उभे करून स्वतः जजही बनत नाहीत. ते (मला वाटतं) वाचकाला आरसा दाखवतात. माणसा, तू हा असा आहेस. तुझ्याही मनात एक भाऊराव आहे, एक भाऊमामी आहे. तुझ्याही मनात भरपूर पाप साठले आहे. ते तुझ्या हातून घडले नसेल याची कारणे विविध असतील. पण पापीणीवर पहिला धोंडा फ़ेकण्याचा तुला हक्क नाही.

या कथेत एक दत्तंभटासारखा चांगला स्वाघ आहे. पण या कथेचे शिर्षक स्लीला आहे त्याचा आणि स्वाघ चा काही संबंध आहे का? जीएंच्या सुरुवातीच्या काळातील १९६० ची कथा जीएंच्या इतर कथांहून वेगळी आहे का? या कथेच्या खोलात जाऊन त्यांनी नंतर काही लिहिले का? जसे त्यांनी एका एका विषयाचा माग घेत (cutting nearer the aching nerve) इतर अनेक कथांचे पुनर्लेखन केले तसे या कथेचे केल्याचे आठवत नाही. - सुनीळ सामंत

विलास वाघोलीकर: कथा - स्ली ला - हिरवे रावे

माननीय सुनीळजीने कथेचे मुद्देसूद विवेचन केले आहे. मी त्यांना धन्यवाद देतो. या कथेची काही वैशिष्टये सांगता येतील.

- I)जीएंचे बालमन उघडण्याने कौशल्य विलक्षण आहे. तुती राधी, कैरी या कथांत जरा मोठा, शाळेत जाणारा मुलगा आहे. बखर बिम्मची, राक्षस ,राणी , स्लीला या कथांमध्ये शाळेत न जाणारी लहान मुले आहेत. त्या मुलीने घरात

येण्याआधी केलेले अवखळ उपद्व्याप कथेत दिले आहेत. भाऊ मामांकडे आल्यानंतरचे अर्ध्या तासातले उपदव्याप दिले आहेत. उलटे वागायचे व कशी गंमत केली , म्हणायचे अशी हा खेळकरपणा होता.

-काही वाक्ये - *तिला रिबन हवी असे - लाकडी घोड्यावर बसायचे असे - लहान लाल काकणासाठी हट्ट करत असे - उनाड मैना - डॉक्टरांकडील नळ सोडला - देशपांडे यांच्या गेटवर उभे राहून गाडीगाडी केली - भाऊंचे नाक रताळ्यासारखे आहे - पाटील बाईंचा चेहरा शेळीसारखा आहे - नॉयलॉनचे पातळ म्हणजे सुधाने पंचा नेसला - भाऊमामीचा चेहरा घागरीसारखा - काडेपेटीत ठेवून सोन्याचे होणारे गणेश पाखरू - किडयाचे नाव राजू ठेवले होते - कुत्र्याला वौ वौ केले. - पाठीला गुदगुल्या करायच्या - --*

- या सगळ्या बाललीला वाचल्यावर पूर्वीचे जुने गाणे आठवते...."घरात हसरे तारे असता.. पाहू कशाला नभाकडे "...कथेतील हा भाग हलका फुलका, हसत खेळत वाचण्याच्या स्वरूपाचा, पुन्हा पुन्हा वाचावा असा आहे.

भाऊ मामा मुलीला गोष्ट रचून सांगतात.तो भाग मनोज्ञ आहे. सांगणारा गोष्ट सांगतो. ऐकणारे बाल मन त्याचा अर्थ त्याच्या मनाच्या लोलकातून लावत जाते. हे बारकाईने सांगीतले आहे. सोन्याचे देऊळ -गुलाबाची फुले म्हटली की त्यांचा सुवास पसरतो -दत्ताभटासारखा वाघ - गाणे म्हणत घरोघरी दूध देणारी गाय - नारळाच्या झाडाला नारळ काढण्यासाठी शिडी - कपडे ओले न करणारे कोरडे पण मऊ मऊ पाणी - चिंचा देणारे कबूतर -इतक्या बारकाईने जीएंनी गोष्ट सांगीतली आहे. बालमनाचे हे व्यापार पुढे बखर बिम्म मध्ये खूप आले आहेत. ते पुस्तकही मोठ्यांनी वाचावे असे झाले आहे.

त्याचवेळी ही बालकथा व प्रत्यक्ष जीवन कथा यांची तुलना दाखवली आहे - - हे सर्व जीवनात होते - इच्छा कुजणे - आयुष्याचा आकार अस्ताव्यस्त होणे - वासना वांझोट्या असणे- स्वप्ने निष्फळ होणे- प्रिय मंडळी सोडून जातात - मनाला ओरखडे पडतात - कोनाडे अंधारे होतात - डोळयातून पाणी येते. पण याउलट बालकथेत सर्व प्रकाराने रंगीत होत जाते.

-जीएंमध्ये किती प्रकारचे लेखक लपले होते- - बाललेखक - ग्रामीण लेखक - महानगरी कथा -देशांच्या प्रवासाच्या कथा- सामाजिक कथा- सत्ता रहस्य कथा - रहस्य कथा - गूढ कथा - काव्यात्मक कल्पनारम्य कथा-गुन्हेगारी रहस्य कथा- स्त्रीजीवन - वृद्धत्व - व्यक्ती -अपंग कथा - प्राणी कथा-पुराण कथा - तत्वज्ञान.अशी जीएंच्या कथांची शेकडो अंगे दिसतात.

-माणूस जन्माला येतो हा एक अपघात. वयात आल्यावर त्याला भिन्न लिंगी व्यक्तीशी लग्न करावे लागते, हाही एक (सामाजिक)अपघात. नंतर त्या जोडप्याला मूलबाळ होणे ही सहज गोष्ट वाटली तरी तोही "अंतिमतः अपघात" असतो. त्यामुळे प्रत्येक टप्प्यावर दुःखाचा डोंगर कोसळू शकतो - हे जीएंनी दाखवले आहे. वंश (काजळमाया) कथेतही हा प्रश्न मुख्यतः घेतला आहे. स्त्रीला पूर्णत्व हवे असते. तिची ती आस या कथेत सूक्ष्मपणे दाखवली आहे. भाऊमामीच्या माहेरपणाच्या अस्पष्ट चित्राने त्यांच्या आताच्या आयुष्याची विफलता तीव्र होते.

आणखी काही वाक्ये - माणूस मृत्यूकडून जीवनाकडे येण्याची असहाय धरपड करतो.

नशीबाशी कसली ईर्ष्या व कसला त्रागा.

हजार माणसे मोहरीच्या दाण्यांप्रमाणे घोळली जात. पण नेमक्या आपल्या दोघांनाच निष्फळ एकत्र आणण्याचा हा व्यापार कोणी केला असेल.

- अशा विफलतेमुळे त्या दोन प्रौढ व्यक्तींचे जीवन असह्य होत जाते. चहा पिणे, खोलीमध्ये वावरणे, शरीरपट्टीतील बदल या बारिकसारीक गोष्टी अति सहवासाने कशा असह्य वाटू लागतात ,हे जीएंनी बारकाईने दाखवले आहे. भाऊमामींना वाटते - या माणसाशी आपली दैवगाठ पडली. खायला ल्यायला कमी नाही. पण एकमेकांच्या सानिध्यात आयुष्यावरील करवंटी कधी फुटली नाही.... भाऊ मामींच्या मनात ,राग , निराशा , शरम हे एकदम जागे झाले.

-कथेत बस अपघाताचा, गुन्हेगारीचा टोकदार कोन आला आहे. तो योगायोगाचा नाही. माणसाची मानसीक आंदोलने किती दुसरे टोक गाठू शकतात,

याचे ते उदाहरण आहे. मन चिंती ते वैरी न चिंती - - -अशी म्हण आहे. रमाबाई सल्ले देते. तिच्या रुपाने टोकदार शिंगांचा गुन्हेगार कथेत प्रवेश करतो. कथेचा शेवटचा भाग व्यक्तींच्या मानसिक आंदोलनांचा आहे. शब्दप्रभू जीएंनी तो डोळयासमोर आणला आहे. अशी ही जीएंची लक्षणीय कथा आहे.

धन्यवाद. विलास वाघोलीकर

सुनीळ सामंत: अतिशय महत्वाचे मुद्दे तुम्ही मांडले आहेत. कथेतील जो्डप्याची विफलतेची जाणीव तुम्ही नेमकी पकडली आहे.

तुमचे विवेचन वाचल्यावर माझ्या अजून एक गोष्ट लक्षात आली.

या कथेचे दोन कालखंड आहेत.

एक अर्ध्या तासाचा. त्यात घडत काहीच नाही पण मनाची rather तीन मनांची प्रचंड उलथापालथ होते. पण ती मनातल्या मनात. बाहेर सुरकुतीही नसते.

दुसरा कालखंड आहे वीस एक वर्षांचा. भाऊरावांच्या वैवाहिक जीवनाचा. त्यातही घडत काहीच नाही. जे काही घडतं ते मानसिक पातळीवर. बाहेर सुरकुतीहि नसते.

भाऊमामीच्या चौकटीला धडकण्यासारखे रूटीन घटनांचे ते आयुष्य. दोघांनाही असह्य झालेले. पण बाहेरून पहाता काहीही वाईट नाही.

स्वप्न -- कथासंग्रह : काजळमाया

सिद्धेश खांडेकर: वाट पाहतोय त्या दिवसाची,

ज्याला सकाळ माहित नाही.

स्वप्न वाईट पडतात,

म्हणून माणूस काही झोपायचे थांबत नाही.

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

कथा : स्वप्न --- कथासंग्रह : काजळमाया

लेखक : जी. ए. कुलकर्णी

जीएंच्या अनेक कथांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे कथाशीर्षक. जी. ए. इतर लेखकांहून त्यांच्या भाषाकौशल्यामुळे वेगळे तर पडतातच पण आणखीन एक महत्वाचे कारण म्हणजे, त्यांच्या लेखानातील प्रतिभादर्शन हे कथेच्या पहिल्या वाक्यापासून सुरु न होता, शीर्षकपासूनच होते. कथाशीर्षक अनेकार्थी असणे, प्रत्येक पात्राच्या दृष्टिकोनातून शीर्षक-अर्थ विविध प्रकारचा, विविध आशयाचा जाणवणे अशा जीएंच्या अनेक कथा सांगता येतील त्यातीलच एक म्हणजे··· स्वप्न

स्वप्न या संकल्पनेचे आपण दोन मुख्य घटकात विभाजन करू शकतो.

स्वप्न १ : इच्छा. प्रत्यक्षात खरे होण्याची शक्यता असते. वैचारिक ताबा असतो

स्वप्न २ : वैचारिक ताबा नसून संपूर्णपणे काल्पनिक. नाटकी असून विविध प्रवाह असतात. प्रत्यक्षात होण्याची शक्यता फारच कमी.

या दोन्ही स्वप्न संकल्पनेचे उपयोजन या कथेमध्ये होताना दिसून येते. कथेतील प्रत्येक पात्र हे स्वतःच्या वैयक्तिक आयुष्यासोबत निगडीत असलेल्या

स्वप्नामध्ये जगताना दिसून येतो. त्या स्वप्नांना एक विषय आहे, आशय आहे. ते कधीतरी पूर्ण व्हावे अशी प्रत्येक पात्राच्या मनाशी एक इच्छा आहे. इच्छा (स्वप्न) पूर्ण करायचे की नाही हे ठरवणारी नियती आहे.

कथनकातील सगळीच पात्रे त्यांच्या वैयक्तिक आयुष्याच्या कोणत्या न कोणत्या दबावाखाली जगताना दिसून येतात. या संपत चाललेल्या पात्रांना जगण्याची - पुढील दिवस पाहण्याची इच्छाशक्ती "शून्य" आहे. आजवर नाईलाज म्हणून जगत आलेल्या जीवनाला एकदाचा मृत्यूचा पूर्णविराम मिळावा, असे त्यांचे प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष स्वप्न आहे.

अंताला अनेक पात्रांची स्वप्ने पूर्ण होतात देखील. रामकोळ्यांना कपडे, भांडी मिळाली. माईंना प्रत्यक्ष हवा असलेला मृत्यू मिळाला, सदानंदाला मालतीच्या शरीराचा उपभोग मिळाला. त्याचप्रकारे अनेक स्वप्ने अर्ध्यावरच मरण पावली.

- सदानंदाला दिसणारा "काळा सर्प" हा त्याच्या मालतीच्या शरीराबद्दलच्या वासनेचे प्रतीक आहे असे वाटते. त्याला जर मालतीच्या शरीराची ओढ नसती, तर पुढील घटनाक्रम घडलाही नासता कदाचित.

- मालतीच्या स्वप्नात येणारा विशाल पक्षी हा वासनेने तुडुंब भरलेल्या पुरुषाचे प्रतीक आहे. (नंतर योगायोगाने तो पुरुष सदानंद ठरतो)

- मालतीने केसात मळालेले फुल हे तिच्या नितळ, अस्पर्शीत यौवनाचे प्रतीक आहे. (सदानंदाच्या वासनेच्या स्पर्शाने मालतीचे शरीर दूषित होते तेव्हा ते फुल चिरडले जाते.)

मनुष्याच्या पाच ज्ञानेंद्रीयांवरून विभाजीत केलेल्या पाचही प्रकारच्या साहित्य प्रतिमांचा उपयोग या कथेमध्ये जीएंनी केला आहे. त्या प्रतिमांचे उदाहरण :

दृश्य प्रतिमा - शेवटची नागमोडी चढण चढून सदानंद साड्यावर आला.

गंध प्रतिमा - त्याला वाटले तिच्या केसाचा जवळून वास घेतला तरी तो निशिगंधाचाच असेल.

श्राव्य प्रतिमा - सारे आभाळच अति ओझ्याने तडकून कोसळल्याप्रमाणे आवाज झाला होता.

स्पर्श प्रतिमा - त्याच्या चेहऱ्यावर वाळलेले टणक काहीतरी सरकले.

रस प्रतिमा - व्हिस्कीचा घोट उष्ण प्रकाशाच्या ओघाळाप्रमाणे खाली उतरला व त्याला प्रसन्न वाटले.

जीएंचे लिखाण सशक्त असून ते साहित्याच्या अनुषंगाने सर्वव्यापी कसे होते याचे उत्तम उदाहरण म्हणजे “स्वप्न” कथा.

थोडक्यात,

पाहिलेली स्वप्ने खरी होतीलच याची काही खात्री नसते अथवा आसक्तीही नसते. या कथेतील प्रत्येक पात्राचे स्वप्न एकमेकांत ओवून जर एक नवीन स्वप्न तयार केले, तर जो घटनाक्रम तयार होईल तो घटनाक्रम म्हणजे “स्वप्न” कथा!

- सिद्धेश खांडेकर

संजीव सावरगांवकर: खांडेकर, छानच लिहिता तुम्ही. कथा खूप मागे वाचली होती. पण विवेचन वाचून कथा परत वाचून वेगळा आस्वाद घेता येईल. जी. ए. वाचकांची सुद्धा बौद्धिक भूक भागवत, वैचारिक खाद्य देत, साहित्य वाचनाची स्वप्ने पूर्ण करतात आणि आपल्या नवीन स्वप्ना ना जाग देतात.

दिलिप बडे: स्वप्न”आपल्या जिवनाची एक अवस्था आहे.ती आपल्याला भुत व भविष्य दाखवते.जन्मापुर्वी व मुर्त्यू नतंर सुद्धा एक अस्तित्व आहे.पण त्याची जाणिव मेंदु च्या आकलना पलिकडचे आहे.पण भविष्यात या दोन्ही अस्तित्वाचा अभ्यास होऊन हे दोन्ही अनुभव जाणिवेच्या कक्षेत येतील.

अलका तडकलकर : सुरुवातीपासून वाचनीय

श्रीकांत देशमुख : अतिशय सुंदर, सशक्त विशेष विवेचन. प्रतिमा व प्रतिके लाजबाब. कथा वाचतांना मदत होईल. 🙏

यतीन गुळवणी : अगदी परिपूर्ण विवेचन! प्रत्यक्ष घडणाऱ्या घटनांतून स्वप्नांकडे (?) होणाऱ्या सफाईदार वाटचालीचा मागोवा घेण्यात आपण यशस्वी होताना आमचेही बोट पकडून बरोबर नेलेत! धन्यवाद!!

सुनीळ सामंत: स्वप्न ही कथा आजवर अनेकदा वाचली होती खरी. पण सिद्धेशच्या विवेचनानंतर काल आज पुन्हा वाचताना आपण ती प्रथमच वाचतो आहोत हे जाणवलं. या कथेतील नाट्य आणि विनोद यांनी इतकी पकड घेतली होती त्या प्रस्तराखाली वाहणारा स्वप्नकाव्याचा झरा सिद्धेशने दाखवेपर्यंत आजवर दिसलाच नव्हता. त्याबद्दल सिद्धेशने जे लिहिले आहे त्याहून अधिक लिहिणे मला जमणे नाही. तेव्हा मला यातले विनोद, भाषा आणि नाट्य जे जाणवले त्याबद्दल लिहितो.

या कथेच्या सुरुवातीलाच "गांधारी प्रसूत झालेली खाट" वाचून खो खो हसलो होतो. त्यानंतर रानजाई कोळ्यांच्या स्वच्छतेबद्दलचे विनोदही अगदी शालजोडीतले आहेत. रानजाई कोळयांच्या चेहरे नसलेल्या वस्तीनंतर जोशांचे घर म्हणजे एक एक सॅपलच जणू. "गाडी बिघडून बसल्यामुळे" त्यांना होणारा एक दिवसाचा उशीर त्यांच्या जीवावर उठतो. जीर्ण पैठणीसारखी माई आणि चापूनचोपून लुगडं नेसणाऱ्या गोदुताई यांचे गूढ समजते पण सांगितले जात नाही. सदानंदला निरोप द्यायला चार पावले पुढे आलेल्या मालतीचे वर्णन वाचताना black n white सिनेमातील नर्गिस किंवा नूतन डोळयांसमोर येते. किंवा "शायद फ़िर इस जनममें मुलाकात हो न हो" म्हणणारी ◌्साधना. आंब्याचे झाड पडून घर कोसळतानाचे सदानंदचे वागणे व विचार अत्यंत नाट्यपूर्ण आहेत. एका भीषण घटनेतही मानवी मन कसे विचित्र वागत असते त्याचा पाठ. जख्ख म्हातारीची जगण्यासाठीची जीजिविषा आणि सदानंदचे पराभूत मन.

मी आजवर केवळ हीच कथा वाचली होती. सिद्धेशने मला त्यातली खरी कथा दाखवली त्याबद्दल त्याचे आभार आणि मनापासून कौतुक.

यतीन गुळवणी : मला सुध्दा हे विनोदाचे धागे जाणवले नव्हते. अगदी सत्य सांगायचे तर या कधेच्या प्रभावाखाली मी एक कथा लिहीली होती. पुण्याच्या श्री भानू काळे यानी अंतर्नाद मध्ये छापली होती. पण आता नव्याने ती कथा उपभोगतो.

विलास वाघोलीकर: आपली स्वप्न कथेच्या प्रभावाखालील कथा जरूर द्यावी असे वाटते. सिध्देश खांडेकरांच्या सूतोवाच बद्दल त्यांना धन्यवाद.

जीएंच्या काजळमाया संग्रहातील स्वप्न ही कथा वाचनीय आहे. या कथेची वैशिष्ट्ये थोडक्यात सांगता येतील -

- कथेत रामकोळी या वन्य जमातीचे भटके जीवन दाखवले आहे. ही जमात भटकी असते. पाच पंचवीस पाल्यांची, (तात्पुरत्या झोपड्यांची) वस्ती असते. पावसाळयाच्या आधी जमात जखणाई दैवताच्या खांबाला पूजण्यासाठी येते. टेकडीच्या पायथ्याशी रहाते. टेकडीवर जोशी यांचे मोठे घर असते. तेही उन्हाळयात तेथे रहायला येतात. हे भौगोलिक वर्णन डोळयासमोर येते. जवळजवळ जन्मभर बिन अंघोळीचे रहाणे,जमातीचे जखणाईच्या खांबाचे दैवत, गाडगी -घोडे इत्यादीचा पसारा ,बायकांचे घरोबे व पोरवडा यांचे वर्णन केले आहे.

- सर्वसाधारणपणे कथेतील नायक हा वागणूकीला व्यवस्थित असतो. जी एंच्या काही कथांमध्ये नायकच भावनाग्रस्त असतो. त्यामुळे कथाही तशीच वहावत जाते. उदा. पुरुष, (थोड्या प्रमाणात) इस्किलार, रातराणी, गिधाडे, फुंका, नाग, पातक, राक्षस,स्वप्न इत्यादी

- स्वप्न मधला सदानंद मालतीबद्दल वासनाग्रस्त असतो. दारू , सिगारेटचा शौकिन असतो. त्यामुळे कामाहून आले की त्याला ओल्ड मंकची आठवण येते. त्या माळावर त्याला बाटलीची सोबत असते. मालतीशी बोलायला तो धडपडतो. व संधी मिळताच तिचा उपभोग घेण्याची धडपड करतो.

- कोड हा रोग आहे. तो भयानक सामाजिक रोग आहे. त्या माणसाचे , कुटुंबियांचे जीवन उध्वस्त करणारा रोग आहे. जीएंनी रातराणी , स्वप्न इत्यादी कथांमध्ये या वास्तवाचे, या दुःखाचे वर्णन केले आहे. कथेत पंख पसरलेल्या आकाराचा कोडाचा डाग, नंतर शरीरभर पसरून जीवन उध्वस्त करू शकतो हे स्वप्नाच्या सहाय्याने दाखवले आहे.

- कथेतील गजराचे घड्याळ, ही महत्वाची वस्तू आहे. त्यामध्ये मधल्या भागात, पिसारा फुलवणारा मोर असतो. सेकंद बदलला की निळा मणी हलत असतो. विश्वात दर क्षण पुढे जातो. दर क्षणी घटना घडतात. याची सांधेजोड हे घड्याळ करते. प्रत्येक घटनेकडे मोर निरपेक्ष नजरेने, तटस्थपणे पहात असतो. तो घटनेत सहभागी होत नाही. घटना बदलत नाही. निरपेक्षपणे पहाण्याचा या विशेषाने जीए नियती ची सूचना देतात. शेवटी झाड पडण्याचा अपघात, फांदीवरून साप येण्याचा प्रसंग, वादळी, ओतणाऱ्या पावसातील अंधारातील धडपड व सदानंदाचा मृत्यू, त्यात रामकोळींनी पलिते घेवून केलेली लूटालूट, मालतीला पळवून नेणे इत्यादींमुळे जीएंनी रहस्यमय, भीतीचे वातावरण तयार केले आहे. कथेत आता चालले ते स्वप्न आहे का अंधारातले न कळणारे वास्तव आहे या संभ्रमात ही लक्षणीय कथा संपते.

-. धन्यवाद. विलास वाघोलीकर

दिलिप बडे: गांधारी प्रसुत्या झालेली खाट,

सुनीळ सामंत: अतिशय महत्वाचे मुद्दे. कथेतील गजराचे घड्याळ तर दुर्लक्षितच झाले माझ्याकडून. या कथेचा ओघ वेग इतका जबरदस्त आहे की काही वाक्यं सुटून जातात. तुम्ही म्हणता तसे खरेच हे एक दुःस्वप्नच वाटते.

हिरवी मखमल, गोरा हात- -- निळा सावळा

मंजिरी देशमुख: कथा : हिरवी मखमल, गोरा हात

प्रथम प्रकाशन : सत्यकथा, ऑक्टोबर १९५७

कथासंग्रह : निळा सावळा, प्रकाशन १९५९

लेखक : जी ए कुळकर्णी

पात्रं : कथानायक दामू, मुंबई, दामूची बहीण शांतू, काही स्त्री रेखा, मॅनेजर बापट, आणि रामा गडी.

हजारो तरुण नोकरी व्यवसायाच्या शोधात महानगरांकडे रोज धाव घेत असतात. त्यातील काही थोडे सोडले तर बाकी सर्व अपयशाच्या खाईत लोटले जातात. हाल अपेष्टांनी भरलेलं जीवन हेच या हजारो तरुणांचं प्राक्तन असतं. त्यांच्या मुलभूत गरजा पूर्ण होऊ शकत नाही. कुणीही त्यांच्या असण्याची दखल घेत नाही. आपुलकीचे दोन शब्द त्यांच्याशी बोलल्या जात नाहीत. या नाकारल्या गेलेल्या तरुणांमध्ये शहरवासी प्रस्थापितांप्रती राग आणि तिरस्कार या भावना ओतप्रोत भरलेल्या असतात आणि त्या ते प्रतिसादाच्या स्वरुपात देऊन मुक्त करतात.असं असलं तरीही मनुष्याला अनुभवावयास आलेला एक हिरवा मखमली धूंद क्षण त्याच्या सभोवतालच्या लोकांना आपल्या असण्याची दखल घेण्यास भाग पाडतो व त्याच्या क्षूद्र दडपलेल्या आयुष्याला झळाळून टाकतो. छोटीशी का होईना एक ओळख त्या व्यक्तीला देऊन जातो.

हिरवी मखमल, गोरा हात ही कथा कथानायक दामूचं मुंबई २६ च्या रेल्वे स्टेशनवर उतरल्यापासून ते गौरी बोर्डिंग हाऊस मधील त्याचा दोन महिने मुक्काम यात त्याचं मिळालेली नोकरी जाणे, या दोन महिन्यांत त्याचं पिचत जगणे, आणि या त्याच्या जीवंत असण्याचीही दखल न घेणाऱ्या मुंबईत रहाणं नाकारून गावी परत

जाण्याचं ठरवून बोर्डिंग हाऊस सोडून निघणे हा कथेचा एक भाग आहे. गावी परत जाण्याचा निर्णय घेणं दामूला सोपं होतं का?...शांतूचं आणखी एक पत्र वाचले तर आपला निश्चय पार ढळून जाईल, परत जाण्याची आपल्याला शरम वाटेल असे दामूला वाटते व तो सर्व पत्रे फाडून टाकतो. तसेच अंगठी विकल्या गेल्यानंतर मागे राहिलेला व आईची आठवण असलेला डाळिंबी खडा देखील दामू पुडीत टाकून ट्रंकेत ठेवून देतो. निर्णय घेणं कठीण करतील असं वाटून मायेच्या या दोन्ही आठवणींपासून दामू जाणीवपूर्वक स्वतःची सुटका करून घेतो.

गावाकडे जाणाऱ्या गाडीला वेळ असल्याने त्या दरम्यान कथानायकानी मुंबईत पचवलेले आणखी काही नकार व शेवटी अनुभवलेला जुगारी क्षण ज्यात लोकं त्याची दखल घेतात व दामूला आपण जिवंत आहोत हा विश्वास वाटतो. इतकंच नाही तर हिरव्या मखमली ब्लाऊजातील गोऱ्या हाताची तरूणी दामूकडे पाहते, थोडी हसते, आणि तिचा गोरा हात हलतो. हा क्षण दामूला थरारुन टाकतो. त्या मखमली धूंद स्वप्न क्षणावर स्वार होऊन हिरवट निळया झळाळत्या ठिणगीच्या स्वप्नबिंदूवर कथेचा दुसरा भाग पूर्ण होतो.

या क्षणी सरसकट आठ आणे किंमत व्हायचं नाकारलेला आणि काही क्षणांसाठी का होईना परंतु आठ रुपयांत आयुष्य विकत घेतलेला दामू हा जणू धुराड्यावर गळा फूगवून एकटेच घुमत बसलेले पांढरे कबुतर आहे.

शांतू, आई,व ओळखीचं हसणारी एक मुलगी यांच्या प्रेमळ स्निग्ध आठवणी सोडल्या तर इतर स्त्री व्यक्तिरेखा बटबटीत शारीरिक ओळख असलेल्या आणि दामूच्या मुंबईतील बकाल वास्तव्याची दखल न घेणाऱ्या आहेत पण हिरव्या मखमली ब्लाऊजातील गोऱ्या हाताच्या सुंदर तरुणीने दाखविलेल्या सहृदयतेने कथानायक थरारुन उठतो व उडालेल्या हिरवट निळया ठिणगीप्रमाणे स्वप्नाच्या मनोहारी क्षणावर स्वार होऊन झूलू लागतो.

लांब झुरका संपल्यानंतरचा दामू कसा असेल? त्याच्याकडे पाहून ओळखीचं हसणारी मुलगी कोण हे कळेल का दामूला? खिश्यातील कोरं तिकीट दामूला

जगण्याचं नवीन भान देईल? मखमली हिरव्या ब्लाऊजमधली गोऱ्या हाताच्या तरुणीबरोबरचा स्वप्न क्षण संपल्यानंतरचा दामू बदललेला असेल का? माहिती नाही परंतु सुखान्त किंवा predictable शेवट नसलेली पण वाचकाला शेवटी तरल अनुभव देणारी अशी हिरवी मखमल, गोरा हात ही कथा आहे.

मंजिरी देशमुख: हिरवी मखमल, गोरा हात या कथेतील पात्रं आणि प्रतिमा :

१. दामू :

सर्वसामान्य, अर्थहीन नावासोबत कोणतीही शारीर ओळख न दिलेलं परंतु नैराश्य, न्युनत्व, व आपण कुणीच नाही या केविलवाण्या भावनेनी पछाडलेलं पण निर्णयक्षमता अबाधित असलेलं मनोविश्लेषणात्मक पात्रं

२. मुंबई :

कथानायक दामूच्या पात्राला मुंबई हे पुरक पात्रं आहे. संत्रस्त दामूच्या भूमिकेला धार देण्याचं कार्य मुंबई २६ करते. मुंबई म्हणजे समुद्रफुल असून ते एका ठिकाणी चिकटून राहतं व आपल्या तुऱ्याने इतरांना खुणावते. एक मोठा तळ ज्यात बटबटीत डोळयांचा मासा खांबाआडून लहान माश्याला निर्विकारपणे गिळतो. दामू मुंबईला "साले, हरामखोर, सापाच्या हृदयाचे" गाव म्हणतो. तेथील रांगा, लोकलचा खडखडाट, रात्रीच्या अंधारात श्वापदांच्या डोळयांसारखे चमकणारे दिवे आणि हजार दातांच्या चक्राची आहे मुंबई.

३. स्त्री व्यक्तिरेखा :

१. शांतु : बहिणीच्या मुक प्रेमाचा ओलावा, बहीण भावातील लाघव कथेत झिरपत रहातं

२ इतर स्त्री रेखा : कथेत स्त्री व्यक्तिरेखांचं कोणतंही उदात्तीकरण नाही. मुंबईच्या बकाल जीवनाला सुसंगत अश्या जगण्याच्या धडपडीत अडकलेल्या स्त्री व्यक्तिरेखा.

प्रतिमा -

१. कथेतील प्राणी सृष्टी : तोंड वासून पडलेले चकचकीत चांदीसारखे, लहान, मोठे, सुरूग मारणारे, निरनिराळ्या रंगांचे मासे, मांजरं, उंदीर, काळ्या पांढऱ्या तुकड्यातले कुत्रे, पांढरे कबुतर.

२. १. तिकीट - दामूला सुवर्णसंधी येणार आहे असं सांगणारं. निदान वजनयंत्रानं तरी त्याचं अस्तित्व मान्य केले होते.

२. कोरं तिकीट - दामूला गावाकडे नेम धरून फेकलेलं.

३. सिगारेट: दामूच्या बदलत्या मनोवस्था दर्शवण्यात मदत करणारी (नव स्वातंत्र्याचं भान, बेचैनी, राग, मुक्तता, आणि समाधान) मुंबईमध्ये मिळवलेली व कथेच्या शेवटापर्यंत असलेली आणि दामूला सहज मिळवता येत असलेली एकमेव सोबती.

४. हिरवट निळी ठिणगी - मिळालेल्या झगझगीत ओळखीतून आलेला धूंद स्वप्न क्षण.

५. पांढरं कबुतर - धूंद क्षण जगणारा दामू

हिरवी मखमल, गोरा हात ही कथा मुंबईत नोकरी मिळाल्याच्या आनंदात गावाकडून मुंबई २६ इथे आलेल्या दामू नावाच्या एका तरुणाची आहे. दामूची मुंबई मधील सुरवात अपशकुनी होते. रेल्वे स्टेशनवर त्याचा बालपणीचा मित्र पत्र टाकल्यानंतर देखील दामूला न्यायला आलेला नसतो. पण कदाचित पुढच्या गाडीने तो येईल या विचाराने उत्साह वाटलेला दामू इतरांप्रमाणे राजरोस वडा खाऊ लागतो व कधीही सिगारेट न ओढलेला दामू सिगारेटचं पाकीट विकत घेऊन विस्तारलेल्या जगाच्या नव्या भानाने त्यातील सिगारेट पिऊ लागतो. गंमत म्हणून दामू वजन करतो. त्याचं वजन चक्क तीन पाउंड कमी झालेलं असतं. त्याला वाटतं चुकून एका बाईला धक्का लागूनही तिने मागे वळून रागाने पाहिलं नाही त्याचं कारण हे कमी झालेलं

वजनच असेल. तिथे मिळालेल्या तिकिटावर त्याचं भविष्य लिहून येतं. लवकरच त्याच्या आयुष्यात एक सुवर्णसंधी येणार असते पण त्यानी हुरळून जाता कामा नये.

या अजस्त्र शहरातील पहिली रात्र फलाटावर काढायची ठरवून दामू तिथेच बसतो. पण जवळच असलेल्या खोलीवर दामूला चलण्याचा आग्रह करणारी तीन माणसे त्याला बेसावध माणसावर उडी घेणाऱ्या जंगली क्रुर प्राण्यांसारखी वाटतात. दुसऱ्या दिवशी नोकरीच्या ठिकाणी दामूची मित्राशी भेट होते. दामूला ती नोकरी मिळते आणि मोठ्या खटपटीने गौरी बोर्डिंग हाऊसमध्ये एक खाट मिळते. तिथेच खाटेखालील जागेत सोबत आणलेल्या ट्रंकमध्ये दामूचा सार्वजनिक संसार सामावतो. तिथे तीन मित्रं दामू मिळवतो. ते सर्व एकमेकांच्या अस्तित्वाची जाणीव नसलेले पण कुडचाभर धान्यात एकत्र आलेले असे असतात.

खानावळीतला दामूचा मुक्काम अतिशय त्रस्त करणारा आहे. तिथे पांघरायला चादर मिळेल हे मोठ्या ऐटीत बहीण शांतू ला सांगून तिने देऊ केलेली चादर नाकारणारा दामू पांघरूण मिळणार नाही हे मॅनेजर ने सांगितल्यानंतर स्वतःची चादर फाटल्यानंतर गादीवरची चादर त्याच्या माघारी पांघरूण म्हणून घेतो. बोर्डिंग मधल्या कच्च्या पोळया आणि खडे असलेल्या भाताच्या आठवणीनं दामूच्या पोटात ढवळून येतं.

पुढे काही दिवसांनी दामूला मिळालेली नोकरी जाते. तो दुसरी नोकरी मिळवू शकत नाही पण या अपयशापेक्षाही दामूला राग येतो ते मुंबईत त्याची एक जिवंत माणूस म्हणून कोणीही दखल घेत नाही याचा. खानावळीचा मॅनेजर बापट आणि रामा गडी दामूने केलेल्या सूचनांवर कोणताच प्रतिसाद देत नाहीत. दामूला एकेकाला चांगलं फोडून काढावं वाटतं.

दामू मुंबईत पिचत राहणं नाकारतो व दोन धडे शर्ट, पँट, आणि शांतूने लाडू घालून दिलेला पण आता रिकामा झालेला डबा पिशवीत ठेवतो आणि कुणाला कळू न देता बोर्डिंग हाऊस सोडतो. रस्त्याने जाताना वरून कुठूनतरी पचकन त्याच्या अंगावर पाणी पडते. दामू आजूबाजूच्या लोकांना ऐकू जाईल अशी शिवी देतो पण

कुणीही त्याच्याकडे पहात नाही. पुढे काही वेळात गर्दीतील एक मुलगी त्याच्याकडे पहात ओळखीचं हसते मात्र दामूला ती कोण किंवा तिला कुठे पाहिलं काही लक्षात येत नाही परंतु त्याच्याकडे पाहून ओळखीचं हसणारी एक व्यक्ती दामूला मुंबईत भेटली असते.

फुटपाथवर सरसकट आठ आणे किंमत असलेल्या पुस्तकांत चाळवाचाळव करत दामू पुढे निघतो. एका दुकानात टांगलेला शार्कस्किन बुशशर्ट आपणही कधीतरी घेऊ असं दामूच्या मनात येतं. पुढे जाताना अगदी अखेरच्या क्षणी पडता पदर सावरणारी एक काकडीसारखी दिसणारी मुलगी समोरून येताना दिसते.तिच्याकडे पाहून अमंगल हालचाली करणाऱ्या हमालाला एक लाथ घालावी असं दामूला वाटते पण नंतर त्यालाही तिचा अत्तराचा वास आवडला होता आणि तिच्या मांड्यांच्या हालचाली त्यानेही हावरेपणाने पाहिल्या होत्या हे आठवून दामू ओशाळतो.

दामू गावाकडे जाण्याचं तिकीट घेतो. यावेळी तिकीटाची मागची बाजू कोरी असते. मुंबईने नेम धरून गावाकडे परत फेकल्याने आता कसलं डोंबलाचं भविष्य असं म्हणत दामू तिकीट खिश्यात ठेवतो. गाडीला वेळ असल्याने फिरण्याचं व जमलं तर आसपासच्या दुकानांतून उरलेल्या ३-४ रुपयांत शांतूसाठी काही स्वस्त वस्तु मिळाली तर घ्यावी या उद्देशाने दामू फिरतो. एका सोन्या चांदीच्या दुकानात एक लठ्ठ बाई इअरिंग्स घेताना पाहून दामूला ते शांतूच्या नाजूक कानांत किती सुंदर दिसतील असे वाटून जाते आणि त्याच वेळी त्या लठ्ठ बाईच्या कानात निऑन साइन्सचेच कानातले हवे असं वाटून दामू खवचट हसतो. मला काही घ्यायचं आहे यावर दुकानदार तीन चार रुपयांत? असं म्हणताच दामू मनात शरमतो. एनॅमलची जांभळी पांढरी झगझगणाऱ्या खड्यांची पदर स्थिर ठेवण्यासाठीची फुलपाखरे पाहून त्याला वाटते या नागड्यांच्या गावात शिंप्याचं काय काम? पण आपली शांतू नववार पातळ सुरेख नेसते तिच्यासाठी घेता आले तर···

मंजिरी देशमुख: हिरवी मखमल, गोरा हात या कथेची मला जाणवलेली वैशिष्ट्ये :

१. वास्तव, प्रभावी, आणि सहज अशी पात्रांची व प्रसंगांची उभारणी

२. सामान्यातील अति सामान्य माणसाची सार्वकालिक कथा

३. कथानायकाचं अबाधित निर्णय स्वातंत्र्य आणि परिस्थिती शरणतेला त्याचा नकार

४. नियतीची अटळ रेष आणि त्यातून निर्माण झालेल्या परिस्थितीच्या व्यूहामध्ये कथानायक त्याने वेळोवेळी वापरलेल्या निर्णय स्वातंत्र्यामुळे जखडला गेलेला कथेत जाणवत नाही.

५. माणसाला आपल्या असण्याची, अस्तित्वाची दखल घेतली जावी ही आंतरिक प्रबळ इच्छा असते हे दामूच्या व्यक्तिरेखेतून प्रभावीपणे दिसते.

६. कथेतील पात्रं, कथेला लाभलेली पार्श्वभूमी, परिसर, जी.एंची वर्णन शैली, आणि सुक्ष्म निरिक्षणातून उभारलेले तपशील या सर्व घटकांना सोबत घेऊन जीए या सर्वांवर भाषेचा सुंदर साज चढवतात व कथा हा जिवंत रसरशीत अनुभव म्हणून वाचकांसमोर ठेवतात.

७ कथा कथानायकासोबत वाचकाला त्या तरल स्वप्न क्षणांची अनुभूती देते.

दिलिप बडे: 1950-60 च्या दशकात असंख्य युवक, खेड्यापाड्यातून नशिब आजमवण्यासाठी मुंबईला जात.दामू हा त्यांचा प्रतिनीधी आहे.80-90 च्या दशकात तरूण अमेरिका-युरोपला जाऊ लागले.आज जग हेच एक खेड होऊन बसल आहे.युरोप आणि भारत,युरोप आणि आशिया असा भेद अत्यल्प उरला आहे.हिरवी मखमल,गोरा हात,स्मित हास्य,गुलाबी क्षण हे प्रत्येक तरूणाच अदृश जग आहे.

विलास वाघोलीकर: माननीय देशमुख मॅडमनी ही कथा अनेक वेळा वाचून उत्तम सूतोवाच केले आहे. त्यांनी कथानक सांगितले आहे व कथेची इंप्रेशन्स चांगली सांगितली आहेत. मी त्यांना धन्यवाद देतो. स्वामी कथेची चर्चा मे च्या पहिल्या आठवडयात सुरू केली होती. अनेकांनी खूप चांगल्या प्रकारे कथेचे पैलू सांगितले. अजूनही त्या कथेवर कोणास लिहायचे असेल, त्यांनी जरूर लिहावे ही विनंती.तसेच हिरवी मखमल.. कथा वाचून त्यावरही लौकर लिहावे , ही विनंती.

मला जाणवलेली कथेची वैशिष्टये थोडक्यात मांडतो.

।) निमशहरी जीवनातून आल्यावर पाहीलेले महानगरी जीवन कथेत आहे. त्यामुळे निमशहरातून आल्यानंतर संवेदनशील माणसाला जो कल्चरल शॉक बसतो तो कथेत प्रभावीपणे वर्णन केला आहे.

2) दामूच्या जीवनातील एक दिवस कथेत आहे.

3) कथानक तसे फार नाही. ही वातावरणाची कथा आहे. त्याची उदा.काही कथा - गुंतवळ, माकडाचे काय.., मुखवटा

4) एकाकीपणा ,तुटलेली विलगपणा सहन करणारी बिनचेहऱ्याची माणसे, गर्दी , घोळक्याचे यांत्रीक जीवन (रात्रीही ट्रामचे आवाज येतात) ,मित्र आलाही नाही , कथेत संवाद किमान आहेत. नवकथेचे वातावरण.... मी एक मुंगी तू एक मुंगी आपण सर्वजण मुंग्या ही मर्ढेकरांची कविता आठवते. जीएंच्या बऱ्याच कथांत एकाकीपणा, जीवनातील विलगता आली आहे. ठळक उदाहरणे - अस्ति स्तोत्र, स्वामी. या कथेत महानगरी वातावरणातील विलगता प्रभावीपणे दाखवली आहे.

- 5. येथे पैशाची ही व्यवस्था अशी आहे की आठ तास पराकोटीने राबवावे लागते (मिनिट मिनिट राबवावे लागते) पण तरीही पैशाची ही व्यवस्था तुम्हाला हे सुद्धा देत नाही - ।.) दोन वेळचे जेवण २ अंगावर पुरेसे कापड 3 डोक्यावर खात्रीचा निवारा 4. किमान औषधोपचार 5. थोड़ी काही तास फुरसत. 6 परवडणारे किमान दर्जेदार शिक्षण, 7 पुरुष -मुले यांना शाररीक मानसिक संरक्षण देणार नाही. मुलींना शारीरिक मानासिक अत्यंत असुरक्षितता देईल.

- माणसाने काळजीपूर्वक शिस्तीचे आयुष्य काढले तरी पैशाच्या या व्यवस्थेत असा बकालपणा होतो. माणसाने व्यसन, भोळेपणा केला तर मग जीवनाची अधोगती होते.

- शहरातील दारिद्रय, बकालपणा ,रोजगारातील असुरक्षितता कथेत दाखवली आहे. म्हणून जीएंनी म्हटले आहे - सापाच्या काळजाचे गाव

- 6. निमशहरी वातावरणातून महानगरी वातावरणात आला आहे.येथे वरवर गोड बोलणारे बाजारी असतात. उदा.खरा मित्र आलाही नाही

- 7 व्यसन - जुगार दाखवणारी, गिधाडे कथा आठवते.

- काही महानगरी वातावरणाच्या कथा आठवतात - एक मित्र - एक कथा, माणसे अरभाट पुस्तक..

- 8 ए - कथेत इड चे दर्शन जागोजागी. निमशहरी जगात इड असतो पण तेथे सामाजिक दडपण असते. व बिनचेहऱ्याचा घोळका नसतो. इडला उघड संधी नसते. महानगरात इडला सारखी संधी असते. कथेत ट्रामचा उल्लेख आहे म्हणजे साधारण सन1940 चे वातावरण आहे. कथेत तुलनेने जुने, वातावरण आहे. झोपडवस्तीचे वातावरण नाही. आता परिस्थिती आणखी बिकट झालेली आहे.

- बी -कथेत हिरवा - मखमली ब्लाऊज घातलेल्या गोऱ्या तरुणीचा उल्लेख आहे. हा उल्लेख सर्व सुंदर स्त्रीच्या सौंदर्याची तारीफ करणारा आहे. जीएंनी इस्किलारमध्ये अल्थियाचे वर्णन केले आहे, त्याची आठवण होते. ग्रीक शिल्पकलेत सुंदर स्त्रीया व रूबाबदार पुरुष दिसतात.त्याचे सौंदर्य कोणालाही कळते. तसेच कथेत दामूला हिरव्या मखमलधारी तरुणीबद्दल वाटते. हा महत्वाचा संदर्भ कथेत आहे...

- 9 एक उल्लेख गरजेचा वाटतो - जीएंनी मुंबईत काही महिने नोकरी केली होती त्या निरिक्षणाने व स्वप्रतिभेने ही कथा लिहिली आहे.

- 10 कथेतील घटना - दामू गाव सोडून नोकरीसाठी मुंबईत आला. मित्र आला नाही.पत्ता फक्त मुंबई 28 दिलेला होता.एकरात्र प्लॅटफार्म वर काढली किरकोळ

दर्जाच्या लॉजवर राहीला.बहिणीला खुशालीची पत्रे पाठवली. नोकरी सुटली. महिनाभर नोकरी मिळवण्याचे प्रयत्न केले.गावी जाण्याचे ठरवले.तिकीट काढले.उरलेल्या पैशात भेटवस्तु पाहीली. नंतर जुगारात पैसे घालवले.त्याला फसलेला म्हणून लोक ओळखतात. हिरवी मखमल गोरा हात असलेली स्त्री सुद्धा त्याच्याकडे फसलेला म्हणून पाहते.

धन्यवाद - विलास वाघोलीकर

मंजिरी देशमुख: धन्यवाद सर, आपण अत्यंत अभ्यासपूर्ण आणि तुलनात्मक संदर्भातून हिरवी मखमल, गोरा हात या कथेवर अतिशय चपखल शब्दांत भाष्य केलंत. 🙏 🙏

अलका तडकलकर : कथा- हिरवी मखमल-गोरा हात

दामू एक सामान्य कुटुंबातील व्यक्ती.ज्याची जगण्याची स्वप्ने वेगळी.ती पूर्ण करण्यासाठी मुंबईला जातो.बोर्डिंगात दोन महिन्यांत स्वतःला खूप सांभाळून जगण्याची धडपड करत असतो.पण प्रत्यक्षात मुंबईच्या जीवनाचे चित्र सोसेनासे होते व परतीचा मार्ग प्रशस्त करतो.सारेच काही निराशाजनक नसते तर तारुण्यसुलभ भावनेलाही कुरवाळणारे प्रसंग अनुभवाला येतात लक्षात राहतो गोरा हात

खरे तर मुंबईत एवढी गर्दी की पाय रोवायला जागा सापडणे मुश्किल. तरीही cotबेसीस वर राहण्याची सोय होते पण समस्याना सोडवण्यास पाहिजे तसे हात मिळत नाहीत. जगताना दररोज समस्या येतातच पण स्वतःच्या घरी स्वातंत्र्य व मदतीचे हात मिळतात बाहेर स्पर्धक असतात.ही तर मुंबई! भल्या भल्या मंडळीना खूप कष्ट घेवून यशाचे शिखर गाठता आले तिथे हा सामान्य कुटुंबातील मुलगा कसा टिकेल?

मुंबईचे जीवन एक विद्न्यान आहे त्यात काही सूत्रे, चिन्हे,नियम, गणिते आहेत.ज्यांना हा अभ्यास जमतो ते पुढे निघून जातात ज्यांना हा विषय अवघड जातो ते नापास होतात. दामू नापास मंडळीत मोडतो.

पण तरीही नापास झाला म्हणून निराश न होता काही चांगल्या आठवणी सोबत घेऊन परततो.आणि जीवन बहुआयामी असते याचा दाखला देत ही कथा संपते.

धन्यवाद. 🙏

तक्षक कथा - पुस्तक - हिरवे रावे

विलास वाघोलीकर: तक्षक कथा - पुस्तक - हिरवे रावे, लेखक जीए कुलकर्णी

विवेचक -व्ही एस वाघोलीकर

💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐 💐

- अण्णाराव या व्यक्तीमत्वाभोवती ही कथा फिरत आहे. अण्णारावांचे लहानपण धूळीत गरीबीत गेले. पुढील प्रवास कष्टाने केला. मोठेपणी स्वतःचा बडा वाडा घेण्यापर्यंत प्रवास केला. जीएंनी दोन्ही परिस्थितींचे वर्णन नेमकेपणाने केले आहे.

- अगदी लहानपणी चाळीस वर्षांपूर्वी ,गाव सोडून, अण्णाराव व त्यांची आई या लहान गावात देवळाच्या धर्मशाळेत आसऱ्यासाठी आले, तेव्हा त्यांची अन्नान्नदशा होती. गांजेकस पुजारी त्यांच्याशी भांडून त्यांना हाकलून देण्याचा दररोज प्रयत्न करत असे. गाभाऱ्यात फेकलेल्या ओलसर तांदळाचा भात, बियाळ वांग्यांच्या तिखट पाण्याबरोबर खावा लागत असे. पाणचट ताकाबरोबर दिवस काढावे लागले होते. रात्री धर्मशाळेच्या गार जमीनीवर झोपावे लागले होते.जरा मोठा झाल्यावर वकीलाच्या घरी पाणी भरून अण्णारावांनी दिवस काढले.

- नंतर दिवस पालटले. अण्णारावांनी संधीचे सोने केले.कष्ट केले. मोठेपणी त्यांनी इतकी मालमत्ता जमवली की गावात त्यांचा शब्द मोलाचा असे.पाच जिल्ह्यांचा कापसाचा व्यापार त्यांच्या ताब्यात होता. गावात स्टेशनरीची तीन दुकाने होती. तीन मजली चाळीच्या दोन इमारती बांधल्या होत्या. मसणवटीच्या

माळरानावर बिनदिक्कतपणे त्या इमारती बांधल्यावर अण्णारावांना भक्कम उत्पन्न मिळत असे. भरवस्तीत दुमजली घर होते. कृष्णवाडीत बंगला होता. ते सोन्याची साखळी वापरत. टेलीफोन,बंदूक वापरत. (हा इंग्रजांचा काळ दाखवला आहे. त्या मालमत्तेचे रूपांतर आताच्या काळात केल्यास खरी श्रीमंती - रियल इन्कम - कळते) त्यांना चांदीच्या ट्रेमधून चहा दिला जाई. घरात माळी, कारकून , गडी इत्यादी नोकर होते. गावातील बँक मॅनेजर , डॉक्टर,पोलीस अधिकारी त्यांना मान देत.

- कथेत जीएंनी अनेक प्रसंग वापरून श्रीमंत घराचे वर्णन केले आहे. जीएंनी काही कथांत श्रीमंतीचे वर्णन केले आहे. उदा.पारधी (वकील दादासाहेब), प्रदक्षिणा (पुढारी दादासाहेब) , जखम (दुकानदार गोविंदराव) इत्यादी.गरीबीतून श्रीमंतीत येताना अण्णाराव अत्यंत गर्विष्ठ, झाले होते. अशा प्रकारचा जीवनप्रवास समाजात अनेकदा दिसतो. गरीबीतून श्रीमंतीत आल्यावर अनेकदा त्या माणसांचा गरीबांबद्दल दृष्टीकोन हा समजूतीचा न रहाता टोकदार होतो. पैसा ही एक महत्वाची सत्ता असते, याचे जीएंनी अनेक प्रसंगांतून वर्णन केले आहे. रक्तमुखी कथेतही सोन्याचा हव्यास करणारा प्रवासी दाखवला होता.

-अण्णारावांनी काही गुन्हेही केले होते. पेट्रोलचा काळाबाजार केल्यामुळे त्यांना हजार रुपये दंड भरावा लागला होता. प्रतिस्पर्धी व्यापाऱ्याला धंद्यात चितपट केल्यावर , त्या व्यापाऱ्याने बायकोसह विहिरीत जीव दिला. आणि रायण्णा या व्यापारात डोईजड झालेल्या बंदूकधाऱ्याविरुद्ध (खोटी) साक्ष दिल्याने त्याला चार वर्षे तुरुंगात डांबले होते. जीएंच्या काही कथा अशा गुन्हेगारी पार्श्वभूमीवरील आहेत.उदा कसाब (गांगुली), अखेरचे घर (सावित्री) ,राक्षस (गुणी) , स्वामी (महंत) इत्यादी.

- गर्विष्ठपणा, मग्रुरी ठेवूनच अण्णाराव बायको - मुलांशी वागत होते.परिणाम म्हणून बायकोने दागिने मोडून पैसे दिल्यावर ,एक मुलगा सदानंद याने परगावी दुकान काढले.दुसरा चित्रकार मुलगा, जयराम याला अण्णारावांनी माळरानावर कापसाच्या व्यापाऱ्यात सक्तीने गुंतवले. तो वेडा झाला व झुरून मेला. त्यांची मुलगी ,प्रेमा हिचा

प्रेमविवाह अमान्य केल्यावर तिने वेगळे होवून परगावी नोकरी घेतली. त्यांच्या काचामुळे बायको यंत्रवत अबोलपणे घरात वावरत होती.

-" बाजारात जायचे तर बाजारी किंमत द्यायला हवी ", ही अण्णारावांची मनोधारणा होती. नोकर मनासारखे वागले नाही की चुटकीसारखे त्यांना कामावरून काढून टाकायचे, असे विचार त्यांच्या डोक्यात असत. दुकानात नोकरांनी घड्याळ आणायचे नाही ,असे जुलमी नियम त्यांनी केले होते.

- तक्षक पुराणकथा - महाभारतातील तक्षक उपकथेचा वापर जीएंनी कथेच्या शिर्षकात केला आहे. परिक्षित राजाला सर्पदंशाने मृत्यू येणार होता. तसे घडू नये म्हणून त्याने कडेकोट बंदोबस्त ठेवला. तलावात महाल बांधून येणाऱ्यांची तपासणी केली.नंतर काही मुनी त्यांना भेटायला आले.त्यांनी बोरांची भेट दिली. त्यात तक्षक हा साप अळीरूपाने लपला होता.राजा बोर खात असताना तक्षक बाहेर आला. त्याने सर्परूप घेतले व राजाचा घात केला. एखादी छोटीशी गोष्ट, पण वेळ येताच मोठी होवून प्राणघातक होते, असे ही पुराणकथा दाखवते. जीएंनी महाभारतसारख्या प्राचीन ग्रंथांचा बारकाईने अभ्यास केला होता. व कलाकार म्हणून ते समर्पक शिर्षके निवडत, हे या कथेवरून दिसते. अन्यथा "अण्णाराव ", " रायण्णा" अशासारखे शिर्षक वापरले गेले असते. जीएंच्या कथांच्या शिर्षकांपासून , तसेच पुस्तकांच्या नावांपासून वाचक विचार करायला लागतो. उदाहरणार्थ, या काही कथा पहाता येतील -कळसूत्र, प्रदक्षिणा, कसाब, गुंतवळ, वीज, अस्तिस्तोत्र , अहम , गिधाडे , पुनरपी , यात्रिक , रात्र झाली गोकुळी , शलॉट इत्यादी कथांच्या शिर्षकांवरून कथेत काय कथानक असेल ते फार कळत नाही. मग वाचक कथा वाचू लागतो. कथेत काय आहे ,ते शिर्षकाशी कसे जोडले गेले आहे, हे कथा वाचल्यावर कळते. तक्षक शिर्षक वाचून कथेबद्दल कळणार नाही.पण कथा वाचल्यावर तो योग्य संदर्भ कळतो. जीएंची प्रतिभा येथे दिसते.

- संज्ञाप्रवाह - माणसाच्या मानसिक विश्वात तो जागा असताना स्पष्टपणे संज्ञाप्रवाह चालू असतो. जागेपणी एक बाह्य विचार मनात चालू असतानाच, मनात

दुसरा तुटकतुटक विचार चालू असतो. तो व्यक्तही होत नाही. खरे तर झोपेतही अव्यक्त विचार चालू असतात. म्हणजे जिवंत मेंदू असताना त्यात विद्युत प्रक्रिया म्हणजे संज्ञाप्रवाह चालू असतो. कथेत मोठ्या प्रमाणात संज्ञाप्रवाहाचे विचार चालू असल्याचे दाखवले आहेत. उदाहरणार्थ, चाळीला भेट देवून येताना डॉक्टर अण्णारावांना नमस्कार करतात." बंगला घ्यायचाय म्हणून हा नमस्कार आहे ", अण्णाराव विचार करतात.. माळी आला नाही, हे अण्णारावांना कळाले.. डेलियाच्या स्पर्धेत नंबर मिळाला नाही, त्याला काढून टाकले पाहिजे.असा अण्णाराव विचार करतात....

अशा प्रकारे कथेतील संज्ञाप्रवाहाचे चित्रण अभ्यास करण्यासारखे आहे.

- कथेत अण्णारावांना संध्याकाळी रायण्णासारखा माणूस दिसला. मग अण्णाराव अस्वस्थ झाले. रायण्णा तुरुंगातून सुटून आला असे त्यांनी मनात घेतले. कारकून नाही, नोकर नाही ,मुले नाहीत , बंदूक नाही ,टेलीफोन नाही ,अशा घटनांमुळे त्यांना कोंडल्यासारखे झाले. रात्रीचा अंधार भयाण वाटू लागला. रात्री रावजीचा मुलगा पैसे मागायला घरात आला. त्यामुळे अण्णारावांची बायको त्याला मनात काही किंतू न आणता, सहजपणे भेटण्यासाठी जिन्याने माडीवर पाठवते. अण्णारावांनी मनात घेतले की जिन्यावरून रायण्णाच बंदूक घेवून येत आहे.याचा अण्णारावांवर भयानक परिणाम होवून ते कोसळतात. रावजीच्या मुलाला मात्र आपण काय विपरित केले हे कळत नाही.येथे तक्षक कथा संपते. पराचा कावळा होवून कसा जीव जातो हे या कथेत प्रभावीपणे दाखवले आहे. म्हणून तक्षक ही जी एंची लक्षणीय कथा आहे.

- धन्यवाद विलास वाघोलीकर

दिलिप बडे: तक्षक हे सर्पनाव आहे.हे महाभारतातील कथेवरून समजते.पण या शब्दाचा संस्कृत भाषेत काही अर्थ ही असावा अस वाटत राहते.

मंजिरी देशमुख- तक्षक या कथेचे अतिशय यथार्थ सुतोवाच केले व तक्षक चा पौराणिक संदर्भ आपण दिला. खूप धन्यवाद आपले.

तक्षक ही प्रतिमा म्हणजे सर्प आणि असुरक्षितता वाटताच दंश करणे ही त्याची नैसर्गिक प्रवृत्ती.

बालपणी गरिबीतून वाट्याला आलेल्या वंचनेचा सर्प अण्णारावच्या मनात सतत वळवळत राहिला आणि झालेल्या मानहानीच्या दंशाचं विष त्याच्या शरीरात जणू भिनून गेलं. यातूनच पुढे परिस्थिती बदलल्यानंतर कष्टाने मिळवलेल्या संपत्तीचा आनंद कुटुंबियांसमवेत घेण्याचं सोडून स्वतःच तक्षक प्रवृत्ती झालेला तो त्याच्या वाटेत आलेल्या इसमांना दंश करतो. त्याच्या दंशातून त्याचे व्यवसायातील स्पर्धक, आसपास वावरणारी माणसे, किंवा त्याची मुलं देखील सुटत नाही.

ताठ फण्याचा अण्णाराव कथेच्या शेवटी भितीपोटी वेड लागलेला पाहून वाचक स्तिमित होतो. आयुष्यभर त्याच्या मनात वास करून असलेल्या तक्षकाने त्याचा बळी घेतला असेच म्हणावे लागेल. तक्षक कथेतील अण्णाराव हे मानवी मनातील गुढ मनोव्यापारांचा खेळ दाखविणारं विलक्षण असं जी एंचं या कथेतील केवळ एक पात्रं आहे.

संपूर्ण कथेला अदृष्य वेटोळी घातलेला व सर्वांना कधी ना कधी (परिस्थिती किंवा अण्णारावच्या रूपाने) दंश करणारा तक्षक मला कथेचा खरा नायक वाटतो व शीर्षक अर्थपूर्ण वाटते.

जी. ए. कुलकर्णी हे मराठी साहित्यातले रत्नच. त्यांची प्रत्येक कथा पैलूदार असे. या प्रत्येक पैलूचे नेमके आकलन होणे हे कोणा एका वाचकाला दुरपास्तच.

२०२२-२३ हे जी. ए. यांचे शताब्दी वर्ष होते! या वर्षाचे औचित्य साधून जाणत्या जी.ए.प्रेमी वाचकांनी एक उपक्रम हाती घेतला. आभासी पद्धतीने एकत्रित येऊन त्यांनी जी. ए. यांच्या १४ कथांवर विविधांगाने चर्चा केल्या, अनेक मते, दृष्टीकोन मांडले. संकलित केले. ही संकलने सात खंडांत उपलब्ध आहेत. जी.ए. यांच्या कथावाचनाचा आनंद घेतांना या चर्चा जी.ए.प्रेमी तसेच अभ्यासक-समीक्षकांना निश्चितच उपयुक्त ठरतील. हा मौल्यवान ठेवा आपल्याकडे नक्कीच हवा!